हिन्दूराष्ट्र—

स. ग्रं. सं. ठाणें
विषय हिंदी
सं. नं. २५९

र्वी, आतां नि पुढें





REFBK-000626

— बाबाराव सावरकर

हिन्दूराष्ट्रग्रन्थमाला – पुष्प २ रें

हिन्दूराष्ट्र

मुंबई आणि पुणें

लेखक—
दे. भ. बाबाराव सावरकर

REFBK-0006268

– प्रकाशक –
हिन्दूराष्ट्रग्रन्थमाला
टपाल पेटी क्रमांक ३५६०
मुंबअी ४

किंमत तीन रुपये

मार्गदर्शक —
डॉ. ना. दा. सावरकर,
शिवाजी उद्यान, दादर – मुंबई
श्री. ग. वि. केतकर
बी. ए. एल्एल्. बी. वकील,
संपादक–'मराठा', पुण्यनगरी [पुणें]

प्रकाशक —
वसन्त पि. वैती
९, सच्चिदानंद भुवन,
दुसरी सुतार गल्ली,
मुंबई ४

पत्रव्यवहारार्थ पत्ता

व्यवस्थापक —

हिन्दूराष्ट्रग्रन्थमाला

टपाल पेटी क्रमांक २५६०

मुंबई [हिन्दुस्थान]

सर्वाधिकार लेखकाधीन

मुद्रक
अ. वा. देसाई, एम्. ए.
प्रभाकर आर्ट प्रिण्टरी,
कृष्ण निवास, मांगलवाडी, **मुंबई ४**

प्रकाशनकाल
मिति जेष्ठ व॥ २ सोमवार १८६४
दिनांक १ जून १९४२
किंमत तीन रुपये.

प्रस्तावना.

हिंदूराष्ट्रावरील संकटांची शीग भरत आली आहे—नव्हे पूर्ण भरली आहे. हिंदुस्थान आधींच पारतंत्र्याच्या पाशांत सांपडून मुक्ततेसाठीं प्रयत्न करीत असतां गुदमरून गेला आहे. अंतर्गत कलहाचें भूत जागृत झालेलें आहे. अशा स्थितींतच सर्व जगभर पसरूं धांवणाऱ्या जगड्व्याळ महायुद्धाचा वणवा पेटून हिंदुस्थान भोंवतीहि त्याच्या ज्वाळा लपेटूं लागल्या आहेत. आणि अशी सकारण भीति वाटत आहे कीं हिंदुस्थानभूमि परकीयसत्तांचें रणक्षेत्र बनून हिंदुस्थानांत अराजक निर्माण होअील नि त्या अराजकाचा लाभ घेण्यासाठीं हिंदुस्थानच्या जिवावर अुठलेला अंतःकलहाचा समंध सर्व देशभर थयथयाट करूं लागेल. जात्यंधता पिसाटासारखी पिसाळत दंगे, मारामाऱ्या, लुटालूट, हत्याकांडें, अत्याचार, जाळपोळ अित्यादींचा देशभर कहर अुसळवील. ही वस्तुस्थिति राष्ट्रापुढें यथाशक्य स्पष्टपणें मांडावी नि ती राष्ट्राला कळावी.

तसेंच, अशा वेळीं काय करावें हें सांगणारा असला तरी देशाच्या या महाभयंकर नि असहाय्य स्थितींत देशवासियांनीं–राष्ट्रिकांनीं–काय करावें हें सांगण्यास तो धजावणार नाहीं. कारण जें कांहीं अशा स्थितींत करावयाला हवें आहे तें करण्याचें सामर्थ्य देशाजवळ कमावलेलें नाहीं. यामुळें जें करणें अवश्य तें सांगतां येणें अशक्य आहे. असल्या परिस्थितींत शक्यांत शक्य असें काय करीत रहावें कीं ज्यायोगें या चालू झालेल्या नि पुढें चालू होणाऱ्या आपत्तींत त्यांतल्यात्यांत स्वसंरक्षणाला हिंदूजाति थोड्याबहुत अंशानें तरी समर्थ ठरेल, नि या चालू परिस्थितींत जागतिक घडामोडींच्या आणि घटनांच्या प्रवाहांतून यदृच्छेनें जी बरीवाअीट स्थिति निर्माण होअील त्या स्थितींत तिला पुढील

मार्गांच्या आक्रमणासाठीं जो अुपयोगी पडेल असा मार्ग नि अुपाय—जो हिंदूराष्ट्रनेते सांगत आहेत तो—पुढें ठेवावा. आणि

अत्यंत असहाय्य स्थितींत धीर ढळूं न देतां अुपायावलंबन करण्यास हिंदू मनें भावी कालाविषयीं आशापूर्ण असावींत यासाठीं त्यांना त्यांच्या असामान्य-पणें तेजस्वी, ओजस्वी नि दिव्य भूतकालाचें स्मरण व्हावें कीं ज्यामुळें संकटांच्या कशाहि कचाट्यांतून सुटून वर्तमानकालीन भीषण झगड्यांशीं झगडत भव्य भविष्यकाल घडविण्याचें सामर्थ्य स्वभावतःच आमच्यांत आहे असा आत्मविश्वास त्यांच्यांत अुत्पन्न व्हावा अशा या तीन गोष्टी साधाव्यात—

म्हणून 'हिंदूराष्ट्र' (पूर्वी, आतां नि पुढें) या पुस्तकाचा प्रपंच केला आहे. 'खऱ्या समर्थ मार्गदर्शकाचें स्पष्टतर मार्गदर्शन होअीपावेतों अत्यंत गडद अंधःकारांत आगपेटीच्या अेखाद्या पेटत्या काडीच्या ज्योतींत जितकी ओझरती वाट दिसते तितका जरी अुपयोग या प्रयत्नाचा झाला तरी आपल्या सेवेचें सार्थक झालें असें मला वाटेल. ही अल्पसी सेवा ह्या सनातन नि विराट् हिंदूराष्ट्र देवाचे चरणीं अर्पण असो.

अनेक राष्ट्रसेवकांपैकीं
अेक
ग. दा. सावरकर

हिंदूराष्ट्र पुस्तक लेखनार्थ, आधारार्थ अुपयोजलेलीं

पुस्तकें–वृत्तपत्रें आदिकांची टिपणी

पुस्तकें

१ हिंदूसमाजदर्शन–ले. धर्मवीर ल. व. भोपटकर
२ हिंदुमुसलमान–वा. रा. शिंदे–बडोदें
३ सिडिशस् कमिटी रिपोर्ट–सरकारी प्रकाशन
४ थॉट्स् ऑन पाकिस्तान--डॉ. आंबेडकर
५ पाकिस्तानचें संकट–शि. ल. करंदीकर
६ पाकिस्तान–बाबू राजेंद्रप्रसाद
७ कान्फिडरेसी ऑफ् अिंडिया-मे. पंजाबी
८ भारतीय श्रेष्टत्व–द. गो. लिमये
९ प्यान अिस्लामिक सोसायटी–प्या. अि. सो. लंडन १९०३ (बुकलेट)
१० खतरेका घंटा–स्वामी श्रद्धानंद
११ गांधी मुस्लिम कान्फिरसी–अे. न्याशनॅलिस्ट
१२ व्हिदर मायनॉरिटीज–दलाल
१३ राष्ट्रमीमांसा–दुर्गातनय
१४ हिंदुत्व–व्या. सावरकर
१५ फंडामेंटल युनिटी ऑफ् अिंडिया–प्रा. राधाकुमुद मुकर्जी
१६ पाकिस्तान–कुलकर्णी
१७ मेवेल ऑफ पाकिस्तान–ग. वि. केतकर, सं. मराठा
१८ आरबमे सात साल–पं. रुचिराम
१९ यं. अिस्लाम ऑन ट्रेक–व्यासिल म्याथ्युज.
२० हिंदुमुसलमान युनिटी–अेन. अेस. बापट
२१ सिंहाला शह–श्री. रा. टिकेकर
२२ विश्वपर हिंदुत्व का प्रभाव–पं. विश्वनाथशास्त्री
२३ पाकिस्तान–अे. पंजाबी
२४ कम्यूनल अवार्ड–प्र. अे. अेन. पांड्ये
२५ न्याशनॅलिझम् अिन् हिंदू कल्चर–प्रो. राधाकुमुद मुकर्जी
२६ प्रेसिडेन्सियल् अॅड्रेस्–ब्या. जिना
२७ कल्चरल् फ्यूचर ऑफ अिंडिया–सय्यद अब्दुल लतीफ
२८ कम्यूनल हरमनी–पर्सिव्हल स्पीअर
२९ काँग्रेस सरकार की अुदार नीति–यु. पी. सरकारची मुसलमानांतच वांटण्यासाठीं गुप्त पात्रिका

वृत्तपत्रें

१ श्रद्धानंद मराठी–सं. डॉ. ना. दा. सावरकर
२ केसरी–सं. ज. स. करंदीकर
३ काळ–सं. शंकरराव दाते
४ बॉम्बे क्रॉनिकल–सं. ब्रेलवी
५ हरिजन–सं. गांधी
६ स्वधर्म–सं. हरीभाअू जोशी
७ भारत मित्र–.....कलकत्ता [हिंदी]
८ हिंदी लोकमान्य–.....,,
९ हिंदु आअूटलुक–सं. अिंद्रप्रकाश, नवी दिल्ली
१० टाअिम्स–.....मुंबअी
११ टणत्कार–.....विलेपार्ले
१२ अर्जुन–सं. द्वा. अिंद्र
१३ लिबरेटर–हुतात्मा स्वा. श्रद्धानंद
१४ नवाकाळ–सं. खाडिलकर अि. अि.

मराठी संशोधन मंडळ
दा. क्र. ५२६
गो. क्र. १९०१५

हिंदूराष्ट्र

(पूर्वी, आतां नि पुढें)

प्रवेश

विशेष अुष्ण प्रदेशांतील अुष्णतेनेंच अुबून फुटणाऱ्या अंड्यांतून निर्माण होणाऱ्या असंख्य टोळांची भूक त्यांचा जन्मदेता प्रदेश शमवूं शकत नसल्यानें त्या भुभुक्षितांना तो रेताड प्रदेश वा खडकाळ भूभाग सोडावा लागतो नि जेथील शेतें पिकांनीं डवरलेलीं असतात नि ज्या स्थळींचीं वनोपवनें फलपुष्पांनीं संपन्न झालेलीं दिसतात त्याच प्रदेशाकडे या भुकेल्या भुतावळीची—टोळांची धाड जाअून आदळते. तद्वतच या जगांतील अेकमेवतेनें चिरंजीव ठरलेल्या भाग्यशाली हिंदुस्थानवर आज दहा बारा शतकांपासूनं (१२०० वर्षांपासून) संकटांचीं टोळधाड येअून धडका देअूं लागली. हिंदुस्थानची जीवनशक्ति अद्वितीय नि म्हणूनच त्या सर्व संकटांशीं टक्कर देत अद्यापहि तो जिवंत राहूं शकत आहे. अितर कोणताहि देश नि त्यांतील जाति हिंदुस्थानवरील संकटांच्या शतांशानें जरी संकटांत सापडली असती तरी त्यांचा चुराडा झाला असता. हा नुसता तर्क नव्हे. अितिहासच याची साक्ष देत आहे. हिंदुस्थानवर १२०० वर्षांपूर्वी येअून आदळलेल्या मुस्लीम संकटांच्या पहिल्या कांहीं धक्क्यांतच आशिया नि युरोपमधील अनेक देश नि जाती धुळीला मिळाल्या आहेत. त्यांचे केवळ अितिहासांत नांव मात्र अुरलेलें असेल. असामान्य जीवनसत्वानीं हिंदुस्थान संपन्न होता म्हणूनच नष्ट झाला नाहीं नि परमेश्वर साह्य

असला तर होणारहि नाहीं. पण सांप्रत मात्र संकटांची तीव्रता नि सर्वग्रासिता अितकी वाढली आहे कीं तत्काल हिंदुस्थानवासी हिंदूनीं भगीरथ प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरच हिंदुस्थान पुन्हां भाग्यपथाचा पथिक होअूं शकेल. नाहीं तर सांप्रतच्या संकटांची सर्वग्रासिता अितकी भयंकर आहे कीं हिंदुस्थानच्या जीवनाची निराशादायी शंकाकुलता अुत्पन्न व्हावी.

भूतकालीन दिव्यता
भविष्यकालची हमी असते.

संकटांच्या तीव्रतेनें अंतःकरणें विदीर्ण होतात आणि निराशेनें मन ग्रस्त होअून भावी अुन्नतीची, अुत्कर्षाची नि संकट मुक्ततेविषयीची आशा करपून जाते. हिंदुस्थानवरील संकटांचें स्वरूप तर अतीव हृदयविदारक आहे तें पाहून मनावर निराशामय औदासिन्याची दाट छाया पसरूं नये म्हणून संकटग्रस्त हिंदूबांधवांना पूर्वकालीं आपला हा प्राचीन देश, विद्या, कला, शास्त्रें, तत्वज्ञान, आदिकांत कसा सर्वश्रेष्ठ होता; शौर्य, धैर्य, पराक्रमादींचे योगानें तो कसा अद्वितीय गणला गेला होता; स्पृहणीय ऐश्वर्य संपन्नतेनें कसा नटला होता नि जगाच्या शीर्षस्थानीं जगदुगुरु नात्यानें कसा नांदत होता हें कळावें आणि औदासिन्याचे आहारीं न जातां भावी कालांत याहिपेक्षां श्रेष्ठतर स्थिति प्राप्त करून घेण्याच्या महदाकांक्षेनें प्रस्फुरित होअून हिंदूमात्र सुदीर्घ प्रयत्नी बनावा म्हणून पूर्व कालांतील भाग्यवान् हिंदुस्थानचें दर्शन होण्यासाठीं वाचकांना घेअून भूतकालांत थोडासा प्रवेश करावयाचें ठरविलें आहे.

पूर्वी

भाग्यवान् हिंदुस्थानचा

भूतकालीन भाग्यकाल.

"सांप्रत पराक्रमानें, बुद्धिवैभवानें, राजनीति–कुशलतेनें नि सामर्थ्यानें गर्वोद्धत झालेल्या झाडून साऱ्या जातींचे, वा ज्या जाती अतिहासगम्य भूतकालांत या वा त्या गुणानें नि श्रेष्ठत्वानें साम्राज्यें भोगून चमकून विझून गेल्या त्या जातींचे पूर्वज या सनातन हिंदूराष्ट्रानें नागवे अुघडे अंगाला रंग लावून फिरतांना पाहिलेले त्याला ताजेपणानें आठवत आहेत. जगांतील कांहीं जातींचें वय शेकड्यांनीं तर कांहींचें अर्ध सहस्रांनीं पण मोजतां येतें. परंतु कालाच्या जणू पितृस्थानीं शोभणाऱ्या या हिंदूराष्ट्रानें कालाचें मोजमाप आपल्या स्वतःचे वयोगणनेला लंगडें पाडिलें. याच्या संस्कृतीच्या, सामर्थ्याच्या, वैभवाच्या नि महत्तमतेच्या कालाचा आरंभ अतिहासास ठाअूक नाहीं. या राष्ट्राच्या अतिहासाचें पहिलें पान सांपडत नाहीं; याचें आयुष्य मोजण्यासाठीं शतकांचे मानदंड मोडून जातात–सहस्रांचे तोकडे पडतात, या राष्ट्रानें जगांतील सर्व धर्मपंथांना नि मतांना जीवन दिलें; याचें तत्त्वज्ञान सर्व जगाच्या तत्त्वज्ञानाला खाकोटीस मारूनहि 'अत्यत्तिष्ठत् दशांगुलम्' (सर्वांनीं जें जें सांगितलें तें पूर्वीच सांगूनहि जें कोणी सांगितलें नाहीं वा सांगूं शकले नाही तेंहि सांगून टाकून अितरांना सांगावयास अधिक कांहीं ठेवलें नाहीं.) असें अतिसीमाव्यापी वा अनंतस्वरूपी होअून चकाकत आहे. जगांतील सर्व अुच्च संस्कृतींचे जन्मदानी हें राष्ट्र आहे, यानें अनेक राष्ट्रांचे जन्ममृत्यू पाहिलेले आहेत, हें राष्ट्र अतिप्राचीन असून याचे पाय पातालाच्याहि अधःस्तलावर रोवलेले आहेत नि याचें मस्तक सात स्वर्गांच्याहिवर ब्रह्मप्रदेशीं पोचलेलें आहे; रामकृष्णादि दिव्यपुरुष, आणि

व्यासवाल्मिकादि महान् ऋषि याच्या मुकुटाला दीप्तिमंत करीत आहेत; कर्णभीमाजुर्नासारखे नरमणि याच्या कंठांतील कंठमणि झालेले आहेत; धर्म–नल अित्यादि प्राचीन कालीन, अशोक–चंद्रगुप्त–समुद्रगुप्तादि मध्यकालीन सम्राट्‌रत्नें ज्याचे कंठांत रत्नहारासारखे शोभतात; पृथ्वीराज–संग्रामसिंह–महाराणा प्रताप–छत्रपति शिवराज–राजा छत्रसाल यांच्यासारखे महान् प्रतापी पुरुष जेथें या राष्ट्राचें सिंहासन अढळ नि अचल ठेवण्यासाठीं सिद्ध होतात; वीर वैरागी–गुरुगोविंदसिंह–छत्रपति संभाजी असल्या ज्ञात वा अज्ञात अशा दिव्य हुतात्म्यांनीं ज्याच्या मानरक्षणार्थ आपल्या प्राणांचे बळी देऊन त्याच्या नांवाचा प्रबल शत्रूंनासुद्धां धाक बसविला; याच्या पोटीं चाणक्य–नाना फडणवीस सारखे राज्यकार्य–धुरंधर पुरुष कालारंभापासून निर्माण होऊन याची राज्यकार्यधुरा वहात आहेत; प्रसंगीं प्रसंगीं वीरभद्र, कार्तिकेय, श्रीराम, धृष्टद्युम्न, अर्जुन, सुग्रीव, विक्रम, शालिवाहन, चामुंडराय, वीर संग्रामसिंह, श्रीशिवराय, धनाजी, संभाजी, बाजीराव, भाऊसाहेब, माधवराव, तात्या टोपे, रण–दुर्गाश्रीलक्ष्मीबाअी आदिक शतशः नव्हे सहस्रशः सेनाधिप सेनाचालना करीत या राष्ट्राचें गौरव नि सामर्थ्य दिगंत पसरविण्यासाठीं तनमनधनानें तत्पर आहेत; ज्याच्या दिव्य नि महान् तत्वग्राही बुद्धिमत्तेच्या तेजस्वितेकडे पाहतांच तत्वज्ञांच्या बुद्धिमत्तेची दृष्टि दिपून जावी असे श्रीशंकराचार्यांसारखे अद्वितीय तत्ववेत्ते अनादिकालापासून सर्व जगाला तत्वज्ञानाचा प्रकाश देत आहेत; अलौकिक प्रेमानें आर्द्र नि दैवी दयामयतेनें मूर्तिमंत दयेलाहि लाजवीत ज्यांच्या हृदयानें 'आत्मवत्' सर्व भूतें जाणून जगांतील अखिल मानवी जातीलाच नव्हे तर यच्चयावत् प्राणीमात्रांना आलिंगन देण्याकरितां आपले बाहू अुभारावे असे अतुल प्रेममय नि अलौकिक दयाशील गौतमबुद्ध, जैनाचार्य महावीर अित्यादि महात्मे ज्याचे पोटीं अुत्पन्न होऊन या हिंदू राष्ट्राचें हृदय विश्वव्यापी प्रेमरसानें कसें ओथंबलेलें आहे नि म्हणून सत्वगुणोत्कर्षानें कसें विभूषित झालेलें आहे हें सिद्ध केलें; आणि हें राष्ट्र अशा रीतीनें दिव्य विभूति, महान् ऋषी, पराक्रमी वीर, निर्भय हुतात्मे, समर्थ राज्यकार्यधुरंधर, तेजस्वी नि पराक्रमी सेनाधिप प्रसवते नि प्रेममय महापुरुषांना जन्म देते; सर्व शास्त्रांची खनि, कला-कौशल्याचें माहेरघर, सर्व सद्गुणांचें आगर, अखिल विद्यांचें अुगमस्थान असें

हें सनातन हिंदुराष्ट्र आहे " मनुष्य जन्म दुर्लभ नि त्यांतहि अशा अद्वितीय श्रेष्ठतासंपन्न राष्ट्रांत तो आपल्याला आलेला आहे हे आपलें विशेष भाग्य आहे. असें हें अेकदां जगच्छीर्षस्थानीं विराजमान् झालेलें सनातन राष्ट्र नि त्यांतील दिव्य हिंदुजाति आज मरणशंकेंत सांपडलेलीं आहेत. अशा वेळीं त्या देवप्रिय हिंदुराष्ट्र–जातीची सेवा करण्याचे महत्पुण्यसाधनार्थ अतीव भाग्याची अशी महनीय संधि आपणांला लाभलेली आहे. या वेळीं प्रत्येक हिंदुराष्ट्रघटकानें नि हिंदूजातीच्या प्रत्येक सत्पुत्रानें तनमनधनाची सर्व शक्ति अुपयोजीत हिंदूराष्ट्रसेवा-करून परमपुण्यसंपादनद्वारा देवकृपा जोडण्यास सिद्ध व्हावें. तरच देह सार्थकीं लागला असें होअील.

अेकांतांत स्वतःच अेखाद्या आरशा पुढें जाअून स्वतःचें तोंड लडिवाळपणें पहाणाराला साधारणतः आपलें स्वरूप निर्दोष–सुंदर आहे असें, क्षणभरच कां होअीना, पण वाटण्याचा संभव असतो; हिंदुजातीय विचारकालाहि आपल्या हिंदुराष्ट्र–जातीसंबंधानें तसें वाटणें स्वाभाविक आहे असें कोणाला कदाचित् दोषैकदृष्टीनें वाटण्याचा संभव आहे. तसें कोणाला वाटण्याचा संभव अुरूं नये म्हणून निरनिराळ्या देशांतील निरनिराळ्या जातीच्या निरीक्षकांना निरनिराळ्या वेळीं हिंदूजाति कशी दिसली याविषयींच्या त्यांच्या साक्षी संगृहित करणें अवश्य आहे. यासाठीं त्या साक्षी हिंदूजातीविषयीं वर जें सूत्ररूप वर्णन केलें त्याहून काकणभर अधिक स्तुतीच्या आहेत किंवा तें वर्णन अवास्तव आहे हें पहाणें आपणांला क्रमप्राप्त झालेलें आहे.

हिंदुस्थानची निसर्गसंपत्ति

'मरे' नामक अितिहासकार आपल्या 'हिंदुस्थानचा अितिहास' या पुस्तकांत म्हणतो कीं "हिंदुस्थानांतील सृष्टिशोभेची भव्यता, विशालत्व, विविधता, आणि त्या भूमींत अुपन्न होणारी अनेक प्रकारची बहुमोल नि विपुल धान्यसंपत्ति या गोष्टींत जगांतील कोणताहि देश हिंदुस्थानची बरोबरी करूं शकणार नाहीं" हिंदुस्थानच्या अतुल नि अवर्णनीय अशा विविध सृष्टीसौंदर्याविषयीं परदेशस्थ अितिहासकाराचें म्हणणें वर दिलेलें आहे. त्याचप्रमाणें अनेक सृष्ट्युपासकांचेहि अुद्गार विपुल संख्येंत देतां येतील. त्यांत सृष्टि देवतेची हिंदुस्थानवरील अद्वितीय

कृपा दिसून येअील; परंतु हिंदूजातीचें सर्वोच्च नि सर्वांगीण स्वयंश्रेष्ठत्व ठरविण्यास निराळ्याच वर्णनाची आवश्यकता आहे नि म्हणून सृष्टि देवतेचें कृतज्ञतापूर्वक पण संक्षिप्त कृपावर्णन झालें तेंवढेंच पुढें करून हिंदुजात्यंतर्गत श्रेष्ठत्वाकडे वळूं.

हिंदू जातींतील गुणमहत्ता.

ज्याप्रमाणें या पृथ्वीवरील सृष्टीदेवतेचें अद्‌भुत नि अलौकिक सौंदर्य हिंदुस्थानांतच येकवटलेलें आहे त्याचप्रमाणें अखिल मनुष्य जातीची शक्य कोटींतील उत्कर्ष—भूतीहि हिंदुस्थानांतच प्रकट झाली आहे आणि म्हणून सृष्टीच्या भक्ताला नि मनुष्यसमाजाच्या विभवाचे कौतुकानें निरीक्षण करणाऱ्याला नि अभ्यासकाला हिंदुस्थान देश नि हिंदुजाति हा येक प्रकारचा 'सनातन ग्रंथच आहे' असें म्हणण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं. **कौंट जार्नस्टजर्ना** नामक चिकित्सक ग्रंथकाराचें म्हणणें आहे कीं "नखशिखांत लोखंडी चिलखत घातलेला राजपुतान्यांतील अश्वारूढ योद्धा नि श्रीकाशीच्या देवालयांतील ईश्वर भक्त नि धर्मनिष्ठ ब्राम्हण पहा; आपल्या सैनिक नौकांतून (लढाअू जहाजावरून) किंवा चपल घोड्यावरून त्वरेनें हालचाली करणारा कडवा मराठा अथवा हत्तीवर बसून मंदगतीनें चालणारा येखादा राजवंशीय यांकडे दृष्टि द्या; अथवा अरण्यांत वाघाची मृगया करणारी वीरस्त्री नि आपल्या कामवासना ईश्वरपदीं समर्पण करणारी भक्तिनी पहा, तुम्हांस हिंदुस्थानांत विलक्षणता, भव्यता नि चमत्कृतिजनकता हीं आढळल्यावांचून रहाणार नाहींत" **कर्नल टॉड** नामक प्रख्यात राजपुत—अितिहासलेखक म्हणतो "ग्रीक तत्वज्ञानाला किंबहुना प्लेटो, थेल्स, पायथ्यागोरस आदिक तत्ववेत्यांना गुरुस्थानीं असलेलीं तत्वज्ञानदर्शनें निर्माण करणारे ऋषी हिंदुस्थानांव्यतिरिक्त दुसरे कोठें आढळणार? ज्यांचें ज्योतिषज्ञान पाहून सांप्रतहि युरोपीयन पंडितांस आश्चर्य वाटतें असे ज्योतिषशास्त्रज्ञ, युरोपीय तज्ञांच्या अद्यापहि आदरास पात्र होणारी प्रचंड नि सुंदर लेणीं कोरणारे शिल्पशास्त्रज्ञ नि मूर्तिकार आणि राग नि स्वर बदलून श्रोत्यांचीं अंतःकरणें आनंदांतून दुःखांत नि दुःखांश्रूंतून हर्षस्मितांत सहज लीलेनें नेणारे गायक हिंदुस्थानावाचून दुसऱ्या देशांत कोठचे सांपडणार? "**प्रो. हीरन** आपल्या 'हिस्टारिक टीचर्स'मध्यें म्हणतात 'केवळ आशियाखंडाचेंच नव्हे तर युरोपखंडांतील लोकांचेहि सर्व ज्ञानांचा नि धर्माचा अुगम हिंदुस्थानांतच

आहे " **म्याक्समुलर** ' हिंदुस्थान नि तो आम्हाला काय शिकवील ' या आपल्या ग्रंथांत म्हणतात " सृष्टिदेवतेनें आपली समृद्धि, सामर्थ्य नि सौंदर्य ही सर्व पूर्णपणें ओतून कोणत्या देशाला मृत्युलोकचें नंदनवन बनविलें आहे हें पहाण्यास मी जर जग धुंडाळावयास लागलो तर मला शेवटीं हिंदुस्थान-कडेच बोट दाखवावें लागेल; मानवी अंतःकरणाच्या नि बुद्धीच्या श्रेष्ठवृत्ती नि शक्ती कोणत्या देशांत पूर्णतेस पोंचल्या आहेत ? सृष्टींतील नि संसारांतील अत्यंत महत्त्वाच्या गूढ प्रमेयांचा सूक्ष्म नि खोल अभ्यास कोठें झाला आहे ? नि प्लेटो, क्यांट प्रभृति तत्ववेत्त्यांच्या ग्रंथांचें परिशीलन केलेल्या पंडितांच्याहि अध्ययनास सर्वस्वीं पात्र होअील असा वरील गूढ प्रमेयांचा अुलगडा कोठें केलेला आहे ? असे कोणी मला प्रश्न करील तर हिंदुस्थान, हिंदुस्थान, हिंदुस्थान असें अेकच मी अुत्तर देअीन. ग्रीक, रोमन नि यहुदी या तीनच राष्ट्रांचे विचार, वाङ्मय नि संस्कृति यांवरच युरोपियन राष्ट्रांचें आजपर्यंत पोषण झालेलें असल्या-मुळें त्यांचें अध्यात्मिक जीवन अपुरें, खुरटें नि आकुंचित झालेलें आहे. हें जीवन खरोखर परिपूर्ण, विशाल, नि सर्व मनुष्यता आकलन करीत विश्वव्यापक करावयाचें असल्यास आपण कोणत्या देशांतील वाङ्मयाकडे धाव घ्यावी असा मी माझ्या मनाशीं विचार करूं लागलो तर भाग्यशाली भरतखंडच माझ्या डोळ्यापुढें अुभा राहतो ! भाषा, धर्म, पुराणकथा, निर्बंध (कायदे), चाली-रीती, प्राचीन कला, प्राचीन शास्त्रें, अित्यादि जे मानवी मनोबुद्धीचे निरनिराळे विकास नि विलास आहेत त्यापैकीं कोणत्याहि अेकाच्या विशेष अध्ययनास आरंभ केल्यावर, तुम्हांस आवडो वा न आवडो, तुम्हांस हिंदुस्थानकडेच जाणें भाग पडेल ! कारण मानवी अितिहासाच्या अत्यंत महत्त्वाच्या नि बोधकारक सामग्रीचें भांडार हिंदुस्थानांत—केवळ अेकट्या हिंदुस्थानांतच—साठविलेलें आहे."

सारांश, राष्ट्रीय प्रपंचाचें कोणतेंही अंग घ्या किंवा मानवी मनोबुद्धिविकासाच्या कोणत्याहि शाखेचा विचार करा. त्या प्रत्येकांत प्राचीन हिंदूलोक श्रेष्ठ नि अग्रगण्य होते. आणि हें वैशिष्ट्य जगांतील अितर कोणत्याहि राष्ट्राचे ठायीं दिसून येत नाहीं, असेंच प्रत्ययास येअील. आजपर्यंत जगांत अेखादें राष्ट्र युद्धविद्येंत तर दुसरें व्यापारांत श्रेष्ठ झालें असेल,

कोणी तत्वज्ञानांत तर कोणी काव्यांत, कोणी शास्त्रांत तर कोणी कलाकौशल्यांत निष्णात झालें असेल. अेखादें राष्ट्र राजकीयदृष्ट्या अुच्चपदास पोंचलें असेल पण तें नैतिक नि बौद्धिकदृष्ट्याहि तितकें श्रेष्ठ असेलच असें नाहीं. पण सर्व गोष्टींत सारखेच अग्रगण्य नि सर्वांहून पुढें असें प्राचीन हिंदुराष्ट्राव्यतिरिक्त पृथ्वीचे पाठीवर अेकहि राष्ट्र पूर्वीहि झालेलें नाहीं नि सांप्रतहि नाहीं. आणि भावीकालांत कोणी होणार असेल तर ती शक्ति–म्हणजे **सर्वांगीण श्रेष्ठत्व प्राप्त करण्याची शक्ति–केवळ या सनातन हिंदू-राष्ट्रांतच आहे. अितरांत नव्हती नि म्हणून पुढेंहि असणार नाहीं.**

प्राचीन हिंदूराष्ट्राचें असें भपकेदार रंगांत चित्र रेखाटून त्याचे दोष लपवून ठेवणें नि गुण तेवढेच फुगवून सांगणें हें अयोग्य आहे असा कोणी टीकाकार ध्रुव आक्षेप घेतील. तर त्यांना अुत्तर असें कीं पर्वताची अुंची त्याच्या अत्युच्च शिखरांवरून ठरवावयाची असते, त्याच्या पोटांत सामावलेल्या डोंगरा टेकड्यांच्या अुंचीवरून नव्हे. हिमालय पर्वतास 'नगाधिराज' ही पदवी–ही यथार्थ पदवी–मसुरी, दार्जिलिंग, वा सिमलासारख्या सामान्य डोंगर–अुंचीवरून मिळाली नसून गौरीशंकर, धवलगिरी नि कांचनगंगा या गगनचुंबी शिखरांवरून मिळाली आहे. 'नगाधिराज' म्हणतेवेळीं या लहान लहान टेकड्या–डोंगरांचें चित्र डोळ्यापुढें आणावयाचीं नसून या गगनाशीं स्पर्धा करणाऱ्या अत्युच्च शिखरांची भव्यता पुढें अुभी ठाकलेली बघावयाची असते हें त्या टीकाकारध्रुवांनीं ध्यानांत ठेवावें. त्याचप्रमाणें हिंदूंची संस्कृति नि हिंदुराष्ट्रानें जगांत केलेलीं महत्कार्यें यांचें मोजमाप करतांना अत्युच्च शिखराचेंच मोजमाप घेणें योग्य आहे.

असीरियन, बाबिलोनियन, अिजिप्शियन, ग्रीक, अिराणी, रोमन आदिक अनेक राष्ट्रें प्राचीन काळीं अुदयास आलीं, वैभवाला चढली आणि राज्यक्रांति, सामाजिक अुत्पात वा वर्णविद्वेषाचे भूकंप यांचे तडाख्यांत सांपडून नामशेषहि झालीं. पण असल्या क्रान्त्यांतून, अुत्पातांतून नि भूकंपांतूनहि वर वर्णन केल्या प्रकारचें भाग्यशाली हिंदूराष्ट्र आपला विशिष्ट हिंदूपणाचा स्थायीभाव टिकवून अद्याप जिवंत राहिलें आहे? यांचें कारण काय? हिंदुधर्माचें हें महान् मंदिर सनातन सत्याचे पायावर अुभारलें असून त्याच्याच आश्रयानें जन्मलेली नि

वाढलेली जी हिंदुसंस्कृति तींत विलक्षण जिवंतपणा नि श्रेष्ठता आहे; आणि म्हणूनच त्या धर्मांत वाढलेलें नि त्या संस्कृतीनें पोसलेलें हिंदुराष्ट्र अजून जिवंत राहिलें आहे. अितर राष्ट्रांचे अुदय हे अुल्कापात वा धूमकेतूचें आगमन-निर्गमन याप्रमाणें अल्पकालव्यापी ठरलें पण हिंदूराष्ट्राचें वैभव नि हिंदुसंस्कृति यांच्या सूर्यास मधुन मधुन मेघांनीं व्यापलें वा ग्रहणानें ग्रासलें तरी हा हिंदुराष्ट्राचा वैभव-संस्कृति-सूर्य सर्व जगाच्या दूरदूरच्या कोनाकोपऱ्यांतहि आपला प्रकाश, अुष्णता नि चैतन्य पसरवीत आणि मानवजातीस समाधान नि सौख्य यांचा लाभ करून देत प्रकाशवित आला आहे-नि पुढेंहि पुन्हां ग्रहण-मुक्त होअून तेंच जगत्कल्याण कार्य करीत राहील यांत शंका नाहीं. आतां राष्ट्रजीवनाच्या विविध क्षेत्रांत हिंदूराष्ट्राच्या अुत्कृष्ठतेचें निरीक्षण करून मग पुढील मार्गक्रमणाला लागूं.

हिंदुसमाज घटना

"सजीव नि सचेतन प्राण्यांची गुणपरिणाम शक्तीनें जसजशी सुधारणा होत जातें, तसतसें त्यांच्या शारिरीक व्यापारांसाठीं त्यांच्या आरंभीच्या अेकरसी नि अेकरूपी शरिरांत निरनिराळ्या कार्यासाठीं अवयव नि अिंद्रियें परिणतावस्थेंत येत असतात. अशा परिणतावस्थेचें सजीव सृष्टींतील परिणत स्वरूप म्हणजे मनुष्य होय. त्याचप्रमाणें समाजाचीहि गोष्ट आहे. समाजाच्या अस्तित्वास, पोषणास, नि अभिवृद्धीस जीं जीं कार्यें वा व्यापार होणें अवश्यक आहेत तीं तीं कार्यें नि व्यापार योग्य रीतीनें नि निर्वेधपणानें चालण्यासाठीं समाजामध्येंहि भिन्न भिन्न अवयव नि अिंद्रियें भिन्न भिन्न वर्ण वा वर्गरूपानें निर्माण होणेंही त्या समाजाच्या परिणतावस्थेची अेकमेव प्रमुख खूण आहे. सामाजिक व्यापार नि कार्यें अबाधितपणें चालण्यासाठीं गुणपरिणामतत्वाच्या विभेदीकरण पद्धतीनें हिंदूसमाजाची घटना वर्णाश्रम-धर्मरूपानें घटित झालेली आहे. पाश्चात्यांच्या अेकरूपी समष्टिशरिरांतसुद्धां हे विभेदीकरणरूपी परिणति कार्य आतां आरंभिलें गेलेलें दिसत आहे. विभेदीकरणाला पूर्णता येअून त्याला परिणत स्वरूप येण्या-पूर्वीच्या अस्थिरतेच्या स्थितींत तो समाज आहे. तरीपण तो परिणतीच्या मार्गावर लागल्याची स्पष्ट चिन्हें दिसतात. हेंच विभेदीकरणाचें कार्य त्यांच्या समाज शरीरांत कार्य करीत आहे नि निरनिराळे व्यवसायसंघ (Trede union वा

Labour union etc) व्यापारसंघ, श्रमजीवीसंघ आदिक निर्माण होऊन परिणतीच्या स्थितीला पोंचण्याची नैसर्गिक धडपड चाललेली आहे. आणि याच चिरस्थायि नि निसर्गसिद्ध गुणपरिणाम तत्वाचें रहस्य जाणून प्राचीन ऋषिवर्यांनीं हिंदुसमाजघटनेसाठीं गुण–कर्म–जन्मनिष्ठ पद्धतीवर वर्णाश्रमसंस्था निर्माण केलेली आहे. या सिद्धांताचे पायावर हिंदुसमाजघटनेचे नि व्यक्तींच्या सदाचाराचे सनातन सिद्धांत त्यांनीं काढले होते. **या सिद्धांतांचे पायावर हिंदुसमाजघटनेचें भव्य मंदिर त्यांनीं अुभारल्यामुळेंच कर्तृत्वावरोवरच सौख्य, प्रगतीवरोवर स्थैर्य आणि अभिवृद्धीवरोवर सत्वसंरक्षण यांचा या समाजाला लाभ झाला.** या सिद्धांतांना अनुसरल्यामुळेंच हिंदुसमाजास स्थैर्य, नि दृढता प्राप्त झाली. मानवी शरिरांत भिन्न भिन्न अवयव नि अिंद्रियें हीं जशीं अेका अंतरात्म्याचे प्रेरणेनें आपापलीं भिन्न कार्यें नि व्यापार अितरांच्या व्यापाराच्या नि कार्याच्या आड न येतां अेकमेकांना पोषकच होतील अशा रीतीनें निर्बंधपणें करतात नि म्हणूनच मनुष्यप्राणी अधिकाधिक शक्ति नि सामर्थ्यसंपन्न होत रहातो. असें जोंपर्यंत याप्रमाणें सुयंत्रित चाललेलें असतें तोंपर्यंत मनुष्यप्राणी सुस्थिर नि निर्भय असतो. त्याला नाशकारी असें स्वशरीरांतर्गत कारण अुत्पन्न होत नाहीं. पण हें तत्व सुटतांच अेखाद्यांत वा अेकाहून अधिक अवयवांत परस्परसाह्यकारिता सुटतांच वा त्यांची स्वकर्तव्यच्युति होतांच त्या त्या अवयवांच्या कमी अधिक महत्त्वाचे मानानें शरीराचीहि कमी अधिक हानि होते नि अधिक बिघाड झाल्यास मृत्यूहि येतो. वर्णाश्रमधर्मांतील मुख्य रहस्य हेंच आहे. प्रत्येक वर्ण, जाति किंवा वर्ग आणि त्यांतील प्रत्येक व्यक्ति यांस त्याच्या त्याच्या मानसिक नि शारिरीक योग्यतेप्रमाणें नि सामर्थ्याप्रमाणें कामें करण्याची संधि नि साधनें त्यास आयतीं दिलेलीं असून तीं कार्यें करीत असतां सबंध समाजाचा नि राष्ट्राचा व्यवहार, हित नि प्रगति हींहि साधतात, नि ती साधतांना व्यक्तीच्या स्वाभाविक गुणांचा, शक्तीचा नि कर्तृत्वाचा सुलभपणें नि शांततेनें विकास होत असतो. हिंदु समाजांतील या वर्णाश्रम–विभागामुळें संपत्ति एकाच वर्गांत सांठविली न जातां तिची सर्व वर्गांत योग्य विभागणी होअून देशांत अठरा विश्वें दारिद्र्य नि अुपासमार हीं फारशीं राहिलीं नाहींत; लोकांची नैतिक

ले. नं. ११०१४९

नि बौद्धिक प्रगति झाली; राष्ट्रीय व्यवहार चोख नि सुरळीत रीतीनें चालला आणि याप्रमाणें शांतता नि स्थैर्य पाहून राष्ट्राची विशेष प्रगति झाली." जगामध्यें आजपर्यंत अनंत जाति अुदयाला आल्या, माध्यान्हावर चढल्या. (वैभव संपन्न झाल्या) नि लागलीच त्यांना त्यांच्या अस्ताचा संध्याकाल पहावा लागला. आजही अनेक जातींचा माध्यान्ह संपून, त्या अस्ताचलाला चाललेल्या दिसत आहेत. कांहींचा माध्यान्हकाल दृष्टीला दिपवीत आहे नि कांहीं अुदयाला येअूं घातल्या आहेत. पण जिचा अुदयकाल जाणणारा परमेश्वराशिवाय दुसरा कोणी नाहीं, जिच्या माध्यान्हकालाच्या दिव्य प्रकाशाचा अनुभव सर्व जग घेत आलेलें आहे नि वारंवार संकटांच्या अभ्रांनीं वा मेघांनीं जी आच्छादली जात असूनसुद्धां अद्याप संपूर्ण प्रकाशदायित्वाचेंच काम निर्वेदतेनें करीत आहे त्या हिंदु जातीला मात्र अस्ताचलाच्या मार्गाला कलण्याची वेळ आली नाहीं हें भाग्य त्या जातीच्या पूर्णपरिणत वर्णाश्रमव्यवस्थेनेंच लाभलेलें आहे. अर्थात् त्यांत कालगतीनें कांहीं बिघाड झाला असेल, किंचित शिथिलता आली असेल पण शरीर सावयव नि सेंद्रिय नि म्हणून पूर्णपरिणत आहे हें मान्य केलेंच पाहिजे. त्या शरीरांतील अवयव भिन्नता मोडून नि इंद्रियांचा चोळामोळा करून सर्व शरीराचा कुट्टन एक निर्जीव मांसपिंड बनविण्यानें त्या समष्टि-जातीचा नाश होईल. ती जाती जर जिवंत ठेवावयाची असेल तर तिची सांगतां न तुटूं देतां नि तिला एकाहि अवयवाच्या वा इंद्रियाच्या नाशानें पंगु न होअूं देतां तिचें शरीर सर्व अवयवांसह निरोग, निर्दोष, पुष्ट नि बलवान् करण्यानें तिचें संरक्षण होऊन तिचें चिरंतनत्व अखंड होणारें आहे. पण हें स्थळ त्याच्याविषयींच्या ऊहापोहाचें नसल्यानें आपण या विशिष्ट वर्णाश्रम संस्थेमुळें हिंदूजातीचें झालेलें कल्याण निःपक्षपाती व निरपेक्ष निरीक्षकांना कसें दिसलें तेवढेंच पाहूं. सर हेन्री कॉटन म्हणतो "सांप्रतच्या हिंदुसमाजांत ज्या अुणीवा, दोष, अडचणी वा भानगडी दिसून येतात त्या सर्वांचा उगम जाति-व्यवस्थेपासून झालेला नाहीं. येवढेंच नव्हे तर, या व्यवस्थेनें प्राचीनकाळीं समाज घटनेचें मोठें कार्य केलेलें असून सांप्रतही त्यामुळेंच हिंदुसमाजाची सुव्यवस्था नि दृढता स्थिरतेनें टिकली आहे." युरोपियन समाजाच्या दृष्टीनेंही आमच्या वर्णव्यवस्थेंत कोणते गुण आहेत याचें वर्णन मि. सिडने लो

यांनीं (A Vision of India) या पुस्तकांत पुढीलप्रमाणें केलें आहे. "जातिव्यवस्थेमुळेंच हिंदुसमाजाचा पाया पक्का नि अचल राहून त्यांत समाधान नांदतें. आणि या गुणांमुळेंच राज्यक्रान्त्या नि पंचमहाभूतांचे उत्पात यांच्यांशीं अनेक शतकें नव्हे तर सहस्रकें एकसारखी टक्कर देत रहाण्याचें हिंदुसमाजांत सामर्थ्य आलें यांत तिळमात्र शंका नाहीं. समाजांतील प्रत्येक माणसास त्याचें योग्य स्थान, योग्य व्यवसाय, योग्य कर्तव्य नि योग्य मित्र दाखवून देण्याचें कार्य हीच जातिव्यवस्था करते. प्रत्येक व्यक्ति एकटी, स्वतंत्र नि असहाय्य अशी न राहतां तिला प्रारंभापासूनच एका जातीचा नि वर्गाचा अवयव ती बनवून टाकते. आणि सामाजिक मत्सर नि मनोरथ–भंगाची निराशा या दुर्धर रोगांची त्याला आमरणांत बाधा होऊं देत नाहीं. त्याचे स्थितीला नि व्यवसायास योग्य असे समशीलाचे स्नेही–सोबती नि बांधव त्यास मिळवून देऊन त्याचे मनांतहि त्यांचेविषयीं स्नेहाची नि बंधुत्वाची भावना दृढ करते. युरोपियन समाजांत 'क्लब', व्यवसाय संघ (Trade unis), परस्पर साह्यकारी संस्था (Benifit society) नि धर्मखातें या संस्था जीं कार्यें करतात, तीं कार्यें एकटीं ही जातिसंस्था हिंदुसमाजांत करिते. हिंदुस्थानांत युरोपप्रमाणें अनाथालयें उत्पन्न झाली नाहींत वा अद्याप त्यांची आवश्यकताहि फारशी दिसूं लागली नाहीं याचें तरी हेंच कारण कीं आपले आतेष्ट, स्नेही, जाति बांधव यांस संकटकालीं सर्वप्रकारें साह्य करणें हें आपलें कर्तव्य आहे अशी हिंदुसमाजांत सार्वत्रिक भावना आहे. आणि कुटुंबाचे सांसारिक पाश, तसेच सहवास नि समव्यवसाय यांनीं उत्पन्न केलेलीं बंधनें जातिव्यवस्थेनें विशेष दृढ करूनच वर सांगितलेली सार्वत्रिक कर्तव्य भावना उत्पन्न झालेली आहे."

'हिंदूंची राज्यव्यवस्था'

हिंदूमध्यें प्रातिनिधिक राज्यसंस्थेची कल्पना पाश्चात्यांच्या–विशेषतः इंग्लंडच्या–सहवासामुळेंच उत्पन्न झाली असें गुप्तस्वार्थ हेतु–प्रेरित बुद्धीनें आम्हांस कित्येक परकीयांकडून वा परप्रत्ययनेय बुद्धीच्या मूर्खांकडून सांगितलें जातें. पण हें म्हणणें अतिहासाच्या निर्विवाद पुराव्यानें निर्मूल ठरलेलें आहे. श्री. जयसवाल यांचा कांहीं वेळापूर्वी प्रसिद्ध झालेला Hindu polity हिंदु पॉलिटी हा ग्रंथ वाचला असतां हा बुद्धिभेदाचा परकीयांचा प्रयत्न विफल

ठरेल इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांत सर्व प्रकारच्या राज्यपद्धतींचे विविधकालांत विविध प्रसंगोपात्त प्रयोग करून पाहून झालेले आहेत. हेंहि लक्षांत येईल. पूर्ण राज़सत्ताक, नियंत्रित राजसत्ताक; प्रतिनिधिसत्ताक, प्रजासत्ताक, समसत्ताक अित्यादि सर्व प्रकार अनेक वार होअून चुकलेले आहेत. अितकेंच नव्हे तर बोलशेव्हिझमच्या (बोलशेव्हिझमध्यें सुद्धां तत्वापलीकडे कृतींत समाजसत्ता पूर्ण रूपानें आली नाहीं) नवीन स्वरूपाच्या तत्वानुसार पूर्ण रूपानें समाजसत्ताहि हिंदुजातीनें अनुभवलेली आहे. ही समाजसत्ता आधुनिक पश्चात्यादिकांना नवीन असेल नि प्रगतिशीलताही वाटेल परंतु आम्हांला मात्र ती नवीन नाहीं. **राज्यव्यवस्थेची अवश्यकता समाजांतील सुख, भरभराट, निर्भयता हीं स्थिर राखण्यासाठीं आहे आणि तो हेतु साध्य होण्याचें कार्य ज्या ज्या वेळीं जी जी राज्यव्यवस्था पार पाडील ती ती राज्यव्यवस्था त्या त्या कालीं नि स्थलीं योग्य म्हटली जाईल.** कोणतीहि गोष्ट वा पद्धति पूर्ण निर्दोष वा पूर्ण सदोष असत नाहीं. परंतु दोष सुप्त राहून गुण प्रकट होत राहतील तोंपर्यंत ती गोष्ट वा पद्धति चांगली म्हटली जाते नि याचे उलट व्हावयाला लागलें म्हणजे तीच गोष्ट वा प्रद्धति वाईट ठरते. वर सांगितलेल्या कसोटीनें सुख, भरभराट, निर्भयता व प्रगतिशीलता ही स्थिर रहाण्याचें कार्य हिंदुस्थानांत अुत्तम होत आलेलें आहे एवढें निरनिराळ्या साक्षीनें ठरलें म्हणजे हिंदुजातींत वाईट राज्यपद्धति नव्हती इतकेंच नव्हे तर अुत्तम राज्यव्यवस्था होती हें आपोआप सिद्ध होईल आणि त्यासाठीं सुख, भरभराट, निर्भयता व प्रगतिशीलता हिंदुसमाजांत कशी श्रेष्ठ प्रतीचीं होतीं हें दाखविलें म्हणजे अुत्तम राज्यव्यवस्थेच्या अस्तित्वाचें गमक मिळाल्यासारखेंच झालें असें निश्चित समजतां येईल. अपोलोडोरस (एल्फिन्स्टनचा हिंदुस्थानचा अितिहास) नांवाचा ग्रीक लेखक म्हणतो कीं झेलम नि बियास या दोन (पंजाबमधील) नद्यांमध्यें एकंदर १५०० नगरें आहेत नि त्यांत एकाद्याचीहि लोकसंख्या कॉस नगराहून कमी नाहीं." प्रो. म्याक्स डंकर म्हणतो (History of antiquity) "आर्यावर्ताची लोकवस्ती अफाट असून त्यांतील नगरांची गणना करणें अशक्य आहे असें एरियन ग्रंथकारानें लिहिलेलें असून पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत प्राचीन भारतीय-राष्ट्र संख्येनें सर्वांहून श्रेष्ठ होतें"

टेशियन ग्रंथकारानें तर याच्याहि पुढें जाऊन असें म्हटलें आहे कीं "अितर सर्व राष्ट्रांची लोकसंख्या एकत्र केली असतां जितकी होईल तितकी प्राचीन हिंदूंची लोकसंख्या होती." स्ट्रबो अितिहासकार लिहितो कीं "पालिबोथ्रा (पाटलीपुत्र—सांप्रतचे पाटणा) नगराची लांबी ८ मैल असून त्याच्या विस्तीर्ण तटास ५७० बुरुज नि ६४ वेशी होत्या" कनोज नगरांत "३० हजार तांबोळी नि ६० हजार वाजंत्री होते" असें अेके स्थलीं वर्णन आहे. संपत्तीसाठीं तर हिंदुस्थान जगांत 'सुवर्णभूमि' म्हणून प्रसिद्धच होता. स्ट्रबोने एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं "**प्राचीन भरतखंडांत चोरीचें नांवही नव्हतें**" डॉ. जानसननें युरोपीय राजधानींतील असुरक्षिततेचें भयानक वर्णन करून पुढें म्हटलें आहे कीं "त्या वेळीं घराचीं दारें कां लावावयाची नि त्यांना कड्या कुलुपें लावण्याची काय आवश्यकता असते हें हिंदु लोकांस ठाअुक नव्हतें" ले. कर्नल मार्क (Historical skectes of the S. india) मध्यें म्हणतो "प्राचीन काळापासून हिंदुस्थानांतील प्रत्येक गांव किंवा नगर म्हणजे अेक लहानसें पण स्वयंपूर्ण लोकसत्ताक राज्यच असे. नि सर्व हिंदुस्थान म्हणजे अशा छोट्या स्वराज्याचा एक प्रचंड संघच होता." याचकरितां 'भरत खंडांतील प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे' असे अेरियननें आदरानें म्हटलें आहे. सर चार्लस मेटकाफ यांनीं तर या ग्रामसंस्थांचें रसभरित गुणवर्णन केलेलें आहे. तो म्हणतो "या ग्रामसंस्थारूप छोट्या लोकसत्ताक राज्यांच्या बहुतेक अवश्यकता गांवांतल्या गांवांत भागत. त्यांचेवर परकीय सत्तेचा शह कधींच बसला नाहीं. जेथें अितर गोष्टी क्षणभंगुर भासतात तेथें ग्रामसंस्था मात्र सनातन असतात. अेकामागून अेक राजघराणीं धुळीला मिळालीं, अनेक राज्यक्रान्त्या होऊन गेल्या. पठाण, मोंगल, शीख, मराठे, इंग्रज आदिक राज़सत्ता आळीपाळीनें या या देशावर स्थापित झाल्या पण या सर्व अुलथापालथींत ग्रामसंस्था आपल्या पूर्ववत् स्थिरच्या स्थिरच आहेत. या ग्रामसंस्थारूपी लहान लहान लोकसत्ताक राज्यांचा असा संघ बनल्यामुळेंच हिंदु लोकांस राजकीय स्वातंत्र्य, स्वावलंबन नि राजकीय सुख यांचा लाभ झाला आहे." (पण इंग्लिशांनीं ही ग्रामसंस्था निरनिराळ्या अुपायांनीं धुळीला मिळवून हिंदुजातीचीं बलकेंद्रें नष्ट करून टाकलेलीं आहेत.)

भारतीयांचे शील

अेरियन नामक ग्रीक अितिहासकार म्हणतो (२ रे शतकांतील) " असत्य भाषण करणारा भारतीय आजपर्यंत कोणासही आढळला नाहीं " " भारतीय इतके प्रामाणिक आहेत कीं त्यांना दारांना कुलुपें लावण्याची किंवा करार बंधनकारक करण्यास ते लेखी करण्याची अवश्यकताच वाटत नाहीं." असे स्ट्रबोनामक अितिहासकारानें लिहिलें आहे. सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-फू-त्सू (ह्यूअेनसंग) हा आपल्या लेखांत लिहितो कीं " प्रामाणिकपणा नि सरळपणा या गुणांत हिंदू लोक फार श्रेष्ठ आहेत; त्यांच्या राज्यव्यवस्थेंत हेच गुण दिसून येतात. ते अन्यायानें केव्हांहि कोणाचें द्रव्य हरण करीत नाहींत; ते न्यायी तर अितके आहेत कीं कित्येक वेळां त्यांच्या न्यायास (फाजिल) अवास्तव औदार्याचें स्वरूप येतें." हिंदूलोक सरळ, प्रामाणिक, सत्यनिष्ठ नि न्यायी असून ते घेतलेली शपथ कदापि मोडित नाहींत. त्यांचे अंगीं लबाडी नि दुष्टपणा मुळींच नसून त्यांस जशी जगण्याची तशीच मरण्याचीहि भीति वाटत नाहीं," अशा सयामच्या वकील सू. वे (सन १२३१), फ्रायर जार्डेनस (४ थें शतक) चिनी वकील फी-इ (सन ६०५) व वेढी अझ झमान (१३ वे शतक) यांनीं साक्षी दिल्या आहेत; (India l what can it teach us). अकराव्या शतकांत लिहिलेल्या भूगोलांत ' अिद्रिसी ' म्हणतो कीं " हिंदू लोक अितके न्यायी, विश्वासू, प्रामाणिक नि एकवचनी आहेत कीं, त्यांच्या या गुणांची कीर्ति अैकून परदेशांतले अनेक नागरिक चोंहोकडून त्या देशांत जाअून राहतात." तेराव्या शतकांत मार्को पोलो नांवाचा प्रवासी लिहितो " या ब्राह्मणांअितके सच्चे नि प्रामाणिक व्यापारी जगांत कोठेंहि नाहींत. कारण अिहलोकच्या कोणत्याहि लाभाकरितां ते खोटें बोलत नाहींत. खाकन प्रांताचा मुसलमान वकील कमालुद्दीन समरकंदी हा कालिकत नि विद्यानगर येथील राजसभेंत वकील होऊन आलेला होता तो म्हणतो " भारतवर्षांतील व्यापाऱ्यांचें संरक्षण अुत्तम होतें." " आपल्या सर्व व्यवहारांत सत्य नि पराकाष्ठेचा प्रामाणिकपणा यांस हिंदुलोक फार मान देतात." असें अबूल फाजलनें लिहून ठेवलें आहे. " हिंदूंची जशी सत्यनिष्ठा तसेंच त्यांचें धैर्यहि श्रेष्ठ प्रतीचें आहे." असें मिलनें " हिंदुस्थानचा अितिहास " यांत लिहिलें आहे. कर्नल स्लीमन यांस

हिंदूंच्या शीलाची पात्रता जितकी ज्ञात होती तितकी फार थोड्यांस होती; ते म्हणतात " परस्परांशीं व्यवहार करतांना लबाडी वा असत्य भाषण करण्याचें खेड्यांतील लोकांना माहितही नाहीं. मजपुढें शेंकडो खटले असे आले होते कीं आरोपी खोटें बोलेल तरच त्याची मत्ता, स्वातंत्र्य नि प्राण वाचतील; पण अशा आणीबाणीच्या प्रसंगींहि आरोपीनें खोटें बोलण्याचें स्वच्छ नाकारलें " कर्नल साहेबांची ही बहुमोल प्रशस्ति उद्धृत करून म्याक्समुल्लर विचारतात कीं" असे उद्गार अिंग्लंडांतल्या अिंग्लिशासंबंधीं किती जजाचे तोंडून निघतील!..." हिंदुस्थानाशीं ज्या ज्या परकीय लोकांचा संबंध आला त्या सर्वांस तेथील लोकांच्या राष्ट्रीय शीलांत सत्यप्रीति हा मुख्य नि ठळक सद्गुण असल्याचें पाहून फार आश्चर्य वाटलें आहे.

युरोपांत माहित असलेल्या गुलामगिरीचें हिंदुस्थानांत नांवही नसून तेथील पुरुषांचें शौर्य, धैर्य नि स्त्रियांचें पातिव्रत्य हे गुण पाहून मागस्थेनिस यास त्यांचेबद्दल फारच आदरबुद्धि अुत्पन्न झाली. रे. मारिस लिहितो कीं " कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी शूद्र हे पूर्वी गुलामगिरींत असणें शक्य नाहीं, नि ते सांप्रतही गुलाम नाहींत. हिंदुस्थानांतले सर्व लोक स्वतंत्र असल्याचें पाहून ग्रीक लोकांस मोठाच अचंबा वाटला. (हिंदुस्थानांत गुलामगिरी नव्हती अितकेंच नव्हे तर गुलामगिरीची कल्पनाहि नव्हती नि याला उत्कृष्ट नि निर्विवाद पुरावा म्हणजे 'गुलाम' या शब्दांत असणारा अर्थ प्रकट करणारा शब्द संस्कृत वा संस्कृतोत्पन्न कोणत्याहि हिंदु भाषेंत अस्तित्वांतच नाहीं. दास हा शब्द गुलामीचा द्योतक आहे असें कांहीं भोंदू लेखक वा परप्रत्ययनेय बुद्धीचे मूर्ख लोक म्हणतात परंतु असें म्हणण्यांत एक जणाचा नीच स्वार्थी हेतू असून दुसऱ्याचा अक्षम्य मूर्खपणा मात्र आहे.) ओल्फिन्स्टन अितिहासकार ' हिंदुस्थानचा अितिहास ' यांत लिहितात कीं " हिंदूंच्या जुन्या नाटकग्रंथांतील अितर पात्रें राजांशीं बोलतांना तोंडपुजेपणा वा दैन्य मुळींच दाखवीत नाहींत. ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे." हिंदु लोक धार्मिक, मोकळ्या मनाचे, परकीयांशीं सभ्यतेनें वागणारे, आनंदी, ज्ञाननिष्ठ, न्यायप्रिय, व्यवहारदक्ष, सत्यनिष्ठ नि प्रत्येक व्यवहारांत अतिशय प्रामाणिक असे आहेत " असें अबूल फझल ह्या कुशल नि चतुर लोकनिरीक्षक मुसलमान अितिहासकारानें

लिहून ठेवलेलें आहे. अजमीर–मारवाडचे कमिशनर कर्नल डिक्सन यांनीं "हिंदूंचा प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, विश्वासूकपणा, निर्वाणीचें शौर्य, राजनिष्ठा आणि सत्त्वाच्या संरक्षणाचा (अब्रूच्या संरक्षणाचा) प्रश्न आला असतां त्यांचे अंगीं दिसून येणारी नि तिन्हाअितांचेंही मनास चटका लावणारी स्वामिनिष्ठा या सद्गुणांची प्रशंसा मुक्तकंठानें केली आहे. नेबूहर म्हणतो कीं हिंदूअितके परधर्मसाहिष्णु लोक पृथ्वीचे पाठीवर दुसरे कोणीच नाहींत; तसेंच प्राणिमात्रांस होतां होअील तों कोणतेंहि दुःख द्यावयाचें नाहीं ही प्रवृत्ति जगांत कोठें अुत्कटत्वानें वास करीत असेल तर ती हिंदू लोकांतच वसत आहे." सर जॉन मालकम म्हणतो "बहार प्रांतांतले लोक (सर्व हिंदुस्थानविषयींहि तेंच म्हणणें आहे) जसे शरीरानें अुंच नि शक्तिमान् आहेत तसेच ते मनानेंहि शूर, अुदार, दयाळू, सत्यनिष्ठ नि धैर्यवान् आहेत. विश्वासूकपणा नि सत्त्वरक्षणपटुता (अब्रुदारपणा) यासंबंधीं त्यांची निष्ठा फार अुच्च प्रतीची आहे नि तीसंबंधानें अशीं अुदाहरणें घडून येत असतात कीं तीं अितिहासापेक्षां काव्य कादंबरींत जास्त शोभतील, असें कोणीहि अिंग्रज म्हणेल. त्यांच्या इतके विश्वासू लोक तर मला दुसरे कोणतेच माहित नाहींत." अिंग्लंडशीं 'हिंदुस्थानचा व्यापार खुलेपणानें आरंभला तर हिंदूंचे संस्कृतीची अभिवृद्धि होईल असें तुम्हांस वाटते काय ?' असा प्रश्न विचारला असता सर थामस मनरो यांनीं उत्तर दिलें कीं "धर्मभोळेपणा नि दुराग्रह नष्ट करणारें अुदार शिक्षण नि राजनीति या दोन गोष्टींत हिंदु लोक युरोपियनांपेक्षां कमी नाहींत, परंतु श्रेष्ठपद्धतीची कृषिपद्धति, अद्वितीय हस्तकौशल्य, सोय नि विलास यांस आवश्यक असलेल्या सर्व वस्तू निर्माण करण्याची योग्यता, प्रत्येक गांवांत लिहिणें–वाचणें–गणित शिकाविणारी शाळा असणें, (हें विधान सरकारी रिपोर्टीनेंहि सिद्ध झालेलें आहे. सरकारी शाळा आरंभण्यापूर्वी बंगाल्यांत ८० हजार गांवठी शाळा होत्या; सन १८३५ ह्या वर्षीं ह्या शाळांचें प्रमाण ४०० मनुष्यास १ असें पडत होतें. मद्रासमध्येंहि ३ त १ मुलगा गांवठी शाळांत शिकणारा असे.) **अेकमेकाशीं सभ्यतेचें वर्तन, आदरसत्काराचें, परोपकाराचें नि विशेषतः स्त्रियांशीं विश्वासाचें–आदराचें नि मार्दवयुक्त वर्तन ठेवणें, हे गुण अंगीं असणें हीं जर सुधारलेल्या**

समाजाचीं लक्षणें असतील तर या गोष्टींत हिंदु लोक कोणत्याहि युरोपीय राष्ट्रांहून कमी नाहींत. (अुलट अनेक पटीनें श्रेष्ठच आहेत) सुधारणा, संस्कृति या वस्तूची जर दोन राष्ट्रांत देवघव करावयाची असेल तर हिंदुस्थानचा हा संग्रह (सद्गुणांचा) आयात करण्यांत अिंग्लंडचाच पुष्कळ लाभ होअील, अशी मला निश्चिति वाटते ! " प्रो. विल्सन यांनीं हिंदूंच्या कांहीं विशेष सद्गुणांची प्रशंसा करून अंतीं म्हटलें आहे कीं **युरोपियन सुधारणेचा प्रचार जेथें पुष्कळ झालेला आहे तेथील लोकांतून मात्र हे गुण नष्ट होत चाललेले आहेत.** प्रो. मानियर विल्यम्स यांनीं (Modern India and Indian) मध्यें लिहिलें आहे कीं " हिंदु लोकांहून धार्मिक नि कर्तव्य निष्ठ लोक मला युरोपांत कोठेंहि आढळून आले नाहींत. " एल्फिन्स्टन साहेब आपल्या हिंदुस्थानच्या अितिहासांत लिहितात " **अिंग्लंडाचे नगरांतील सामान्य श्रेणीचे लोक जितके नीतिभ्रष्ट असतात तितके हिंदूमधील अगदीं कनिष्ट वर्गही नीतिभ्रष्ट नाहींत** " सर जी. क्यांबेलचे म्हणणेंहि येथें सहज अुल्लिखित करणें अनाठायीं होणार नाहीं. **तो म्हणतो. " जितका अधिक काल अेखादा हिंदुस्थानचा प्रांत आमच्या हातांत आलेला असतो तितका तो अधिकाधिक रीतीनें सार्वत्रिक नि गंभीरतेची लबाडी नि खोटेपणा करूं लागतो."** (The longer we possess a province. the more common and grave does purgery become.)

हिंदूचा क्षात्रधर्म नि तेज.

" जेव्हां एखादें अनिवारणीय संकट अंगावर येऊन कोसळतें, तेव्हां हिंदु लोकांतल्या कनिष्ट वर्गांतीलही पुरुष जी शांतवृत्ति दाखवतो, ती पाहून युरोपियन लोक तोंडांत वोटच घालतात. " असें जें अेल्फिन्स्टननें ' हिंदुस्थानचा अितिहास 'मध्यें म्हटलें आहे त्याचें मूळ हिंदूच्या आत्म्याचे अमरत्व नि पुनर्जन्मसिद्धांत या धार्मिक सत्यावरील त्यांच्या दृढश्रद्धेंतच आहे. अकबरकालीन अितिहासकार अबूल फाजल लिहितो कीं " विशेषतः संकटकालीं हिंदूंचें शील जास्तच अुज्ज्वलता पावलेलें दिसून येतें. रणभूमींलून पाय काढून पळून जाणें हें रजपुतांस मुळींच माहित नाहीं, युद्धांत यश येणार

नाहीं असें दिसतांच तो युद्धांतून पलायन करीत नाहीं; तर तो अुलट घोड्या-वरून खालीं अुतरतो नि शत्रूंत घुसून प्राण जाईपर्यंत झुंजत राहतो." कर्नल टॉड लिहितो "कुरूंशीं तुलना करतां त्यांचेपुढें होमरचे वीर पुरुष क्षुद्र वामनमूर्तींच ठरतील. कुरूंचें हातातलें कडे अॅजक्सला नुसतें अुचलतां तरी आलें असतें कीं नसतें याची शंकाच वाटते" कर्नल टॉड म्हणतात प्राचीन भारतीय क्षत्रियांची परंपरा रजपुतांतच आतांपर्यंत अुरलेली आहे. यावरून प्राचीन क्षत्रियांच्या क्षात्रधर्माची बरीच कल्पना करतां येईल. **हिंदुक्षत्रिय रजपूत यांच्या अितकी शूर, विश्वासूक नि अुदात्त स्वभावी जाति पृथ्वीच्या पाठीवर कोणतीहि झाली नाहीं नि पुढें होणार नाहीं.....महाकाव्यांतच शोभणाऱ्या अद्भुत शौर्याच्या पण खऱ्याखुऱ्या घटनावर्णनांनीं भरलेला अितिहास जगांत दुसऱ्या कोणत्याहि प्राचीन वा अर्वाचीन राष्ट्राचा नाहीं.**" अेल्फिन्स्टन साहेब लिहितो (हिंदुस्थानचा अितिहास) "हे लोक पुष्कळ प्रसंगीं अितकें शौर्य प्रकट करतात कीं जगांतील कोणत्याहि क्षात्रवृत्ति लोकांस त्यांचेवर ताण करतां येणार नाहीं. धर्म नि सत्व यांचें संरक्षणार्थ प्राणही अर्पण करण्यास ते सतत अेका पायावर सिद्ध असतात." दोनशें वर्षांपूर्वी पंजाबांतील सियालकोट येथील पाठशाळेंतील मुसलमान मुलानें हिंदुधर्माची निंदा केली. ती अैकून संतापून जाअून अेका हिंदु मुलानें मुसलमानी धर्माचीहि निंदा केली. हें प्रकरण काजीकडे गेल्यावर त्यानें हिंदु मुलास देहांत शिक्षा सांगितली. लाहोरच्या सुभेदारानें यावर तडजोड सुचविली कीं हिंदु मुलानें जर मुसलमानी धर्म स्वीकारला तर त्याला ही शिक्षा सूट द्यावी. पण त्या हिंदु मुलानें धर्मत्याग करून प्राण वांचविणेंची तडजोड स्वच्छ निर्भयपणानें नाकारली. तेव्हां अंतीं त्या मुलाचा शिरच्छेद करण्यांत आला. या मुलाचें नांव हकीकतराय असें असून त्यानें देह ठेवला तेथें रणजितसिंहानें समाधि बांधली नि तिचे दर्शनास अद्याप हजारो भाविक जातात.' कर्नल टॉडचे आणखी अेकच पण महत्त्वाचें वचन देऊन दुसऱ्या गोष्टीकडे वळूं. ते म्हणतात "**रजपुतांनीं अस्थानीं भूतदया नि औदार्य अथवा अविचार दाखविला नसता तर मोंगली राज्य अधिकच लवकर नामशेष झालें असतें.**" अुलट

असेंहि म्हणतां येईल नि अितिहासावलोकनानें बरोबर पटेलहि कीं **जर हिंदुजाति थोडी कपटपटुता स्वीकारून 'जशास तसें' हें धोरण स्वीकारीत राजकारणांत वागती तर हिंदुस्थान हा केवळ हिंदूमयच राहून प्रखरतेजोदीप्त स्वातंत्र्याच्या संरक्षक छत्राखालीं सर्व जगाला अद्यापही आदरणीय, वंदनीय नि गुरुस्थानीयच शोभला असता.**

वाङ्मय

मि. टेलर लिहितात कीं " संस्कृत भाषेंतील तत्त्वज्ञानाचा जुनेपणाचे दृष्टीनें विचार केला तर त्याचेपुढें पायथ्यागोरसचें तत्वज्ञान कालपरवांचेंच ठरेल; आणि कल्पनेच्या नि बुद्धीच्या अत्युच्च भराऱ्यांच्या दृष्टीनें तुलना केली तर प्लेटोच्या अुच्चतम कल्पनाहि नीरस नि सामान्य भासतील. आपणांस पूर्वी माहित असलेल्या सर्व काव्यांहून संस्कृत काव्यांत शुद्धबुद्धीचे विलास जास्त दिसून येतात. त्या भाषेंतील शास्त्रें तर अितकीं प्राचीन आहेत कीं त्याचा कालनिर्णय करतांना ज्योतिषशास्त्रासहि हात टेकावे लागतात. अशा प्रकारच्या प्रचंड वाङ्मयाचें खरें स्वरूप वर्णन केलें तर तें अतिशयोक्तीचें नि घमेंडीचें वाटेल ! परंतु हें वाङ्मय आपल्या स्वतंत्र नि श्रेष्ठ पदावर दुसऱ्या कोणत्याहि आधारावांचून आरूढ होअून आजपावेतों तेथेंच स्थित आहे. ...संस्कृत तत्वज्ञानांत मानसशास्त्रांतील प्रत्येक गूढ नि बिकट प्रश्नांचा विचार केलेला आहे, संस्कृतांतलें धर्मशास्त्रहि ते ज्या जातीकरितां लिहिलें त्या जातीअितकेंच, विविध स्वरूपीं आहे. कौंट जान्र्स्टजर्ना म्हणतात, (Theogany of The Hindus) " हिंदुस्थानचें वाङ्मय प्राचीन काळांतील एका थोर राष्ट्राचा आपणांस परिचय करून देतें; आणि या राष्ट्रानें विद्येची प्रत्येक शाखा हस्तगत करून घेअून मानवी सुधारणेच्या अितिहासांत या राष्ट्राला सदैव श्रेष्ठपदच मिळेल अशीहि ते आपलें निश्चिति पटवितें ! " मि. ब्रौननें असें लिहिलें आहे कीं The daily Tribune The Saltlake City) " जगांतील निरानिराळीं सर्व वाङ्मयें नि धर्मकल्पना यांचा मूलजनक हिंदुराष्ट्रच आहे ! " प्रो. म्याक्समुल्लरनें म्हटलें आहे " विद्येची नि ज्ञानाची कोणतीहि शाखा घ्या; हिंदुस्थानांतील प्राचीन वाङ्मयानें तीवर नवीन प्रकाश पाडला नाहीं किंवा तींत नवीन चैतन्य उत्पन्न केलें नाहीं, असें

घडलेंच नाहीं. पण त्यांतले त्यांत जगांतील निरनिराळे धर्म नि पुराणकथा यांजवर या वाङ्मयामुळें पडलेला प्रकाश तर फारच अपूर्व महत्त्वाचा नि अत्यंत अुज्ज्वल आहे यांत संशय नाहीं." जनरल कनिंगह्याम आपल्या शीखांचे अितिहासांत लिहितात कीं "हिंदूंचें प्राचीन गणितशास्त्र अितकें पूर्णावस्थेस पोचलें होतें नि ज्योतिषविषयक गणित ते अितकें बिनचूक करीत कीं सूर्यचंद्रांचें गमनमार्ग नि गति ही त्यांनीं अचूक मापली होती. सामान्य जनसमूहाच्या धर्मकल्पना नि कांहीं थोडया लोकांचे तत्वज्ञान यांची इतर देशांत नेहमीं ताटातूट झालेली असते पण हिंदु लोकांमधील विद्वानांचें तत्त्वज्ञान सामान्य जनसमूहाचे धर्म कल्पनांत पूर्णपणें मिसळून गेलें आहे. **अीश्वराचें अेकमेवाद्वितीयत्व नि सृष्टिकर्तृत्व, आत्म्याचें अमरत्व नि जीवाची कर्मबद्धता ही भारतीय तत्त्वज्ञानांतील चार मुख्य तत्त्वें सामान्य लोकांच्या धर्मांचींहि मूलतत्त्वें बनलीं आहेत, ज्या पुनर्जन्म तत्त्वाचा दुसरीकडील धर्मवेत्यांनीं अुल्लेख केलेला असला तर ओझरताच केलेला असेल, तें पुनर्जन्म तत्त्व नि त्याचप्रमाणें अीश्वराचें अेकत्त्व नि सर्वशक्तिमत्त्व अनेक देवतावादी ग्रीक नि रोमन जनसमूहांस वा द्वैती मिसिश्रेक धर्मशास्त्रकारांसही अज्ञात होतें. तें धर्मतत्त्व गंगानदीतीरावरील हिंदू ऋषींनीं भरत खंडांतील सर्व जनतेस पूर्वीच पटविलें होतें.** पापाचरणासाठीं भयंकर शासन होतें हा सिद्धांत सामान्य जनसमूहाच्या मनांत ठसवून त्यांची पापभीरुता जाज्वल्य राखण्याचे कामीं व्यासांनीं तर प्लेटोवरही ताण केली आहे." प्रो. हीरन यांनीं आपला अभिप्राय दिला आहे कीं "संस्कृत वाङ्मय, शास्त्रीय विषय–गद्य नि पद्य–या सर्व शाखांतही सुसंपन्न आहे." "ज्यांची हस्तलिखितें सांप्रत अुपलब्ध आहेत, असे संस्कृत भाषेंत दहा हजार निरनिराळे ग्रंथ आहेत" असें म्याक्स मुल्लरनें गणना करून म्हटलें आहे. मिसेस म्यानिंगबाअी म्हणतात कीं "मानवी मन नि बुद्धि यांची धांव जेथपर्यंत पोंचणें शक्य आहे, तेथपर्यंतचा पराकाष्टेचा प्रदेश हिंदूंच्या मनोबुद्धीनें गांठला आहे यांत शंका नाहीं." म्याक्स मुल्लर महाशयांचा सर्वांस असा कळकळीचा उपदेश आहे कीं, "**अितर कोणत्याहि भाषेंतील ग्रंथानें जें काम झालें नसतें तें काम वेदांनीं**

जगाच्या अितिहासांत केलें आहे. म्हणून ज्याला ज्याला म्हणून स्वतःचे पूर्वजांचा नि आपल्या अितिहासाचा अभिमान असेल नि जो आपल्या बौद्धिक विकासाची अिच्छा करतो, त्या प्रत्येकानें वेदांचा अभ्यास करणें अत्यंत अवश्य आहे.'' म्याक्सडंकरनें म्हटलें आहे कीं "संस्कृतांतील काव्य भांडाराचा मुळीं ठावच लागत नाहीं. भारतीयांची नैसर्गिक प्रवृत्ति काव्यमय असल्यामुळें त्यांचे हातून असंख्य काव्यग्रंथ निर्माण झाले यांत काय आश्चर्य ? सध्यां अुपलब्ध असलेले ग्रंथ-संख्येनें जर आपण इतके मोहित झालों आहोंत तर अत्यंत दुष्ट नि क्रूर नराधमांच्या धार्मिक अत्याचारास बळी पडून ज्यांची राखरांगोळी झाली त्या ग्रंथांची निश्चित संख्या आम्हांस माहित झाली तर आमच्या आश्चर्यास सीमाच रहाणार नाहीं." काऊंट जार्न्स्टर्जर्ना म्हणतात कीं "हिंदुस्थानांत काव्याचेंच साम्राज्य आहे. अमूर्त भावनामय शास्त्रांचीच नव्हे तर धर्मग्रंथांची सुद्धां भाषा काव्यछटेनें रंगलेली असून आणखी त्यांत काव्याचा मोहकपणा नि आकारसादृश्य हे दोनही गुण कांहीं कमी नाहींत." डॉक्टर हसलर नामक अमेरिकन पंडित महाभारताची मुक्तकंठानें स्तुति करीत असतांना अुद्गारतात "दैवी स्फूर्तीनें भारलेले प्राचीन भारतीयांचे अत्यंत थोर महात्मे यांनीं जो महाभारत नामक ग्रंथ निर्माण केला आहे त्याचे अितका थोर ग्रंथ आजपर्यंत माझे पहाण्यांत दुसरा नाहीं. नि माझ्या पूर्व आयुष्यांतील अनुभवावरून मी असें म्हणतो कीं या ग्रंथानें मला जितकें वेड लावून सोडलें, तितकें वेड मला दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाचें यापूर्वी लागलें नाहीं. या ग्रंथाचा अहर्निश अभ्यास करून मी त्यांतून अेक हजारावर अुतारे घेऊन माझ्या आयुष्यांतील अभ्यासाकरितां त्यांची मांडणी केली आहे. महाभारत म्हणजे एक अभिनव सृष्टीच आहे असें मला वाटतें, व त्यांतील सत्पक्षप्रीति, ज्ञान, चातुर्य नि सत्य अित्यादि गुणसमच्चयाचें वर्णन पाहून तर मी अगदीं तल्लीन होऊन जातो. परंतु अेवढ्यानेंच त्याचा मोठेपणा संपतो असे नाहीं ! तर माझ्या मनानें परमात्मा नि जगदुत्पत्ति यासंबंधी जे कांहीं सिद्धांत बांधले होते तेच या ग्रंथांत सुंदर नि स्पष्ट भाषेंत सांगितलेले पाहून मला या ग्रंथाविषयीं फारच आदर वाटूं लागला. नि त्याची थोरवी किती गाअूं असें मला होऊन गेलें आहे." अिंडियन डेली स्पेक्टेटर

मधील अुतारा याप्रमाणें आहे " (महाभारत) हें काव्य म्हणजे धर्म, नीति, मानसशास्त्र, तत्वज्ञान, नि राजकारण आदि विषयांच्या तत्वरत्नांचा कथारूप सूत्रामध्यें गुंफलेला हारच आहे. यांत पांच हजारापेक्षां अधिक वर्षांपूर्वी आर्यावर्तांतील लोकांचा जीवनक्रम, रीतिभाति, राजकारण, धर्म नि तत्वज्ञान हीं मूर्तिमंतपणें चित्ररूपानें या ग्रंथांत पहावयास मिळतात, अेवढेंच नव्हे तर अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें काव्य नि अत्यंत थोर नि गहन विचारांची निपज जी या जगावर झालेली दिसते त्यापैकीं बरेच या ग्रंथांत आढळून आल्यानें याची अपूर्वता नि महती फार वाढते." बाबू पी. सी. राय यांनीं मोठ्या नेटानें महाभारताचे अिंग्रजी भाषांतर प्रसिद्ध करण्याचें काम चालविलें होतें. त्यावेळीं अमेरिकेंतून जेरेमिआ कर्टिन नामक मानववंशज्ञास्त्रज्ञाकडून असें पत्र आलें कीं " महाभारताचें २४ भाग साद्यंतपणें नि काळजीपूर्वक मी नुकतेच वाचून संपविले आहेत; नि त्यावरून माझी खरोखर अशी समजूत झाली आहे कीं या ग्रंथाअितका श्रेष्ठ ग्रंथ दुसरा नाहीं. हिंदूंच्या बुद्धिमत्तेविषयीं नि खऱ्या शीलाविषयीं या ग्रंथवाचनानें सर्व लोकांच्या नेत्रांत चांगलेंच अंजन पडेल... आपण जें काम हातीं घेतलें आहे त्यायोगें हिंदुस्थानचेंच नव्हे तर सर्व आर्यवंशाचेंहि कल्याण होणारें आहे. महाभारत ही अेक विशाल खाण आहे नि तीमधील संपत्तीची कल्पना अद्याप जगाला आलेली नाहीं. यांतील रत्नें जसजशीं बाहेर येतील तसतशीं याची महती जगाला पटूं लागेल." रामायणाविषयीं सर मोनियर विल्यम म्हणतात " संस्कृत वाङ्मयांत रामायणासारखें मोहक काव्य दुसरें कोणतेंच नाहीं. भाषेंतील साधेपणा, स्पष्टता नि निर्दोषता हे काव्यांतील अभिजात गुण, शुद्ध काव्य भावनेच्या सुंदर छटांची विपुलता, वीररसात्मक प्रसंगांचीं अक्षरशः वर्णनें, सृष्टींतील अत्यंत भव्य देखाव्यांचीं शब्दचित्रें, मानवी चित्तांतील निरनिराळ्या विचारांचें कसकसें युद्ध चालतें याविषयीं पूर्ण ज्ञान नि त्यांतील अत्यंत विशुद्ध भावनांशीं पूर्ण परिचय अित्यादि गुणांनीं जगतांतील कोणत्याहि भागांत, कोणत्याहि कालीं अुत्पन्न झालेल्या अत्यंत सुंदर नि मनोरम काव्यामध्यें रामायणाची योग्यता फार मोठी आहे....रामचरित्रांत अथपासून अितीपर्यंत निःस्वार्थी वर्तन दृग्गोचर होत आहे त्यावरून त्याच्या मानुषी जीवनक्रमाविषयीं मनांत मोठी शंका येअून हा खरोखरी परमेश्वर अंशच असला पाहिजे

अशी मनाची समजूत होते. त्याच्या अतिमानुष कृत्याविषयीं कधीं कधीं आमच्या मनाची मोठी चमत्कारिक स्थिति होऊन जाते परंतु असे प्रसंग फार वेळ टिकत नाहींत. निदान पूर्वभागांत तरी अेखाद्या शूर, अुदारमनस्क, पवित्र नि सद्गुणी मनुष्यापेक्षां कवीनें जास्त असे रामचरित्रांत हेतुपूर्वकच दाखविलें नाहीं. आज त्याचें शौर्य, निर्लोभता, औदार्य, पित्राज्ञाप्रमाणबुद्धि, विमलपत्निप्रेम, सहोदर प्रेम, व क्रोधमय विचारांचा पूर्ण अभाव अित्यादि गुणांची मात्र जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच होणार आहे. आपल्या सापत्न मातेच्या क्रोधास तो जेव्हां बळी पडतो तेव्हां त्याच्या मुखावाटे अेकही रागाचा शब्द निघत नाहीं, जेव्हां त्याचा पिता वनवासास पाठविण्याचें ठरवितो तेव्हां हूं कां चूं ही करीत नाहीं. आपल्या पित्याच्या मार्थी प्रतिज्ञाभंगाचें पाप येण्यापेक्षां आपल्या सुखाची होळी करण्यास मागेंपुढें पहात नाहींत, नि सीतेविषयीं तर बोलावयास नको; कारण ती केवळ गृहलक्ष्मीच होय. नि तिजमध्यें सद्गुण मूर्तिमंतच अवतरले आहेत असें दिसतें. **स्त्रीजातीला सीता ही अुत्तमोत्तम आदर्श आहे. तिची थोर पतिनिष्ठा, तिचें अमर्याद प्रेम, पतिपत्नीच्या शाश्वत नि दैवी संबंधाविषयीं तिची अत्युच्च कल्पना अित्यादि गोष्टींत कवीनें जीं ध्येयें पुढें मांडलेलीं आहेत तीं श्रेष्ठपणाच्या नि अुदात्तपणाच्या दृष्टीनें अितर कोणत्याहि भाषेंत वा वाङ्मयांत पहावयास मिळणार नाहींत.**"

'ज्या परिस्थितींत आपण वाढतो तत्सदृश होणें हा स्वभावसिद्ध धर्मच आहे. या दृष्टीनें पाहिल्यास संस्कृत महाकाव्यांतील पात्रें अद्भुत, शक्तिमान्, महातेजस्वी, अग्नितुल्य, पवित्र, पर्वताप्रमाणें धैर्यवान्, पृथ्वीप्रमाणें सहनशील, सत्वाला जागण्यासाठीं जिवावर अुदार, याप्रकारचीं आपणांला दिसून येतात; प्रत्येक गुण घेऊन तो पराकाष्टेला पोंचविला आहे, असेंच पात्रांच्या वर्णनावरून दिसतें. याकामीं हिंदु ग्रंथकारांच्या अप्रतिहत कल्पनाप्राचुर्याचें नि मनश्चक्षूंच्या विशाल दृष्टिकक्षेचें जरी सहाय्य झालें असलें तरी सभोंवतालच्या परिस्थितीच्या यथार्थत्वाचें प्रतिबिंबच त्यांत विशेष प्रतिबिंबित झालेलें आहे!" हें निश्चित.

हिंदूंची शस्त्रास्त्रविद्या

पूर्वी हिंदुस्थानांत युद्धकालीं प्रमुख शस्त्र म्हणजे धनुष्यबाण असे हें सर्वश्रुतच आहे. तरीपण तोफा, बंदुका नि अितर स्फोटक अस्त्रें नि विषारी धूर यांचाहि अुपयोग विपुलपणानें करीत असत. युद्धकारणार्थ सैन्याची चार अंगें असत. पदाति (पायदळ) अश्वदल (घोडेस्वार) गजदल नि रथदल हीं तीं चार अंगें होत. नि त्यावरून सैन्याचें वर्णनांत 'चतुरंग सैन्य' हा शब्द सर्वसामान्यरीत्या रूढ होऊन बसलेला होता, तरीपण सैन्याचीं अितकींच अंगें नसून या व्यातिरिक्त नौसेना नि वियत्सेना हींहि दोन प्रमुख अंगें असत. नौसेना म्हणजे सांप्रत ज्याला 'आरमार' म्हणतात नि विमानसेना म्हणजे वियत्सेना होय. हिंदू लोक युद्धांत जिवावर अुदार होअून झुंजण्यांत जगांत प्रख्यात होते नि आहेतही. जिवाची तमा न धरतां शत्रूवर तुटून पडणें, कधींहि माघार न घेणें, स्वामीकरितां वाटेल ते हाल सोसणें, प्रामाणिकपणा, विश्वासुकपणा, सोशिकपणा, कर्तव्यदक्षता, साहस, पराक्रम, धैर्य, मितपणा अित्यादि गुण प्रमुखपणें पाळले जात. '

'अशा पराक्रमी लोकांचीं शस्त्रें काय होतीं तें समजण्याची प्रत्येकास जिज्ञासा असणें अगदीं साहाजिक आहे. हिंदूंची धनुर्विद्येंत फारच गति होती. अेका धनुष्यापासून एकाच वेळीं चार ते नअूपर्यंत बाण सोडल्याचें प्रो. विल्सन सांगतो. आणि याहूनहि अधिक प्रविणत्व पूर्वीच्या हिंदूंत सर्वत्र दिसून येतें ! अर्जुन कर्णासारखे धनुर्धर, दशरथादिक पूर्वकालीन नि पृथ्वीराजासारखे अितिहासकालीन शब्दवेधी, मत्स्यवेधी, अचुक नेम मारणारे कसलेले धनुष्यकलापटु नि आपले बाण परत आणणारे प्रविण धनुर्विद्या–विशारद लोक सर्वत्र असत. इतकेंच नव्हे तर सांप्रतसुद्धां असले प्रविण लोक मधून मधून निपजतात. बाण परत आणणें ही कविकल्पनेची किंवा वेडेपणाची कल्पना असेल असें परकीय नि स्वकीय मूर्ख लोक म्हणत असत. परंतु आस्त्रेलियांत 'बुमरंग' नांवाचें फिरून मागें आणतां येणारें शस्त्र पाहिल्यावर मात्र शंकाखोर युरोपियनांची शंका फिटली. याव्यतिरिक्त तरवार हें अेक फार प्रमुख शस्त्र असे. तरवारीचा अुपयोग अत्यंत कुशलतेनें हिंदु लोक करीत असत नि त्यामुळेंच त्यांच्या तरवारीचा घाव हा म्हणीवजा अितर भाषांत रूढ झाला आहे. 'हिंदु अुत्तर देणें' म्हणजें हिंदू-

सारखा तरवारीचा घाव करणें असा अर्थ समजला जात असे. या व्यतिरिक्त (१) यंत्रमुक्त—यंत्रानें वा कळीच्या साह्यानें फेकलेलीं अस्त्रें; (२) हस्तमुक्त—हातानें फेकलेला 'शक्ति' आदिक (३) मुक्तामुक्त—जंबिया, त्रिशूल, आदि (४) तरवार, गदा (५) नैसर्गिक मूठ आदिक. या व्यतिरिक्त भिंदिपाल, तोमर, नाराच, परशु, कृपाण, क्षेपणी, पाश अित्यादि अनेक शस्त्रें असत.

'तोफा नि बंदुका ह्या सार्वत्रिक नि प्रामुख्यानें अुपयोगित नसत तरीपण त्यांचाहि अुपयोग पुष्कळ स्थळीं नि पुष्कळ वेळां होत असे. पृथ्वीराज ग्रंथांत "तोफा नि बंदुका यांचा ध्वनि १० कोस दूर अैकूं गेला." असें वर्णन आहे. अयोध्येच्या राजाच्या राजसभेंत राजा कुंडनलाल नामक हिंदु अितिहासकार म्हणतो कीं "लिच्छम" नामक अेक फार मोठी तोफ अयोध्येमध्यें होती. पण यापूर्वी ती अजमीरच्या महाराजापाशीं होती. **टपालाची पद्धति हा निराळा विभाग असल्याचें अुल्लेखून युद्धशास्त्राविषयींहि माहिती त्यानें दिलेली आहे.**

मार्फी म्हणतो "अग्न्यस्त्रांचा अुपयोग करण्यांत हिंदूंची पोर्तुगीज लोकांवर फार कडी आहे" फरिआअी सुझा म्हणतो कीं "पोर्चुगीज लोकांवर तोफांनीं चाल करणारी एक हिंदी युद्धनौका मी पाहिली आहे." १५०२ वर्षीं कालिकत बंदरांत अशाच युद्धनौका होत्या नि १५०३ वर्षीं ३८१ तोफांनीं झामोरिनच्या (मलबारचा राजा) लोकांनीं निकराची चाल केली. अरिस्टाटल यांस पाठविलेल्या पत्रांत अलेक्झांडर (शिकंदर) लिहितो कीं "हिंदुस्थानांत माझ्या सैन्यावर भयंकर ज्वालायुक्त पदार्थ पडले." याच-प्रमाणें थेमिस म्हणतो कीं "हिंदुस्थानांतील ब्राम्हण दूर अुभे राहून जळणाऱ्या नि गर्जना करणाऱ्या शस्त्रांनीं युद्ध करतात." प्रो. विल्सन म्हणतो "अशाच अस्त्रांपैकीं एक वज्रास्त्र म्हणून असे. त्याचा अुपयोग दूर अंतरावर असलेल्या पदार्थांचा नाश करण्याच्या कामीं केला जाअी. त्यास गति मिळण्यास दारू-सारखा गतिदायक कांहीं तरी पदार्थ असला पाहिजे यांत कांहीं संशय नाहीं." टेसियस, अेलियन फिलॉस्टॅटस, लासेन, युसेबी, सालबर्टी अित्यादि सर्व ग्रंथकार प्राचीनकालीं हिंदु लोक युद्धाच्या कामीं दाहक पाण्याचा अुपयोग करीत असें

अुल्लेखित करून ठेवतात. या दाहक जलाचे घटकावयव काय होतें तें पक्कें माहित नाहीं. परंतु शत्रूचीं नगरें, किल्ले, वाहनें, शस्त्रें नि लोक यांची जाळून राखरांगोळी करण्याच्या कामीं ते त्याचा उपयोग करीत होते असें त्यांनीं म्हटलें आहे. अर्वाचीन युद्धशास्त्र विशारदांच्या युद्धशास्त्रावर मात करणारी अशी अस्त्रविद्या पूर्वकालीं आर्योंजवळ होती. (अर्थात् हें लिहिलें गेलें त्यावेळीं सांप्रतची युद्धशास्त्रें अस्तित्वांत नव्हतीं. आतां युरोपियांचीहि प्रगति आश्चर्यकारक झाली आहे) वर वर्णन केलेल्या अस्त्राव्यतिरिक्त धूमास्त्र, वायवास्त्र, पर्जन्यास्त्र अित्यादि अनेक अस्त्रें प्रचारांत होतीं त्या योगानें शत्रूवर धुराचा, पावसाचा, वाऱ्याचा, मारा करून त्याला 'देमाय' करून टाकीत असत. वायुमंडलांत अनेक प्रकारचे विषारी पदार्थ, अनेक आकृतीचीं भयंकर श्वापदें नाग आदि प्राणी पसरून दिले जात. विषारी नि रोगट धुरामुळें त्यांचे घसे गुदमरून श्वास कोंडत, कधींकधीं कानठाळ्या बसणारे असंख्य ध्वनि अेकदम अुठत, कधीं महापूर आणणारा जलौघ दिसे, कधीं निबिड अंधःकार सर्वत्र पसरून शत्रु वा मित्र ओळखण्याची मारामार पडे, कधीं विजांचा कडकडाट होअून शत्रुसैन्य गर्भगळीत होत असे. दुसऱ्या बाजूनें सोडलेलीं अस्त्रें पाहून एकमेक निवारक नि प्रतिबंधक अस्त्रें सोडीत असत.

परंतु या मनुष्यक्षयकर युद्धविषयक सामर्थ्याबरोबर युद्धनीतिहि अत्यंत अुत्क्रांत होअून या शक्तीच्या मनुष्यजाति—संहारकारी परिणामाला फार परिणामकारक आळा घातलेला होता. परंतु ही विद्या अितकी सार्वत्रिक असून-सुद्धां कशी नष्ट झाली ह्या अुहापोहाचें हें स्थल नाहीं नि स्थलाभावामुळें तें करतां येत नाहीं. अस्तु.

वास्तुविद्या नि शिल्पशास्त्र

अेल्फिन्स्टन म्हणतो "शास्त्राच्या पूर्ण अभिवृद्धीकरितां हिंदु लोक फारच कष्ट घेतात नि त्या कामीं बुद्धीची अपूर्व कुशाग्रता दाखवितात." प्राचीन भव्य बांधकाम, अजिंठा, कारला, वेरूळ, बदामी आदिक स्थलींची विशाल नि विस्तृत पांडव कृत्यें नि कोरीवलेणीं सिद्ध होण्यास वास्तुविद्येचें साधेंसुधें ज्ञान पुरेसें नाहीं. अितकेंच नव्हें तर तें ज्ञान असामान्य प्रकारचेंच असावयास पाहिजे, खरोखर हीं पांडव कृत्यें नि कोरीवलेणीं जगांतील अद्भुत चमत्कारांत

मोडत असून त्यास लागणारें शिल्पज्ञान केवळ अतर्क्यच असलें पाहिजे, सूक्ष्मदर्शक यंत्रें, दुर्बिणी, घड्याळें आदी वस्तु होत्या असें वर्णन मयसभेच्या वर्णनांत आहेत. या मयसभेंत सहस्त्रावधि माणसें बसत अितकी मोठी होती तरी तिला एका स्थलाहून दुसऱ्या स्थलीं पोचविण्यास १०।१२ माणसें पुरत. आकाश (ether) तत्वाच्या अस्तित्वाचा शोध हिंदूंना फार प्राचीन काळीं लागलेला आहे. नि तें तत्व पाश्चिमात्यांच्या विचारशक्तीला आतां दिसूं लागलें आहे." एका मोठ्या युरोपियन पंडितानें असें म्हटलें आहे कीं "हिंदुस्थानांत विमानविद्या हें एक स्वतंत्र शास्त्र असून त्याचा हिंदुलोक व्यावहारिक कामाकडे उपयोग करतात." मुहम्मद गझनवी यासारख्या कडव्या मुसलमानानेंसुद्धां हिंदूंच्या बांधकामांची बळकटी, टिकाअूपणा, सौंदर्य नि भव्यता या गोष्टीमुळें प्रशंसापर अुद्गार काढले आहेत. त्यानें एक पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो (महंमदी मताची मुसलमान लोकांना अत्यंत श्रेष्ठता वाटते ती अितकी कीं कोणत्याहि गोष्टीची कोणत्याहि गुणांत त्यांच्या मताशीं (धर्माची) तुलना करणें त्यांना अगदीं असह्य होतें. तरी देखील तो म्हणतो कीं) "महंमदी धर्मा'इतकेंच येथील बांधकाम बळकट असतें" मि. थार्नस्टन, प्रो. वेबर, फर्ग्युसन, लॉर्ड व्हलेनशिया यासारख्या प्राच्यभाषाकोविद कलापंडित नि मार्मिक टीकाकार यांनीं मनापासून येथील प्रचंड, गंभीर नि विस्मयकारक बांधकामाची यथेच्छ स्तुति करून अंतीं त्यांचें यथार्थ नि सौंदर्यानुरूप वर्णन करणें अशक्य आहे असें मान्य केलें आहे. अेल्फिन्स्टन अेका स्थलीं म्हणतो "खांब, गणेशपट्या, खिडक्यांची कवाडें, खंडमंडलें (मेहरापीं,) यांचीं कामें देखील अितकीं सुंदर नि अेकसारखीं केलेलीं आहेत कीं त्यांच्या पट्या सांच्यांतून ओतून काढल्या आहेत कीं काय असा भास होतो. लता, वेली, पुष्पें, मानवाकृति, पशुपक्षी, नि अितर काल्पनिक आकृति हीं सर्व अेका स्थलीं मनोहर रीतीनें घालून त्यांचीं कलाकुसरीचीं केलेलीं कामें खरोखरच मनास चटका लावून सोडतात. हीं कामें इतकीं कांहीं कलाकुसरीनें नि वेलबुट्टीनें नयनमनोहर केलेलीं असतात कीं त्यांच्या सारखीं कामें दुसरीकडे क्वचितच पहावयास मिळतील. पांडेचरीच्या दक्षिणेस २० मैलांवर चलंब्रम् नांवाचें एक अति भव्य मंदिर बांधलेलें आहे. ३६० फूट लांब नि २६० फूट

रुंद अशा विस्तीर्ण पटांगणांत हें पवित्र भव्य मंदिर असून त्यास १००० खांब आहेत नि प्रत्येकाची उंची ६।७ पुरुष आहे. यावरून या देवालयाचा आकार केवढा असेल नि त्याचें दर्शन किती अुदात्त असेल याची सहज कल्पना होईल. असें डॉ. राबर्टसन नि प्रो. हीरन म्हणतात. वेरूळच्या लेण्याविषयीं प्रो. हीरनचा अभिप्राय आहे कीं " पृथ्वीच्या पृष्टभागावर नि पोटांत शिल्पकलेला जेथें जेथें प्रवेश करून आपलें शोभिवंत काम, सुबकपणा, कौशल्य, अुदात्तपणा, गांभिर्य ही दाखवितां येतील तितकें सर्व तिनें या स्थळीं दाखविलें आहे. या लेण्यामध्यें जिनें पूल, माड्या, गच्च्या, देवालयें, खण, ढलेच (Posties), द्वारकमानी, मनोरे, भव्य पुतळे, अुठावदार वेलबुट्या, (Reliefs) अित्यादि सर्व कांहीं आहे. त्यांच्या दारांत पाअूल टाकतांना अंगावर अेक प्रकारचा कांटा अुभा राहिल्यावांचून रहात नाहीं. वसुंधरेच्या नितांत पोटांत वर सांगितलेले सर्व प्रकार पोखरून काढलेले पाहिले, डोक्यावर अत्यंत वजनदार पर्वताचें आच्छादन पाहिलें नि कित्येक स्थळीं निराधार भारी ओझ्याचे हे डोंगरी आढें नि छप्पर दृष्टीस पडलें म्हणजे ज्यांच्या हातून हें निर्माण झालें त्यांच्याविषयीं आदर, विस्मय, कौतुक, नि पूज्यभाव अित्यादि भावना मनामध्यें खेळूं लागतात नि जर त्यांचें दर्शन होअील तर आपण किती धन्य होअूं. असे विचार मनांत आल्यावांचून राहत नाहींत." अशीं स्थळें हिंदुस्थानांत विपुल आहेत. बौद्ध पंथाचे कालीं बौद्धपंथप्रसारासाठीं **बौद्ध भिक्षू जेव्हां पूर्वपश्चिम अुत्तर दिशांनीं सर्व जगभर गेले तेव्हां अितर कलांविद्यांबरोबर ही स्थापत्य विद्या नि शिल्पकला विरामस्थानें मठ आदिक निमित्तानें जाअून तिची छाप अन्य देशीय बांधकामावर बसली आहे. त्यांचा परिणाम मुसलमानी कमानी नि खिस्ती प्रार्थनामंदिरें यांजवरसुद्धां झालेला दिसतो** " असें प्रो. वेबर नि कर्नल टॉड यांचें म्हणणें आहे.

वीणकाम

येथील वायुमंडळ, कारागिरांचे हस्तलाघव, नयनचापल्य, साधनसामुग्रीचें अल्पत्व नि साधेपणा, पिढीजात संस्कार नि अभ्यास यांचें प्राचुर्य याविषयीं युरोपियन अितिहासकार काय म्हणतात तें पाहूं. जेम्स मिल्ल नि आर्म हे प्रख्यात

अितिहासकार म्हणतात कीं " हिंदु लोक जरी शरिरानें कोमल नि सडपातळ असले तरी त्यांची दृष्टि फार खोल नि बारीक अशी वहिवाटलेली असते. हाताचीं बोटें सूक्ष्म संवेदना जाणण्यास पूर्ण समर्थ असून, चपळाअी, साहजिकता, कांति नि लवचिकपणा या गोष्टींत विनतोड आहेत. सुंदर, मनोहारी, कोमल, मृदु, पातळ. पिळदार नि टिकाअू कापड येथें निघत असे नि त्याचा खप सर्व जगभर होत असे. पडेल तें मोल देअून येथील झगझगीत, विरलतम नि मनोहारी कापड घेण्याची रुची परकीयस्थ राजेरजवाड्यांना लागलेली असे असें मिल्ल, अेल्फिन्स्टन, मरे, थार्नटन आदि लेखकांच्या लेखांवरून दिसतें. डाक्याची मलमल तर प्रसिद्धच आहे. अेकदां अवरंगजेब आपल्या मुलीस दाक्षिण्याभावाबद्दल रागें भरून म्हणाला " मुली ! हें काय ? " त्वां आपलें सुकुमार नि कोमल शरीर वस्त्राच्छादित करून पुरुषांच्या दृष्टीस न पडावें असें करणें अुचित नाहीं काय ? " त्यावर ती मोठ्या नम्रतेनें म्हणाली, " बाबा अेकावर अेक असे सात 'जामे' मी नेसलें आहे परंतु त्यांच्या पातळपणामुळें नि सूक्ष्मतेमुळें त्या सातही वस्त्रांतून अंग दिसतें त्याला मी काय करूं ? " ही दंतकथा नसून 'वॉथ' यांच्या 'डाक्यांतील कापसाचा व्यवसाय' या पुस्तकांतून घेतली आहे. काश्मीरच्या शाली तर जगप्रसिद्धच आहेत. या थोड्याशा अुल्लेखांकरून विणकामाच्या अत्युत्कृष्टत्वाची कल्पना करतां येण्यासारखी आहे म्हणून आतां आपण

'धातुकाम' नि 'कलाकाम'

याकडे वळूं. प्रो. विल्सनसाहेब म्हणतात " लोखंडाच्या ओतकामाची कला हिंदुस्थानांत किती प्राचीन कालापासून चालूं आहे हें कांहीं सांगतां येत नाहीं. कारण हिंदुस्थानांत ओतकाम, घडकाम, तारकाम, खोदकाम, पोलादकाम फार प्राचीन कालापासून चालूं आहे." डॉ. राय म्हणतात कीं डमास्कसच्या तरवारीची जरी प्रसिद्धि आहे तरी ती कला अिराणी लोकांनीं येथून नेअून पुढें आरबांनीं अुचलली. दिल्लीमधील कुतुबमिनार म्हणून प्रसिद्ध असलेला खांब हा पृथ्वीराजानें आपल्या मुलीला इंद्रप्रस्थाहून श्रीयमुनेचें दर्शन व्हावें यासाठीं अेकस्तंभी मंदिर म्हणून बांधलेलें होतें. तें कुतुबशाहानें वरचा भाग पाडून नि पुन्हां मुसलमानी पद्धतीनें तो भाग बांधून कुतुबमिनार असें नांव दिलेलें आहे. **त्याचे पुढें**

असलेला एक भव्य धातुस्तूप आज १५०० वर्षांवर तेथें अुभा आहे. त्यावर वारा, अून, पाअूस, थंडी यांचा अेकसारखा मारा होत असून त्याजवर गुंजेअेवढाहि गंज चढलेला नाहीं. किंवा त्याच्या मूळच्या सौंदर्यांत यत्किंचितही कमीपणा आलेला नाहीं. अथवा त्यावरील कोरलेल्या लेखांत यत्किंचितहि मलीनपणा आलेला नाहीं. जगन्नाथ पुरी येथील प्रचंड लोखंडी पट्टी सोमनाथाचें नकशीदार नि सालंकृत लोखंडी दरवाजे, नरवारची २४ फुटी तोफ ही सर्व मूकघोषानें प्राचीन कालांतील हिंदूंच्या धातु कलाप्राविण्याविषयीं साक्ष देत आहेत. त्याचप्रमाणें तावदानें, जरतारी कामें, कलाबतू नि किनखापाचीं कामें, गालिचा, त्याचप्रमाणें अंतःपुरीन चिकाचे पडदे, नकशी नि कलाकुसरीचें जाळीदार काम, काच नि विल्लोरी काम, लांकडी काम, तीक्ष्ण धारेचीं शस्त्रें, अित्यादि वस्तूंवरून हिंदूंच्या कलाप्राविण्याविषयीं यथार्थ निश्चिति पटते. ज्याच्या सुबकपणाची, मोहकपणाची प्रत (नक्कल) करतां येणें अशक्य आहे अशी नक्षिकामें, मौक्तिक रत्नजडित अलंकार, भरजरीच्या वस्तूंच्या वानग्या, मूल्यवान् नक्षीदार कामें, अपूर्व रंगमिश्रणानें रंगविलेले गालिचे, रंगाचा अुठावदारपणा नि विलक्षण प्रभा यामुळें तेजस्वी दिसणारीं मीनाची कामें, कमानी, महिरापी, वेलबुट्या अित्यादींचे पदार्थ १८५२ सालच्या लंडनच्या प्रदर्शनांत मांडिले होते. ते पाहून पाश्चात्य कलापटु आश्चर्यानें स्तंभित होऊन त्यांनीं त्या कलाप्राविण्याला गुरुस्थानीं मानलें.

धर्म नि धर्मतत्त्वज्ञान

हिंदुधर्म सर्व धर्मपंथांचा जनक आहे. अत्यंत निकृष्ट प्रतीच्या मनुष्यापासून तों अत्यंत श्रेष्ठ विचारी पुरुषांपर्यंत सर्वांना यथाधिकार तत्त्वोपदेशानें अुच्चतर पदांचे अधिकारी करण्याची शक्ति या धर्मांत आहे. इतर धर्मपंथ वा मतप्रवर्तकांनीं एकांगी दृष्टीनें जेवढें कांहीं समजलें असेल वा मनानें घेतलें असेल तितकेंच नि तेंच सत्य समजून त्याचा प्रसार करण्यास त्यांच्या अनुयायांस प्रवृत्त केलें. आणि कांहींनीं तर बलात्कार, अत्याचार, अडवणूक वा फसवणूक या मार्गाचा अवलंब करण्यावर विशेष भर ठेवला. हिंदुधर्म म्हणजे सर्वांगपूर्ण धर्म असल्यामुळें तद्धर्मीयांना नवीन धर्मतत्त्वें शिकवून स्वानुयायी बनविणें दुसऱ्या मतवाल्यांना शक्यच नव्हतें नि म्हणून हिंदुस्थानांत मात्र अितर

मतवाल्यांनी वरील चार अुपायांचा सरसहा अुपयोग केला नि करीत आहेत. 'डेला व्हॅली' नामी एका प्रख्यात खिस्तभक्तानें आपल्या 'पूर्व हिंदुस्थानचा प्रवास' या पुस्तकांत मान्य केलें आहे कीं हिंदी लोकांस दुष्काळानें अनाथ नि अन्नान्न करून सोडलें नसतें तर येथें एकही मिशनरी ठेवण्याची आवश्यकता नव्हती. 'नाअिंटिंथ सेंचरी' नामक प्रख्यात मासिकांत जर्सीच्या काअुंटेसचे पुढील अुद्गार मननीय आहेत.

" हिंदुस्थानांतील अुच्च जातींतील विचारवान लोकांना ज्या शंका येतात नि भीति वाटते त्यांचें निरसन खिस्ती धर्मानें होणें ही गोष्ट अशक्य आहे. मनांत अुद्भवणाऱ्या अत्युच्च आशा अुद्भविण्यास नि त्यांची तृप्ति करण्यास अुपनिषदें पूर्ण समर्थ आहेत. प्राचीन ऋषींचें सूक्ष्म तर्कशास्त्र हा अेक अभेद्य तट असून त्यांतील वादविवाद नि विवेचनपद्धति हिंदुतत्त्वज्ञानाचें संरक्षण करण्यास पुरेशी आहे. जगांमध्यें दिसून येणारी विषमता, सुखदुःखाची व्यस्त प्रमाणांत झालेली वांटणी, हे प्रश्न कर्माच्या तत्त्वानें सोडविलेले आहेत. आत्म्याची खळबळ नि तळमळ शांत करण्यास अेका विशिष्ट मूर्तीवर ध्यान देअून बसावें हा अुपाय सांगितलेला आहे. पुढें ही प्रतिमा बिंदुसमान कल्पून नंतर कांहीं दिवसांनीं तो बिंदु आपणांमध्येंच आहे अशी भावना करण्याचा प्रयत्न करावा. हा प्रयत्न सिद्ध झाला म्हणजे मन आत्मविचारांत दंग होतें नि अशा वेळीं अैहिक अिच्छा नि सुखलालसा पार मावळून मन आत्मिक प्रेमानंदांत पोहूं लागतें. हिंदुतत्वज्ञानाची ही स्थिति म्हणजे परमावधि होय ! परंतु अशा अत्युच्च आर्यतत्त्वज्ञानानेंसुद्धां ज्यांचें समाधान होत नाहीं अशांस खिस्ती धर्म कसें समाधान देणार ? खिस्तीधर्मामध्यें अितकी योग्यता थोडीच असणार ? अर्वाचीन भौतिकशास्त्रांशीं कोणत्या अेका तत्त्वज्ञानाचा जर मेळ असेल तर तो केवळ हिंदुतत्त्वज्ञानाचाच होय. दुसरीकडे तत्वज्ञान पदवीला योग्य असा विचारच केलेला सांपडत नाहीं." (बौद्धपंथाव्यतिरिक्त).

जान्स्टॅजर्ना म्हणतो कीं " बौद्ध धर्माचीं तत्त्वें बहुतेक अितर सर्व धर्मांत मिसळून गेलेलीं आढळून येतात." आणि बौद्धपंथ म्हणजे हिंदुधर्माचेंच बालक वा शाखा होय. भारतवर्षांतून अिजिप्शियन धर्ममत निघालें, अिजिप्शियन धर्मावरून मोझेझनें आपलीं ज्यू धर्मशास्त्रें रचिलीं. या शास्त्रांवर पुन्हां बौद्धमतांचा परिणाम

ग्रं. सं. 99094

पूर्वी

होऊन ख्रिस्तीमत निघालें. पारशी, ज्यू नि ~~ख्रिस्ती आ तिन्ही~~ धर्ममतांच्या भेसळीचें जें कडबोळें तें मुसलमानी धर्ममत म्हणून पुढें आलें. बुद्ध देवाच्या पादुका हिंदुस्थान नि त्या व्यतिरिक्त इतर कांहीं देशांत आढळून आल्या आहेत. बौद्ध लोकांची अशी समजूत आहे कीं जोंपर्यंत अशा पादुका अस्तित्वांत असून लोक त्यांचें दर्शन घेत आहेत तोंपर्यंत महापूर, प्रलय, अुल्कापात आदिक पंचमहाभुतांच्या अुत्पातापासून भय नाहीं. अशा पादुकांची अेक जोडी मक्केस आहे नि मुसलमानी मताचे पूर्वी बौद्ध लोक तेथें यात्रेला जात असत. त्या पादुकांस क्राबत् म्हणतात. ग्रेट ब्रिटनमधील द्रुअिड लोक आपलेकडील ब्राह्मण जातीप्रमाणें श्रेष्ठ वर्णाचे होते. त्यांच्यांत पुनर्जन्म, पूर्वजन्म, आत्म्याचें नि परमात्म्याचें मीलन हीं तत्त्वें असून अुत्पादक, संरक्षक नि विनाशक या तीन देवांचें त्रिकूट सांपडल्याप्रमाणेंच होतें. याचप्रमाणें निरनिराळ्या देशांत सर्व जगभर मूलतः हिंदुधर्म किंवा त्याचेंच विकृत रूप अस्तित्वांत होतें याला अनेक पुरावे मिळाले, मिळत आहेत, अधिकाधिक मिळत राहतील. म्याक्समुल्लरच्या मतें असिरियन, अिजिप्शियन नि ग्रीक पुराणांचा पाया हिंदु पुराणेंच आहेत नि हिंदु पुराणांची अुभारणी वेदांचे पायावर झालेली आहे. डी. ब्राअून यांचा असा अभिप्राय आहे कीं, सर्व जगांतील वाङ्मय नि अीश्वरोत्पत्तिशास्त्र हें हिंदूंच्या अखंड परिश्रमांचें फल आहे असें पूर्वग्रहरहित नि निर्विकार मनानें काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्यांच्याठायीं गाढ विद्वत्तेला शोभणारी नि विशाल प्रतिभेला अनुरूप असें गंभीर कवित्व, स्फूर्ति नि नितांत आणि अगाध विचारशक्ति वास करीत होती. त्यांच्या संपूर्ण वाङ्मयाचें संपूर्ण भाषांतर झाल्यास आधुनिक मदमत्त संस्कृति या पुराण परंतु रुचिर, मोहक नि सुगंधि अशा वाङ्मयपुष्पांकडे साभिलाष दृष्टीनें पाहून त्यांच्या प्राप्तीविषयीं आतुर झाल्यावांचून रहाणार नाहीं. असे आजन्म विद्याव्यासंगी प्राच्यविद्याविशारद प्रो. म्याक्समुल्लर, ज्याकोलेट, सर विलियम जोन्स हे छातिठोकपणें सांगत आहेत.

हंटरच्या मतें "बुद्धि, मन, जड अिंद्रियें, आत्मा, दुःखोत्पत्ति, आत्म्याचें आत्यंतिक सुख, नियतिवाद, प्रयत्नवाद, सृष्टि–सृष्टिकर्ता यांतील परस्परसंबंध, परमेश्वराचें कारुण्य नि मानवी प्राण्याचें दुःखमय जीवन, सुखदुःखविषमता,

अित्यादि कठिण विषयांचें विवेचन हिंदु तत्त्वज्ञानांत विस्तारपूर्वक केलेलें आहे. ग्रीक, रोमन, मध्यकालीन नि अर्वाचीन शास्त्रज्ञ नि तत्त्वज्ञ यांच्या बुद्धीस वर दिलेलें नि त्याच जातीचे अितर विषय फारच अवघड नि कठीण वाटले नि त्यांची ते सोडविण्याकरितां फार प्राचीन कालापासून धडपड चाललेली आहे. आर्यतत्त्वज्ञान्यांनीं आपल्या बुद्धिप्रकर्षानें, वक्तृत्वपूर्ण वाणीनें नि शोधक मनानें त्यांचें कोडें फार प्राचीन काळींच अुकलून ठेवलेलें आहे.

आर्यांचें तत्त्वज्ञान सर्वव्यापी आहे. जगांतील सर्व तत्त्वज्ञानमतें आर्य-तत्त्वज्ञानाचे पोटांत समाविष्ट झालेलीं आहेत. आर्यतत्त्वज्ञानाचा विचार उपनिषदांत केलेला आहे. उपनिषदांमध्यें जगांमधील सर्व प्रचलित मतें संग्रहीत झालेलीं आहेत. आर्यावर्तांतील तत्त्वज्ञानाला जगद्गुरुत्वाचा मान सर्व देशांतील पंडितांनीं दिला तो केवळ सन्मानार्थ दिला नाहीं तर हिंदु जातीनें अध्यापनाचें काम सर्व जगांतील मानवीसमुदायांत सतत चालविलें होतें, म्हणून दिला. हिंदुस्थान म्हणजे सर्वजगाचें विद्यापीठ होतें. याच विद्यापीठांतून प्राचीनकाळीं पायथ्यागोरस हा आद्य ग्रीक तत्त्ववेत्ता येथें हिंदुस्थानांत येअून आर्यतत्त्वज्ञानाचा अभ्यास नि पुनर्जन्म सिद्धान्त शिकून गेला. डा. ओन्फिल्डच्या मतें पायथ्यागोरस आनाझारकर, पायऱ्हो आदिक तत्त्ववेत्ते हिंदुस्थानांतच शिकून गेले. स्वीडनमधील फाअूंट, पोकाक, शूगेल, प्रिन्सेप, सरमोनियर विल्यम्स, अलेक्झांडर पोर्लिस्टर, यार्ड अशी मोठमोठी मंडळी अशाच गोष्टीचें पुष्टीकरण करीत आहेत. युरोपांत नास्तिक मताचा पुरस्कार निरीश्वर बौद्धपंथापासून झालेला आहे. तत्त्वज्ञान ग्रंथांत अलंकारस्थानीं शोभणारे आचार्य ग्रंथांविषयीं सर विल्यम जोन्स म्हणतात "आचार्य भाष्यासारख्या सुंदर ग्रंथाचें संपूर्ण भाषांतर झाल्यावाचून तत्त्वज्ञानाचा अितिहास पुरा होणार नाहीं. प्रत्यक्ष सरस्वतीसुद्धां आचार्य भाष्याची महति गातांना शीण आल्यावांचून राहणार नाहीं."

शेवटीं म्याक्समुल्लरचें अेक अत्यंत विचारार्ह नि मननीय विचारप्रदर्शन पुढें ठेवून ह्या भागाची समाप्ति करूं. तत्त्वज्ञानाचा अुगम केव्हां होतो नि त्याची वाढ होण्यास राष्ट्राची स्थिति कशी असावी लागते याविषयीं म्याक्समुल्लरनें अितिहासाभ्यासपूर्वक अेक सिद्धान्त काढला आहे. तो असा:-" राष्ट्रांत जिकडे तिकडे शांतता अस्तून धनधान्याची समृद्धि आहे; कांहीं ठळक ठळक

कुटुंबांजवळ विपुल संपत्ति सांठलेली आहे; सर्व लोकांना विद्या नि कला यांचें ज्ञान होण्यास लागणारीं विद्यालयें नि विद्यापीठें भरपूर आहेत; अशा स्थितींत पोटाकरितां अहर्निश झटणाऱ्या लोकसमूहांमधून थोड्यांना विद्या, कला आदि गोष्टींकडे लक्ष देण्यास सवड मिळते नि त्यांतूनही फारच थोड्यांना त्याचा ध्यास लागलेला असतो. अशा अल्पसंख्येंतून सर्व जनांच्या चित्तांना आनंद नि शांति देणारे भावी तत्त्वज्ञानी निर्माण व्हावयाचे असतात. हाच नियम जर हिंदुस्थानास लागला तर तो पूर्णपणें खरा ठरलेला पहावयास मिळतो. आणि जगाद्विख्यात तत्वज्ञान्यांची गिणती केल्यास हिंदुस्थान वरील नियमान्वयें सर्व जगाचें शीर्षस्थानींच शोभेल यांत शंका नाहीं."

भाग्यकालाची संध्याकाळ

असा सर्वांगीण भाग्यैश्वर्यसंपन्न हिंदुस्थान आपत्तींचा भक्ष्य कसा बनला ? वा कां बनावा ? असे प्रश्न मनापुढें दत्त म्हणून अुभे राहतात. जगांतील सर्व वस्तुजाताला दिवस नि रात्र अर्थात् सुदिन नि दुर्दिन वा सुख वा दुःखकाल पहावा लागतो. अत्युन्नतीच्याच पोटांत अवनतीचीं बीजें रोवलीं जातात, त्यांना अंकुर फुटतात, ते प्रवर्धित होतात नि परिपुष्ट होअून अवनतीच्या रूपानें त्या त्या वस्तूला ग्रासून टाकतात. ही गोष्ट हिंदुस्थानच्या संबंधांत तर तंतोतंत सत्य ठरली आहे. हिंदुस्थान हें सर्व जगाचें हृदय होतें. धर्म, शास्त्र, कला, तत्त्वज्ञान आदिक गोष्टींचे सर्व जगभर झालेल्या प्रसरणाला पुनः पुनः नवजीवन देण्याचें कार्य हिंदुस्थान करीत होता. हिंदुस्थानांतून प्रचारक, शास्त्री, तत्त्ववेत्ते, व्यापारी अितकेंच काय पण राजवंशांतील पुरुषहि सर्व जगभर जात असत. धर्म प्रचारकांनीं जगांतील हिंदुधर्मीयांना आपापल्या धर्मशासनांत दृढ ठेवलें; शास्त्रवेत्यांनीं जगभर शास्त्रांच्या ज्ञानाचें दान दिलें, तत्त्ववेत्यांनीं तत्त्वज्ञान-पिपासूंना तत्त्वज्ञानामृत पाजून परितृप्त केलें, व्यापारी वर्गांनीं सर्व जगांत हिंदुस्थानाकरवीं नि सकल जगांतील व्यवसायाद्वारां हिंदुस्थानांत संपत्तिवर्धन केलें, आणि राजवंशांतील पराक्रमी नि समर्थ राजपुरुषांनीं पृथ्वीवरील सर्व देशांना राजवंश पुरवून त्या त्या देशांत सद्राजवंश स्थापीत तो तो देश अुन्नतीच्या मार्गाला लावलेला आहे. ही कथा म्हणजे आत्मप्रौढीची अवास्तव कल्पना म्हणून कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. यासाठीं अगदीं थोड्या

अुदाहरणांनीं नि माहितींनीं या विधानाची वास्तवता दाखवून पुढील मार्गाला लागूं.

चीन, तिबेट, जपान, कोरिया, सयाम, हिंदूचायना, सुमात्रा–जावादिक बेटें आदिक आशियांतील पूर्व भागांत हिंदू संस्कृति–धर्माचाच ध्वज डोलत होता नि आजही रूपान्तरानें तोच तसा डोलत राहिला आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. तार्तरी सायबोरिया आदिकमध्येंहि हिंदू संस्कृतीचे अवशेष असल्याचें सुप्रसिद्धच आहे, अरबस्थानांत हिंदूंचें वास्तव्य नि राज्यें होतीं हें पुष्कळांना माहित नाहीं पण अितिहासावशेष नि अद्यापहि तेथें परकीय संस्कृतींच्या वेढ्याला तोंड देअून अुरलेल्या थोड्याशा अुर्वरित हिंदूजातीच्या अस्तित्वावरून सिद्ध करतां येण्यासारखें आहे. तेथील मूर्ति अिस्लामियांनीं छिन्नविच्छिन्न करून टाकलेल्या अद्यापपर्यंत सांपडतात. अितकेंच नव्हे तर पर्वतांतील खडकांतून स्थळोंस्थळीं श्रीविष्णु, देवी, श्रीशंकर (ही अेकच कोरीव मूर्ति) मूर्ति पर्वतांतील खडकांत कोरलेल्या मिळाल्या आहेत. बलोचस्थान, अफगाणिस्थान, अिराण हे देश तर हिंदू–संस्कृतीचे अंशभाग होते याविषयीं वादच नाहीं. जर्मनी, आस्त्रियादिक तर आम्हीं आर्य असून भारतीयापैकींच आहोंत असें म्हणत आहेत. (अर्थात् अितिहास आधारावर) अमेरिकेंत हिंदू संस्कृतीच नांदत होती हें श्री. चमनलालजींच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाद्वारा प्रसिद्ध झालेलें आहे. आफ्रिकेंतीलहि कांहीं प्रदेशांत हिंदूंच्या संस्कृतीचे पूर्वावशेष अद्याप मिळत आहेत. युरोपच्या सर्व भाषांचें अुगमस्थान अशा ज्या लाटिन नि ग्रीक भाषा आहेत त्यांचे मातामहीच्या स्थानीं संस्कृत भाषाच आहे. रशियन भाषेंत शेंकडा ६० शब्द संस्कृतोत्पन्न शब्दांचीं रूपान्तरें आहेत. इतकेंच नव्हे तर आजच्या सर्व युरोपीय भाषांमधून संस्कृतोत्पन्न शब्दांचींच रूपान्तरें विपुल सांपडतात. अेकदां श्री. विवेकानंद अुद्गारले होते कीं जगांतील विविध मानववंश नि भाषा यांच्या मूल–अुगमस्थानाविषयींची समस्या आर्यवंश म्हणजेच आर्य जाति नि संस्कृत भाषा याच अुत्तरानें सोडवितां येअील. या सूत्ररूपात्मक लिखाणांत अंगुलीनिर्देशानें सर्व जगांत हिंदुत्वाचा नि हिंदु संस्कृतीचा फैलाव झालेला होता हें संक्षेपानें देतां आलें त्याला निरुपाय आहे. याची समग्र माहिती तद्विषयक अितर पुस्तकांवरून जिज्ञासूनीं करून घ्यावी.

महाभारतकाल हा हिंदुस्थानांतील हिंदुत्वाच्या भाग्यैश्वर्याचा मध्यान्हकाल होता. त्या युद्धांतील संहारानें जगांतील अुत्तमोत्तम योद्धे, वीर, धनुर्धारी नि शस्त्रास्त्रविद्याकुशल पराक्रमी पुरुष नष्ट झाले. क्षत्रियवर्गांतील वृद्ध, प्रौढ नि तरुण पिढी जवळ जवळ नाहींशी झाली. सर्वत्र अेकप्रकारची अनवस्था माजली. समाजाचा संरक्षणकर्ता नेतृवर्ग मृत्युमुखीं पडल्यानें अुचलेगिरी, परस्वापहारबुद्धि आदिक दुर्वर्तनांना समाजांत प्रकट होण्याला वाव मिळाला. नि अेकंदर हिंदुसंस्कृतीची जागतिक घडी विसकटून गेली. कौरवपांडवांनीं सर्व जगांतील क्षत्रियकुलभूषण राजवर्गाला आपापल्या साह्यार्थ आमंत्रित केलें होतें नि जगांतील जवळ जवळ तत्कालीन प्रत्येक राष्ट्रांतून त्या त्या राष्ट्राचे प्रख्यात रणधुरंधर आपापल्या निवडक सैन्यानिशीं या महाभारतांत साह्यप्रदानार्थ या ना त्या पक्षाला जाअून युद्धामध्यें प्रविष्ट झाले होते. अठरा अक्षौहिणी म्हणजे अक्षरशः लक्षावधि योद्धे (पन्नासलक्षांचे जवळ जवळ) या महाभारत युद्धांत रणशायी झाले. अेकंदर सर्व जगाचा क्षय तर झाला पण प्रत्यक्ष भारताचा—हिंदुस्थानचा भयंकर शक्तिपात झाला. ज्याप्रमाणें ब्रह्मचारी, वानप्रस्थ नि संन्यास वर्गाला पोसणारा, संरक्षिणारा आणि सर्व दृष्टीनें आधार होणारा गृहस्थाश्रम हा आवश्यक आहे, त्याचप्रमाणें कलाकौशल्यादि प्रविण राष्ट्रसेवाधर्मी शुद्र, संपत्तिवर्धन द्वारां राष्ट्राचें पोषण करणारा वैश्यवर्ग, नि विविध ज्ञानदानद्वारां राष्ट्राला सर्वज्ञानसंपन्न ठेवून मार्गदर्शन करणारा ब्राह्मणवर्ग यांना स्वकर्मनिष्ठ ठेवून त्याचें यथायोग्य नियमन नि संरक्षण करणारा प्रबळ क्षत्रियवर्गहि राष्ट्राला अत्यंतावश्यक आहे. आणि तोच वर्ग या महायुद्धांत नष्ट झाल्यानें हिंदुस्थानची अपरिमित हानि झाली.

सर्वांगपरिपुष्ट नि पूर्णारोग्यसंपन्न अशा बलवान् मनुष्याचे अंगांत अेखाद्या शक्तिपातकारी दुखण्यानें ठाणें दिलें तर त्याच्या आरोग्यांत नि बलवत्तेच्या स्थितींत अुणीव अुत्पन्न होअील पण म्हणून तो लागलींच धराशायी होअून मृत्युवश झाला पाहिजे असें नाहीं, तो पूर्वीच्या स्थितीशीं तुलना करतां जसा होता तसा राहिलेला नसला तरी तो अितर सामान्याहून केव्हांहि वरचढच रहाणार यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानहि थोडासा अुच्च स्थितींतून या महाभारताच्या शक्तिपातामुळें खालीं घसरला तरीहि जगांतील त्याचे जगद्गुरू-स्थानची अुचता नि श्रेष्ठता ही अगदींच नाहींशी झालेली नव्हती. पण पूर्वी

ज्याप्रमाणें सर्व जगभर हिंदुस्थानांतील सर्व प्रतीच्या कर्त्या पुरुषांची जा–ये होत होती ती तशी टिकूं शकली नाहीं. त्यांत कमीपणा येऊं लागला. महाभारतानंतर हिंदुस्थानांतून अनेक कारणांनीं निराधार लोकसमूह हिंदुस्थाना-बाहेरील निरनिराळ्या देशीं वसाहतीसाठीं गेले, अरबस्तानांतहि अशाच गेलेल्या वसाहतवाल्यापैकीं कांहीं अंश सिरिया भागांत अद्यापहि हिंदुत्वाला चिकटून राहिलेला आहे.

तरीपण वर सांगितल्याप्रमाणें हळुंहळूं हिंदुस्थानांतील सर्व क्षेत्रांतील कर्त्या पुरुषांची जगांमधील सर्व देशांकडे होणारी जा–ये थांबली नि त्यामुळें शनैः शनैः अितर देशांतील धर्मसंस्कृतीचें परिष्कृत स्वरूप विघडूं लागलें. कारण 'अेतद्देशप्रसूतस्य सकाशात् अग्रजन्मनः । स्वे स्वे चरित्रं शिक्षेरन्पृथिव्यां सर्व मानवाः ॥ ' (या देशांत जन्मलेल्या अग्रजन्मीं म्हणजे ब्राह्मण वर्गापासून धर्मविषयक नि संस्कृतिविषयक चरित्रपरिचर्या नि समस्या परिष्कृत करून नि सोडवून घ्याव्यात.) असा स्मृतिकार मनुमहाराजांनीं दंडक घालून दिला होता तो व्यवहार्य कोटींत राहूं शकला नाहीं. सर्व जगांत हिंदुधर्म नि संस्कृतीच नांदत होती. हिंदुस्थानांतून कर्त्या पुरुषांची जा–ये चालू राहून सर्व देश आपली तद्विषयक अवश्यकता भागवून घेत होते नि त्यामुळें अुत्पन्न होणाऱ्या कृतज्ञताबुद्धीमुळें सर्व देश हिंदुस्थान देशाकडे आपली अुपकार-कर्ती मायभूमि या दृष्टीनें बघत होते. अशा स्थितींत बाहेरून हिंदुस्थानावर आक्रमण होणें वा अितर कोणत्याहि प्रकारें त्यांचेकडून अुपसर्ग हिंदुस्थानला पोंचणें शक्य नव्हतें. हिंदुस्थानांत भारतीय संहारासुळें भारतीयामध्यें थोडा विगालितपणा आला होता तरी कर्तृत्वशून्यता अुत्पन्न झाली नव्हती. सर्व वर्ण आपापल्या कक्षेंत परस्परसहाय्यक नि पूरक बुद्धीनें नि पद्धतीनें कार्यरत होते. देश धनधान्य नि फलाफुलांनीं अत्यंत समृद्धतेनें नांदत होता. कदाचित् देशांत कांहीं निमित्तांनीं लहानमोठीं युद्धें झालीं तरी धर्मयुद्ध-पद्धति प्रस्थापित झाल्यामुळें केवळ युयुत्सु पक्षांतील युद्धमान् सैन्यांत अेखाद्या विविक्षित भागांतील रणस्थलावर युद्धें होत. त्यांचा सामान्य जनसमाजाला नि त्यांच्या विविध व्यवसायाला किंचितहि अुपसर्ग होत नसे नि त्यामुळें भारतीय लोक अिहलोकींच अेकप्रकारें सुखसर्वस्व लाभवून देणारा स्वर्गच अनुभवित

होते. त्यायोगानें अिहलोकीं कांहीं विशेष प्रातव्य अर्थात् महान् गोष्ट प्राप्त करून घेण्याची महदाकांक्षा वा महत्त्वाकांक्षा घरण्यासारखें कांहींच अुरलेलें दिसण्यासारखें नव्हतें नि म्हणून अिहलोकीं कांहीं नाहीं तर परलोकावर स्वारी करून त्या प्रदेशांत कांहीं विशेष कामगिरी करावी अशी महदाकांक्षा बुद्धिवान् नि कर्त्या लोकांच्या मनांत अुदय पावून बहुतेक कर्ता नि बुद्धिवान् वर्ग निःश्रेयसाकडे–परलोकीय कल्याणाकडे–मुक्ति वा मोक्ष मार्गाकडे झुकूं लागला. मनुमहर्षीप्रणीत वयपरत्वें चार आश्रमाच्या पायऱ्या चढत चढतच मग मोक्षपदवीसाठीं संन्यास वा वानप्रस्थ घ्यावा–तत्पूर्वी सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत हा समाज–सुस्थिति सर्व प्रकारें सुरक्षित ठेवणारा दंडक समाजामधून नाहींसा होअूं लागला. राज्यक्रांत्यादिक विविध आपत्तींपासून त्रस्त न होतां सुसमृद्ध नि सुरक्षित, अशा शांततेचा अुपभोग शतकांमागून शतकें–नव्हे सहस्रकांमागून सहस्रकें–घेत राहिल्यासुळें सामाजिक नि दैनिक सुस्थिति असणें निसर्गसिद्धच असून त्याला विशेष प्रयत्नांची वा सावधपणाच्या जपणुकीची आवश्यकता असते हें सत्य जणूं काय त्यांच्या मनोभूमिकेंतून कापरासारखें अुडून गेलें. अशा त्या सुखमय नि समृद्धिमय सामाजिक स्थितींत गौतमबुद्धाचा जन्म झाला. आणि प्रपंचांतील जन्ममरण–दुःखरूप आपत्तींचा जीवमात्रामागें लागलेला 'ससेमिरा' पाहून त्याचें हृदय विदीर्ण झालें. त्यांतून सुटण्याचा अुपाय, त्याला मिळत गेलेल्या परिस्थितींत नि यदृच्छेनें भेटलेल्या तपस्व्यादिकांच्या साह्यानें, धुंडण्याच्या मार्गाला तो लागला नि त्या प्रयत्नांची तीव्रता गाठतांच त्याला देशकालातीत आनंदस्थितीचा अनुभव–पूर्वकालीनांप्रमाणें अनुभव–प्राप्त झाला.

बुद्धाला निर्वाणीचा–मुक्तस्थितीचा–अनुभव आल्यावर त्याच्या कोमल नि दयापूर्ण हृदयाला तो आनंद स्वतःपुरताच न ठेवतां सर्व मनुष्य-मात्रांना–शक्य तर जीवमात्रांना–त्याचा लाभ करून देण्याची अुत्कट अिच्छा झाली. नि म्हणून "केवल मुक्तिपथावलंबी व्हा" या अेकाच मंत्राचा गंभीर अुच्चार करीत नि स्वतःच्या प्रभावानें सर्वांना मोहित करीत संन्यासधर्माकडे तो सर्वांना खेंचूं लागला. 'ज्याला संन्यासदीक्षा घेतां येअील तोच खरा धार्मिक बाकी सर्व दोषी' ही

मनोवृत्ति धारण करणारे अनुयायी भोंवतालीं गोळा होऊं लागले. संन्यासदीक्षा घेत अेकदम संसाराला लाथ मारून चालतें होणें हेंच खरें कर्तव्य नि तें ज्याला करतां येत नाहीं त्यांनीं निरुपायांनीं संसारांत रहावें. परंतु तेथेंहि हळुंहळूं संन्यासग्रहणाची आकांक्षा ठेवून आपली योग्यता वाढवीत रहावें. संन्यासग्रहण अुत्तम, संसारचालन हें गौण ही मनोवृत्ति अुत्पन्न करणें हा या पंथाचा विशेष ठरला. केवळ संन्यासमार्गालाच योग्य नि अितर आश्रमसंस्थांना विघातक नि प्रतिरोधी अशा अहिंसादि गुणांचें सरसहा आचरण, अुपदेश नि अनुष्ठान आरंभलें गेलें. समष्टिधर्म नि व्यक्तिधर्म यांचें समतोलन बिघडून केवळ व्यक्तिधर्मच प्रबल होत समष्टिधर्माला गचांडी मिळाली. कारण समष्टिधर्माची तीव्र तर नव्हेच, पण सामान्य अवश्यकता कां होअीना, पण ती बोचती अवश्यकता भासावी अशी परिस्थितीच नव्हती. या अेकंदर परिस्थितिपुष्ट परिवर्तनाचा परिणाम असा झाला कीं समाजसंस्था दिवसेंदिवस शिथिल, निस्तेज नि क्षीणबल होत जाअून सामाष्टिक–कार्यकारी शक्तीला ती पारखी होअून बसली. चातुवर्ण्यकर्तव्य–संस्था लोपूं लागली नि आश्रमसंस्था संपुष्टांत आली. हाच अेकमेव योग्य मार्ग या भावनेनें भिक्षु–संन्यास आश्रम परिपुष्ट झाला आणि तें अशक्य असल्यास अपरिहार्य म्हणून गौणत्व भावनेनें अुरलेला सांसारिक लोकांचा वर्ग दुर्बल स्थितींत जीव धरून राहिला. याप्रमाणें समष्टि धर्माला कोठेंच स्थळ अुरलें नाहीं. मोक्ष मार्गाला प्रत्येकानें लागावें, प्रत्येकानें आपण (स्वतः) मुक्ती कशी मिळेल याची चिंता करावी " आअी-बाप–देश–जाति कोणाची ? संन्यास दीक्षापूर्वक मोक्षमागार्थ नि तो मिळाल्यावर, रानावनांत गेंड्याप्रमाणें विहरावें. वैयक्तिक कल्याण साधावें " अशा प्रकारच्या व्यक्तिनिष्ठ अुपदेशाचा ध्वनि देशभर घुमूं लागला. असे अुपदेश करणारे मान्यगण्य ठरले. लोक तो अुपदेश मनोभावें मनांत ठसवूं लागले. मोक्षमार्गाचा अधिकारी कोट्यवधींत अेखाद दुसराच सांपडणार. पण व्यक्तिनिष्ठतेचा अुपदेश मात्र घेण्याला प्रत्येक व्यक्ति समर्थ–कारण प्राणीमात्र जन्मतः व्यक्तिनिष्ठच–असतो नि ती व्यक्तिनिष्ठा निरनिराळ्या संस्कारांनीं प्रगल्भ करून तिला समष्टिधर्माची दीक्षा घ्यावी लागते. ते बंद झाल्यामुळें नि व्यक्ति-दृष्टि ही जन्मजात अंगीं मुरलेली असल्यामुळें हा व्यक्तिनिष्ठ होण्याचा अुपदेश

या जन्मतःच प्राप्त असलेल्या व्यक्तिदृष्टीला पुष्ट करणारा सिद्ध होऊन हिंदूमध्यें व्यक्तिदृष्टि अितकी वळावली कीं त्याच वैगुण्यामुळें म्हणा, दुर्गुणामुळें म्हणा वा तिच्या अमर्याद नि निरंकुश सत्तेमुळें म्हणा हिंदुस्थानच्या अितिहासांत या गेल्या १०००।१२०० वर्षांपासून घडलेल्या आपत्तींचे पोटीं याच दुर्गुणाच्या पापाचें अस्तित्व आढळून येतें. या आपत्तींशीं तोंड देऊन जेव्हां हिंदूजातीनें हिंदुस्थानला वांचविण्याचे यशस्वी प्रयत्न केलेले दिसतात त्या त्या वेळीं या व्यक्तिनिष्ठेला बळी देऊन समष्टिदृष्टीचा स्वीकार करणाऱ्या महापुरुषाच्या नि राष्ट्रभक्तांच्याच प्रभावानें यश मिळवलेलें आढळून आल्यावांचून रहाणार नाहीं. परमेश्वर करो नि ही राष्ट्रघातकी नि शेवटीं आत्मघातकीहि ठरणारी केवळ व्यक्तिदृष्टि ही हिंदूमनांतून समूळ नाहींशी होवो.

वर ज्या समष्टिधर्माच्या अभावाचें वर्णन केलें त्या अभावामुळें संघटित असलेला हिंदु समाज विघटित होत जाऊन कोणताहि धक्का सहन करण्याला असमर्थ होऊन बसला. बुद्धानंतर सर्व देश व्यक्तिनिष्ठ मोक्षमार्गाच्या नादाला लागून अहिंसादि गुणांच्या अतिरेकी पापानें पोखरत जात असतांहि दोनअेक सहस्र वर्षें त्याचेकडे विरोधी भावनेनें पहाण्याचें बाहेरील देशांतील लोकांनीं मनांत आणणें शक्य नव्हतें. कारण मागेंच अेका स्थळीं म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानकडे प्रेमादरभावनेनें कृतज्ञता बाळगणारेच समाज बाहेर वास्तव्य करीत आलेले होते. परंतु हिंदुस्थानांतून ज्ञानदानाचा–विशेषतः धर्मतत्त्वज्ञानदानाचा–जिवंत झरा बाहेर वाहत राहणें बंद पडलें. नि बाहेरील देशांत असलेल्या हिंदूधर्मीय वा तत्सदृश समाजांतील विचाराआचाराचे वारंवार शुद्धिकरणकार्य हिंदुस्थानांतील धर्मतज्ज्ञांकरवीं परिस्थितीच्या अपरिहार्यत्वानें बंद पडल्यामुळें बाहेरील धर्मपंथांचें परिमार्जन होअीनासें झालें. आणि त्यांचे धर्मसंस्कृतिविषयक विचारांत नि तद्वारां आचारांत हळुहळू पण निश्चितपणें परिवर्तन होअूं लागलें. हिंदुधर्म तत्त्वज्ञान हें कर्म-ज्ञानमार्गाचें सामंजस्यपूर्ण रूप आहे. पुढें हिंदुस्थानांत तें समतोलन बिघडून तत्त्वज्ञानाकडे विशेष भर पडूं लागल्यामुळें थोड्याशा तत्त्वज्ञानाचा स्वीकार करीत केवळ कर्मावर भर देणारा जरदुष्ट्र धर्मपंथ–पारशी धर्मपंथ – अस्तित्वांत आला. हीच हिंदुधर्मातून निघालेली कर्मप्रमुख अशी अेक शाखा होय. नि त्यानंतर कांहीं शतकांनीं तत्त्वज्ञानाकडील विशेष झुकावामुळें निवृत्ति मार्गाला

विशेष साह्य मिळून केवल निवृत्तिपथावलंबी नि तत्त्वज्ञानैकजीवी अशी बौद्ध-पंथाची दुसरी शाखा अुदयाला आली. याप्रमाणें या धर्माच्या मूळघरींच – हिंदुस्थानांत–धर्माच्या अभ्युदय निश्रेयसात्मक प्रवृत्ति–निवृत्ति धर्मांचें सामंजस्य वा समतोलन विघडून अनवस्था होण्याचा प्रसंग आला. अंतर्गत निर्माण झालेल्या याच वैगुण्यामुळें हिंदुस्थान विकलगात्र होअून पडला.

अिराणांत वर वर्णन केलेल्या जरदुष्ट्र अर्थात् पारशी धर्मपंथाचा प्रसार झाला. जगांतील सर्व देशांत धर्ममालिन्य होत गेल्यामुळें तत्त्वज्ञानविहीनता पसरूं लागली नि त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. पारश्यांच्या तत्त्वज्ञानाशीं पारखा न होअूं पहाणाऱ्या पण कर्ममार्गावर विशेष भर असणाऱ्या पारशी धर्मपंथामुळें यहुदी धर्ममतांचें पोषण झालें. बौद्धपंथाचे संन्यासी सर्व जगभर विखुरले होते. त्यांतील संन्याशांचा शिष्य जीजस यांनीं बौद्धांचा आचारधर्म नि यहुद्यांच्या पुराणकथा यांच्या आधारावर आपलें खिस्तीमत आधारलें नि युरोपमध्यें त्याचा फैलाव झाला. यहुदी मताच्या पुराणकथा नि त्यांतील व्यवहारनियम यांच्यांत कट्टरपणाची भर घालून अरबस्थानांत महंमदानें मुस्लीममताची अुभारणी केली. यहुदी नि अिस्लामी मतांतील देव हा दंडधारी शासक रूपांत रंगवला गेला नि खिस्ती मतांवर बौद्धाच्या सात्विक आचार-धर्माचा पगडा बसला असल्यामुळें तें मत फारसें असहिष्णु नव्हतें तरी त्यांतील कांहीं मतप्रचारकांनीं त्यांच्या राजसत्तेच्या साह्यावर अितर धर्ममतीय नि पंथीय यांवर बलात्कारादि अत्याचार केले. पण तें धर्ममत मूलतः तामसी मार्गावर अवलंबलेलें नसल्यामुळें पुढें पुढें बऱ्याच कालानंतर त्याच्या प्रचारकार्यांत केवळ–बलप्रयोगाचें प्रमाण कमी कमी होत गेलें. नि प्रत्यक्ष बलात्कारावर भर न देतां अितर सौम्य पद्धतीनें पण कपटलाघवादिकांचा अुपयोग करीत आपले मताचा प्रस्ताव खिस्त्यांनीं चालविला. यहुदी मतांच्या मंडळींनीं कांहीं काल धर्मसंबंधांत प्रतिशोधबुद्धीनें प्रत्यक्ष बलात्काराचा अवलंब केला. पण या बलात्कारी अत्याचाराची परिसीमा गांठण्याचें श्रेय मुस्लीम–मतानें मिळविलें. मुस्लीम–मत हें प्रामुख्यानें देवप्राप्ति–मार्गावर भर न देतां देवाचे नांवावर नि नांवानें आपल्या मतप्रसारार्थ तरवारीच्या सहाय्यानें म्हणजेच आक्रमक पद्धतीनें मुसलमानांनीं प्रसृत करण्यास आरंभ केला. अेकदां मतांधतेचा घोट पाजीत

धर्ममतप्रचाराची ग्रंथाज्ञा असल्यावर त्यांच्या बलात्कारी प्रसारकार्याला अितर धरबंध कांहींच रहाणें शक्य नव्हतें. म्हणून अत्याचारी बलात्कार हा त्यांच्या मतप्रचाराचा अेक प्रमुख मार्ग होअून राहिलेला आहे.

अरबस्थानांतून झुंडीच्या झुंडी बाहेर पडून मेसापोटेमिया, तुर्कस्थान, ग्रीस, सर्व्हिया मार्गें अर्ध्या युरोपांत मतप्रचाराचा धुमाकूळ घालीत स्पेनच्या टोंकापर्यंत त्यांनीं देश पादाक्रांत केले. आफ्रिकेंत मिसर आदिक पूर्व संस्कृतींच्या मार्गानें कमीअधिक मार्गानें चालणाऱ्या देशांना आक्रमून टाकून त्या खंडांत मुसलमानांनीं आपलें वर्चस्व स्थापित केलें. नि अिकडे आशियांत पूर्वेकडे तोंड वळवीत अिराण, बलोचस्थान, अफगाणिस्थान, आदिक प्रदेश धुळीला मिळवून त्यांना मुसलमानी मताची दीक्षा दिली. वर तार्तरी चीनादींकडे वळून तिकडेहि त्यांनीं गोंधळ माजविला. आणि अिकडे हिंदुस्थानावर मुस्लिम मतवाल्यांच्या आक्रमणाची धाड येअून कोसळली. हिंदुस्थानांत खिस्तीमतवाल्यांचा चंचुप्रवेश आधींच झालेला होता. हिंदुस्थानांत धर्मक्षेत्रांत विविध मतपंथ-वाल्यांना आपापलीं मतें प्रतिपादण्याची पूर्ण मोकळीक असे नि आहे. धर्मसहिष्णुता हा हिंदूराष्ट्राचा अेक विशेष आहे. त्यांचें तत्त्वज्ञान अितकें सर्वांगपूर्ण आहे कीं बौद्धिक क्षेत्रांत कोणीहि त्यांचा हात धरूं शकेल अशी किंचितसुद्धां शंका त्यांना वाटणें शक्य नव्हतें. पण या नव्या मुस्लिममताचा प्रकारच नवा. 'कुराण स्वीकारा वा तरवारीला मान द्या' अशी आरोळी टोकीत वाटेंत येणारे देश तुडवीत, त्यांचे धर्म नष्ट करीत, तद्देशीय जातींना बाटवीत वा कंठस्नान घालीत वावटळीचे वेगानें मुस्लिम–मतवादी पुढें पुढें घुसत आले. नि ही त्यांची धाड हिंदुस्थानवर येअून आदळली. हिंदुस्थानचें शौर्य, पराक्रम, तेज, बल, वीर्य हीं लुप्त झालीं नव्हतीं. पूर्वीच्या तुलनेनें जरी वैगुण्य आलें होतें तरी तत्कालीन जगाचे तुलनेंत हिंदू अद्याप श्रेष्ठच होते. पण ही आपल्या देशावर–धर्मावर–संस्कृतीवर कोसळणारी आपत्ति आपण सर्व राष्ट्रीयांनीं मिळून नष्ट केली पाहिजे हें समष्टिधर्म विसरलेल्या हिंदुस्थानला कळलें नाहीं. अेक अेक करून निरनिराळीं राज्यें त्यांच्या आक्रमणाला बळी पडूं लागलीं. तरीहि अितर राष्ट्रांना सर्वस्वीं मारक ठरणारा हा मुस्लीम–मताचा आघातक हात हिंदुस्थानांत तसा प्रभावी ठरूं शकला नाहीं. भारतीय पराक्रम शौर्यादि गुणांच्या

अुत्कृष्टतेनें त्याचाहि शक्तिपात केला. हिंदुस्थानांत अपरंपार ग्रन्थसंपत्ति जाळली गेली, शेंकडों देवालयें नष्ट केलीं, हिंदूंना वाटविण्यासाठीं लक्षावधींचीं हत्याकांडें झालीं. देशांत सर्वत्र हाहाःकार माजविण्याचा रावणी प्रयत्न मुस्लिममतवाल्या आक्रमकांनीं केला. पण हिंदूंचाहि प्रतिकार संयुक्त जरी नसला तरी फुटकळच पण प्रखर पराक्रमाचा झाल्यामुळें त्यांच्याहि नाड्या बऱ्याच ढिल्या पडल्या. अिस्लामीमतवाल्यांचा स्वभावपालट शक्य नव्हता तरी पण त्यांच्या रक्तपीपासु प्रयत्नांना बराच आळा पडून त्यांना अंशतः सौम्य व्हावें लागलें.

राजपुतांनीं नि त्यांतल्या त्यांत अुदयपुरच्या महाराणा शिसोदिया वंशानें हिंदूस्वातंत्र्याच्या संरक्षणाचें कंकण बांधून दिल्लीस स्थापन झालेल्या मुस्लिम बादशाही सत्तेशीं विषम लढा अनेक दशकें चालवून हिंदूस्वातंत्र्यध्वज परकीयांचें पारतंत्र्यांत जाअूं दिला नाहीं. पुढें त्याच वंशातील त्यांच्या महाराष्ट्रीय शाखेच्या भोसले वंशीय महापुरुषानें—श्रीशिवरायांनीं—तो अेकाकीपणें कसातरी जीव धरून राहिलेला हिंदू—स्वातंत्र्यध्वज पुन्हां सह्याद्रीच्या शिखरावरून हिंदुस्थानवर स्वराज्याची शीतल छाया पसरण्याच्या मंगल कामनेनें रायगडीं अुभारला. पुढें त्याच्या पंतप्रधानांनीं—पेशवे वंशियांनीं—अेकामागून अेक पिढ्या कष्टवीत नि खपवीत जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर तो विजयी करून दिल्लीच्या बादशाही तक्ताचे तुकडे अुडविले. नि व्यवहारतः हिंदुस्थानवरील मुस्लिम सत्ता केवळ नामशेष करून हिंदुस्थान हिंदू साम्राज्याखालीं नांदूं लागावा अशी वस्तुस्थिति निर्माण केली.

परंतु

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या अखंड परिश्रमानें राष्ट्रधर्म शिकलेल्या राष्ट्रीयांनीं हिंदुस्थानला पारतंत्र्याच्या गर्तेतून काढून पुन्हां स्वातंत्र्यपदावर सुप्रतिष्ठित करण्याचें कार्य श्रीशिवराय यांच्या नेतृत्वाखालीं करून पुढें थोड्याच पिढ्यांत हिंदुस्थान हिंदुछत्राखालीं अैश्वर्यभरानें नांदविण्याचें कार्य पूर्ण करीत आणलें पण श्रीसमर्थांची राष्ट्रधर्मशिक्षणाची परंपरा महाराष्ट्रांत खंडित झाली नि हळुहळू पुन्हां हिंदू—मनांत घर करून वसलेल्या पण कांहीं काल दबल्या गेलेल्या स्वार्थनिष्ठ व्यक्ति—दृष्टीनें पुन्हां हिंदू मनांत—महाराष्ट्रीय हिंदूमनांतहि—अुचल घेअून शेवटच्या बाजीरावाच्या काळांत स्वराज्यनिष्ठेची तेजस्वी ज्योत

महाराष्ट्रीयांच्या मनांतून अेकाद दुसऱ्याच असामान्य कर्त्या पुरुषाचे अपवाद वगळीत मालवली गेली. आणि या सत्तासंक्रमणाच्या संधीचा लाभ घेत टपून बसलेल्या अेका कपटपटू यूरोपीय जातीनें हिंदुसाम्राज्य स्थापन करूं पहाणाऱ्या पण आतां स्वार्थाच्या व्यसनांत फसलेल्या महाराष्ट्रीयांच्या हातांतून तो लोण्याचा गोळा छळ, कपट, फोडा नि झोडा आदिक कुटिल डाव खेळत हिसकावून घेतला नि स्वातंत्र्याचे अनुष्ठानांत दंग असलेल्या हिंदुराष्ट्राला पुन्हां पारतंत्र्याच्या खाअींत आणून फेकलें. तें पारतंत्र्याचे आपत्तींत हिंदुस्थानला ढकलणारें युरोपीय राष्ट्र म्हणजे अिंग्लंड होय हें न सांगतांहि समजण्यासारखें आहे.

भाग्यास्तानंतरचा संधिकाल

राजकारण क्षेत्रांत राजकारणाचें नवें तंत्र स्वीकारणाऱ्या अिंग्लिश राष्ट्राची हिंदुस्थानशीं गांठ पडली. अिंग्लंड समाष्टिदृष्टीचें अुपासक नि हिंदुराष्ट्र व्यक्तिगत दृष्टीनें पछाडलेलें अशी विषम स्थिति झालेली असल्यामुळें अिंग्लिशांच्या कौशल्यपूर्ण राजकारणपटुतेला यश येणें हें अगदीं साहजिक होतें. मुसलमानाच्या वेळीं काय वा अिंग्लिश प्रतिद्वंद्वितेच्या कालांत काय हिंदूराष्ट्राच्या पतनाचें सूत्ररूपानें वर्णन करावयाचें म्हणजे पुढीलप्रमाणें करावें लागेल.

महम्मद घोरीच्या किंवा महम्मदबिन कासीमच्या (पंजाब नि सिंधवरील) आक्रमणापासून तों मुसलमानांचे साम्राज्याच्या अतिविस्तारकालापर्यंत नि पुढेंहि मुसलमानांची अेकहि स्वारी, युद्ध वा हिंदूंना जिंकण्याचे प्रयत्न व्यक्तिगत हीनलाभार्थ फितुर हिंदूंचें सहाय्य नि शौर्य, प्रतिपक्षीयांशीं दाखविली जाणारी हिंदूंचीं अस्थानीं अुदारबुद्धि नि शत्रूवर अस्थानीं विश्वास ठेवण्याची प्रवृत्ति यांच्या साह्यावांचून अेकाहि वेळीं सफल झालेली नाहीं. अकबरकालीं मानसिंह नि सगरजीचा बाटगा मुलगा आणि अवरंगजेबाचे वेळीं यशवंतसिंह, जयसिंह नि तोच सगरजीचा मुलगा यांच्याच पराक्रमानें नि साह्यानें मोंगल साम्राज्य प्रवर्धित नि प्रबल झालेलें आहे. पुढें अिंग्लिश-पारतंत्र्य कालीं शीख नि अिंग्रज, राजपुत नि अिंग्रज यांचीं जीं जीं युद्धें झालीं त्या सर्व युद्धांत अिंग्रजांनीं अेकदां अेकाचा पक्ष घेअून दुसऱ्याला त्याचेकडून मारविलेलें आहे आणि त्यानंतर पहिल्याच्याहि टाळूवरील लोणी गिळंकृत केलेलें आहे असेंच आढळून येअील. ज्याला अिंग्रज

आल्यानंतरची त्यांची कपटपूर्णता नि हिंदुस्थानांत निरनिराळ्या सत्ताधाऱ्यांत आपसांत लढा लावून देऊन तद्वारां दोघांनाहि दुर्बल बनवीत अेकदां अेकाला नि पुढें दुसऱ्याला आपल्या पोटांत रिचवण्याचा अुपक्रम करीत हिंदुस्थानभर आपले हातपाय कसे पसरले हें पहावयाचें असेल त्यांनीं अिंग्लिश सत्तावर्धनाचे प्रामाणिकपणें लिहिलेले अितिहास वाचावेत, म्हणजे हिंदुस्थानांत परकीय अिंग्लिश राज्यप्रसार हा हिंदूंच्याच हातून नि त्यांच्याच शक्तीनें कसा झालेला आहे हें स्पष्टतेनें कळून येअील.

१८१८ या वर्षीं मराठी हिंदुराज्यसत्तेशीं अिंग्लिशांचा चाललेला दीर्घकालीन लढा संपून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हिरावलें गेलें. हिंदुस्थानवर अिंग्लिशांची सत्ता जवळ जवळ अबाधितपणें स्थापित झाली. ही सत्ता प्रत्यक्ष अिंग्लिश राष्ट्राची नसून प्रत्येक गोष्ट संयुक्त पद्धतीनें करण्याचा स्वभाव बनलेल्या अिंग्लिश लोकांच्या अीस्ट अिंडिया कंपनीची होती आणि त्या कंपनीला तसा पहिल्यानें व्यापाराचा नि पुढें राज्यस्थापनेचाहि अधिकार अिंग्लंडच्या पार्लमेंटनें दिलेला होता. अठराशें अठरापासून अठराशें सत्तावनपर्यंत त्या कंपनीचें राज्य होतें. नानाप्रकारचीं कुटिल कारस्थानें, छल, कपटादि प्रयोग, आदिक युक्त्यांनीं त्या कंपनीनें निरनिराळीं राज्यें अेकमेकांशीं लढवून दुर्बल करीत आपलीं अंकित करून ठेवलीं. पण त्यांचें येवढ्यांनींहि समाधान होअीना. हीं राज्यंहि गिळून टाकून सर्व हिंदुस्थान पूर्ण सत्ताविहीन, दुर्बल, अशरण करून अितर खंडांत केल्याप्रमाणें स्वतःच्या मनसोक्त धुडगुसाला सुरक्षित करून ठेवण्यासाठीं अेक अेक राज्य 'वारस नाहीं' सारख्या निमित्तानें त्या वेळच्या कंपनीचा व्हाअिसराय लार्ड डलहौसी यानें नष्ट करण्यास आरंभ केला. अनेक लहानमोठीं राज्यें त्यानें गिळंकृत केलीं. नि त्यामुळें पूर्वीचे सत्ताधारी आतां जरी दांत काढलेल्या नागांप्रमाणें हतबल झालेले होते तरी पीडकांना विळखे घालून प्राण घेण्याची शक्ति त्यांच्यांतून अद्याप नष्ट झालेली नव्हती. त्याचवेळीं खिस्ती मिशनरीद्वारां नि निमित्तानें हिंदुस्थानांत खिस्तीकरणाचा फार मोठा डाव रचला गेला होता. मुसलमानांना डुकर वर्ज्य नि हिंदूंना गाय अतिपवित्र. या दोन्हीचेहि रक्ताचा संबंध असलेले काडतुसांचे पट्टे दातांनीं तोडावे लागतील नि आपण धर्मभ्रष्ट होअूं या सकारण शंकेनें सैन्यांतील

हिंदुमुसलमान सैनिकहि बिथरलेले होते. अशा परिस्थितीचा अुपयोग करून घेणारा अेक समर्थ संघटक हिंदुस्थानला त्यावेळीं मिळाला. तो संघटक म्हणजे शेवटच्या बाजीरावचे चिरंजीव नानासाहेब पेशवे हे होत. त्यांनीं सेनापति तात्याटोपे, झांशीची महाराणी लक्ष्मीबाअी, बिहारचे प्रख्यात वीर कुंवारसिंह आदिक सहकाऱ्यांसह देशांतील सर्व अवशिष्ट सत्ताधारी, समंजस प्रजावर्ग नि सैन्यांतील सैनिक यांचें उत्कृष्ट संघटन करून हिंदुस्थान अिंग्लिशांच्या गुलामगिरींतून सोडवण्याचा व्यूह रचला. येथें अेक गोष्ट विशेषपणें अुल्लेखणें अत्यावश्य आहे. पुढील कांहीं वस्तुस्थितीच्या निरीक्षणावरून निगमन काढावयास अुपयुक्त अशी ती घटना असल्यामुळें येथें अुल्लेखली आहे. त्या वेळीं हिंदुस्थानांत हिंदूसत्ताधाऱ्यांप्रमाणेंच कांहीं मुस्लिम सत्ताधारीहि होते. त्यांत मराठ्यांनीं (हिंदूंनीं) नांवापुरते राखून ठेवलेलें नि त्यांच्याच कृपेवर जिवंत राहिलेले दिल्लीचे नामधारी बादशहा पुढें अिंग्लिशांचे ताब्यांत गेले होते. त्यांनाहि या कटांत गोवण्याचा प्रयत्न श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं केला. लक्षांत ठेवावयाची गोष्ट कीं नामधारी बनलेल्या या बाहुल्यानें आपल्या नांवाचा अुपयोग करण्याचें मोल म्हणून 'मला हिंदुस्थानचा बादशहा' या नात्यानें मान्य करण्याचें अभिवचन मागितलें नि तें तसें अभिवचन देअून क्रांतीचे अुठावणीच्या प्रारंभापासूनच श्रीमंत नानासाहेबांना तसें अुद्घोषित करावें लागलें. तसें त्यांनीं केलेंहि. कारण त्यांना हें माहीत होतें कीं सर्व सेनाबल आपल्या हातीं आहे. तेव्हां खरी शक्ति आपल्या हातीं आहे तोंपर्यंत नामधारी मुस्लिम बादशहाच्या बाहुलीचे-कडून अुपद्रव होण्याचा संभवच नसल्यामुळें भयाचें कारण नाहीं. पण ही घटना मात्र मुस्लिम मनाची मनोरचना कशी आहे हें समजण्यास पुष्कळ अुपयुक्त आहे. नि त्याकरितां लक्षांत घेण्यासाठीं म्हणून येथें अुल्लेखिली आहे.

पुन्हां हिंदुमनाचा संकोचितपणा आड आला

ही वेळ म्हणजे हिंदुस्थानला–अर्थात् हिंदूंना देवानें नि दैवानें दिलेली अमोल संधि होती. मागील काळांत व्यक्तिस्वार्थ वा संकोचित स्वार्थ पहाण्यापासून काय हानि झाली हें त्या वेळेपावेतों आलेल्या ताज्या अुदाहरणांवरून शिकून जर हिंदूराष्ट्र त्या वेळीं समष्टिधर्मानें वागतें तर आजचे दुर्दिन न येते. पण हिंदूंचें

दुर्दैव संपलें नव्हतें असेंच म्हटलें पाहिजे. अितिहासांतील या वेळच्या सर्व घटना देणें स्थलाभावामुळें अशक्य आहे. पण अेकदोन गोष्टी अुल्लिखित करणें अपरिहार्य वाटतें. अयोध्येच्या नबाबानें नेपाळला छळलें होतें म्हणून अयोध्येवर नेपाळचा रोष नि पंजाबांत शीखांचा अनन्वित नि अमानुष छळ दिल्लीच्या बादशहांनीं पूर्वी केला होता म्हणून दिल्लीच्या बादशहावर शीखांचा धुमसता क्रोध आणि म्हणून अखिल हिंदुस्थानच्या पूर्ण मुक्ततेचा प्रश्न अुभा राहिला असूनहि या अेकप्रकारें व्यक्तिगत स्वार्थ–प्रेरित रोषा—क्रोधाला बळी पडून नेपाळचे हिंदू नि पंजाबचे हिंदू (शीख) यांनीं अिंग्लिशांची बाजू घेअून या हिंदुराष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ–प्रयत्नाला हाणून पाडण्याचा प्रचंड प्रयत्न केला नि अिंग्लिशांना जय मिळवून दिला. त्यांना हें समजलें नाहीं कीं अखिल हिंदुस्थान स्वतंत्र होतांच हिंदूंच्या वरील अन्यायावरील अुट्टें खऱ्याखुऱ्या रीतीनें नि अवश्यकच ठरतें तर अधिक परिणामकारीपणें सैन्यबल हिंदूंचेंच असल्यानें यथातथ्य रीतीनें काढतां आलें असतें. येवढें समजण्याचासुद्धां गंभीरपणा या हिंदुमनांतील संकोचित वृत्तीला येऊं शकला नाहीं. त्याचप्रमाणें '.शिंदे जर या प्रयत्नाला येऊन मिळते तरी आम्हांला आमच्या बाडबिस्तऱ्यासह प्रयाण करावें लागलें असतें ' असें प्रत्यक्ष तत्कालीन व्हाअिसरायचे अुद्गार आहेत. पण त्या वेळीं शिंद्यांना क्रान्तिपक्षाला मिळूं न देण्याचा देशद्रोह केवळ व्यक्तिगत स्वार्थाला बळी पडून सर टी. माधवराव नामक अिंग्लिश कच्छपी लागलेल्या अेका मूर्खाला स्वतः शिंद्यांचे दिवाण असल्यामुळें करतां आला. अेवंच प्रत्येक आणीबाणीच्या प्रसंगीं परकीय शत्रूंपेक्षां हिंदूंच्या मनांत दडून बसलेल्या व्यक्तिगत स्वार्थसाधनाच्या राष्ट्रहानिकर लालसेनेंच या हिंदुराष्ट्राची मनस्वी हानि केली आहे आणि अद्यापहि हा राष्ट्रघाती दुर्गुण राष्ट्राला बऱ्याच प्रमाणांत छळीत आहे.

‘ सांप्रत ’ वा ‘ आतां’चा संकटकाल

या १८५७ चा प्रयत्न दुर्दैवानें अयशस्वी ठरला नि कंपनीच्या हातांतून राज्यकारभार काढून घेऊन प्रत्यक्ष अिंग्लिश पार्लमेंटनें व्हिक्टोरिया राणीच्या नांवानें आपल्या हातीं घेतला आणि हिंदुस्थानांतील प्रक्षुब्ध वातावरण शांत करण्यासाठीं विपुल (पोकळ) आश्वासनांचा पाऊस पाडणारें अेक घोषणापत्रक (जाहीरनामा) हिंदुस्थानांत प्रसिद्ध केलें. त्याचबरोबर ठिकठिकाणीं अिंग्लिशांनीं भारतीयांवर फार निर्दयपणें प्रतिशोधहि (सूडहि) घेतला. हिंदुस्थानांतील हिंदूंच्या मनांतील स्वातंत्र्याची ज्योति विझणें कधींहि शक्य नाहीं कारण ती स्वातंत्र्याकांक्षा केवळ अैहिकच नव्हे तर त्याहूनहि प्रबलतर अशा पारमार्थिक क्षेत्रांतहि तीव्रतेनें सुप्रतिष्ठित झालेली आहे. त्यांना या लोकीं परकीय मानवांचें तर काय पण पारमार्थिक क्षेत्रांतील अेक प्रकारें परमेश्वराचेंहि वर्चस्व सहन करवत नाहीं. अितर पंथ वा मतें परमेश्वराचे दास, पुत्र, मित्र बनण्याच्याच कक्षेंत फिरत राहतात, त्यांना परमेश्वर म्हणून कोणीतरी शिरावर पाहिजे असतो. पण हिंदू परमेश्वराचें अस्तित्व मानतो तरीहि त्याचें सतत नि चिरंतन अस्तित्व आपले शिरावर राहूं द्यावयाला हिंदू सिद्ध नसून तो आपल्या तत्त्वज्ञानाचे बळावर यथार्थत्व ओळखून स्वतःच परमेश्वररूप आहोंत हें ओळखतों नि तसें स्वयं परमेश्वररूप वा परब्रह्मरूप बनण्यांतच त्यास पुरुषार्थ वाटतो. तेव्हां जी जाति परमेश्वराचें नित्याचें वर्चस्व शिरावर न ठेवतां स्वतःच परमेश्वर होअूं धांवते ती जाति अैहिक क्षेत्रांत परक्याचें वर्चस्व कसें सहन करूं शकणार ? या नैसर्गिक स्वातंत्र्यप्रेमाच्या अखंड स्रोतामुळें पारतंत्र्याचें जूं या हिंदूराष्ट्रानें स्वेच्छेनें असें कधींच स्वीकारलें वा मानलें नाहीं. अितकेंच नव्हे तर लहान मोठ्या प्रमाणांत त्या पारतंत्र्याविरुद्ध या नाहीं त्या भागांतून

भारतवर्षांत स्वातंत्र्यार्थ प्रयत्नांचा नंदादीप अखंडपणें त्यानें तेवत ठेवलेला आहे. १८५७ चे प्रयत्नानंतर लगोलग १८८१ ते ८५ पर्यंत पुन्हां अेक क्रान्तीच्या स्फोटाची पूर्वसिद्धता महाराष्ट्रांत होत होती. या वेळच्या स्वातंत्र्यार्थ प्रयत्नाचे यजमान श्रीमान् वासुदेव बळवंत फडके नामक महाराष्ट्रीय चित्पावन ब्राह्मण होते. त्यांच्या प्रयत्नांची व्याप्ति, आरोप, सिद्धता अित्यादीविषयीं अितिहास देण्याचें हें स्थळ नव्हे. पण अिंग्लिशांना तसले प्रयत्न होणें हें आपल्या साम्राज्याच्या सुरक्षिततेला धोक्याचें आहे असें वाटून तत्काल हिंदूंच्या मनांतील स्वातंत्र्याकांक्षेचा पारा किती चढला व चढत आहे हें सतत कळत राहावें यासाठीं सर अे. ओ. ह्यूम, सर वेडरबर्न नि सर हेनरी काटन यांच्या द्वारां तत्कालीन व्हाअिसरायांनीं कॉंग्रेसचा 'सेफ्टी व्हाल्व्ह'—राष्ट्रीय सभेचें तापमान यंत्र—निर्माण करविलें येव्हढें सांगितलें म्हणजे या श्रीमान् फडके यांच्या प्रयत्नाचे परिमाण नि प्रमाण कल्पनेच्या प्रत्ययाला येण्यासारखें आहे.

ही 'कॉंग्रेस' नांवाची बाहुली अुभी करतांना या वर नांवें दिलेल्या धूर्त-त्रयांनीं त्यांच्या प्रेरकांच्या प्रेरणानुसारें ती कॉंग्रेस भावी काळांत आपणांस घातुक नि खरीखुरीच आपली प्रतिस्पर्धी होअूं नये अशी आरंभापासूनच सावधानता घेतली होती. अितिहासाच्या अवलोकनानें मिळणारे धडे घेअून तदनुसारें आपल्या कुटिल राजकारणबुद्धीच्या जोरावर राज्यकारभार चालविण्यांत अिंग्लिश राष्ट्र हें अितर सर्व युरोपीयांपेक्षां अधिक प्रविण आहे. जितकें अिंग्लिश राष्ट्र अधिकांत अधिक कुटिल राजकारण पटु आहे, तितकेंच जातीय दृष्टीनें हिंदू अधिकांत अधिक सरल, प्रामाणिक नि कुटिलतेकडे क्वचितच ढुंकून बघणारे असे राजकारणांतील भोळसर लोक आहेत. त्यामुळें कॉंग्रेस निर्मितीचे वेळीं धूर्तांची धूर्तांगिरी लक्षांत न येतां त्यांच्या जाळ्यांत हिंदू अचानकपणें सांपडले. तो प्रकार असा.

कोणत्याहि देशांत केवळ अेकरसी, अेकधर्मी, अेकभाषी अशी अेकमेव जाति आज वास्तव्य करीत नाहीं. प्रत्येक देशांत तद्देशीय धनिजातीव्यातिरिक्त धर्ममत—भाषा—परंपरा—अितिहास आदिकानें विभिन्न असलेले परकीय लोकांचा हि थोड्याबहुत संख्येनें समावेश झालेला असतो. आणि तरीहि तो तो देश त्या त्या देशाच्या धनिजातीच्या नांवानेंच राष्ट्र म्हणून मोडला जातो. अिंग्लंडमध्यें,

जर्मनीमध्यें, जपानमध्यें, इंग्लंडमध्यें, चीनमध्यें तद्देशीय जातीचे—धर्माचे—परंपरेचे संस्कृतीचे नि त्याच देशाच्या अितिहासावर स्वकीयतेनें प्रेम करणारे लोकच त्या त्या देशांतील राष्ट्रीय म्हणून गणले जातात. तुर्कस्थानांत केवळ तुर्कीय सभा भरली असतां ती जातीय सभा न ठरतां राष्ट्रीय ठरली जाते नि सर्व देशांत हाच परिपाठ आहे. पण सर्व जगाप्रमाणें हिंदुस्थानांत घडेल तर मग हिंदुस्थान कसा म्हणावयाचा ? जगाविरहित हिंदुस्थानांतील रीत असावयाची असा जणुं काय अिंग्लिश राजवटीचा विशेष होअून बसला आहे. हिंदुस्थान हा हिंदूंचा देश. या देशाची हिंदूजाति धनि आहे. हिंदुस्थानांत हिंदुजाति, हिंदुसंस्कृति, हिंदूधर्म, हिंदू अितिहास, हिंदू परंपरा, हिंदू भाषा याच गोष्टी राष्ट्रीय म्हणून समजल्या गेल्या पाहिजेत. अितरांनीं आपापल्या धर्मसंस्कृति आदिक गोष्टींसह सुखानें रहावें पण त्या गोष्टी राष्ट्रीय म्हणून असूं शकणार नाहींत. सर्व राष्ट्रीयक्षेत्रांत भिन्नजातीयांनीं राष्ट्रीय गोष्टींचाच मान राखला पाहिजे. आपसांतील व्यवहारांत त्यांनीं आपसांत आपापल्या गोष्टी सुखनैव पाळाव्यात—राखाव्यात. हाच मार्ग नि दंडक न्याय्य, अुचित, योग्य नि अिष्ट आहे. प्यालेस्टाअिनमध्यें खिस्ती नि मुसलमान यांच्या अत्याचारादिकांनीं त्रस्त होऊन यहुदी लोक नि अिराणमधून मुसलमानांच्या अनन्वित छळ, बलात्कारादिक पाशवी अत्त्याचारापासून आश्रयार्थ जेव्हां पारशी लोक येथें या हिंदुस्थानजवळ आश्रय मागण्यास आले तेव्हां त्यांना राष्ट्रीय क्षेत्रांत राष्ट्रीय भाषा, रीति, अितिहास आदिक स्वीकारावयाच्या अटींवर नि हिंदुस्थानशीं सदासर्वदा निष्ठेनें नि मातृवत् प्रेम करीत राहूं अशा अभिवचनानंतर हिंदुस्थानीय हिंदू राजांनीं अुदार बुद्धीनें त्यांना आश्रय दिला नि त्यांनींहि त्या उदारबुद्धीचा दुरुपयोग न करतां आपापसांत आपापले धर्मसंस्कृति आदि संभाळून गुण्यागोविंदानें राहण्याचें व्रत चालविलें आहे. ते संख्येनें अत्यंत अल्प आहेत. जगांतील अितर कोणत्याहि देशांत परकीय धर्मसंस्कृतीचे अितके अल्पसंख्य लोक आश्रयार्थ गेले असते तर ही सुरक्षिति न राहती. पण येथें या हिंदुराष्ट्रांत ते सुरक्षित आहेत अितकेंच नव्हे तर भरभराटींत नांदत आहेत. हा सहज प्रसंगोपात्त अुल्लेख झालेला नसून या वस्तुस्थितीचा पुढील विवरण करतेवेळीं विशेष अुपयोग होण्यासारखा आहे.

ही वस्तुस्थिति त्या अिंग्लिश तीन व्यक्तींना माहीत नव्हती असें नाहीं. परंतु जाणूनबुजून त्या वेळच्या हिंदू शिक्षित वर्गाला हाताशीं धरून राष्ट्रीयसभा—कॉंग्रेस (Indian National Congress—अिंन्डियन न्याशनल कॉंग्रेस) स्थापन करतेवेळीं खोटी राष्ट्रकल्पना हिंदुस्थानच्या कल्याणार्थ निघणाऱ्या कॉंग्रेसच्या गळीं बांधली. ती कल्पना म्हणजे अशी—हिंदुस्थानांत जितक्या म्हणून मुख्य जाती रहात आहेत त्यांच्या प्रतिनिधींसह जी होअील ती कॉंग्रेस. त्यांत जर केवळ हिंदू आले तर ती राष्ट्रीय नव्हे. त्यांना माहित होतें कीं राष्ट्रकल्याणाचा प्रयत्न म्हटला म्हणजे ज्यांचें अंतःकरण पिळवटून येअून राष्ट्रकल्याण प्रयत्नांत धांवून येतील ते हिंदूच आहेत. त्यांच्या राष्ट्राचें कल्याण हें त्यांचें नैसर्गिक नि स्वाभाविक अिष्ट राहणार. कारण या राष्ट्राचे तेच नैसर्गिक स्वामि वा धनि आहेत. आणि अशा प्रकारें राष्ट्रबुद्धीचा जवळजवळ अभाव असलेल्या हिंदूजातींत जर राष्ट्रीय दृष्टीचा अुदय झाला तर ती जाति हां हां म्हणतां संघटित होईल नि तें अेक नवेंच महासंकट अुभें राहील. म्हणून राष्ट्रीय कॉंग्रेस म्हणून हिंदुस्थानच्या कल्याणार्थ जरी अेका संस्थेचा डोलारा अुभा केला तरी या संस्थेच्या गळ्यांत असें अेक मोठें थोरलें लोढणें अडकविलें पाहिजे कीं त्यायोगें ती कॉंग्रेस आपणाला सेफ्टी व्हाल्व्हचे—तापमानयंत्राचें काम तर देअील पण हिंदुस्थानांतील राष्ट्रीय संघटन मात्र यथार्थपणें होअूं शकणार नाहीं. आणि या हेतूनें, नि हिंदूंच्या राष्ट्रीय प्रयत्नांत मुसलमान खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय प्रेमानें कधींहि समाविष्ट होणार नाहींत हें हिंदुस्थानच्या नि मुसलमानांच्या पूर्वापार अितिहासज्ञानावरून ओळखून, वरीलप्रमाणें खिचडी वा गोधडी राष्ट्रीयतेची खोटी कल्पना कॉंग्रेसच्या गळीं बांधली. नि भोळेपणानें ती कल्पना कॉंग्रेसनें स्वीकारून राष्ट्रकल्याणाचा मार्ग ती चालूं लागली. या धूर्ततेच्या प्रयत्नांत जय मिळाल्याचा आनंद त्या धूर्तांना किती प्राप्त झाला असेल हें आपणांला कळणें कठीण आहे. त्यांच्या धूर्ततेनें हिंदुस्थानांत खरी राष्ट्रीयता प्रवर्धित न झाल्यानें हिंदू कसे विसंघटित नि म्हणून दुर्बल राहिले आहेत नि राष्ट्रकल्याणाच्या मार्गांत मुस्लिम महत्त्वाकांक्षेची केवढी धोंड अुभी राहिली आहे हें आज प्रत्यक्ष आपण अनुभवीत आहोंत.

अति धूर्तांचे फसवणुकीच्या फेऱ्यांत साधाभोळा समाज वा राष्ट्र फसूं शकेल

पण येणाऱ्या थोड्या फार अनुभवाचे धक्के खसतांच शिताबरून भाताची परिक्षा या दृष्टीनें हिंदुस्थानांतील राष्ट्रकल्याणेच्छु हिंदूंनी सावध व्हावयास पाहिजे होतें. पण तेहि धडे त्या त्या घटनेपासून हिंदूंनीं घेतले नाहींत.

वाटेंतील दुश्चिन्हें

सन १८९९ मध्यें लखनौला कॉंग्रेसचें अधिवेशन होतें. कॉंग्रेसमध्यें मुसलमान नसले तर तिचें राष्ट्रियत्व सिद्ध होणार नाहीं—कारण तसें त्या संस्थेच्या इंग्लिश गुरूंनीं शिकविलें होतें—या भाबड्या भावनेनें कॉंग्रेसचे चालक या ना त्या प्रकारें कॉंग्रेसच्या व्यासपीठावर नि प्रतिनिधींमध्यें मुसलमानांचा भरणा थोड्याफार प्रमाणांत नि सूक्तासूक्त मार्गानें पण झालेला दाखविण्याची चिंता बाळगीत असत. लखनौमध्यें मुसलमानांचा भरणा फार तेव्हां तेथें मुसलमान पुष्कळ मिळवितां येण्याचा संभव फार नि म्हणून कॉंग्रेसमध्यें पुष्कळ मुसलमान जातील या शंकेनें सर सय्यद अहमदनें ते कॉंग्रेसमध्यें जाऊं नये म्हणून फार प्रचार केला नि कॉंग्रेसमध्यें मुसलमान येण्याचा संभव दुरावूं लागला. म्हणून कांग्रेसवाल्यांनीं काय केलें हें हुतात्मा स्वामी श्रद्धानंदजीच्या शब्दांतच आपण पाहूं. ते लिबर्टी या साप्ताहिकाच्या ॲप्रिल २२।१९२६ च्या अंकीं लिहितात "……बाबू गंगाप्रसाद वर्मा यांनीं मला व्याख्यानपीठावर नेऊन बसविलें. तेथें गेल्यावर पहिल्यानें अेक गोष्ट जी लक्षांत आली ती ही कीं लाहोरच्या कॉंग्रेस—अधिवेशनापेक्षां या अधिवेशनांत मुसलमान प्रतिनिधी चौपट संख्येनें अधिक आलेले होते. त्यापैकीं बहुतेकांनीं अंगावर जरीचे अुत्तम काम केलेलें अुंची रेशमी चोगे घातलेले होते, अर्थात् चोग्यांचे आंतील त्यांचे कपडे अगदीं साध्या प्रकारचे होते. ते चोगे लखनौच्या धनवान् नि श्रीमंत हिंदू लोकांनीं या मुसलमानांच्या अंगावर कॉंग्रेस तमाशांत सजवून त्यांना आणण्यासाठीं म्हणून त्या वेळेपुरते वापरावयास दिले होते. तेथील ४३३ चारशे तेहतीस मुसलमान प्रतिनिधींपैकीं केवळ ३० जण लखनौबाहेरून आलेले होते. आणि बाकी चारशें तीन जण लखनौमधून वरीलप्रमाणें भाडोत्री आणून सजवून बसविलेले होते. कॉंग्रेस प्रतिनिधींना १० रुपये शुल्क द्यावें लागत असे. पण या लखनौकर मुसलमानांतील बहुतेक सर्वजणांना प्रतिनिधीचें तिकीट, कॉंग्रेस शिबिरांत राहणें नि भोजन आदिक सर्व नि:शुल्क—फुकट

मिळालें होतें. असे हे कॉंग्रेसचे जांवयाहूनहि श्रेष्ठ—अतिजांवयी—लखनौच्या अधिवेशनांत मिरवत होते. सर सय्यद अहमदचा कॉंग्रेसविरोधी प्रचार व्यर्थ झालेला दाखविण्यासाठीं कॉंग्रेसवाल्यांनीं चार दिवस कॉंग्रेस मंडपांत अधिवेशनाआधीं भरगच्च दिपवाळी करून ठेवली. आणि त्या रात्रीं प्रवेश फुकट मिळेल असें अुद्घोषिलें होतें. याचा परिणाम असा झाला कीं लखनौ-मधील 'चंडूखाने' (खुशालचंडूंचे अड्डे) रिकामे पडले नि कॉंग्रेस मंडपांत त्यांची दाटी झाली. तीस हजारांचा मेळावा जमला नि त्यांना १२ निरनिराळ्या व्यासपीठांवरून व्याख्यानें अैकविलीं (कारण त्या वेळीं अेवढ्या मोठ्या मेळ्याला अैकविण्यासाठीं ध्वनिक्षेपक अस्तित्वांत आले नव्हते) आणि या मेळाव्यांतून कॉंग्रेसचे मुस्लिम प्रतिनिधी निवडले वा अुचलून घेतले गेले.

मुस्लिम प्रतिनिधी आल्याचा देखावा करण्यासाठीं तथाकथित मुसलमान प्रतिनिधीला अुभे करीत नि तो म्हणे—अर्थात अुर्दूमध्यें—"हजरत हम मुस्लिम डेलिगेट है" नि लागलींच कोणी तरी हिंदू अुठून "त्रिवार आनंद प्रदर्शन" म्हणून म्हणतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला जाअी (जणू कांहीं मुस्लिम प्रतिनिधी कॉंग्रेसमध्यें आणलें हें स्वराज्य मिळविल्यासारखेंच शतकृत्य झालें). हे 'प्रतिनिधी' कॉंग्रेसाविरोधी प्रयत्न करणाऱ्यांचे विरुद्ध खूप जोराजोरानें अुर्दूत भाषण करून मूळ ठराव न वाचतांच बसूं पहात तोंच त्या वेळीं कॉंग्रेस कार्यवाह 'अहो ठरावाला संमति द्यावयाची राहिली ना' सांगतांच "हो हो चुकलोंच" असें सर्वांना अैकूं जाअील असें आत्मगत बोलून त्या ठरावाचे कसें तरी अुर्दू भाषांतर वाचून दाखवीत आणि 'खेळ खलास' करीत.

आणखी अेक प्रसंग. कॉंग्रेसच्याच मंडपांत पूर्वी सोशल कान्फरन्स भरत असे. पण त्या वेळीं असल्या केवळ आपल्याच सामाजिक गोष्टींविषयीं भरविल्या जाणाऱ्या परिषदेलाहि त्यांच्या दृष्टीनें राष्ट्रीय रंग देण्यासाठीं 'न्याशनल' हें विशेषण लावण्याचा मोह त्यांना आवरला नाहीं. अशा त्या 'न्याशनल सोशल कान्फरन्स'ला (राष्ट्रीय सामाजिक परिषदेला) अेकच मुसलमान म्हणजे बरेलीचे मुफ्तीसाहेब हे अुपस्थित होते. विधवाविवाहाचा प्रश्न त्या सभेपुढें आला. तो अेका हिंदूप्रतिनिधीनें मांडला आणि स्वामी श्रद्धानंदानीं त्याला पुष्टि दिली. त्या ठरावांत बालविधवांचीं पुन्हां लग्नें

सां. ग्र. १२०९५

करावींत असें प्रतिपादन होतें. सनातनी पांडितांनीं त्या ठरावाला विरोध केला. आणि हें स्वाभाविक होतें. पण मुफ्तीसाहेब जुमे समझे. तेव्हां अध्यक्षमहाशय राय वैजनाथ म्हणतात 'हा ठराव केवळ हिंदूंच्याच अंतर्गत गोष्टींसंबंधीं असल्यामुळें आपण बोलण्याची अवश्यकता नाहीं.' अर्थात् मुफ्तीसाहेब खवळले. म्हणतात 'तब अिसका नाम न्याशनल क्यौं रख्खा ?' (मग अिचें नांव न्याशनल काय म्हणून ठेवलें ?) अर्थात् मुसलमानांचा समावेश असल्याविना न्याशनल—राष्ट्रीय—हें नांव सार्थ कसें होणार ?! गरीब बिच्चारे अध्यक्ष चूप झाले. मुफ्तीसाहेब म्हणतात 'हिंदूशास्त्रांनीं पुनर्विवाह निषिद्ध मानला आहे तेव्हां तो पुन्हां सुरू करणें हें पाप आहे ?' त्यानंतर हिंपूंमधील जे लोक बाटवून खिस्ती नि मुसलमान केले गेले त्यांची पुन्हां शुद्धी करून त्यांना हिंदूंत घ्यावें या अर्थाचा दुसरा प्रश्न पुढें आला. तेव्हां मुफ्तीसाहेबांनीं आग्रहपूर्वक विरोध करून सांगितलें 'जेव्हां अेकादा मनुष्य धर्मभ्रष्ट होतो नि हिंदूधर्मापासून पतित होतो त्याला पुन्हां हिंदूसमाजांत येअूं देतां कामा नये. त्याच्या येण्यामुळें पवित्र हिंदू जातीचें पावित्र्य नष्ट होअूं देअूं नये !!' हें पाहून हिंदू निरुत्तरच झाले. या घटनेनें अेक गोष्ट हिंदूंनीं शिकावयास पाहिजे होती कीं कदाचित् न्याशनल म्हणून जर मुसलमान आलेच तर तेथेंहि ते आपले हितसंबंधच बघण्यासाठीं येतील, राष्ट्रहितबुद्धीनें कधींहि येणार नाहींत. अेवढ्या परिषदेंत अेकच मुसलमान येतो नि हिंदू विधवांना मुसलमान करण्याचा चालविलेला सपाटा बंद होअून आपला मुसलमानसंख्यावर्धनाचा व्यापार बंद पडतो हें पाहून विधवाविवाहाला विरुद्ध बोलतो नि हिंदु बाटविला नि तो पुन्हां शुद्ध होअूं लागला तर हिंदुस्थानांतील हिंदूंच्या मुस्लिमीकरणाचा डाव अुधळून लावला जातो म्हणून हिंदूजातीच्या पावित्र्यासंबंधीं त्यांना भडभडून येतें आणि तो नक्राश्रू गाळतो !! हा देखावा पुष्कळच धडा शिकवणारा आहे. मुसलमान मुफ्तीला हिंदूंकडून होणाऱ्या पापाची नि हिंदूंच्या पावित्र्यनाशाची केवढी भयंकर चिंता !! हा असाधारण नि कपटी देखावा पाहून हिंदूंनीं कांहींच शिकावयाला नको होतें काय ?...पण...!!

समाजाची मनोवृत्ति कशी ओळखावी ?

हिंदुस्थानांत हिंदूमुस्लिम प्रश्न फारच गुंतागुतीचा होअून बसला आहे.

सार्वजनिक कार्यांत भाग घेणारा अेकहि मनुष्य असा मिळावयाचा नाहीं कीं ज्याच्या मनापुढें हिंदूमुस्लिम प्रश्नाचें कोडें गोंधळ करीत अुभें नाहीं. कोणी म्हणतात 'हिंदूमुस्लिम अेकीच शक्य नाहीं' तर कोणी म्हणतात कीं दोघेहि मानवी गुणधर्मांचेच पुतळे असल्यामुळें 'हिंदूंनीं योग्य प्रयत्न केले तर अेकी शक्य होईल.' कोणाचा अुपाय निर्लज्ज शरणांगतीचा तर कोणाचा सलज्ज शरणागतीचा, कोणी त्यांना राष्ट्रभक्त करूं घांवतो तर कोणी त्यांच्या धर्ममताची स्तुति करून. त्यांची हाजीहाजी करीत त्यांना मित्र बनवूं पहातो. पण अमुकच मार्ग ठाम परिणामकारक आहे असें सर्व सामान्यांनाहि पटेल अशा विचिकित्सक पद्धतीनें अद्याप ठरवण्याचा प्रयत्न झाला नाहीं. या विविध मार्गीयांना मुस्लीम मनाची ठेवण कशी आहे हें निर्विवादपणें नि पुराव्यानें दाखवून दिल्यावांचून त्यांना निरुत्तर करतां यावयाचें नाहीं म्हणून आपण अेका विशेष पद्धतीनें स्वभावपरीक्षण करण्याचा अुपक्रम करूं म्हणजे त्याप्रमाणें तें निरीक्षित निगमन प्रत्यक्ष पुराव्यानें सत्य कीं चुकलेलें आहे हें बघण्यास सोपें जाअील.

मुसलमान समाजाचें मनोवृत्तिदर्शन

प्रत्येक समाज त्या त्या समाजांतील तत्त्वज्ञानानें परिचालित झालेला असतो. कांहीं समाज राजकीय तत्त्वज्ञानानें भारलेले असतात—आणि सांप्रत युरोपीय देशांतील प्रत्येक समाज राजकीय तत्त्वज्ञानाचाच अनुयायी बनून त्याचें सर्व आयुष्य राजकारणाच्या सूत्रांत ओवलेलें असतें. हिंदूसमाज—सांप्रतचा हिंदुसमाज, पूर्वीचा भाग्यकालांतील नव्हे—परमार्थिक तत्त्वज्ञानानें नि व्यक्तिगत परमेश्वरप्राप्तिनिष्ठेनें भारलेला असल्यामुळें त्याचें आयुष्य प्रामुख्यानें व्यक्तिगत पारमार्थिक धाग्यांत कमीअधिक प्रमाणांत ओवलें गेलेलें नि समाजधर्म आणि राष्ट्रीय अभ्युदय यांची दृष्टी गमावून बसलेलें, असा आहे. बौद्ध पंथांतील लोकहि कांहीं राष्ट्रनिष्ठा नि कांहीं धर्मनिष्ठा यांच्या संयुक्त वृत्तीनें आतांपर्यंत नांदत असत. पण जगावरील युरोपियांची राजकीय धुमाकूळ पाहून नि त्यामुळें त्यांचे देशांवर ओढवूं पहाणाऱ्या भावी आपत्तीच्या कल्पनेमुळें तेहि हळुहळू पण निश्चयानें राजकारणी तत्त्वज्ञानानें भारले जात आहेत. मुसलमान समाजाचें या कोणाशींहि साम्य नाहीं. त्या समाजावरील धर्ममताची पकड फार प्रचंड

होती नि बऱ्याच प्रमाणांत हिंदुस्थानांत अद्याप आहे. युरोपीयांच्या आक्रमक धोरणामुळें तुर्कस्थान, अिराण, अिजिप्त आदिक देश हे राष्ट्रभक्ती थोड्याफार प्रमाणांत शिकले आहेत. पण पॅनअिस्लामी वृत्ति त्यांच्यांत अद्याप जीव धरून आहे. नि वेळ येतांच ती जोराचा अुठाव घेतल्याविना राहणार नाहीं. याचें कारण ज्या धर्ममताचा मुस्लिम मनावर ताबा आहे त्यांतील आज्ञा नि प्रमेयें यांत सांपडेल.

कुराण काय म्हणतें ?

कुराणांत कांहीं वाक्यें सहिष्णुतेचीं सांपडतात पण मुख्य जोर निर्भेळ असहिष्णुता नि तज्जन्य वर्तनाज्ञा यांवरच आहे. कुराणप्रणेत्या महम्मदावर ज्या वेळीं आरंभीं आरंभीं संकटें आलीं नि त्याचे त्याच्या समाजाशीं विरोधाचे प्रसंग येअून त्या विरोधाला विरोधानेंच तोंड देतां येणें शक्य नव्हतें त्या वेळीं त्यानें कारस्थानी कार्यकर्त्याप्रमाणें मअू भाषण नि वर्तन ठेवण्याच्या आज्ञा आपल्या अनुयायांना दिल्या. पण पुढें जेव्हां अनुयायांची संख्या निरनिराळ्या अुपायानें भरपूर वाढली नि आतां आपण परिणामकारी रीतीनें विरोध तोडूं शकूं असें त्यानें पाहिलें तेव्हां त्यानें आपलें खरें असहिष्णु स्वरूप प्रकट करून आपल्या अनुयायांना मुसलमानेतर अशा अरब देशीय जातीशीं अत्यंत निष्ठुर नि कडक प्रकारें वागण्याचे आदेश दिले. त्यांतील कांहीं पुढें दिलें आहेत.

१ सूरये तोबा (म्हणजे कुराणांतील अेका विभागाचें नांव) हरामी, काफर फरेब, मकर (पापी, मुसलमानेतर म्हणून ठार मारण्यासच योग्य, विरुद्ध असणारे, नि लुच्चे (?)) असे जेथें जेथें भेटतील तेथें तेथें पकडा, मारा, शक्य तर कैद करा. अेकाच अटीवर त्यांची मुक्तता होअील. ती म्हणजे तोबा करून (पश्चात्तापयुक्त होअून) जर ते कलमा पढतील नि मुसलमान होतील आणि जकात (दंड) देतील तर मात्र त्यांना सोडा. नाहीं तर ठार मारून टाका. ”

२ अल्लाच्या मार्गांत (मुस्लिम मतप्रचाराच्या मार्गांत) जे जे येतील, जे तुमच्याबरोबर (तुमच्या प्रयत्नांविरुद्ध) लढतील त्यांस जेथें ते मिळतील तेथें कापून टाका. कापून टाकण्यापेक्षांहि काफर नीच आहे. त्यांजबरोबर असें

लढा कीं काफर कोठेंहि न राहतां अल्लाचा धर्म होअील. (मंजिल १, सिपारा २, सुरा २ आयात १७४ ते १७९).

३ त्यांजबरोबर (मुसलमानेतरांबरोबर म्ह. काफरांबरोबर) त्यांच्यांत फितना अर्थात् बल मुळींच राहूं नये. आणि सर्वत्र अल्लाचा धर्म व्हावा. तुम्ही हें जाणावें कीं जे कांहीं तुम्ही लुटाल (लुटण्याचा आदेश दिला आहे) कोणतीहि वस्तु निश्चयें अल्लासाठीं आहे. त्यांत पांचवा भाग त्याचा म्हणजे अर्थात् त्यांच्या नायकाचा आहे. (मं. २, सि. ९, सु. ८ आ. ३९ ते ४१).

४ हे नबी (अल्ला जणू कांहीं धर्मोपदेशकाला सांगतो) काफर आणि शत्रू यांच्यांशीं झगडा कर नि त्यांच्यावर सक्ती कर (मं. ७, सि. २८, सु. ६९ आ. ९)

या आणि अशाच कुराणाज्ञेंत काफिरांना मारण्यालुटण्यांत यश मिळाल्यास काफरांच्या स्त्रिया नि संपत्ति हीं मिळतीलच. पण जर या लढ्यांत मृत्यु आला तर त्याहि दृष्टीनें कांहीं लोभनीय पारितोषिक असलेलें दाखविल्यावांचून मरणाच्या शंकेनें युद्धाकडे प्रवृत्ति होणें शक्य नाहीं हें जाणून कुराणांत तीहि सोय वर्णन केली आहे. (मं. ६ सि. २७, सु. ५६ आ. ४ ते ७५) ती अशीः—या जिहादींत म्हणजे अिस्लामसाठीं झालेल्या युद्धांत वा झगड्यांत मरण आलें तर ते 'शहीद' ठरतील नि स्वर्गांत त्यांना प्रत्येकीं बहात्तर बहात्तर सुंदर स्त्रिया नि सुंदर सुंदर तरुण मुलें अुपभोगार्थ नि सुखदानार्थ मिळतील, यथेच्छपणें पिण्यास पवित्र दारू मिळेल, अुत्तम अुत्तम आवडतें मांसभोजन नि मेवे; निजावयास तारेंचे पलंग, विपुल मध, जेथें तेथें स्वच्छ पाण्याचे झरे अि. अि. अनंतकाळ अुपभोगावयास मिळतील असें वर्णन आहे.

अशा कुराणाज्ञा असल्यामुळेंच मुसलमानेतरांविरुद्ध विरोध अुभारून त्यांना लुटणें, कुटणें, त्यांच्या स्त्रिया हिरावून घेणें, बलात्कारानें बाटविणें अित्यादि अत्याचारी गोष्टी करण्याकडे व्यक्तिगत दृष्ट्या नि सामुदायिक दृष्ट्या त्यांची प्रवृत्ति होते नि त्यांना स्फुरण चढतें. आणखी अेक गोष्ट मुस्लिम धर्ममतांत प्रतिपादलेली आहे तीहि या वरील प्रदर्शित केलेल्या परिणामाला पुष्टिकारक ठरते. अिस्लाममतानें जगाचे मुख्य दोन भाग केले आहेत. अेक दार-अुल-अिस्लाम-म्हणजे जेथें मुसलमानांचें राज्य आहे अथवा तें नसेल तर मुसलमानांचा

प्रभाव नि प्राबल्य आहे तो भाग. आणि दुसरा भाग दार-अुल-हरब म्हणजे अिस्लामेतर लोकांचे राज्याचा वा प्रभावाचा नि प्राबल्याचा प्रदेश. अर्थात् कुराणाज्ञेप्रमाणें हा म्हणजे शत्रुप्रदेश होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अिस्लामचा प्रदेश अथवा अिस्लामचा शत्रुप्रदेश अशा दोन भागांत जगत् वांटलेलें आहे नि वरील दिलेल्या कुराणाज्ञेप्रमाणें सर्वत्र अिस्लाम फैलावण्या-साठीं अिस्लामेतर प्रदेशाकडे नि तेथील मुसलमानेतर लोकांकडे शत्रुदृष्टीनें बघावें असें आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे मुसलमानी मताचा पगडा बसलेल्या मुसलमान व्यक्तीची, समाजाची वा देशाची मनोवृत्ति काय असेल नि वर्तन कसें होत राहील याची सहज कल्पना करतां येअील. नि तर्कदृष्टीनें वरील गोष्टींचा कारणकार्यभावदृष्टीनें विचार करतां निगमनहि तसेंच निघेल.

अितिहास काय सांगतो ?

वरील निगमन औतिहासिक दृष्ट्या खरें ठरतें वा चुकीचें ठरतें हें विहंगम दृष्टीनें आपण बघूं. अरबस्थानांतून अरबांच्या लाटावर लाटा अुत्तर, पश्चिम नि पूर्व प्रदेशावर (दक्षिणेकडे समुद्रच होता म्हणून दक्षिण दिशेचा विचारच नाहीं.) आदळून युरोप, आफ्रिका नि आशिया खंडांमधील देशांतील अनेक देशांना-राष्ट्रांना नि त्यांतील धर्ममतांना नि संस्कृतीला त्यांनीं धुळीला मिळविलें आहे. या गोष्टीचा विस्तार करणें येथें स्थलाभावीं शक्य नाहीं, पण हिंदुस्थानच्या अितिहासांत या मुस्लिम लाटावर लाटा येऊन काय काय घडलें हें संक्षेपतः पाहिलें म्हणजे अितर देशांतील अितिहासाची कल्पना सहज करतां येअील.

हिंदुस्थानावर मुसलमानांच्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्या केवळ लूट वा प्रदेश जिंकण्याच्याच हेतूनें झाल्या नाहींत तर त्यांत मुस्लिममतप्रचार हा अेक प्रमुख अुद्देश होता. सिंधवर महंमद बिन कासीमनें जें आक्रमण केलें तें हिंदुस्थानांत मुसलमानी मत वाढविण्यासाठीं केलें. तो अेका पत्रांत म्हणतो 'दाहिर राजाचा पुतण्या, त्याचे पक्षाचे योद्धे नि मुख्य मुख्य अधिकारी यांना कंठस्नान घातलें. आणि बाकीच्या काफिरांना अेक तर अिस्लामी मत स्वीकारावयाला लावलें नि जेथें तें शक्य झालें नाहीं तेथें त्यांचीं हत्याकांडें (कत्तली) केलीं. देवळें पाडलीं नि मूर्ति भग्न केल्या

आणि त्यांचे स्थलीं मशिदी अुभारून आतां तेथें आपल्या अल्लाची दोन वेळा प्रार्थना केली जाते.' हें पत्र नि दाहिर राजाच्या शिरासह पाठविलेली राजभेट (बहुमूल्य हिरे आदिक) हीं **हजाज**कडे पाठविलीं त्याला **हजाज**नें अुत्तर पाठविलें त्यांत तो कासीमला लिंहितो, ''अल्लानें सांगितलें आहे कीं काफरांना सोडूं नकोस—कंठस्नानच घाल' ही थोर अल्लाची आज्ञा लक्षांत घे आणि कोणाचेंहि रक्षण करण्याचें मनांत आणूं नकोस...यापुढें कोणालाहि सोडूं नकोस. सर्वांना ठार कर. केवळ फार योग्यतेचे मोठे अधिकारी असतील अशांच्याच प्रसंगीं विचार कर."

गजनीचा महम्मद—'जिहाद' पुकारीत हिंदुस्थानवर यानें अनेक आक्रमणें केलीं. त्याच्याविषयीं अितिहासकार अुटबी यांनीं पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहेः "त्यानें मूर्तीच्या देवालयांचा विध्वंस करून अिस्लाम स्थापन केला. त्यांनीं नगरें जिंकलीं, भ्रष्ट नीचांना (काफर म्हणजे भ्रष्ट नीच) ठार मारून मूर्तिपूजकांचें अस्तित्व मिटविलें नि मुसलमानांना संतुष्ट केलें. नंतर स्वदेशांत जाअून अिस्लामच्या विजयाचें वर्णन केलें. आणि याप्रमाणें प्रत्येक वर्षीं अिस्लामी युद्धार्थ हिंदुस्थानवर आक्रमण करीत राहीन हा निश्चय प्रसिद्धिला. दिल्लीचे निवासी (जे 'दाअिये अिस्लाम' या पुस्तकामुळें हिंदूंना चांगलेंच परिचित आहेत. दाअिये अिस्लामचे भयसूचक घंटा म्हणून मराठींत भाषांतर झालेलें मराठी वाचकांना ठाअूक आहेच.) हसन निझामी आपल्या अितिहासांत महंमद गझनीसंबंधीं लिहितातः—" त्यांनीं आपल्या खड्गाच्या बलावर हिंदुस्थानांतून काफिरी नि दुर्गुण यांचा नायनाट केला. अनेक देवपूजक त्या प्रदेशांतून नष्ट केलें (हिंदूंचा नाश केला) नि मूर्तिपूजेची अशुद्ध गोष्ट नाहीशीं केली आणि राजशक्तीच्या बळानें नि निश्चयशक्तीच्या बळावर अेकहि देवालय अुभें ठेवलें नाहीं."

याच गझनीच्या महम्मदाचे हातून १००१ मध्यें जेव्हां पंजाबचा राजा जयपाळ याचा पराभव झाला तेव्हां याच्या आज्ञेवरून "त्याच्या मुलांच्या नि राज्याधिकारी आणि सेनाधिकाऱ्यांच्या दृष्टीसमोरून अवमानित, लज्जास्पद स्थितींत नि गुलामाप्रमाणें जयपाळाला राजमार्गांतून बंदीस्थितींत मिरविला." या आज्ञेच्या मागें अिस्लामानुयायी मुसलमानांविषयीं भय नि दरारा अुत्पन्न

होऊन देशभर हिंदूंना धाक बसावा असा हेतू होता. काफरांना ठार मारण्यांत नि त्यांचीं हत्याकांडे करण्यांत त्याला विशेष आनंद वाटे. १०१९ मधील युद्धांत त्यांनीं हातीं लागलें नि वाटलें त्यांना गुलाम करून नेलें नि बाकीच्यांना ठार केलें. त्याच्या मुसलमान सैनिकांनीं काफिरांच्या (हिंदूंच्या) हत्याकांडाची हौस मनसोक्तपणें पहिल्यानें फेडून घेतली नि मग लुटीच्या 'पुण्यकृत्याला' आरंभ केला. अितके ते लोक काफिरांना—सूर्य नि अग्निपूजकांना (हिंदूंना) ठार मारण्यासाठीं अुत्सुक झालेले होते.

महंमदगिजनीनीं हजारांवर देवळें नष्ट केलीं असतील. सोमनाथाच्या सर्वदेशप्रसिद्ध महामंदिराचा नाश करून श्रीसोमनाथजीची मूर्ति त्यांनीं घेअून भग्न केली नि त्याचा अेक तुकडा गझनीच्या जामेमशिदीला लावला, अेक आपल्या राजवाड्यांत अुपयोगांत आणला नि दोन तुकडे मक्का नि मदिनेला पाठविले. येथें फार मोठी लूट मिळाली. जवळ जवळ दीड दोन कोटी रुपयांची संपत्ति येथून त्यांनीं नेली.

तैमूरलंग आपल्या आत्मचरित्रांत लिहितो "हिंदुस्थानवर आक्रमण करण्यांत, काफिराविरुद्ध लढावें, त्यांना वाटवून मुसलमान करावें नि तद्वारां महम्मदांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांना 'सत्यमार्गा'कडे आणावें, अिस्लाममतनिषिद्ध होणारें वर्तन बंद पाडावें, अनेक देववाद नाहींसा करावा, देवालयें पाडून टाकावींत, मूर्ति नष्ट कराव्यात आणि या गोष्टी केल्यानें आपण गाजी (अल्लाचे सहाय्यक) आणि मुजहिद (अल्लाचे सैनिक) व्हावें, हा हेतू होता." बाहेरील मुसलमानांनीं हिंदुस्थानांतील मुस्लिम शासकांवरहि आक्रमणें केलीं आहेत. नि तेहि आपसांत भांडले आहेत पण हिंदूधर्मनाशनाच्या कार्यीं ते सर्व अेकमत होअून सर्व मिळून भाग घेत असत.

बखत्यार खिलजी—अनेक वेळीं मुसलमानी आक्रमकांनीं केलेल्या अमर्याद हत्याकांडामुळें हिंदूधर्माला नि संस्कृतीला पुष्कळच धक्का बसला. बिहारमधील स्वारींत ब. खिलजीला अेका ठिकाणीं त्या लुटींमध्यें खूप लूट मिळाली. तेथील निवासी बहुतेक ब्राह्मण संन्यासी होते. ते सर्व ठार मारले गेले. फार मोठा ग्रंथसंग्रह हातीं लागला, पण त्या ग्रंथांत काय आहे हें सांगावयाला अेकसुद्धां ब्राह्मण वा जाणणारा हिंदू जिवंत अुरला नव्हता.

महमद घोरी—हा म्हणजे महमदगजनीची दुसरी आवृत्ति. यांनीं अजमीरला नि दिल्लीला अनेकशः देवालयें पाडून त्याच सामग्रींनीं मशिदी बांधल्या. दिल्लीला देवालयें वा देवपूजक अेकहि अुरूं दिला नाहीं म्हणून याची प्रौढी गायलेली आहे. कतुबुद्दीन **आयबक** यांनींहि हजारांजवळ देवालयें नष्ट करून त्यांतील सोनें नि पाषाण दिल्लीच्या जामे मशिदींत अुपयोजलीं आहेत. **अल्लाअुद्दीननें** मशिदीअितकीच मोठी मिनार बांधून तिचे बांधकामासाठीं खाणींतल्या दगडावरोबर देवालयें पाडून त्यांचेहि दगड अुपयोगांत आणले होते.

सुलतान फेरोजशहा—याच्या राजवटींत दिल्लींत हिंदूंनीं पुन्हां देवालयें बांधावयास आरंभ केला हें कळतांच मीं काय केलें हें तो प्रौढीनें वर्णितो कीं दिल्ली नि आसपासच्या प्रदेशांत अिस्लामच्या आज्ञेविरुद्ध जाअून महम्मद पैगंबरानें निषेधलेल्या गोष्टी केलेल्या सहन होणें मला शक्यच नव्हतें. त्या अल्लाच्या पवित्र (?) प्रेरणानुसारें या काफिरी कृत्यांचे प्रेरक नि पुढारी मीं ठार केले, अितरांना फटक्यांची शिक्षा दिली आणि मूर्तिपूजक नि मूर्तिपूजा यांचें नांवहि अुरूं दिलें नाहीं.

शाहाजहानच्या राजवटींतहि देवालयें बांधणें चालू झालें होतें. त्यासंबंधीं बादशाहानाम्यामध्यें मोठ्या गंभीरतेनें अुल्लेखलेलें आहें कीं "अकबराच्या राजवटींत श्रीकाशींत हिंदूंनीं देवालयें बांधावयाला काढलीं तीं अपुरी राहिलीं होतीं. तें नगर काफिरी लोकांचा मोठा किल्लाच आहे. पण तेथील तीं अपुरीं राहिलेलीं देवालयें पुरीं होअूं न देतां सर्व पाडण्यांत आलीं. काशी जिल्ह्यांत शाहात्तर देवालयें याप्रमाणें पाडलीं गेलीं." महम्मद गझनी–घोरी, तैमूर आदिक आक्रमक मूर्ति फोडणें, लूट मिळविणें, काफिरांना गुलाम करून नेणें (या गुलाम करून नेलेल्यांत निरनिराळ्या कला नि विद्यांतील प्रविण हिंदू कारागीर नि तज्ञ लोक, सुंदर सुंदर हिंदू स्त्रिया नि तरुण लोक हे विशेषतः नेले जात) आणि अिस्लामी तरवारीनें काफिरांना ठार मारून नरकांत पाठविणें (मुस्लिममताप्रमाणें मुसलमानेतरांना अल्ला नरकांतच घालतो. त्यांना दुसरी गति नाहीं.) याच गोष्टींत समाधान मानीत. पण मुस्लिम बादशाही स्थिर रूपानें दिल्लींत स्थापन झाल्यापासून बलात्कारानें हिंदूंना मुसलमान करण्याचा सपाटा मुस्लीम सत्ताधाऱ्यांनीं कमी अधिक मानानें चालू केला.

कारण तशी अत्यन्तिक अवश्यकता त्यांना भासूं लागली. "**सर्व देशच मुस्लिममय करावयाचा हें बादशाही राजकारणाचें प्रमुख धोरणच ठरविलें गेलें.**"

"१६६९ त अवरंगजेबाला असें कळलें कीं ठट्ठा, मुलस्थान (मुलतान) नि श्रीकाशी—नि प्रमुखतः श्रीकाशींत—मूर्ख ब्राह्मण आपल्या शाळांतून क्षुद्र पुस्तकांतील अुपदेश करतात आणि तेथें हिंदू नि मुसलमानहि (बलात्कारानें बाटविल्यानें मुसलमान म्हटल्या जाणाऱ्या पण मनानें हिंदूवत् असलेल्या मुसलमानांना हिंदूविषयीं परकेपणा वाटणें अशक्यच नसून अुलट आत्मीयता वाटावी हें साहजिक होतें) फार दूरवरून येअून शिकत असतात....अर्थात् हें सहन न होअून अिस्लामच्या मुल्ला मौलवींच्या आज्ञानुसार सगळ्या प्रांतांच्या शासकांना काफिरांच्या शाळा नि देवालयें मोडून टाका नि त्यांचा शिक्षणक्रम नि पूजनक्रम तत्काल नि पूर्णपणें बंद पाडा" असें अलमगिराच्या (अवरंगजेबाच्या) अितिहासांत वर्णन केलेलें आहे.

बलात्कारानें बाटविण्याच्या कार्यीं अत्याचाराचे नाना अुपाय अवलंबले जात असत. त्यांत क्रूरपणाच्या पद्धतीचेंच काय तें अंतर. वानगीसाठीं अगदीं करुणास्पद असें अेक अुदाहरण म्हणून पुढें दिलें आहे. अेक वृद्ध ब्राह्मण दिल्लींत आपल्या घरांत देवपूजा—देवमूर्तीची पूजा—करीत आहे म्हणून कळलें. हिंदुस्थानांत हिंदू बाटवून मुसलमान केले गेले तरी त्यांच्या भावना, विश्वास आदिक बराच काल त्यांच्यांत पूर्वींचेच जिवंत राहणें साहाजिक. तो ब्राह्मण अगदीं साधूवृत्तीनें राहत असल्यामुळें त्याचा प्रसाद नि आशिर्वादादि मिळण्यासाठीं मुसलमान बायकापुरुषहि त्या ब्राह्मणाकडे कामनिक बुद्धि धरून जात असत. अर्थात् मूर्तिपूजा हा अेक अपराध आणि मुसलमान बायकांमुळें आदिक त्यांत भाग घेण्यास जातात हें मुस्लिम मतानें अक्षम्य अपराधी कृत्य. मुसलमान बादशहा—फेरोजशहा १३५१—८८च्या वेळचा—त्या वेळीं राज्य करीत होता. त्यानें त्या ब्राह्मणाला बोलावून आणला नि त्याचा दावा मुसलमानी निर्बंधवेत्ते, मुल्ला मौलवी नि मुस्लिम नियमान्वयें निवाडा देणारे यांचेपुढें मांडला गेला. ब्राह्मणाच्या कृत्याविषयीं मुसलमानी कायदा स्पष्ट होता. अेक तर ब्राह्मणानें मुसलमान व्हावें अथवा जाळून ठार मारण्याच्या दंडाला सिद्ध असावें. हा

मुस्लिम सत्यतेचा निवाडा त्याला सांगितला गेला नि त्यांनीं काय करावें हें म्हणजे मुसलमान होणें हें—आज्ञापिलें गेलें. अर्थात् त्यानें ती आज्ञा झिडकारली. परिणामी त्या ब्राह्मणाला जिवंत जाळण्यांत आलें. आणि " बघा कुराणाज्ञा कशी तंतोतंत मुसलमान बादशहानीं पाळली—आज्ञेचें अुल्लंघन तो कसें करूं शकेल " असें या घटनेविषयीं टीकाकारांनीं मोठें धन्यतापूर्वक म्हटलें आहे.

" अिस्लामचा संबंध हिंदुस्थानशीं आल्यापासून काफिरांना ठार मारणें नि त्यांच्या (हिंदूंच्या) देवळांचा नाश करणें अेवढेंच करून न राहतां पराजितांना मोठमोठ्या संख्येनें गुलाम म्हणूनहि पकडून घेअून जात. सरदार, शिपाअी नि सेनापति यांनीं केलेली लूट वांटून घेण्यांतच ते लोक फार दंग असत. महमूद गझनीनीं काफिरांची कत्तल करणें, देवळांचा नाश करणें, गुलाम म्हणून हिंदूंना बंदी करणें, नि संपत्ति लुटणें (विशेषतः देवळांची नि त्यांतील अुपाध्याय—पुजाऱ्यांची संपत्ति लुटणें) हें त्यांच्या आक्रमणाचे विशेष हेतू होते. पहिल्या स्वारींत त्यांनीं अगणित संपत्ति नि पांच लक्ष सुंदर सुंदर स्त्रिया नि पुरुष गुलाम करून नेले. " गुलाम केलेल्यांची कांहीं बोटें कापीत असत (बहुधा गुलाम म्हणून ओळखण्याच्या खुणेसाठीं असावें.) त्या बोटांची मोजणी करतां करतां गणक थकून गेले अितके गुलाम केले गेले असें कनोजच्या आक्रमणाचा वृत्तांत लिहिणारानें अुल्लेखून ठेवलें आहे. गुलाम अितके विपुल मिळाले कीं २ ते १० दिनार (अेक हलकें नाणें) च्या मोलानेंहि अेक अेक गुलाम मिळे नि त्यांना विकत घेण्यासाठीं लांबलांबून मुसलमान व्यापारी येत होते " असें वर्णन आहे.

अल्लाअुद्दीननेंहि पूर्वीच्याच प्रथेचें अनुकरण केलें. लूटमार, हत्याकांडें, बलात्कार, देवळें पाडणें यांचा धुमाकूळ अुडवून दिला. त्याला हिंदूनींहि पुष्कळ जोराचा प्रतिकार केला. पण तो (सामुदायिक अुठावणीच्या अभावी) पुरे पडला नाहीं. शेवटीं अल्लाअुद्दीनानें हिंदूंच्या प्रतिशोध (सूड) बुद्धीनें पुढील निर्बंध त्यांचेवर लादले.

१ हिंदूंनीं घोड्यावर बसूं नये, शस्त्र बाळगूं नये, चांगला वेष करूं नये, आयुष्याचे भोगविलासहि अुपभोगूं नयेत.

२ त्यांनीं 'झिझिया' (मुसलमान न होतां हिंदू राहण्यासाठीं द्यावयाचा कर) द्यावा.

या सुलतानाच्या राज्यांत हे नियम फार कडक रीतीनें पाळिले जात होते. कोणीहि हिंदू डोकें वर काढून चालणें शक्य राहिलें नाहीं. नियमभंगासाठीं (शस्त्र ठेवणें, चांगला वेष करणें, घोड्यावर बसणें, विडा खाणें आदिक) ठोसे, फटके, मोठमोठ्या संख्येनें कारावासाची शिक्षा, बेड्या आदिक शिक्षा दिल्या जात.

ग्रंथसंपत्तीचा नाश तर अमर्याद झाला. पूर्वी हिंदुस्थानांत प्रांतोप्रांतीं नि प्रमुख सोयीच्या स्थळीं मोठमोठीं विश्वविद्यालयें असत. तेथें गुरुगृहीं शिक्षण पद्धतीनें सहस्रावधि विद्यापिपासू विद्याभ्यास, कलाभ्यास नि शास्त्राभ्यास करीत असत. अशीं विश्वविद्यालयें, नि त्यांतील अतुलनीय ग्रंथसंपत्ति ही मुसलमानांच्या दृष्टीला पडली कीं त्यांचा विध्वंस होअी. त्यांतील सहस्रावधी विद्यार्थ्यांची कत्तल होअी नि ग्रंथसंपत्ति जाळून टाकीत. अेक स्थळीं तर तेथील ग्रंथसंपत्ति सहा महिने जळत होती नि त्या जळणावर पाणी तापवित असत असे अुल्लेखिलेलें आहे. यामुळें किती अमोल ग्रंथ नि तद्द्वारां ज्ञानसंपत्तीला जग मुकलें असेल नि हिंदू संस्कृतीची किती भयंकर हानि झाली असेल याची यथार्थ कल्पना करणेंहि शक्य नाहीं. ग्रंथ जाळण्याचा वा नष्ट करण्याचा युक्तिवाद अेका मुस्लिम राज्यकर्त्यानें केल्याचें अुल्लिखित आहे तो असाः—"कुराणांत आहे तेंच जर या ग्रंथांत असेल तर निरुपयोगी म्हणून जाळावेत नि त्या व्यतिरिक्त अधिक वा निराळें कांहीं असेल तर तें खुदाच्या ग्रंथाशीं विरोधी म्हणून तें जाळलें पाहिजे." अेवंच कुराणावांचून अितर ग्रंथसंपत्ति असता कामा नये असा आशय ठेवूनच काफिरांच्या देशांतून वर्तन सर्वत्र ठेवलें गेलें होतें असें दिसतें. जगन्नाथपुरी, प्रयाग, श्रीकाशी आदिक पुण्यक्षेत्रीं ब्राह्मणांचीं हत्याकांडें सहस्रावधींनीं झालेलीं आहेत. यापैकीं अेकेस्थळीं तर जवळजवळ दोन लक्ष ब्राह्मणांचें हत्याकांड झालेलें आहे. अेकंदरींत हिंदुस्थानांत मुस्लिमप्रसारार्थ होणाऱ्या अनन्वित कृत्यांना हिंदूंनीं असामान्यपणें तोंड देअून आपला धर्म नि संस्कृति अितक्या महाभयंकर संहारकृत्यांमधूनहि बऱ्याच अंशांनीं सुरक्षित ठेवली हें कार्य हिंदूंच्या मधील प्रखर धर्मनिष्ठेच्या बळावरच होअूं शकलें.

त्याचेच बरोबर समुदायभावना वा संयुक्तता भावना–हिंदू तेवढा अेक नि आपण सर्व मिळून, सर्वांचें आपल्या राष्ट्राचें, धर्माचें, संस्कृतीचें रक्षण केलें पाहिजे अशा प्रकारें संघटित नि अखिल हिंदू अेकता भावनेनें–जर हिंदू या प्रचंड आक्रमणाला तोंड देते तर हिंदुस्थानचें भवितव्याचा अितिहास निराळ्या प्रकारें लिहावा लागला असता. **अद्यापहि ती संयुक्ततेची समुदायभावना, व्यक्तिगत स्वार्थपरतेवर विजय मिळविण्याअितकी प्रबलपणें, प्रकट होत नाहीं हीच गोष्ट हिंदुराष्ट्र नि त्याचा भाग्य काल यांच्यामध्यें अडसर म्हणून आडवी पडलेली आहे.**

त्रिखंड प्रसिद्ध स्वामी विवेकानंद अेकदां म्हणाले होते कीं "महंमदानें अिस्लाम मत स्थापून जी महान् विध्वंसक शक्ति निर्माण करून ठेवली आहे तशी पूर्वी पृथ्वीच्या पाठीवर केव्हांहि निर्माण झाली नाहीं." नाना देशांच्या अितिहासज्ञानानें नि हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष पुरावे पाहून वरीलप्रमाणें त्यांचे अुद्गार निघालेले आहेत. येथपर्यंत अिस्लाममताप्रमाणें कुराणानें कशा आज्ञा दिलेल्या आहेत, अितर देशांतील मुस्लिम आक्रमणाचा त्रोटक अुल्लेख करून हिंदुस्थानांत त्यांच्या आक्रमणापासून नि येथें बादशाही स्थापन झाल्यावर मुसलमान आक्रमकांचें नि सत्ताधाऱ्यांचें कसें वर्तन झालेलें आहे हें आपण पाहिलें. त्यावरून असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं, कीं मुसलमान झालेल्या व्यक्तीवर नि त्यांच्या गटावर ज्याप्रमाणांत कुराणाज्ञांचा पगडा बसलेला असेल त्यामानानें ती व्यक्ति वा तो गट परधर्माविषयीं तंतोतंत अिस्लाममताच्या अनुसारें वागणार. अकबर, नि तत्सम अितर मुस्लिम बादशाहांच्या मतपरिवर्तनानें असो वा साम्राज्यस्थिरतेच्या दृष्टीनें धूर्ततेनें असो त्यांच्या धोरणांत सौम्यपणा अुत्पन्न झालेला होता नि त्या सत्ताधाऱ्यांच्या धोरणाप्रमाणें मुसलमान समाज कमी वा अधिक कडक स्वरूप धारण करीत असे. **त्याचप्रमाणें अितिहासावरून नि सांप्रतच्या चीन, जपान, अिंग्लंड अमेरिकेमधील मुसलमानांच्या वर्तनावरून असेंहि दिसून येतें कीं जेथें मुसलमानेतरांची शक्ति वरचढ असेल नि त्यांच्या अतिरेकी वर्तनाला वाव मिळणें शक्यच नसेल तेथें ते समंजसपणानेंहि वागूं लागतात. नि हा अतिरेकीपणा कमी केला**

वा झाला म्हणून त्यामुळें त्यांच्या मुसलमानीपणाला कांहीं बाध आला वा आपण कमी प्रतीचे मुसलमान झालो असेंहि त्यांना वाटत नाहीं. अितकेंच नव्हे तर अितरत्र कट्टर नि मतवेडानें वागणारे मुसलमानहि तशा सौम्यवृत्तीनें नि म्हणून माणुसकीनें वागणाऱ्या मुसलमानांना हीनहि लेखित नाहींत. तेंहि आपल्याच अितके मुसलमानीपणानें युक्त आहेत असे मानतातसें दिसून येतें. यावरूनहि हिंदूंना बराच बोध घेतां येण्यासारखा आहे.

मुसलमानांचें आजचें वर्तन

मुसलमानांच्या सांप्रतच्या अेकंदर वर्तनाविषयीं विचार करतां त्यांचें वर्तनांत स्वाभाविक भाग किती नि अगांतुक भाग किती याचा अुलगडा करून घेतांना कौराणिक (कुराणाच्या) शिकवणुकीमुळें मुस्लिममतवाल्यांचा नैसर्गिक स्वभाव कसा बनलेला असतो हें आपण जें अितिहासकथनापासून पाहिलें तशाच प्रकारचें तें आहे कीं त्याहून निराळें आहे हें आपण तौलनात्मक दृष्टीनें बघितलें पाहिजे. नि मग तदनुसार त्याविषयीं आपले पुढील मार्ग आखले पाहिजेत हें स्पष्ट आहे. अिंग्लिश लोकांनीं राष्ट्रीय अुत्थानाचे प्रयत्नांत हिंदुबरोबर मुसलमान समभागी होणार नाहींत हें ओळखून त्या वस्तुस्थितीचा लाभ घेण्याचें त्यांनीं ठरविलें, हें अगदीं साहजिक आहे.वर सांगितल्याप्रमाणें (राष्ट्रीयसभा) कॉंग्रेस आपल्यास योग्य वाटलेल्या पद्धतीनें काम करीत असतां पूर्वीच्या कॉंग्रेसधुरीणांचेच केवळ हातीं ती सभा राहणें कठिण होअूं लागलें. परलोकवासी लाला लजपतराय, बंगाल फाळणीमुळें अुत्पन्न झालेल्या प्रचंड आंदोलनांत प्रसिद्धीला आलेले अरविंदबाबू घोष नि मुख्यतः आपल्या सहकारी नि अनुयायांसहित आंत शिरलेले दिवंगत लो. टिळक ही मंडळी हळुहळू कॉंग्रेसमध्यें अेक महत्त्वाचा घटक होअून बसण्याची वेळ आली. लार्ड कर्झन या कुविख्यात व्हाअिसरायाचे राजवटींत हिंदुस्थानांत राजकीय असंतोष फारच तीव्र होअूं लागला नि १९०५ च्या आरंभीं झालेल्या बंगाल फाळणीमुळें देशांत असंतोषाच्या लाटांनीं वादळाचें स्वरूप धारण केलें, कॉंग्रेस जुन्या नेतृवर्गाच्या हातून जाण्याची वेळ आली–नव्हे १९०६ या वर्षी ती त्या जुन्या नेत्यांचे हातून निघून लो. टिळकप्रमुख नेत्यांचे हातीं वास्तवतः आल्यासारखें झालें. खरा राष्ट्रीय पक्ष प्रबळ झाला, देशांत गुप्त संस्थांचें जाळें

पसरून त्यांच्या प्रयत्नांची आच राज्यकर्त्या अिंग्लिश अधिकाऱ्यांना जाचूं लागली. नि याप्रकारें हिंदुस्थानांत राजकीय पक्ष प्रबलतर होऊन बसला.

वरील गोष्टी या थराला येत असतां हिंदुस्थानांत अिंग्लिश सत्ताधारीहि कांहीं स्वस्थ नव्हते. त्यांनीं हिंदुस्थानांतील या वाढत्या राष्ट्रीय शक्तीला शह देण्यासाठीं हिंदूंशीं मनापासून कधींच न मिळालेला नि न मिळणारा मुस्लिम गट आपल्या बाजूला वळविला. अिंग्लिश राष्ट्राच्या राजकीय धोरणांत साम्राज्यांतर्गत नि साम्राज्याबाहेर जी कांहीं निश्चित नि स्थायी राजनीतिसूत्रें ठरलेलीं आहेत त्यांपैकीं ज्याप्रमाणें अेक 'फोडा नि झोडा' हें आहे त्याचप्रमाणें 'शक्तिसमतोलन' (बॅलन्स ऑफ पावर) हेंहि अेक सूत्र आहे. वरील मुस्लिम गटाला आपणांकडे वळविण्यांत या दोनहि सूत्रांचा समावेश होतो. अेक तर हिंदुस्थानीयांतून मुसलमानांचा गट फोडून आपल्या बाजूला केला नि हिंदुस्थानांत संभवनीय वाटणाऱ्या संयुक्त विरोधी शक्ती परस्परांपासून वेगळ्या केल्या. त्याचप्रमाणें वाढत्या हिंदू राष्ट्रीयपक्षाचे डाव परस्पर तोडतां यावे नि त्यांचा अुपसर्ग आपणांला लागूं नये म्हणूनहि अिंग्लिशांना या मुस्लिमगटाचा अुपयोग झाला. तें कसें हें आपण आतां पाहूं.

हिंदुस्थानांत अिंग्लिशांचें साम्राज्य स्थापन झाल्यावर मुसलमान लोकांनीं आपली बादशाही हिंदुस्थानांतून गेली, आतां आपण कोणतें धोरण नि ध्येय आखावें याविषयीं विचार करण्याचें ठरविलें. अितकें दिवस मुसलमानी बादशाहीमुळें तिच्याशीं झगडण्यांत ७।८ शें वर्षें जाअून शेवटीं हिंदुपदपादशाही स्थापन करण्यांत जवळ जवळ यशस्वी होत आलेली हिंदूशक्ति या नव्या नि विलक्षण धोरण-पद्धतीच्या अिंग्लिश आक्रमणांत पराजित होअून अेक प्रकारें थोडा काळ दिङ्मूढशी बनली. नामधारी कां होअीना पण मुसलमानांचा बादशाहीचा टिळा पुसट्टून जातांना त्यांच्या कुराणाज्ञेच्या अभिमानानें अिंग्लिश राज्यांत आपण कसें वागावें याचा विचार मुसलमानांत चालूं झाला. मुसलमानेतर राज्यांत राहणें हें अनिष्ट कारण ते मुसलमानेतर राज्य म्हणजे शत्रुराज्य 'दार-अुल-हरब.' तेव्हां अेकतर या राज्याचा अंत करावा किंवा तें अशक्य तर मुसलमानांनीं देशांतर करून मुसलमानी देशांत चालतें व्हावें या विचाराचे आंदोलन मुस्लिम मंडळींत चालूं झालें. या विरुद्ध सर सय्यद अहमद यांनीं प्रचार करून ज्या

अर्थी या अिंग्लिश राज्यांत मुसलमानांना आपल्या धर्माप्रमाणें पूर्ण स्वतंत्रपणें वागतां येणारें आहे नि म्हणून हें राज्य दार–अुल–अिस्लाम–म्हणजे मुसलमान देशच आहे–शत्रू देश नव्हे असें प्रतिपादून मुसलमानांचा देशांतराचा विचार स्थगित करविला. देशांतराचा विचार जरी स्थगित झालेला दिसला तरी तो अिस्लामी देश म्हणून नसून व्यवहारतः तें अशक्य दिसून आलें म्हणूनच होय. देशांतराचा जरी विचार थांबला तरी अिंग्लिश राज्यांत राहणें म्हणजे दाल–अुबल–हरब शत्रुराज्य वा देश यांमध्येंच राहणें होय ही मनोवृत्ति मात्र नाहींशी झाली नाहीं. आणि असें कळतें कीं हिंदुस्थानभर मुख्य मुख्य मशिदींतून अद्यापहि खुदाच्या प्रार्थनेच्या वेळीं हिंदुस्थान हा दार–अुल–अिस्लाम नसून दाल–अुल–हरबच आहे अशी वारंवार मुस्लिममनाला चेतावणी दिली जाते. यांतील हेतू अुघड आहे. जें असावें तें नाहीं तेव्हां तदर्थ प्रयत्न चालूं असावेत. यासाठीं ही चेतावणी असणार यावांचून दुसरा हेतू काय असावयाचा !

वर अुल्लेखलेल्या सर सय्यद अहमदच्याच खटपटीनें कॉंग्रेसपासून मुसलमान दूर राहूं लागले, त्यानें प्यान अिस्लाम चळवळीचा आरंभ करून त्या शिकवणीनें भारलेले मुस्लिम कार्यकर्ते निर्माण करणारें केंद्र स्थापित करण्यासाठीं अलीगड कालेज काढलें, आणि १८८६ पर्यंत मुसलमानांच्याविषयीं अिंग्लिश मतांतील असलेला रोष काढून टाकून हिंदूविषयीं तीव्र विरोधी भावना निर्माण व्हावी म्हणून १८५७ मधील स्वातंत्र्यप्रयत्नांचे वृत्तान्तासंबंधीं 'त्या प्रयत्नांतील मर्म जाणणारा' हा रंग घेअून अेक पुस्तिका छापली नि ती त्यावेळच्या पार्लमेंटच्या सभासदांत, मंत्रिमंडळांतच केवळ वाटून अिंग्लिशांच्या राजकारणाचें हिंदुस्थानांतील धोरणाला हिंदुविरोधी धोरण ठरविलें जाण्याचा प्रयत्न केला. अिंग्लिशांना कुटिल डाव खेळण्याची संथा देण्याची अवश्यकताच नाहीं. पण सर सय्यद अहम्मदच्या वरील अुपक्रमाला मान दिल्यासारखें करून त्यावेळीं मुसलमान पक्षपाताचे नि मुसलमानांना फूस देण्याचें धोरण हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजकारणी धोरण म्हणून ठरविलें गेलें. १८८६ या वर्षी अंजुमान अिस्लाम ही संस्था मुस्लिम हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठीं स्थापन झाली. मुसलमानांनीं १८९२ मध्यें जस्टिस मिस्टर सय्यद महम्मद यांच्या नेतृत्वाखालीं **महामेडन–अँग्लो ओरिअेंटल डिफेन्स असोसिअेशन**च्या

द्वारा (हें संस्थेचें नांव ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.मुसलमान नि अिंग्लिश हितसंबंध-संरक्षण समिति हा या संस्थेच्या नांवाचा अर्थ. यावरून मुसलमानांनीं अिंग्लिशांशीं हातमिळवणी करून त्यांचे साह्यानें आपले अिस्लामी हेतू पूर्ण करून घेण्याचें धोरण आंखलें होतें हें स्पष्ट होतें.) साधारणतः वीस हजार प्रमुख प्रमुख मुसलमानांच्या स्वाक्ष-र्यांसह अेक विनंति पत्रक अिंग्लिश सरकारकडे पाठविलें नि त्यांत आपले हितसंबंध अेकंदर हिंदुस्थानच्या हितसंबंधांहून वेगळे आहेत नि ते तसेच निराळे-पणें संरक्षित केले पाहिजेत असें त्यांनीं मागणें मागितलें होतें. वर सांगितलेल्या अंजुमान अिस्लाम संस्थेचेंच २३ जून १९०३ मध्यें प्यान अिस्लामिक सोसायटी नामक संस्थेंत रुपांतर होअून तिचें मुख्य कार्यालय अिंग्लंडमध्यें स्थापन झालें. त्यांत हिंदुस्थानी मुसलमानांतील मोठमोठ्या लोकांचे हात होते अितकेंच नव्हे तर परकीय मुसलमानी प्रमुखांचीहि सहानुभूति नि साह्य मिळालेलें होतें. या संस्थेचे जवळ जवळ हिंदुस्थानांतील ४० आजीव सभासद होते. अिराणचे १९ सभासद (यांत अिराणमधील प्रधान, राजपुत्र, परदेशीय वकील नि अितर अिराणी मोठमोठे लोक समाविष्ट आहेत.), अिजिप्तमधील चार, अिंग्लिश जातीय मुसलमान झालेले चार हे सर्व आजीव सभासद, सन्माननीय (आनररी) सभासद म्हणून १३ अिंग्लिशांनीं आपणांला जागा मिळ-विल्या होत्या (हे अिंग्लिश या संस्थेंत कां गेले हें हिंदूंना समजेलच असें नाहीं म्हणून येथें सांगितलें पाहिजे कीं भारतांतील प्रत्येक संस्थेंत–मग ती हिंदुस्थानांत स्थापन झालेली असो वा बाहेरील प्रदेशीं हिंदुस्थानवासियांकडून स्थापन झालेली असो त्यांत नि हिंदुस्थानांतील प्रत्येक मोठ्या नेत्याच्या कच्छपी अेक वा अधिक अिंग्लिश सद्गृहस्थ (?) संबद्ध झालेले असतात. त्यांत त्यांचे दोन हेतू. अेक तर शक्य तो त्या संस्थेला वा मनुष्याला अिंग्लिशोपयुक्त करून घ्यावयाचें नि दुसरा हेतू त्या त्या संस्था वा मनुष्याच्या हालचालींत कांहीं अिंग्लिशविरोधी कार्य वा हालचाली घडत आहेत कीं काय हें पाहून त्याविषयीची बातमी अिंग्लिश सत्तापक्षाला देअून सावध करावयाचें. अुदाहरणार्थ कॉंग्रेसमध्यें आरंभीं तीन सद्गृहस्थ होते हें मागें आलेलेंच आहे. त्यांत हार्निमन आदिकांची भर घालावयाची. श्रमिक पक्षांतहि कांहीं अिंग्लिश आहेत. या प्यानअिस्लाम संस्थेंतहि अिंग्लिश आहेतच. राजकारणांत थियासफिस्टांची अभिनेत्री अनीबेझन्ट

नि आतां लेडवीटर हे वावरत होते नि आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रत्येक नेत्याच्या मागे एक वा अधिक अिंग्लिश स्नेह्यांचे शुक्लकाष्ट असतेंच. अेक लोकमान्य टिळकच कायते या निमयाला अपवाद झाले. (सध्यां हिंदुमहासभा नि तिचे प्रमुख सूत्रचालकहि लोकमान्यांच्याच पंथाचे अनुकरणी असल्यामुळें ते या नियमांत सांपडलेले नाहींत.) या प्यानाअिस्लामी संस्थेचे परिपोषक वर्गांत तर वर दिलेल्या प्रमुख मुसलमानांहून श्रेष्ठतर असे लोक समाविष्ट झालेले होते. अिजिप्तचा खेदीव (म्ह. राजा), किंग अेडवर्ड सातवे यांच्या शरीरसंरक्षकावरील मुख्य अधिकारी, अिजिप्तचा मुफ्ती, आदिक लोक परिपोषक वर्गांत वीसपर्यंत संख्येंत होते.

१८८६ मध्यें कॉंग्रेस स्थापन झाली नि तीविरुद्ध मुसलमान अशी व्यवस्था मुसलमानांकडून स्वाभाविकरीत्याच झाली नि त्याला अंशतः अिंग्लिश प्रेरणाहि कारणीभूत ठरली. तरीपण अिंग्लिश प्रयत्नांना अुथळपणा राहूं नये नि मुसलमान हिंदूंपासून पक्केपणीं फोडले जावे म्हणून लगोलग १८८८ मध्यें असलेले हिंदुस्थानचे व्हाअिसराय लार्ड डफरिन यानीं विधिमंडळांत जे लोकप्रतिनिधी निवडून घ्यावयाचे ते अिंग्लंडप्रमाणें सर्वसाधारणपणें प्रजावर्गांतून न निवडतां प्रत्येक जातीचे निरनिराळे हितसंबंध आहेत असें कल्पून त्या भूमिकेवरून मुस्लिमहितसंबंध सुरक्षित रहावेत म्हणून मुस्लिम प्रतिनिधि निवडावयाचें धोरण आरंभलें. नि पुढें मुसलमानांनीं तें धोरण पक्कें करून घेण्यासाठीं १८९२ मध्यें मागें नुक्तेंच अुल्लेखलेलें वीस सहस्र स्वाक्षऱ्यांचें विनंतिपत्रक प्रमुख मुसलमानांकडून गेलें होतें. हिंदुस्थानांतील मुसलमान सवत्यासुभ्याची ही पूर्वपीठिका आहे.

हिंदुस्थानांत ज्या ज्या वेळीं मुसलमानांचें दंगे पूर्वी झाले ते ते दंगे देशांतील हिंदू आंदोलनाला जरा विशेष स्वरूप आलें कीं त्या शक्तीवर आघात म्हणून झालेले आहेत हें सूक्ष्म अवलोकनानें लक्षांत येण्यासारखें आहे. मुसलमानांनीं हिंदुस्थान ही दार-अुल-हरब अर्थात् शत्रुभूमि आहे हें ठरविलेलें सांगितलेंच आहे. ती शत्रुभूमि अिस्लामभूमींत परिवर्तित करण्याचें धोरण आंखून त्या हेतूला परिपोषक अशा नीतीचा अवलंब मुसलमानांनीं करावा हें स्वाभाविकच आहे. हिंदुस्थान हा अिंग्लिशांच्या हातांत गेलेला आहे. तो अेक

लढून घेण्यानें अिस्लामचा करतां येअील पण तें तसें करणें अनेक कारणानें अशक्यसें त्यांना वाटलें. त्यापैकीं प्रमुखतम कारण येथें देअून टाकणें अत्यावश्यक वाटतें तें हें:—ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानवर असणें हें हिंदूंना केव्हांहि संमत होणें वा सहन होणें शक्य नाहीं. अर्थात् हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना काढून लावण्याचा खेळ आरंभला तर त्याच हेतूला निसर्गतःच उचलून धरणारे हिंदू लोक असल्यामुळें अेक समान हेतू त्यांच्याशीं होअून हातमिळवणी करणें अपरिहार्य होतें. आणि अशा हिंदुमुसलमानी संयुक्त प्रयत्नानें हिंदुस्थान अगदीं मुक्त केल्यास मुसलमानी राज्य नि त्यामुळें दार–अुल–अिस्लाम हिंदुस्थानचा होणें शक्य नाहीं. अर्थात् तो अिंग्लिश विरोधाचा मार्ग बंद झालेला. अुरला अेकच मार्ग नि तो म्हणजे हिंदूंनीं स्वराज्यार्थ केलेले प्रयत्नामुळें मिळणाऱ्या सत्तेमध्यें अिंग्लिशांना साह्य केल्यासाठीं मिळणाऱ्या विनिमयांत त्या सत्तेंमधून बराच मोठा वाटा आपण लाटावयाचा नि या प्रकारें हळुहळू पण निश्चयानें हिंदुस्थानांत मुस्लिम सत्तास्थापनेच्या हेतूंत अंशा–अंशानें यश मिळवावयाचें. हें मुसलमानांचें धोरण निश्चित ठरून त्याप्रमाणें पुढील पावलें त्यांची पडूं लागलीं.

मुसलमानांनीं–अर्थात् त्यांच्या पुढारीवर्गांनीं त्यांच्या स्वार्थसाधनाला अुपयुक्त अशा राजकारणी पद्धतीचा अवलंब केला. व्यक्तिस्पर्धा, परस्पर द्वेष, आपण मोठे ठरावयाची–सत्ताधीश बनावयाची–संपत्तिमान होण्याची महत्त्वाकांक्षा, अित्यादि गोष्टी कोणत्याहि समाजांतील व्यक्तींच्या अंगीं असतातच. वैयक्तिक आकांक्षा, मोठेपणाची हाव अित्यादी गोष्टींपासून अलिप्त राहून केवळ राष्ट्रसेवा–कार्यी वा समाजहितरक्षणार्थच आपलें जीवन आहे असें समजून आपलें व्यक्तित्व विसरणाऱ्यांची संख्या कोणताहि समाज पाहिला तरी कमी अधिक प्रमाणांत पण फार थोडी असते. असे हे थोर पुरुष ज्या समाजाला जितके अधिक लाभतात तो समाज त्यामानानें अधिक भाग्यवान् समजला पाहिजे. पण समाजाचें सर्व कार्य करण्यास पुरे पडतील अितक्या संख्येनें अशा असामान्य समाजसेवकांची प्राप्ति कोणत्याच समाजाला होत नाहीं. समाजाला बहुतेक अंशानें व्यक्तिगत विचार–प्राधान्य असलेल्या कार्यकर्त्यांकडूनच होणाऱ्या सेवेचा लाभ होत असतो. अशा वैयक्तिक हेतूप्रेरित समाजाच्या कार्यकर्त्यांत अेक

गुण विशेषत्वानें असावा लागतो नि तो म्हणजे हा कीं स्पर्धा, अिर्षा, द्वेष, आदिक पारस्परिक संघर्ष अुत्पन्न करणाऱ्या मनोवृत्तींच्या आहारीं जाअून ते समाजाच्या हानीला अुद्युक्त होत नाहींत. त्याच्यापेक्षां मला समाजांत अधिक मान मिळेल अशीं कार्यें करीन, अितरांहून अधिक समाजकल्याण साधून पुढारीपण आपले हातीं राखीन, प्रतिस्पर्ध्याला समाजकार्यस्पर्धेंत मी वरचढ होअून निस्तेज करीन अित्यादि समाजहितकर अिच्छा नि मनिषा व्यक्तिगत स्पर्धादिकांत ठेवण्याची त्यांची मनाची घडण असते नि त्यामुळें परस्पर स्पर्धादिक दोषांचा अुपसर्ग समाजाला होत नाहीं. मुसलमानांच्या मध्यें हा गुण आहे. त्यांच्यांत परस्पर द्वेषादिकांस भरपूर पूर येतो पण त्या आवेशांत मुस्लिमहिताविरुद्ध जाण्याकडे त्यांचें मन सहसा झुकत नाहीं. हा त्यांचा नि जगांतील सर्व जयिष्णु, वर्धिष्णु नि वर्धमान समाजांचा विशेष गुण आहे नि या गुणांमुळें आपसांतील मनोमालिन्यादि गोष्टीमुळें समाजाची हानि न होतां झाला तर लाभच होतो. या वस्तुस्थितीपासून हिंदूंनीं पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. हा गुण हिंदु समाजांतील सर्व व्यक्तीमध्यें असतां तर आजची दुस्थिति हिंदुजगताला आलीच नसती.

मुसलमानांनीं आपल्या समाजाच्या राजकीय अैक्यासाठीं अनेक संस्थांद्वारा नि निरनिराळ्या अुपायांनीं अनेकशः प्रयत्न केले आहेत. त्या सर्वांचा अितिहास देणें हें शक्य नाहीं. पण त्यांच्या प्रयत्नाचा अगदीं स्वल्पारंभ होअून हळुहळू सर्व हिंदुस्थानच गिळंकृत करण्याच्या पायरीपर्यंत ते कसे येअून पोंचले आहेत हा वृत्तांत विहंगमदृष्टीनें दोन गोष्टी शिकण्यासाठीं हिंदूंनीं पहाणें अत्यावश्य आहे. पहिली गोष्ट शिकण्याची म्हणजे आपल्या अिष्ट सिद्धीसाठीं त्या समाजानीं सर्वसाधारणतः नि समाजनेत्यांनीं विशेषपणें कसकसे प्रयत्न केले नि ते अिष्ट साधनाकडे कसे प्रगत होत गेले ही होय. आणि दुसरी गोष्ट शिकावयाची म्हणजे हिंदुस्थान हें हिंदुस्थान म्हणूनच राखावयाचें असेल, हिंदुराष्ट्र अक्षुण्ण राखून जर बलवान्, अैश्वर्यशाली नि समर्थ करावयाचें असेल तर मुस्लिम आक्रमणाचें स्वरूप ओळखून तें आक्रमण विफल करण्याचे अुपाय योजण्यासाठीं कोणते नि कसे प्रयत्न करावयाला पाहिजेत हें समजणें ही होय.

मुसलमानांनीं अिंग्लिशांशीं हात मिळवीत हिंदुस्थानांत हिंदूंच्या स्वराज्यार्थ

वा स्वातंत्र्यार्थ होणाऱ्या आंदोलनाला विरोध करून अिंग्लिशांना साह्य करावयाचें निं हिंदूविरोधामुळें ज्या कांहीं सत्तेचा अंश अिंग्लिशांकडून हिंदुस्थानला मिळत राहील त्या सत्तेंतील बहुतांश आपण त्याचे विनिमयांत (मोबदल्यांत) लाटावयाचा असा बेत करून तदनुसार त्यांचे डाव टाकणें चालूं झालें आहे ही गोष्ट लोकमान्य टिळकांसारख्या राजकारणपटु कार्यकर्त्याचे लक्षांत आल्यावांचून रहाणें शक्य नव्हतें. नि म्हणूनच दिवंगत लोकमान्यांनीं हिंदूमधील आत्मविस्मृति निघून जाअून हिंदुस्थानच्या राजकारणांतील हिंदीपणाची भूमिका अनेक कारणाकरितां फारशी बिघडलीशी दिसूं नये अशा बेतानें पण हिंदीपणाच्या वेडांत आपला हिंदुपणा विसरलाहि जाअूं नये नि हिंदूराष्ट्रीयतेच्या मूळ स्वाभाविक भूमिकेवरून हिंदू घसरून जाअून आधारहीन होअूं नयेत म्हणून १८९६च्या आसपास महाराष्ट्रांत श्रीशिवोत्सव नि श्रीगणेशोत्सव चालू केले. त्यांत दोन अुद्देश साधण्यासारखे होते. श्रीशिवोत्सवामुळें श्रीशिवरायांनीं ज्या हिंदुपदपादशाहीसाठीं सर्वस्व पणाला लावून आमरण प्रयत्न केले नि हिंदुपदशाहीची मुहूर्तमेढ रोवली त्यासाठीं कृतज्ञताबुद्धीनें त्यांचें पवित्र स्मरण करीत असतांना तीच मनीषा आतांच्याहि कालीं धारण करण्याची बुद्धि हिंदूंना व्हावी. आणि श्रीगणेशोत्सवाचा आरंभ राजकारणाबरोबरच हिंदूंच्या मनाचें धर्मकारणांकडे लक्ष जाअून त्याहि दृष्टीनें हिंदूंची हानि होअूं नये हा अुद्देश होता. हिंदुस्थानावर पारतंत्र्य असल्यामुळें राजकारणासाठीं होणाऱ्या प्रयत्नांची आवश्यकता स्पष्ट कळण्यासारखी आहे. पण धर्मकारणाकडेहि लक्ष देण्याचें कारण काय असा प्रश्न कोणा दीर्घ शंका घेणाऱ्याच्या मनांत यावयाचा. त्यासाठीं त्याचें थोडेसें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. मुसलमानांच्या बादशाही राजवटींत धर्मावरील नि तद्द्वारा हिंदूसंस्कृतीवरील आक्रमण स्पष्ट नि अुघडेनागडें होतें तसें तें ब्रिटिश सत्तेखालीं नाहीं नि म्हणूनच तें अेक प्रकारें अधिक घातुक होतें. हिंदुस्थानांत इंग्लिश शिक्षण प्रसाराविषयीं अिंग्लंडमध्यें ज्या चर्चा नि प्रतिवृत्तें झालीं आहेत त्यांत हिंदुस्थानला प्रत्यक्ष नसलें तरी अप्रत्यक्ष रीतीनें धर्महीन करून खिस्त्याप्रमाणें बनवावयाचें, तद्द्वारा ब्रिटिशांविषयीं ममताभाव अुत्पन्न करावयाचा नि राज्यकारभाराला लागणाऱ्या दुसऱ्या तिसऱ्या प्रतीचा नोकरवर्ग निर्माण करावयाचा असे हेतू त्यांत ग्रथित झालेले होते. त्या हेतूप्रमाणें पुढें परिणामहि घडूं लागला. हिंदू

जातीमध्यें अेक विशेष शक्ति आहे. ज्याप्रमाणें सप्तशतींतील कथेंत श्री दुर्गादेवीच्या अंगांतून निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या अवश्यकतानुसार त्या त्या प्रकारें कार्य पार पाडणारीं देवीचीं विविध रूपें बाहेर पडत नि तीं तीं कार्यें करून पुन्हां तीं शरीरें मूळ श्रीदुर्गादेवीच्या शरिरांत हळुहळू तिरोहित होत असत. हिंदू जातींतहि अगदीं तद्वतच शक्ति आहे. पूर्वीचा काल सोडून दिला तरी अगदीं अर्वाचीन काळींहि पंजाबमध्यें मुस्लिममताचा प्रसार होण्याची भीति निर्माण होतांच आणि पूर्वीच्या सनातन धर्माचें स्वरूप मलीन होअून नवीन प्रकारच्या स्वरूपधारणाची अवश्यकता अुत्पन्न होतांच आर्यसमाजोत्पत्ति, बंगाल मध्यें खिस्तीमताचें प्राबल्य धर्महीन शिक्षणाच्या लाटेनें होण्याची वेळ येतांच ब्राह्मसमाज, मुंबअीच्या बाजूला नास्तिकतेच्या लाटेला थोपविण्यास विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा प्रयत्न यांनीं आळा पडला. ज्याप्रमाणें आपली बाजू बळकट करणें हें स्वसंरक्षणाला आवश्यक असतें, त्याचप्रमाणें प्रतिपक्षाचें बल तोडणें हेंहि तितकेंच अवश्यक ठरतें. यावेळीं धर्महीनतेचा परिणाम अिंग्लिशांच्या शिक्षणद्वारा होत होता नि त्यामुळें युरोपीय विचार, तत्त्वज्ञान, संस्कृति आदिक गोष्टींच्या बाह्य झगझगाटानें हिंदुस्थानवासीयांतील नवशिक्षित वर्गावर छाप पडून स्वकीय अुत्कृष्टताहि त्यांना निकृष्टता वाटूं लागली. ही स्थिति बदलणें हिंदुत्वाच्या संरक्षणासाठीं अपरिहार्य होतें नि जणूं कांहीं त्याचसाठीं श्रीरामकृष्ण परमहंसाचे द्वारा निर्माण केला गेलेला त्यांचा शिष्यवर श्रीविवेकानंद यांनीं अमेरिकेंत सर्व धर्मपरिषदेंत जाअून जगांतील धर्मपंथ नि मताच्या अभिमानी नि विद्वान समजल्या जाणाऱ्या निवडक मंडळीपुढें व्याख्यान देअून सर्व जगांत हिंदूधर्माची श्रेष्ठता अेकमुखानें संशयातीतपणें मान्य करविल्या क्षणापासून आत्मवंचना करून घेणाऱ्या नि स्वतःला तुच्छ समजल्या जाणाऱ्या हिंदूंमध्यें अेकप्रकारें आत्मविश्वास नि आत्मसन्मानाला स्थान मिळालें. आणि पाश्चात्यांच्या ज्ञानाचा अुथळपणा अुघडा पडला. तरीहि जनतेमध्यें नित्यप्रति धर्मकारणाविषयीं चर्चा, विवरण, अूहापोह, नि चालू कालांतील तद्विषयक घडणाऱ्या घटनांचा खल व्हावा म्हणून धार्मिक अुत्सवाची अवश्यकता होती. ती अवश्यकता भरून निघावी आणि वर अुल्लेखलेले आपत्तीनें पुन्हां वर डोकें काढूं नये म्हणून लोकमान्य टिळकांनीं श्रीगणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देअून तो पुरस्कारला. यावरून

लोकमान्यांना मुसलमान प्रयत्नांचें अंतरंग नि भावी परिणामहि कळून त्याचेवर आपले राष्ट्राची तोडहि उपयोजलेली असावी अशा हेतूनेंच वरील दोन अुत्सवाचे अुपक्रम त्यांनीं केले असले पाहिजेत यांत शंका नाहीं. पुष्कळ वेळीं मनांतील हेतू प्रकटपणें अुघड प्रसिद्धिणें वा जनतेपुढें मांडणें अिष्ट नसतें. त्याचप्रमाणें या अुपक्रमाचे वेळीं लोकमान्यांच्या मनांत वरील हेतू असूनहि त्यांनीं कांहीं विशेष कारणानें त्यावेळीं ते तसें प्रसिद्धपणें प्रकटविणें अिष्ट नाहीं असेंच ठरविलें असलें पाहिजे. या विधानाला पुरावा हवा, असें बहुतेकांना वाटण्याचा संभव आहे. त्यासाठीं १।२ पुरावे येथें अुल्लेखून ठेवूं. प्रकट न करण्यासारखे हेतू मनुष्य सर्वसामान्यपणें सर्वत्र बोलून दाखवित नसला तरी कांहीं कांहीं वेळीं त्या हेतूचें दिग्दर्शन करून ठेवणें त्याला अुपयुक्त वाटतें. तसेंच दिग्दर्शन लोकमान्यांनींही केलेलें आहे. 'लोकमान्यांच्या आठवणी नि आख्यायिका' या पुस्तकांतील अशा प्रासंगिक अुल्लेखांपैकीं कांहीं अुल्लेख येथें मांडले आहेत.

१ कोणत्याहि सुधारणेचा मुख्य अुद्देश म्हणजे विशिष्ट राष्ट्रीय अभिमान जागृत करणें हा आहे. तो अभिमान आम्हीं कोणता धरावयाचा अर्थात् हिंदुत्वाचा होय.(खंड. ४ पृ. ३७३)

२ आपणांस पुढें जी अुर्जितावस्था प्राप्त व्हावयाची आहे ती हिंदुराष्ट्र या नात्यानेंच झाली पाहिजे. (खंड ४ पृ. ३७५)

३ सारांश मी हिंदु आहे, हिंदु राहीन, हिंदु मरेन आणि हिंदुत्वानेंच आपला अभ्युदय केव्हांना केव्हां तरी करून घेअीन असा त्यांचा पूर्ण विश्वास होता. प्रो. जिन्सीवाले यांच्या चरित्रापासून **तरुण मंडळींनी जो कांहीं बोध घ्यावयाचा तो हाच होय.** (खंड४ पृ.३४५)

४ आमच्यांपैकीं कांहीं मंडळी अशी आहेत कीं मुसलमानांनीं कांहींहि अगाळिकी केल्या तरी भावी (कल्पित) परिणामावर दृष्टी ठेवून बंधुत्वाच्या नात्यानें आम्हीं त्यांस आलिंगन द्यावें आणि क्षमा नि शांति हे ब्रह्मगुण प्रकट करावे असे ते प्रतिपादन करीत असतात. **आजची स्थिति लक्षांत घेतां हा पक्ष आम्हांस किंचित्हि मान्य नाहीं.** (खंड १ पृ. २७५)

हीं अवतरणें लोकमान्य टिळकांच्या मनांत अंतःस्तलीं कोणत्या भूमिकेचें अधिष्ठान होतें हें कळण्यास पुरेसीं आहेत आणि त्यावरून वर जो दोन

अुत्सवांच्या मुळाशीं अमुक हेतू त्यांचा असावा म्हणून म्हटलें तेंच यथार्थ नि सरळ ठरतें हें वाचकांच्या लक्षांत येअील.

लोकमान्यांचेंच धोरण कसें यथार्थ नि अुपयुक्त होतें हें मुस्लिम धोरणाच्या स्वरूपाचें जें आविष्करण होत गेलें त्यावरून लक्षांत येअील. १८९६ या वर्षांचे आसपास हे अुत्सव चालूं करून हिंदूमध्यें नव्या नि स्पष्ट धोरणाचें सुकाणू राष्ट्रसूत्रधार लोकमान्यांचेद्वारा वळविलें गेलें त्याचें खरें महत्त्वमापन राजकारण क्षेत्रांत अंध बनलेल्या आम्हां सर्वसामान्यपणें वावरणाऱ्या हिंदूंच्या त्यावेळीं लक्षांत आलें नसलें तरी राजकारणपटु अिंग्लिश सत्ताधाऱ्यांना न कळणें अशक्य होतें. हिंदूंच्या हिंदू म्हणून होणाऱ्या प्रबलीकरणाकडे या चळवळींचा रोख आहे हें त्यांचे सहज लक्षांत आलें. नि त्यांचे महामेडन अॅंग्लो ओरिअेंटल संस्थेंतील हातमिळवणी करणारे अिंग्लिश सत्तापक्षाचे मित्र वा पूर्व बंगालचे गव्हर्नरांच्या (१९०५ चे सुमाराला) भाषेंत 'आवडती बायको मुसलमान' हिंदूंच्या या स्वसंरक्षणाच्या अक्षम्य अपराधा (?) साठीं त्यांना प्रायश्चित्त देण्यासाठींच जणूं कांहीं पुढें सरसावले. मुंबअी, सिन्नर, येवलें आदिक स्थानचे त्या वेळचे महाराष्ट्रांतील मुसलमानी दंग्याचे स्वरूपांत मुसलमानांनीं आपला रोष प्रकट केला. १९०५ या वर्षांपासून बंगाल फाळणीमुळें सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या असंतोषाचे काळीं बंगालमधील त्या आंदोलनाचे तीव्रतेमुळें ब्रिटिश सत्तापक्ष वेडावून गेला नि त्यांचे 'आवडते बायको'ला हें न पाहवल्यानें बंगालमध्येंहि त्यावेळीं मुसलमान दंग्याला प्रवृत्त होअून मोठमोठाले दंगे झाले. पण या गोष्टींची सूत्रेंही अंधारांतून नि पडद्यामागून चालविलीं जात होतीं तेव्हां त्यांविषयीं अधिक वाटाघाट करण्याच्या भरीस न पडतां मुसलमानांनीं स्वतंत्रपणें आपले प्रयत्न कसे चालूं केले हें पाहूं.

१८८८ मध्यें लार्ड डफरिनकडून हिंदुस्थानच्या कॉंग्रेसला मुसलमान क्वचित कां होअीना पण मिळण्याचा संभवहि अुरूं नये म्हणून वेगळेपणाचें प्रतिनिधित्व मान्य केलें हें मागें आलेंच आहे. अिंग्लिश राजकारणी लोक महाधूर्त. याप्रमाणें अनाहूतपणें आपणच जर मुसलमानांना न मागतां वाढवूं लागलो तर अुघडपणें पक्षपाताचा दोष जग आपणांला देअील या गोष्टीला भिअून लार्ड मिंटोनें १९०९ मध्यें ज्याला मौलाना महमदअल्लीनीं अेका वेळीं (कमांड

परफार्मनस) ' सांगीप्रमाणें कार्य ' असें म्हटलें होतें त्या मिंटोप्रेरित मुसलमानी शिष्टमंडळाला भेट देऊन " तुम्हींच मागण्या मागतां आहांत तेव्हां निरुपायानें मला तुमचें म्हणणें मान्य करावें लागत आहे " असा देखावा करीत मुसलमानांच्या 'मागण्या' मिंटोबावानीं मान्य केल्या. त्यांत सामाजिक, स्थानिक नि संख्याबलानुसार असलेले महत्त्वाचे मानानें मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळालें, विश्वविद्यालयांत त्यांचे प्रतिनिधी असावेत; प्रांतिक विधिमंडळांत त्यांना विशेष पद्धतीनें प्रतिनिधी निवडले जाण्याचा हक्क मिळावा, आणि कोठेंहि त्याचे परिणामकारी ठरणार नाहीं अितकें अल्पसंख्य प्रतिनिधित्व राहूं देऊं नये हा त्या मागण्यांतील निष्कर्ष होता. नि ' दानशूर ' मिंटो महाशयांनीं ' हलवायाच्या घरावर तुलसीपत्रा'चे न्यायानें हिंदूंचे हक्क मारून मुसलमानांच्या झोळींत तें दान घातलें.

असला हा सिद्धसाधकपणाचा जीवघेणा खेळ हिंदुस्थानांत महामेडन अंग्लो मैत्री खेळत असतां हिंदुस्थानच्या कल्याणाची फार कळकळ आम्हांला वाटते असा आपणां स्वतःवर सात्विक आरोप करून घेणाऱ्या अिंग्लिश सज्जनां (!) पैकीं सर विल्यम वेडरबर्न हे हिंदूमुसलमानांचें जें मनोमालिन्य आहे तें दूर होअून त्यांचें सख्य व्हावें म्हणून तळमळत (!) होते. १९१० या वर्षीं हिंदुस्थानचे कल्याण-साधनार्थ निर्माण झालेल्या कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनीं हिंदुस्थानवर राज्य करणाऱ्या अिंग्लंडमधल्या या वेडरबर्न महाशयांना कांग्रेसचे अध्यक्ष होण्यासाठीं निमंत्रण दिलें होतें नि त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या कळकळीनें आर्द्र होअून ते हिंदुस्थानांत धांवत आले नि कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. हें वर्ष १९१० होतें. त्यावेळीं सर्व हिंदुस्थान हा राष्ट्रीय चळवळीच्या आंदोलनानें आंदोलित झालेला होता. अिंग्लिश सत्तेनें अनेक राष्ट्रभक्तांना फांशीं नि काळ्यापाण्याच्या शिक्षा देण्याचा सपाटा लावला होता. भारतीय राष्ट्रीयपक्षांपैकीं गुप्त संस्थेच्या द्वारा राष्ट्रोद्धारार्थ भगीरथ प्रयत्न करणाऱ्या **अभिनवभारतानें**हि आपल्या राष्ट्रभक्तांवर आग पाखडणाऱ्या कांहीं अधिकाऱ्यांचे बळी घेण्याचा बॉंब नि मुख्यतः पिस्तुलें यांचेद्वारा अुपक्रम केला होता. यामुळें हिंदुस्थानांतलें नि अिंग्लंडमधलें वातावरण अत्यंत क्षुब्धतेनें तापून गेलेलें होतें. अशावेळीं अिंग्लिश गृहस्थांच्या मनांत हिंदुस्थानच्या कल्याणाचा अुमाळा येणें, तो पाहून त्यांच्या सत्पात्रतेचें जणूं पारितोषिकच

म्हणून कीं काय त्यांना हिंदुस्थानच्या कल्याणसाधनाची संधि देण्याची कल्पना तत्कालीन कॉंग्रेसनेत्यांना होणें, हिंदुस्थानच्या कल्याणार्थ हिंदुमुसलमान अेकी व्हावी अशी अिच्छा—मुसलमानांना या ना त्या प्रकारानें हिंदूकडून आपल्याकडे वळवून घेण्यांत प्रयत्नशील असलेल्या अिंग्लिश राष्ट्रांतील—अेका अिंग्लिश राष्ट्रिकाला होणें हे सगळेच आश्चर्यकारी देखावे. पण ते तसे घडून आले खरे. १९१० च्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं विराजमान झालेल्या सर विल्यम वेडरबर्ननीं हिंदुमुस्लिम अेक्यार्थ अेक मंडळ नेमलें नि त्या मंडळाला हिंदु-मुसलमान अैक्याचा मार्ग शोधून काढावयाला सांगितला.

या मंडळाचें अध्यक्षपद कोणाला अेकाला—हिंदूला वा मुसलमानाला—न देतां हिंदुमुस्लिम अेकीचे प्रतीक म्हणूनच कीं काय दरभंग्याचे महाराज नि नामदार आगाखान या संयुक्त अध्यक्षपदीयांकडे दिलें. या दोन व्यक्तीनीं अेक अध्यक्षपद मंडित केलें. हिंदुस्थान ही आश्चर्यभूमि म्हणतात. आणि अशीं दृश्यें पाहिलीं म्हणजे हा समज खराच कीं काय अशी शंका दृढावूं लागते. या संयुक्त अध्यक्षपदीय गृहस्थांचें अध्यक्षत्वाखालीं हे मंडळ अेकदांचें बसलें नि विचारविनिमय चालू व्हावयाचा तोंच त्या मंडळांतील अेका मुसलमान सदस्याकडून हिंदूंशीं मुसलमानांनीं अेकीला सिद्ध होण्यासाठीं पहिली अट म्हणून अेक मोल मागीतलें गेलें. तें मोल 'अुर्दू ही हिंदुस्थानची राष्ट्रभाषा म्हणून हिंदूंनीं मान्य करावी' म्हणजे मग पुढील बोलणें चालूं करावयाला बरें पडेल, या स्वरूपांत मागितलें. असें म्हणतात कीं ही स्फूर्ति त्या मुसलमानी सदस्याला नामदार आगाखानद्वारा झाली होती. या सूचनेला अध्यक्षीय स्वीकृति मिळाली म्हणजे मग पुढें त्या सूचनेचा विचार व्हावयाचा. पण ही सूचना गर्भांतच अुमळून पडली. संयुक्त अध्यक्षपदामधील दरभंग्याचे महाराज नि अितर हिंदू सदस्य हे कांहीं शेळी दुधानें मिळमिळीत मनाचे झालेले नव्हते. खंबीर मनाचे हिंदू होते. अत्यंत अन्याय्य, राष्ट्रीयदृष्टीनें अपमानकारी नि या राष्ट्राच्या खऱ्या राष्ट्रभाषेला मारक असलेली ही मागणी स्वच्छ शब्दांत नाकारली गेली आणि पुढील अेकीचें बोलणें संपलें. नामदार आगाखान 'सबसे चूप भली' चें धोरण स्वीकारून ते मोकळे झाले नि या हिंदु-मुसलमानांच्या अेकीविषयीं अत्यंत कळकळीनें (?) झालेल्या वेडरबर्नी प्रयत्नाला—

मुसलमानी भाषेंत सांगावयाचें म्हणजे—मूठमाती मिळाली. वेडरबर्न महाशयांना त्यांच्या या नक्राश्रूमिश्रित कळकळीच्या प्रयत्नाला मिळालेल्या अपयशामुळें काय वाटलें असेल बरें? बहुधा करमणुकीची गम्मत वाटली असावी! पण निश्चित असें काय नि कोणी सांगावें?

१९०९ मध्यें हिंदुस्थानची प्रक्षुब्धता दूर करण्याचे निमित्तानें विधि-मंडळांत कांहीं हक्क हिंदुस्थानला अधिक दिले गेले—सुधारणा झाल्या नि त्यांत मुसलमानांना अवास्तव अधिकार नि हक्क मिळाले. या गोष्टींचा हिंदुस्थानवर अिष्ट परिणाम घडला नाहीं. १९११ मध्यें लार्ड हार्डिंगच्या बादशाही मिरवणुकीवर हिंदुस्थानांतील धुमसती प्रक्षुब्धता बॉम्ब फेकती झाली. हिंदुमुसलमानांच्या अेकीच्या बेगडी प्रयत्नांना यश येणें शक्यच नव्हतें नि हिंदुमुसलमानांचे संबंध दुरावत गेले. हिंदुस्थानांतील अेकंदर वातावरण संशयानें, अनिश्चितनेतें, असंतोषानें भरून राहिलेलेंच होतें. अशा स्थितींत १९१४ या वर्षीं जर्मनीशीं युरोपांत महायुद्ध जुंपलें नि सर्व जग त्यामुळें हादरून गेलें. अिंग्लिश राष्ट्रावर त्यावेळीं आलेला प्रसंग सामान्य नव्हता. साम्राज्यसत्ता पणाला लावली गेली. त्याच समयाला लोकमान्य टिळक हे आपल्या दीर्घकालीन कारावासांतून मुक्त होअून घरीं आले. हिंदुस्थानचा नेता हिंदुस्थानला पुन्हां परत मिळाला. सर्वांचे डोळे त्यांचेकडे लागले. १९०७ मध्यें दुभंग झालेली कॉंग्रेस सांधून नि राष्ट्रीय कल्याणसाधनकार्यांत अडसर होअून आडवे पडलेले मुस्लीम पक्षाला वळवून घेअून या युद्धाच्या आणीबाणीच्या वेळीं जर अिंग्लिशां-पुढें सर्व राष्ट्राचे वतीनें संयुक्त मागणी पुढें ठेवली गेली तर ती अशा कठिण प्रसंगीं नाकारणें अिंग्लिशांना कठिण जाअील हें ओळखून लोकमान्यांनीं तें कार्य साधण्यासाठीं आपले प्रयत्न चालूं केले.

१९१६ मध्यें कॉंग्रेसचीं शकलें सांधून सर्व पक्षांची संयुक्त कॉंग्रेस लोकमान्यांच्या प्रयत्नांनीं पुन्हां बोलावणें त्यांना शक्य होअून लखनौमध्यें तें अधिवेशन भरलें. त्याचप्रमाणें मुसलमानांची संस्था जी मुस्लिमलीग तिच्याशीं हात मिळवणी करण्यासाठीं 'लखनौकरार' नांवानें सुप्रसिद्ध असलेली तडजोड त्यांनीं मुसलमानाशीं घडवून आणली. यासंबंधीं अधिक माहिती देण्यापूर्वी आत्तांच पहिल्यानेंच अुल्लेखलेल्या मुस्लीमलीग या संस्थेची थोडी माहिती येथें

देणें अवश्य आहे. मुस्लिमलीग संस्था ही १९०१ मध्यें स्थापन झाली. 'महामेडन्-ॲंग्लो ओरिऐंटल डिफेन्स असोसिअेशन' ही संस्था केवळ मुसलमानांची नव्हती यासाठी केवळ मुसलमानांचे म्हणून असलेले हितसंबंधांचा आपापसांत विचारविनियम नि चर्चा करावयास नि तदनुसार योजना आंखून त्याप्रमाणें पावलें टाकण्यास आपली स्वतंत्र संस्था पाहिजे असें समजूनच ही नवी संस्था अस्तित्वांत आली असावी. पण हिला अखिल भारतीय असें स्वरूप बराच वेळ आलें नाहीं. तसें तें स्वरूप १९०६ या वर्षीं—बंगालच्या फाळणीच्या निमित्तानें १९०५ पासून हिंदुस्थानव्यापी जें राष्ट्रीय आंदोलन अुत्पन्न झालें त्यानंतर अेकाच वर्षानें—डाका येथें डाक्याचे नबाबसाहेब यांचे घरीं सर्व मुसलमान प्रतिनिधींनीं यापूर्वीच जन्मलेल्या मुस्लिम लीगला अखिल भारतीय स्वरूप दिलें. आणि त्यावेळेपासून मुसलमानांनीं राजकारण क्षेत्रांत 'सर्वांची कॉंग्रेस' या संस्थेपासून अुघडपणें वेगळे होअून मुसलमानांचा सवतासुभा अस्तित्वांत आणला. जी गोष्ट गर्भांत वाढत होती ती यावेळीं जगापुढें प्रकटपणें अवतीर्ण झाली. १९१४ नध्यें जर्मनी, आस्ट्रिया, नि तुर्कस्थान या संयुक्त संघाशीं, अिंग्लंड फ्रान्स नि रशिया यांचें युद्ध जुंपलें. अिंग्लिशांचें साम्राज्य हिंदुस्थानवर प्रस्थापित झाल्यावेळेपासून अिंग्लिशांच्या या जगाचे डोळे दिपविणाऱ्या वैभवी सामर्थ्याविषयीं स्पर्धा बाळगून फ्रान्स, रशियादि राष्ट्रें जळफळत होतीं. नेपोलियनच्या नेतृत्वाखालीं फ्रान्सचें बल वाढत आहे नि तें तसें वाढूं दिलें तर अुद्यां ती सत्ता आपणांला आव्हान देअूं शकेल या भीतीनें अिंग्लंडनें दीर्घ काल युद्ध चालवून फ्रान्सला हतबल केला. रशियाशीं अशीच पेचापेची करून त्यालाहि दूर राखला. या स्पर्धेंत पुढें जर्मनीनेंहि पदार्पण केल्यानें जर्मनीचें सामर्थ्य अिंग्लिशांना भयद वाटूं लागलें आणि त्याच्या पोटीं १९१४ या वर्षी जर्मनमहायुद्ध चालूं झालें. नेपोलियनच्या वेळेपेक्षां हा जर्मनयुद्धाचा प्रसंग अिंग्लिशांना पुष्कळच अधिक जड गेला. आणि अमेरिका मध्यें न येती तर या युद्धांत जर्मनी कदाचित् विजयी ठरून अिंग्लिशांची शक्ति तुटली असती. अशा या संकटांत सांपडलेल्या कठिण प्रसंगीं त्यांना हिंदुस्थानचे साह्याची फार आवश्यकता वाटूं लागली. जगांत अडचणींच्या नि संकटांच्या वेळीं दुर्वृत्त मनुष्य वा राष्ट्र सुवृत्त बनण्याची वेळ असते. अिंग्लंड हिंदुस्थानला कधींहि सत्ताधारी होअूं देण्यास सिद्ध न होणें हें सहज समजण्याअितकें

ढळढळीत सत्य आहे. पण अिंग्लंड प्रसंगांत सांपडल्यामुळें साह्यार्थ हिंदुस्थानची याचना करतेवेळीं त्या साह्याचे विनिमयांत हिंदुस्थानचे हातीं राजसत्तेचा भाग देण्याला सिद्ध होणें अपरिहार्य ठरेल हें ओळखून लोकमान्य टिळकांनीं राष्ट्राचें म्हणणें म्हणून 'स्वराज्याचे हक्क द्या नि आम्हीं तुम्हांला साह्य देअून बरोबरीच्या नात्यानें नि स्नेही म्हणून युद्धांत भाग घ्यावयास सिद्ध आहोंत ' अशी अिंग्लिशं पक्षापुढें मागणी मांडली. यावेळीं सर्व 'राष्ट्राची अेकमुखी मागणी' रूपानें जर हें मागणें पुढें मांडतां आलें असतें तरच अिंग्लिशांचे हातीं गेलेली राज्यसत्ता पूर्ण नसली तरी बरेच अंशानें मिळणें शक्य झालें असतें ही गोष्ट निश्चित ओळखून ती मागणी अेकमुखी होण्यासाठीं मुसलमानांचें प्रतिनिधित्व आम्हीं करतों म्हणून हक्क सांगणाऱ्या मुस्लिम लीगशीं हातमिळवणी करण्याचा प्रयत्न लोकमान्यांनीं केला, नि तो प्रयत्न त्यावेळेपुरता तरी यशस्वी झाला. त्या करारांत ज्या ज्या प्रांतांत ते पुष्कळ अल्पसंख्य आहेत. तेथें त्यांना थोड्या अधिक प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळूं देण्याचें मान्य करून जेथें ते बहुसंख्य आहेत तेथें त्यांच्या बहुसंख्याक अवस्थेंत त्यांना हक्क सोडावयाला लावले नि याप्रकारें हिंदुस्थानांतील बहुसंख्य हिंदूवर अन्याय न होअूं देतां अल्पसंख्य मुसलमानांचें समाधान केल्याचें श्रेय या करारान्वयें मिळविलें. या घटावाला पुढें पुष्कळ चांगलें नि परिणामकारी स्वरूप आलें असतें. पणः—हिंदुस्थानच्या संबंधांत हा 'पण' अितका कांहीं भयंकरपणें हिंदूंच्या मार्गांत अुभा राहतो कीं त्या 'पणा'चा हिमालय अुल्लंघला जात नाहीं नि हिंदुराष्ट्रहित साधत नाहीं. वरील बनाव बनत असतांच हिंदुराष्ट्रहिताचे विरोधकांशीं सतत अनुकूल वर्तन करीत रहाणाऱ्या परधार्जिण्या गांधींचा अपशकून वाटेंत आडवा पडला. " अिंग्लिशांच्या अडचणीचा लाभ घेअून आपलें हितसाधन करून घेणें हें थोरपणाचें लक्षण नाहीं. हीनतेचा स्वार्थीपणा यांत आहे." अशा अर्थाच्या वल्गना करीत पुढें आलेला हा जणूं अिंग्लिश हातच अशी गांधी मूर्ति पुढें आली. स्वतः गुजराथभर हिंडून जर्मनाविरुद्ध अिंग्लिशांना साह्य करण्यासाठीं सैन्याची भरती करण्याकरतां हा अहिंसाभक्त (!) पुढें सरसावला. आणि त्यावेळीं अिंग्लिश हितार्थ म्हणून आजारी पडेपर्यंत परिश्रम घेत सैन्यांत भरती करण्याचें शतकृत्य केलें. त्याप्रसंगाचे वेळीं अहिंसाभक्तीचें प्रदर्शन करणाऱ्या या अहिंसाभक्ताला अिंग्लिशांना युद्धार्थ साह्य म्हणून

सैन्यभरती करतांना अहिंसाभंगाची खंती वाटली नाहीं. पूर्वी बोअर युद्धांतहि अिंग्लिशांना बोअरांविरुद्ध असेंच साह्य केल्याचें त्यांचे चरित्रांत अुल्लेखलेलें आहे. परक्यांना युद्धार्थ साह्य देण्यांत या जिवाला अहिंसाव्रत मोडल्याचें पातक दिसत नाहीं अथवा तें पातक केलें तरी त्यांत कांहीं दोष वाटत नाहीं असेंच म्हणावें लागतें. या नि अितर कांहीं कारणानें लोकमान्य टिळकांच्या योजनेला यावें तसें यश आलें नाहीं. नि तरीहि युद्ध संपतांच कांहीं राजकीय हक्क देणें अिंग्लिशांना भाग पडलें. त्यालाहि कारणें आहेत.

युद्ध चालूं असतांच क्रांतिप्रणेते ब्या. विनायकराव सावरकर यांचे पट्टशिष्य राष्ट्रभक्त लाल हरदयाळ नि अितर त्यांचे साह्यकारी क्रांतिकारक यांनीं जर्मनीच्या साह्याचे बळावर अिंग्लिशसत्तेविरुद्ध हिंदुस्थानांत अेक मोठी स्वराज्यस्थापनेची क्रांतिकारी अुठवणी करण्याचें कारस्थान रचलें नि अिंग्लिशांचे पोटांत भीतिचा गोळा अुठावा असें गंभीर स्वरूप त्याला आणलें होतें. हिंदुस्थानांतील कॉंग्रेसनें लोकमान्यांच्या साह्यानें मुसलमानांना मुस्लिमलीगद्वारा आपल्यांत समाविष्ट करून घेअून स्वराज्याची मागणी जोरानें पुढें मांडली. बाहेरून क्रांतिपक्ष जर्मनीच्या साह्यानें हिंदुस्थानांत रणधुमाळी माजविण्याला प्रवृत्त झालेला नि १९१७ पावेतों जर्मनी चढत्या वाढत्या प्रमाणांत विजयी होत चाललेला अशा या घटावानें ब्रिटिश राष्ट्र हादरलें. १९१७ला पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानला वसाहतींचें स्वराज्य देण्याची घोषणा करण्याला—अत्यंत अनिच्छेनें कां होअीना पण—अिंग्लिंडला भाग पडलें. परंतु पुढें परिस्थिति पालटली. क्रांतिकारी प्रयत्न यशस्वी होण्यांत विघ्नें आलीं, अिंग्लंडवरील प्राणसंकट टाळण्यासाठीं अमेरिका पुढें सरसावली नि त्यामुळें अिंग्लिशांवरील भय पुष्कळ कमी झालें, कॉंग्रेसच्या नि राष्ट्राच्या नांवानें लोकमान्य टिळकांनीं पुढें मांडलेल्या स्वराज्याच्या मागणीला अेकमुखीपणा जो दिसत होता त्याला गांधीनें बिब्बा घातला—विनाअट (शर्त) सहाय्य ब्रिटिशांना देण्याचें अुद्घोषिलें—आणि तरीहि हिंदुस्थानला सुधारणांचा हप्ता देणें अिंग्लिशांना भाग पडलें.

कठिण समयाला वचनें देअून वेळ निभावून नेण्यांत नि वेळ निभावतांच दिलेल्या वचनाचा अर्थ हवा तसा लावून त्या वचनदानाच्या बंधनांतून वचनभंगाचें पातक जणू कांहीं लागूं शकणार नाहीं अशा प्रकारें सुटका करून

घेण्यांत अिंग्लिश प्राण्याइतका दुसरा कोणी कचितच प्रवीण असलेला सांपडेल. स्वराज्याचा हक्क म्हणून केलेल्या घोषणेवर राष्ट्रानें " अपुरी, असमाधानकारक नि निराशाजनक " म्हणून आपली मुद्रा ठोकली आणि तरीहि त्या राववूनच घ्या—रुसून कोपऱ्यांत बसूं नका. हाच दंडक लोकमान्यांनीं सांगितला. जर्मनीच्या बाजूला तुर्कस्थान गेला होता. त्याचवेळीं प्यानइस्लामी चळवळीला मुस्लिम देशांतून जोर चढूं लागला होता. तुर्कीच्या सुलतानानें—जो मुस्लिम जगताचा खलीफा म्हणजे धर्मविषयक नि राजकारणाचा अेकमेव नेता म्हणून मुसलमानांकडून मानला जात असे त्या सुलतानानें—अिंग्लिशांविरुद्ध 'जिहाद' (धर्मयुद्ध) पुकारलें. खलिफानें अशी जिहाद पुकारली म्हणजे त्यांच्या धर्ममताप्रमाणें प्रत्येक मुसलमानानें त्या युद्धांत आपल्यापरीनें भाग घेतलाच पाहिजे असें बंधन आहे. अशी ती जिहाद पुकारल्यामुळें हिंदुस्थानांतील अिंग्रजांची 'लाडकी बायको'—मुसलमान—बिथरेल कीं काय अशी भीति अिंग्रजांना पडली नि म्हणून अिंग्लिशांनीं सात्विकपणाचा आव आणीत असें प्रसिद्धिलें कीं सुलतानाचें आम्ही पूर्वपार स्नेही होतो नि अद्यापहि आहोंत. पण तुर्कस्थाननें अिकडे लक्ष न देतां आम्हांविरुद्ध युद्ध पुकारलें आहे तेव्हां त्या युद्धाला आम्हांला तोंड दिलेंच पाहिजे. पण म्हणून सुलतानाचे अहित आम्हीं अिच्छित नाहीं. त्यांच्याविषयीं आम्हांला आदरच आहे. त्यांची आम्ही कांहीं हानि करणार नाहीं—तसा अुद्देशहि नाहीं. निरुपद्रवी नि निरपराधी स्वतः असल्याचें प्रतिपादून हिंदुस्थानांतील मुसलमानांना आपणांविरुद्ध क्षुब्ध होअूं दिलें नाहीं. आणि सत्तेच्या बलावर मुसलमानी सैन्य नेअून मेसापोटेमिया आदिक प्रदेशी तुर्कांशीं लढविलें. अिकडे हा सात्विक निरुपद्रवीपणाचा आव आणीत असतांच तुर्कांच्या—मुसलमानांच्या—खलिफाची राजधानी कान्स्टांटिनोपल नि असेच कांहीं प्रदेश यांची लाच देण्याचें मान्य करून जर्मनीविरुद्ध आपल्या वतीनें रशियाला लढण्याला सिद्ध केला. अरबस्थानादिक देश—तुर्कांच्या राज्यांत मोडत होते. त्या देशांच्या पारतंत्र्याविषयीं नक्राश्रू गाळणाऱ्या अिंग्लिशांनीं तुम्हांस तुर्कांच्या पारतंत्र्यांतून निघण्याची हीच संधि आहे. आम्हीं साह्य करतों. तुम्ही तुर्कांशी लढा. युद्ध संपतांच तुमचें स्वातंत्र्य तुम्हांला मिळेल असें आमिष दाखवीत अरबादिकांना तुर्कांच्या विरुद्ध लढविलें. पुढें युद्ध संपतांच हिंदुस्थानांतल्या मुसलमानांना अभिवचन दिल्याप्रमाणें तुर्कस्थान स्वतंत्र ठेवण्याचें चिन्ह दिसेना. खलिफाचें

राज्यपद वायुमंडलांत तरंगूं लागलें. आणि अरबादिक देशांचीं स्वातंत्र्येंहि वाफेप्रमाणें नाहींशीं होतातसें दिसलें. अिब्नसौदच्या करारी स्वभावानें नि कर्तृत्वानें अरबस्थानांतील कांहीं भाग स्वतंत्र राहूं शकला; बाकी तुर्कांचें सर्व राज्य फ्रान्स नि अिंग्लंड या भुभुक्षितांनीं आपल्या अुदरांत गडप केलें हें पाहतांच सगळ्या जगतांतील मुसलमानांचें धावें दणाणलें. हिंदुस्थानांतील मुसलमान पुढारी ज्या अेका मुस्लिम केंद्रावर अवलंबून वायुमंडळांतील फुसके किल्ले प्यान अिस्लामीवृत्तीनें बांधूं पहात होते त्यांची ती मनोराज्यें चूर होतातसीं पाहून ते संतापानें वेडे झाले. नि अिंग्लिशाविरुद्ध खिलाफतीसाठीं मोठें आंदोलन अुभारून अिंग्लिशांवर शह बसवीत खिफाफत वाचवावी म्हणून विचार करूं लागले. पण हिंदुस्थानांत प्रभावी आंदोलन अुभारावयाचें तर हिंदूंचे साह्यावांचून कांहींहि होणें शक्य नव्हतें. ब्रिटिशांविरुद्ध लढा चालवून स्वराज्य मिळवावें म्हणून हिंदू तर सारखी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होतेच, तेव्हां अर्थातच अिंग्लिशांना शह देण्याची गोष्ट त्यांचे पथ्यावरच होती. ते निश्चित आपल्याला मिळतील हें ओळखून मुसलमानांनीं हिंदूंना आपल्या खिलाफती स्वार्थसाधनार्थ 'भाअी' म्हणून पुकारीत खिलाफतकारणी मित्रत्वाची आरोळी ठोकली. त्या वेळीं लोकमान्य टिळक अद्याप विद्यमान् होते. पण त्याचवेळीं गांधींचा धूमकेतूप्रमाणें राजकारण क्षेत्रांत प्रवेश झालेला होता. त्यांनीं खिलाफतीचें विकत श्राद्ध घ्यावयाचें मनांत आणलें. अर्से म्हणतात कीं या संबंधांत लोकमान्य टिळकांचे नि गांधींचे विचारविनिमयांत लोकमान्यांनीं हें खिलाफती विकत श्राद्ध न घेतां हिंदुस्थानच्या स्वराज्यार्थ मुसलमानांना प्रवृत्त करून तद्द्वारा मग खिलाफत सुरक्षित राखण्याचा वा करण्याचा प्रयत्न करतां येअील अर्से पटवून द्यावें नि हिंदु मुसलमान मिळून अिंग्लिशांविरुद्ध आंदोलन माजवावें अर्से सुचविलें होतें. पण गांधीपणाला हें कर्से पटणार. त्याचा खाक्या वेगळाच. त्यांनीं खिलाफतीसाठीं मुसलमानांना साह्य करून त्यांना आपले करून घ्यावे म्हणजे कृतज्ञतेनें मागाहून स्वराज्य प्रयत्नांत आपणांस साह्य करतीलच असा युक्तिवादाचा देखावा करून तदनुसार ते प्रयत्नाला लागले. ही वेडी लहर यशस्वी झाली नसती, पण हिंदूंच्या नि हिंदू राष्ट्राच्या दुर्दैवानें महा-राष्ट्रधुरंधर लोकमान्य मृत्युवश झाले नि गाधींना रान मोकळें सांपडलें. हिंदुस्थानांत अितर हिंदू पुढारी नव्हते अर्से नाहीं. पण सर्व राष्ट्राचें अेकमेव पुढारीपण घेअून ते

दायित्वानें पार पाडण्यास समर्थ असा नेता राष्ट्राला योग्यमार्गाला नेण्यास हवा असतो. तसा नेता दिवंगत झाला. नि तें महान दायित्व घेण्याची असामान्य शक्ति असलेला हिंदुपुढारी कोणी न अुरल्यामुळें गांधींच्या गोंधळानें देशाचें तारूं भरकटत जाअील हें दिसत असूनसुद्धां त्या वेडाला विरोध करण्याचें नि राष्ट्राच्या राजकारणाचीं सूत्रें गांधींच्या हातीं न जाअूं देण्याचें धाडस कोणीं करूं शकलें नाहीं. हें कसें तें पुढें आपण पाहूंच.

खलिफाला अफगाणच्या अमीर हबीबुल्लाखानानें साह्य दिलें नाहीं नि अिंग्लिशांशींच मैत्री राखून त्यांचा मिंधा राहिला म्हणून अफगाणजनता क्षुब्ध झाली होती. या मुख्य नि अितर गौण कारणामुळें हबीबुल्लाखानाला अेका मारेकऱ्याकरवीं कोणीतरी कंठस्नान घातलें. अमीर प्राणास मुकला नि महत्वाकांक्षी नि तरुण अफगाण पक्षाचा पुरस्कर्ता अमनुल्लाखान राज्यपदावर आला. हें राज्यपद वडील भाअू नि चुलता यांचे राज्यपदावरील हक्क अुडवूनच त्यानें घेतलेलें होतें. असा हा तरुण, महत्वाकांक्षी नि कर्ता अमनुल्ला राज्यपदीं येतांच ब्रिटिशांविरुद्ध जाण्याचें त्यानें मनांत आणलें. काबूलचा अमीर नांवानें जरी स्वतंत्र म्हणून म्हटला जात होता तरी परदेशीय राजकारणांत तो स्वतंत्र नव्हता. अमीर अमनुल्लानें पूर्ण स्वातंत्र्य अुद्घोषित् केलें नि अपमानित ब्रिटिश सिंहाचा पंजा विस्फारला गेलाच तर वा आपण होअूनहि त्याला चांगला फटका लगावावा असें ठरवून त्याप्रमाणें त्याचे परीनें त्यानें सिद्धता चालविली. हा निश्चय ठरवण्यास त्याला प्रोत्साहक अशी महत्त्वाची अेक गोष्ट घडलेली होती. ती ही कीं युद्ध संपतांच जणू युद्धांत दिलेल्या साह्याचे विनिमयांत कीं काय कोणास ठाअूक, रावलात–अॅक्टनामक अेक नवा निर्बंध–हिंदुस्थानांतील स्वातंत्र्यार्थ प्रयत्नांना दाबून टाकण्यासाठीं अेक अति अन्यायी निर्बंध–हिंदुस्थान सरकारनें केला नि पंजाबमध्यें जालियनवाला बागेंत हिंदुस्थानवासीयांची ओडवायरच्या संमतीनें डायर नामक सैनिक अधिकाऱ्यानें लांडगेतोड केली. चारी बाजूंनीं कोंडून त्यांचेवर मशीनगनचा मारा केला त्यामुळें हिंदुस्थानांत असंतोषाची प्रचंड लाट घुमूं लागली नि त्यांतच खलिफाच्या निमित्तानें मुस्लिम जनता बिथरून खिलाफतीचे आंदोलनानें त्या लाटेला वादळाचें स्वरूप आणलें. गांधींनें या खिलाफतीचें विकत श्राद्ध घेअून हिंदुस्थानला सव्यापसव करविण्याचा अुपद्व्याप आरंभिला. त्या आंदोलनाला अहिंसात्मक असहकाराचें

स्वरूप जरी दिलें गेलें होतें तरी मुख्यतः मुसलमान पुढाऱ्यांनीं काबुली अमीराच्या साह्यानें अिंग्लिशाशीं लढा लढण्याचें ठरविलें. या वेळीं मुलमानांनीं अमनुल्लाशीं बाधलेलें संधान पूर्णपणें गांधीला माहित होतें असें म्हणावयास भरपुर पुरावा नाहीं. तरीपण त्यासंबंधीं गांधींना माहिती निश्चित असली पाहिजे. नाहीं तर पुढें पुन्हा १९२१ या वर्षीं अमनुल्लाखानाचे वळावर पुन्हां अेक डाव गांधी–मुसलमानांनीं रचला होता त्याचा ग्रंथ चांगला लागत नाहीं. नि जाणत्या केंद्रांत ती माहिती गांधींना होती हें ठाअूक आहे. या १९१९ च्या वेळीं हिंदुस्थानांतून मुसलमानांकरवीं जीं पत्रें अमनुल्लाखानाला गेली त्यांतील लिखाण खालीलप्रमाणें आहे. हिंदुस्थानांतील असंतोषाच्या परमावधीची माहिती मुसलमानांनीं अमनुल्लाला दिली होतीच. पत्रांत "तुम्हीं याच वेळीं हिंदुस्थानवर स्वारी करा–द्रव्य आणि मनुष्यें देअून आम्हीं तुम्हांस साह्य करूं–लोक सर्वच बिथरले आहेत. **दिल्लीच्या सिंहासनावर तुम्हीं कधीं बसाल आणि आम्हीं तुम्हांस पांच कुर्निसात नि सात सलाम केव्हां करूं असें झालें आहे.**" (बादशहाच्या तक्तापुढें करावयाचा हा विधि आहे.) अशा अर्थाचीं लिखाणें होती. अमनुल्ला हा असल्या पत्रावरच केवळ भरवसा ठेवून बसणारा नव्हता. त्यानेंहि गुप्तहेरांकरवीं शोध काढले, पुढाऱ्यांच्या (पंडित मालवीयादि हिंदु पुढाऱ्यांसुद्धां) गांठी घेवविल्या, सैन्याविषयीं माहिती काढली. त्यावेळीं सर्व परिस्थिति पूर्ण अनुकूल नव्हती, असें त्याला दिसून आलें, पण निराळेंच निमित्त होअून पुढें प्रबल बनणाऱ्या अमीराला आधीच जखडावा म्हणून अिंग्लिशांनींच युद्धाला तोंड फोडलें. युद्ध म्हणण्यापेक्षां ५ दिवसांची चकमक अुडाली. अफगाणि अमीराला संधि करण्याची विनंति करणें भाग पडलें. पण त्या वाटाघाटींत अमनुल्लानें आत्मसन्मान न बिघडूं देतां तो संधि अफगाणिस्थानला अनुकूल असाच करून घेतला. अिंग्लंडच्या अितिहासांत पराजित राष्ट्राशीं संधि करते वेळीं त्या पराजित राष्ट्रालाच अनुकूल असा संधि केल्याचें अेकहि अुदाहरण आतांपर्यंत घडलें नाहीं. अफगाणच्या अमीराशीं मात्र जो संधि झाला तो त्याला सर्वस्वी अनुकूल असा झाला. त्याचें पूर्ण स्वातंत्र्य मान्य केलें गेलें हा त्यांतील प्रमुख विशेष होय. असें कां झालें हें स्थलाभावामुळें सर्व देणें शक्य नाहीं. पण येवढें येथें सांगितलें म्हणजे पुरे कीं

रशियाची सहानुभूति नि मैत्री अमनुल्लांनीं संपादन करून आपलें पारडें जड करून घेतलें होतें नि हिंदुस्थानांत खिलाफतच्या निमित्तानें हिंदुस्थानभर असंतोषाचे लाटेनें वादळाचें स्वरूप धारण केलें होतें या दोन गोष्टी प्रमुख होत, कीं ज्यामुळें अमीराच्या अिच्छानुसार संधि त्यांना मान्य करावा लागला.

हा संधि तात्पुरता युद्ध थांबविण्यापुरता झाला. या कच्च्या संधिपत्रावर स्वाक्षऱ्या दिनांक ८ आगस्ट १९१९ मध्यें होऊन सहा महिन्यांनें पक्क्या संधीसाठीं पुन्हां दोन्ही पक्षाचे प्रतिनिधी अेकत्र येणार होते. त्याप्रमाणें पुढें पक्क्या संधीची भाषा चालूं झाली पण कालहरणांत दिवस घालविले जाअूं लागले. त्यांत कांहीं दिवसांनीं हिंदुस्थानांतील असंतोष येनकेन प्रकारानें आपण शमवूं, आपणांला भरपूर वेळ मिळेल, तोंपर्यंत महत्त्वाकांक्षी अमीराची स्थिति बिघडवून ठेवतां येअील नि मग पुन्हां या ना त्याप्रकारें संधि उधळून देअून अमीराच्या अुद्दंडतेचें त्याला प्रायश्चित देअूं अशी आशा ब्रिटिशांना वाटत असावी. अमीरहि कांहीं कच्चा नव्हता. त्यानें मध्यंतरी रशियाच्या औपचारिक मैत्रीला खऱ्याखुऱ्या मित्र राष्ट्राच्या मैत्रीचें स्वरूप दिलें. रशियाशीं संधि झाला. त्यांत महत्त्वाच्या अटी म्हणजे, २ काबूल नि रशिया यांनीं राजकीय वा सैनिक करार (अेकमेकांचे संबंधांत) तिसऱ्या कोणाशीं करार करावयाचा नाहीं. १० अफगाणिस्थानास लागणारी आर्थिक नि अितर साह्य देण्याचें रशियानें अंगिकारलें. (या अटींत फारच मोठा अर्थ भरलेला आहे हें वाचकांचे ध्यानांत येअीलच). अितरहि अमीराच्या लाभाच्या गोष्टी त्यांत ठरलेल्या होत्या. हा संधि होतांच अिंग्लिशांचें धाबें दणाणलें नि फार काळ लांबणीवर टाकलेला नि कांहीं हेतूंनीं केला जाअूं नये म्हणून ठरवलेला संधि अिंग्लिशांना अमीराशीं चुंबत करावा लागला. कारण या रशियाच्या स्नेहामुळें बळावणारा अमीर हिंदुस्थानच्या राशीस येण्याचा बराच संभव १९२१ मध्यें अुत्पन्न झाला होता. हा रशियाचा संधि २८ फेब्रुवारी १९२१ मध्यें झाला. नि अिंग्लिश संधि २२ नोव्हेंबर १९२१ ला झाला. या घटनांशीं हिंदुस्थानचा फार निकटचा संबंध असल्यामुळें ही माहिती दिली आहे. कसा हें आपण आतां पाहूंच.

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानचें राजकारण क्षेत्र गांधींना मोकळें कुरण म्हणून जणूं कांहीं आंदण मिळालें. आणि या लो. टिळकांचें

मृत्यूच्या दुर्दैवी घटनेनंतर कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्यें अेकूनअेक हिंदू पुढारी विरुद्ध असतांहि केवळ मुसलमानांच्या भाडोत्री मताधिक्याचे बळावर खिलाफतीची आपत्ति गांधीनें हिंदुस्थानच्या डोक्यावर लादली. हिंदू विरुद्ध जात आहेत, कॉंग्रेसमध्यें खिलाफतीचें वारें संचरविल्यावांचून आपले हेतू पूर्ण होणार नाहींत हें ओळखून कॉंग्रेसकरवीं खिलाफत आंदोलनाची स्वीकृति घेण्यासाठीं कॉंग्रेसमध्यें केवळ पैशांच्या भाडोत्री अुपायांनीं मुसलमानांची दिखाअू प्रतिनिधी संख्या खूप वाढविली नि त्यामुळें अधिक संख्याक प्रतिनिधीला आपल्या बाजूचे झाल्याचा देखावा अुत्पन्न करून कॉंग्रेसद्वारा खिलाफत आंदोलन, राष्ट्रीय आंदोलनाच्या रूपांत गांधींच्या साह्यानें मुसलमानांनीं मान्य करवून घेतलें. हिंदुस्थानला हा अेक शापच ठरला. खिल याचा अर्थ संस्कृतमध्यें सर्व असा होतो आणि आपत्ति या शब्दाचें आपत हें ग्रामीण रूप आहे तेव्हां अगदीं खऱ्याच अर्थानें ही खिलाफत म्हणजे संपूर्ण वा सर्व आपत्तीच हिंदुस्थाननें आपणांवर लादून घेतली. १९२१ च्या कॉंग्रेसमध्यें 'अेक वर्षांत स्वराज्यां'ची आरोळी ठोकून अनत्याचारी असहकाराचें आंदोलन गांधीनें चालूं केलें. अनत्याचार अर्थात् अहिंसा हें गांधींचें सोंगच होतें. कारण ही अेक वर्षांत स्वराज्याची आरोळी मारून खरोखरीच अनत्याचारी असहकारानें स्वराज्य निश्चित मिळेल हें खरें मानणारा अेक तर वेडापीर अथवा अट्टल ढोंगी असला पाहिजे. कॉंग्रेसमध्यें बुद्धिच नाहीं! सर्व वेडेपीर आहेत नि होते, असें कोणींच म्हणूं शकणार नाहीं. आणि असें असून वर्षांत स्वराज्य निश्चित मिळेल ही भावना त्यावेळीं या मंडळींत वावरत होती याला त्या मागें तसेंच विशेष प्रबल कारण असलेंच पाहिजे हें थोडा विचार करतां शाळेंतलें लहानसें पोरगेंहि समजूं शकेल. या अेक वर्षांत स्वराज्याच्या मागें बाह्याकारी पुढें केलेल्या निरुपद्रवी अहिंसेच्या आश्रयानें केलेला असहकारच केवळ साधन म्हणून होता हें खोटें आहे. त्यामागें फार मोठें कारस्थान होतें. काबूलच्या अमीराला पूर्वीच मुसलमानांनीं हिंदुस्थानवर राज्य करण्याला आमंत्रित केलें होतें हें मागें अुल्लखलेलें आहेच. रशियाशीं पक्का संधि करून रशिया साह्यकर्ता मित्र ठरल्यावर अमनुल्लाचें साहस वाढलें. हिंदुस्थानांतील खिलाफतीची चळवळ शमण्याचे स्थलीं तिनें वावटळीचें वा वादळाचें स्वरूप धारण केलेलें दिसलें, रशियाचे साह्याची हमी मिळाली, हिंदुस्थानांतील त्यावेळीं कॉंग्रेसचा अेकमेव कर्ताधर्ता बनवलेला नेता गांधी अनुकूल, गांधीप्रमाणेंच

नेहरू पितापुत्र नि त्यांचेचप्रमाणें आणखी कांहीं दुय्यम हिंदू पुढारी गांधींच्या हाताला हात लावून अमनुल्लाचें बादशाही पद स्वीकारावयाला सिद्ध, भारतीय मुसलमान सर्वस्वीं अनुकूल होऊन हवे तें साह्य करावयास उत्सुक, अशा थाटांत सर्व सामग्री जमल्यावर मग अमनुल्लाला धीर कां न यावा ? सरतेपर्दी अमनुल्ला आपल्या साह्याद्वारा हिंदुस्थानांत बादशहा बनण्यास येणार असें मुसलमानांना कां वाटूं नये ? सैन्य नि पोलिसांना 'आयत्या वेळेवर सरकारी पक्षाकडून निघून कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं या' म्हणून अल्लीबंधूंनी उपदेश द्यावयाला आरंभ केला, गांधींनी सैतानी इंग्लिश सरकारला साह्य न करतां अमनुल्लाला साह्य करीन म्हणून उघड प्रतिपादलें, मुसलमानांत (धर्मयुद्धाचें) जिहादचें वारें भरण्याचे नेटाचे प्रयत्न चालूं झाले, अमीराच्या हस्तकांशीं गुजगोष्टी होऊं लागल्या नि या दिशेनें सर्व वारे वाहूं लागलें. पण गांधींनींच यंग इंडियामध्यें लिहिल्याप्रमाणें सैन्यामध्यें नि पोलिसांमध्यें सरकारशीं फटकून वेगळे होण्याचें वारें भरलेलें नव्हतें, पंजाबसिंह लाला लजपतराय, महामना पं. मालवीय, धर्मवीर डॉ. मुंजे, महाराष्ट्रीयगटाचे अध्वर्यु दे. भ. तात्याराव केळकर, देशभक्त नि मागाहून लोकनायक ठरलेले बापूजी अणे, सर शंकरन् नायर, इतर प्रांतांतील हिंदु पुढारी, बंगालचे देशबंधु दास इत्यादि लोकनेतृवर्ग या घरघालू कटाला पूर्ण विरोधक, सर्वसामान्य हिंदुवर्ग आंधळेपणीं जरी गांधींच्या मागें लागलेला होता तरी अमनुल्लाच्या आगमनाबरोबर निश्चिततेनें त्या आपत्तीशीं तोंड द्यावयाला उभा ठाकणारा, त्यांतहि अल्लीबंधु पकडले गेले, सर्व कटाचें अंतःस्वरूप ब्रिटिशांना कळून ते तद्विरुद्ध सिद्धतेंत असलेले, इत्यादि गोष्टी पाहून अमीर अमनुल्लानें अंतिमसंधिपत्रावर स्वाक्षरी करावयाचें ठराविलें. स्वाक्षरी संधिपत्रावर होऊं नये, हिंदुस्थानांत आशादायक परिस्थिति आहे अशा अर्थाची गांधींची तार अमनुल्लाला जरी युक्तिप्रयुक्तीनें धाडण्यांत आली तरी पण धूर्त अमनुल्लानें अधिक खोलांत शिरून मिळालेलेंहि गमावूं नये म्हणून संधिपत्रावर स्वाक्षरी केली आणि ज्या अमनुल्लाचे बळावर वर्षांत स्वराज्याचा डोलारा उभारावयाचा गांधी–अल्लीबंधू प्रमुख मुसलमानादिकांचा मनोदय होता तो मनोदयच ठरून वायुमंडळांत विरून गेला. अर्थात् हा उलटता डाव पाहून असहकाराची लाट उसळून द्यावयाचा हरीगणेशा बारडोलीला गांधींनी वळवावायचा म्हणून नेम केला

होता, तो मागें वेऊन गांधींनीं आपले हात आवरते घेतले. हा दिलेला विहंगम दृष्टीचा वृत्तांत ज्याला पुराव्यांसह बघावयाचा असेल त्यांनीं 'न्याशनालिस्ट' या नांवानें संपादिलेलें नि श्री. रघुनाथपंत घाणेकर यांनीं पुण्यास प्रसिद्धिलेलें 'गांधी मुस्लिम कान्स्पिरसी' हें पुस्तक अवश्य वाचावें. तेथें वाचकांना भरपूर कागदोपत्रीं पुरावे निश्चिति पटवून घेण्यास मिळतील.

राष्ट्र म्हटलें म्हणजे त्या राष्ट्राचेच राष्ट्रिक त्यांत असतील नि अितर परकीय स्वरूपाचे पण अल्पसंख्य असलेले त्यांत मुळींच असणार नाहींत असें अेकहि सांपडणार नाहीं. प्रत्येक राष्ट्रांत अल्पसंख्य हे असावयाचेच. त्यांना त्यांच्या धर्म–संस्कृति–भाषाविषयक अंतर्गत गोष्टीपुरतें संरक्षण देअून त्यांनीं राष्ट्रीय क्षेत्रांत सर्व गोष्टी राष्ट्रीयच स्वीकारून गुण्यागोविंदानें नि राष्ट्रिकाशीं केवळ अविरोधी वृत्तीनेंच नव्हे तर अेक प्रकारें बंधुभावनेनें युक्त होअून वागावयाचे असाच दंडक जगांत होता, आहे नि राहील. गेल्या महायुद्धानंतर सर्व राष्ट्रांतील राजकारणी प्रतिनिधी लोक अेकत्र जमून त्यांनीं बाकी गोष्टींत जरी भल्याबुऱ्या गोष्टी केल्या असल्या तरी बहुसंख्य–अल्पसंख्य प्रश्नासंबंधीं सर्व जगांत चालूं असलेल्या अलिखित नियमालाच जरा अधिक विस्तारानें लिपिबद्ध करून टाकला. पण त्यांत त्यांनीं नवीन असें कांहीं केलें नसून जागतिक रूढ न्यायाला जागतिक संमतीची अधिकृत मुद्रा ठोकली. हिंदुस्थानांतसुद्धां हा अलिखित न्याय–अितिहासाला माहीत असलेल्या अलीकडच्या काळांत हा नियम–अवलंबल्याचीं दोन सुप्रसिद्ध अुदाहरणें आहेत. अेक पारश्यांचें नि दुसरें यहुदी यांचें. पारश्यांना आपल्या स्वदेशांत–अिराणांत–आपला धर्म, संस्कृति, भाषा आदिक संभाळतां न येअून त्यांचें राष्ट्र मुस्लिम आक्रमणाच्या अत्याचारी वणव्यांत सांपडून भस्म होण्याची वेळ आली तेव्हां त्यांतून कांहीं धर्मवीरांनीं आपला पुरातनकालापासून पूजित केलेला पवित्र अग्नि घेअून आपल्या धर्मग्रंथासह आश्रयार्थ हिंदुस्थानाकडे धाव घेतली नि त्या आश्रयदान मागणाऱ्या पारसिकांना या दयामय हिंदुराष्ट्रानें अुदार बुद्धीनें आश्रय दिला. त्यांना आपापसांतील संस्कृति, धर्म आदिक पालनाची स्वतंत्रता नि निर्भयता देअून राष्ट्रीय क्षेत्रांत भारतीय होण्यास सुचविलें नि ते न्याय्य म्हणणें स्वीकारून पारशी आज बारातेरा शतकें येथें गुण्यागोविंदानें भरभराटींत नांदत आहेत. यहुद्यांची तीच गोष्ट. तेव्हां अल्पसंख्याकांची समस्या सोडवण्याचीं

गोष्ट हिंदुस्थानला नवीन नाहीं. हिंदुस्थानमध्यें ज्याप्रमाणें यहुदी, पारशी, खिस्ती आदिक अल्पसंख्यांक आहेत त्याचप्रमाणें मुसलमानही अल्पसंख्याक आहेत. नि त्यांनाहि पूर्वापार वहिवाटीप्रमाणें नि तदनुसार (लीग आफ नेशन) राष्ट्रसंघानें लिपिबद्ध केलेल्या 'जागतिकन्याया' ("Law of the world") प्रमाणें हिंदुस्थान वागविण्याला स्वाभाविकपणेंच सिद्ध आहे ही गोष्ट मुसलमान पूर्णपणें जाणतात. पण त्यांना अल्पसंख्याक म्हणून रहाण्याची त्यांची मनची अिच्छा नसून हिंदुस्थानवर त्यांना आपलें वर्चस्व स्थापावयाचें आहे. आणि त्याहि पुढें जाअून दीर्घ प्रयत्नानें हिंदुस्थानचें हिंदुस्थानपणच त्यांना नाहींसें करावयाचें आहे. या त्यांच्या अंतस्थ हेतूप्रमाणें त्याचें वर्तन कसें आहे, आपसांत त्या संबंधीं कसे संकेत ठरलेले आहेत, त्याच हेतूचें दिग्दर्शन प्रसंगोपात त्यांच्या नेत्यांकडून कसें झालेलें आहे, या हेतूला अनुसरूनच मुसलमान कसकसे प्रयत्न करीत आहेत अित्यादि गोष्टी हिंदुराष्ट्रिकांना पुराव्यांसह पूर्णपणें. कळण्यासाठीं त्याविषयींची अत्यंत आवश्यक तेवढी माहिती. आपणांला यापुढें पहावयाची आहे. ती क्रमाक्रमानें पाहूं.

मुसलमानी प्रयत्नाचें स्वरूपाविष्करण

मुसलमान, मग तो कोणत्याहि पक्षाचा, वा त्यांच्या आपसांतील कोणत्याहि भेदाविभेदाचा (शिया, सुनी, अहमदिया, आगाखानी आदिक) असो, आपसांतील त्यांची मतभेदांची चुरस कितीहि तीव्र असो, मुसलमानेतरांविरुद्ध हिंदुस्थानांत विशेषतः 'हिंदुविरुद्ध मुसलमान' म्हणून सर्वजण अेक होतात—हा अेक त्यांचा विशेष आहे. ही गोष्ट हिंदूंच्या ध्यानांत येत नाहीं नि म्हणून त्याविषयीं अेक प्रबल पुरावा येथें देणें अवश्य वाटतें. १९२९ या वर्षीं कलकत्त्याला काँग्रेस अधिवेशन भरलें होतें. त्यावेळीं तेथें जमलेल्या हिंदुस्थानमधील सर्व मुसलमान पुढाऱ्यांची अेक गुप्त बैठक झाली. त्या सभेचें प्रतिवृत्त (Report) त्यांत पाठविलेल्या मुसलमानवेषधारी स्वयंसेवकाकरवीं मिळालें होतें नि १०।१२ वर्षांपूर्वी 'Eye opener' या नांवानें प्रसिद्ध झालें होतें. त्यांत बंगालमधून हिंदूंचें निर्मूलन कसें करावें याचा विशेषत्वानें अूहापोह होता. पण हिंदुस्थानच्या अितर प्रांतांत त्याच धोरणाचें अवलंबन झालेलें आहे हें त्यांच्या निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या नि कार्यकर्त्यांच्या अुक्ती नि कृतीवरून स्पष्ट होणारें आहे. तें कसें हें पुढें

दिसेलच. त्या पुस्तिकेच्या ४ थें पृष्ठावर म्हटलेलें आहे. " आपणांमध्यें आपसांत बाह्यात्कारी देखाव्यानें भेद विभेद वा पक्ष असावेत. (१) कांहींनीं राजनिष्ठ राहून नि सदासर्वदा सरकारला साह्य देऊन अिंग्लिश सरकारची मुसलमानांवर कृपा वा प्रेम नि त्यांचेविषयीं सहानुभूति संपादन करून ठेवावी. (२) कांहीं कॉंग्रेसवाले वनतील. त्यांनी सतत अधिकाधिक हक्क नि सवलती मागत रहावें. त्यांतून मग अर्धी मागणी जरी स्वीकारली गेली तरी आपला लाभच होअील. (३) कांहीं समाजसत्तावादी नि समतावादी (Socialists & communists) होतील. त्यांनीं शेतकरी नि कामकरी लोकांचें संघटन करून त्या संघटित संस्थाद्वारा हिंदु नि मुसलमान समाजाची सहानुभूति आपणांकडे वळवून घ्यावी." ही समग्रच पुस्तिका वाचनीय आहे. पण वरील भाग म्हणजे भिन्न भिन्न पक्षीय मुसलमान कार्यकर्त्यांची अंतस्थ मनोवृत्ति कशी अेकरूप आहे नि कोणीहि मुसलमान कोणत्याहि स्वरूपाच्या संस्थेंत असो तो आपलें खरें लक्ष ' मुसलमानहित ' या अेकमेव हेतूकडेच कसे ठेवतो हें समजण्याची ती किल्लीच, नि म्हणून ती येथें देऊन ठेवली आहे.

' राष्ट्रीय ' मुसलमान

मुसलमान कॉंग्रेसमध्यें समाविष्ट आहेत हें सूक्तासूक्त मार्गानें दुसऱ्यापुढें प्रदर्शोविण्यासाठीं नि आपल्याहि मनाची फसवणूक करून घेण्यासाठीं राष्ट्रसभावाले हिंदू कसे आतुर असतात हें मागें आपण पाहिलें आहेच. पण ज्यांना सध्यां हिंदुस्थान ' नामांकित राष्ट्रभक्त ' म्हणून पूर्वी अेकेकाळीं समजत होतं वा सध्यां समजतें आहे त्यांचेविषयींचे दिग्दर्शन काय दाखवतें हें आपण पाहूं. वर सांगितलेल्या दिखाअू भेदांपैकीं सरकार पक्षी मुसलमान वेळोवेळीं सरकारचा पक्ष अुचलून लोकपक्षविरोधी—विशेषतः हिंदुहितविरोधी—कसें वर्णन करतात हें राजकीय घटनांचें वृत्त वरवर वृत्तपत्रें वाचणाऱ्यांनाहि ठाअूक आहे म्हणून तें येथें देअून पुस्तकाचे पृष्ठांत भर घालावयाची अवश्यकता नाहीं. दुसरा विभेद जो 'कॉंग्रेसी ' अर्थात् ' तथाकथित ' राष्ट्रीय मुसलमान कसे वागतात हें सांगणें अवश्य आहे नि म्हणून ते पाहूं.

मौ. महमद अल्ली, शौकत अल्ली, ब्या. जिना, स्वातंत्र्यप्रेमी नि लो. टिळकांचे शिष्य म्हणविणारे मौ. हसरत मोहानी ही मंडळी अेकेकाळीं शंभरी

शंभर टक्के 'राष्ट्रीय' होते. नि त्या राष्ट्रीय म्हणून असल्यावेळींच म्हणजे खिलाफत आंदोलनाचे वेळीं अमनुल्लाखान—काबुली अमीर—याला हिंदुस्थानवर बादशाही स्थापन करण्याकरितां आणण्याच्या कटांत होते येवढें सांगितलें म्हणजे पुरें. कोकोनाडा कॉंग्रेसमध्यें कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून महमद अल्लीनी कॉंग्रेसच्या मुसलमानांच्या भावना दुखवतात म्हणून वाद्यें न वाजवितांच राष्ट्रगीतादिकांचें गायन व्हावें म्हणून आज्ञा दिली होती. पं. विष्णुबुवा पळुस्कर या कणखर महाराष्ट्रीय गायकांनीं 'मौलानाजी ही मशीद नाहीं. कॉंग्रेसचा मंडप आहे. येथें वाद्यें वाजवूनच गायन होअील' असें म्हणून मौलानांचे कान अुपटले तेव्हां कॉंग्रेसच्या अधिवेशनांत वाद्यबंदीची धोंड बांधली जाण्याची आपत्ति टळली. त्याच अधिवेशनांत 'अस्पृश्यांची हिंदू नि मुसलमान मिळून आपसांत वाटणी करून घेअूं अर्थात् अर्धे तरी अस्पृश्य आम्हीं मुसलमान करून घेअूं' ही सूचना मांडून कॉंग्रेसची मूकसंमति मिळविण्याचा त्यांनीं अुपक्रम केला होता. या दोनहि प्रकरणीं कॉंग्रेसच्या गांधीप्रमुख हिंदू नेत्यांनीं मान खाली घालून निमूटपणें या गोष्टीला अविरोधी वृत्ति धारण केली हें विशेष ध्यानांत घेण्यासारखें आहे. जीनांचा राष्ट्रीयपणा त्यावेळीं कसा वेगडी होता हें आतां अुघड झालेंच आहे. त्यांनींच अेकेस्थळीं मुस्लिम लीगच्या अध्यक्ष नात्यानें अेकदां म्हटल्याचें प्रसिद्ध झालें आहे कीं लखनौ कराराच्या वेळीं आमचे हेतू स्पष्ट करण्याची वेळ आली नव्हती. आतां दुसरे अितर 'राष्ट्रीय' मुसलमानांच्या वानग्या पहाण्यापूर्वी मौलाना अबुल कलम आझाद—सांप्रतचे कॉंग्रेसाध्यक्ष 'राष्ट्रपति'—हे म्हणजे आज आदर्श राष्ट्रीय मुसलमान म्हणून मानले जातात. यांच्या राष्ट्रीयतेचें स्वरूप काय आहे तें पाहूं.

(१) **मौलाना अबुल कलाम आझाद**—हे मूळचे आरब गृहस्थ. १९१२ मध्यें हिंदुस्थानांत प्यान अिस्लामचें वारें हिंदुस्थानी मुसलमानांमध्यें भरण्याचे कार्यार्थ आले होते. केमालपाशा द्वारा खिलाफती—खिरापत अुडविली गेल्यानंतर त्या प्रश्नाला तितकें महत्त्व राहिलें नाहीं. नि तें परत जाअूं लागले पण कलकत्त्यास मुसलमान प्रमुखांनीं विशेष आग्रहपूर्वक त्यांना राहवून घेतलें. कोणी म्हणेल कीं पहिल्यानें ते जरी प्यान अिस्लामीसाठीं आले असले तरी मागाहून हिंदुस्थानांत आल्यावर हिंदुस्थानच्या प्रेमानें त्याचे मनांत घर केलें असेल नि



पाकस्तानचे विक्राळ स्वरूप

रेखांकीत भाग — मुस्लामी वर्चस्वाचा सूचक.

ओरलेला भाग — हिन्दू वर्चस्वाचा सूचक.

त्यामुळें ते राष्ट्रीय वनले असतील !! हीच ~~त्यांचें हिंदुस्थानावर~~ लक्ष वसलें हें सत्य, पण कशासाठीं ? हें पुढील त्यांचीं वक्तव्यें अुघड करतील. (अ) हुतात्मा स्वामी श्रद्धानंद यांची हत्त्या करणारा अब्दुल रशीद हा तुरुंगांत असतां त्याला भेटावयाला मौ. अबुल कलाम अझाद गेले. नि त्यांची दृष्टादृष्ट होतांच त्याच्या हाताचें चुंबन घेअून भावनाभरानें म्हणतात **" धन्य आहे तुझी ? असे जर शंभर अब्दुल रशीद हिंदुस्थानांत निघतील तर हिंदुस्थानांत मुस्लिम राज्य व्हावयाला वेळ लागणार नाहीं.** (हिंदू आॅब्झर्व्हर, नवदिल्ली) (**आ**) १९२७ च्या खिलाफत (अखिलभारतीय) परिषदेच्या अध्यक्ष नात्यानें म्हणाले **" माझी जातीयता म्हणजे सर्व मानवांना चुचकारून आणि साह्य करून अिस्लामचे अनुयायी वनविणें हीच आहे "** याचा अर्थ कॉंग्रेसद्वारा हिंदुस्थानला चुचकारून त्याला अिस्लामीकरणाचा घास करणें असाच नाहीं कां ? (**अि**) कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून अझाद म्हणाले **" मुसलमान हे हिंदुस्थानांतील अेक अल्पसंख्य जाति नसून ते स्वतंत्र राष्ट्र आहेत. त्यांनीं काय घ्यावें, आपलें भवितव्य कसें ठरवावें, त्यांचे हक्क काय अित्यादि गोष्टी ठरविण्यास ते पूर्ण स्वतंत्र नि समर्थ आहेत. त्यांनीं दुसऱ्यांचे संमतीसाठीं अडून बसण्याचें कारण नाहीं अि."** यावर मुस्लिम लीगचे सर महमदखान देहलवी यांनीच जें म्हटलें आहे तें अुधृत केलें म्हणजे त्यांतील मर्म ध्यानांत येअील. ते म्हणतात, **" आमचे वाया गेलेले (म्ह. कॉंग्रेसला मिळून मुस्लिमपणापासून च्युत झालेले) मौलाना आझाद हे अंतःकरणांतून पक्के मुसलमान आहेत, अितकेंच नव्हे तर राजकीय दृष्ट्या प्यानअिस्लामीहि आहेत. मुसलमान हे अल्पसंख्य नसून स्वयंपूर्ण राष्ट्र आहेत असें कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून अधिकृत रीत्या आपले कॉंग्रेसाध्यक्ष नात्यानें मत घोषित केलें आहे हें पाहून मला आनंद होतो. "** लाहोरच्या ओस्टर्न टाअिम्सनेंहि अशाच प्रकारची टीका करून मौलाना अझाद यानीं कॉंग्रेसाध्यक्ष पदावरून प्रकट केलेल्या वरील अुद्गाराविषयीं अभिमान नि समाधान व्यक्त केलेलें आहे. यावरून आझादची राष्ट्रीयता ही खरी राष्ट्रीयता आहे कीं प्रच्छन्न मुस्लिमवृत्ति आहे हें स्पष्ट होअील. (**अी**) अेका फ्रेंच मनुष्याशीं बोलतांना मौ. आझादनीं **हिंदुस्थानांत राहून**

बाहेरच्या मुसलमान देशांतील पुढाऱ्यांशीं नि सरकारशीं दळण-वळण ठेवलेलें होतें अशी स्वीकृति असावधपणाच्या क्षणी दिली होती हें प्रसिद्ध झालेलें आहे. अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. (उ) मौलाना अबुल कलाम आझाद यानीं अध्यक्षपदावरून करावयाच्या कारवाया करून अधिवेशन संपतांच जिनांकडे येक अगदीं गुप्त खलिता पाठविला नि त्यांत कळविलें कीं 'तुम्हांला तुमचें पाकिस्तान घुसडावयास घटनासामितींत पूर्ण वाव ठेवलेला आहे.' हा पत्रव्यवहार जिनानींच उघडकीस आणला आहे. नि तो 'राष्ट्रीय' आझाद 'राष्ट्रपती'नें (?) नाकारला नाहीं हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

(२) **हकीम अझमलखान**—हे राष्ट्रीय मुसलमान म्हणवीत असत, नि हिंदूंना तर काय कोणीहि मुसलमानांनीं 'मी राष्ट्रीय' म्हणावें नि ते त्याला तसें मानूं लागतात. सर्वांचीं बरींच उदाहरणें देत बसण्यानें पुस्तकाचा आकार फार वाढण्याचें भय असतें म्हणून बऱ्यांच उदाहरणांतून शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें अगदी निवडक उदाहरणांवरच समाधान करावें लागतें. कॉंग्रेसमध्यें कोणत्याहि अधिकाराचें स्थान जातीय संस्थेमध्यें अधिकार स्थानावर असलेल्याला द्यावयाचें नाहीं असा कॉंग्रेसचा दंडक आहे. परंतु हा दंडक वास्तवतः केवळ हिंदूपुरताच आहे—मुसलमानांना लागू नाहीं. हकीम अजमल खान हे खिलाफत कान्फरन्सचे अध्यक्ष असतांनाच कॉंग्रेसचेहि १९२१ मध्यें अध्यक्ष होते. (येक वर्षांत स्वराज्य ही आरोळी देणारे हें वर्ष, काबूलच्या अमीराला हिंदुस्थानवर बादशहा करण्याच्या कटांत कॉंग्रेसचे मुसलमान नि कांहीं गांधी प्रमुख हिंदू पुढारी होते त्यांतच हकीम अजमलखानहि होते हें ध्यानांत घेणें अवश्य आहे.) हकीम अजमलखान हे गांधींचे परमामित्र होते हें सर्वांना ठाऊकच आहे. आणि हकीम अजमलखानांच्या सर्व हालचालींना गांधींची संमति होती हें निराळें सांगण्याची अवश्यकता नाहीं. **त्या वर्षींच्या खिलाफत कान्फरन्समध्यें हकीमच्या अध्यक्षतेखाली 'टर्कीविषयीं आम्हीं येकनिष्ठ (loyal) आहोंत' हा ठराव येकमतानें नि सर्वांनीं उभें राहून स्वीकृत केला होता. या वर्षीं या कॉंग्रेसाध्यक्ष असलेल्या हकिमांचा टार्किश सरकारशीं सारखा पत्र व्यवहार**

चालू होता. अशाच प्रकारचा प्रस्ताव गांधींनीहि काँग्रेसपुढें मांडून तो अुत्तीर्ण करून घेतला होता. या राष्ट्रीय मुसलमानांची नि हिंदुस्थानच्या स्वराज्यार्थ म्हणून प्रयत्न करतो म्हणणाऱ्या काँग्रेसवाल्यांची परकीय मुसलमानी देश जो टर्की यांच्याशीं अेकनिष्ठा कशाकरितां नि कां असावी बरें? ही राष्ट्रीयता नि राष्ट्रभक्तीच आहे काय? अितर कोणत्याहि देशाचे नागरिक नि त्या देशाची राष्ट्रसभा परक्या देशाशीं अेकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करीत असल्याचें दृश्य भूतकालच्या अितिहासांत वा सांप्रतच्या चालूं घटनांत कोठेंतरी आढळेल काय? याचा वाचकांनीं—हिंदुमात्रांनीं—आपल्या मनाशीं विचार करावा. (२) डा. किश्चलूं—हेहि अेक राष्ट्रीय म्हणून मिरवणाऱ्यांत होते. अमृतसर येथें जालियनवाला बागेंत लोकमान्य टिळक स्मृतिदिन मानला जात होता. हिंदूसभेच्या वतीनें ती सभा चालली होती. नि त्या समारंभप्रसंगीं अुच्चस्थानावर लो. टिळक यांचें अेक भव्य चित्र फुलामाळानीं सजवून ठेवलेलें होतें. साधारणतः ९ चे आंतबाहेर डा. किश्चल् नि त्यांचे कांहीं साथीदार तेथें आले आणि दाराशीं अुभे राहिले. हिंदूसभेचे मंत्री डा. गुरुबक्षरायना बोलावून त्यांना किश्चल्नी सांगितलें कीं "हा अुत्सव काँग्रेसच्या वतीनें व्हावयाला पाहिजे होता. पण आतां हिंदूसभेनें भरविलेली स्मृतिसभा संपवून काँग्रेस कमिटीच्या कामाला आरंभ करा." यावर काम संपत आलें आहे. आपण आंत येअून बसा." असें श्रीगुरुबक्षरायनीं सांगितलें. तेव्हां किश्चलू म्हणतात "तेथें तसवीर अुभी आहे आणि आमच्या धार्मिक बुद्धीच्या तें विरुद्ध आहे तेव्हां अुत्सव होतांच ती दूर काढून टाका म्हणजे आम्ही आंत येअूं नाहींतर आम्ही येणार नाहीं.या त्यांच्या अुद्दामपणाच्या म्हणण्याला वास्तविकपणें धुडकावून देअून त्यांच्या अुर्मटपणाविषयीं त्यांची चांगली कानअुघाडणी करणें अवश्य असूनसुद्धां हिंदूंच्या अतिरेकी 'सात्त्विक' म्हणजे खुळयाबावळ्या वृत्ति असल्यानें नि सतत दुसऱ्याचें मन न दुखवण्याच्या अस्थानी प्रवृत्तीमुळें त्या हिंदूमंडळींनीं किश्चलूंच्या म्हणण्याप्रमाणें तें चित्र—लो. टिळकांचें मूर्तिचित्र—दूर काढून ठेवलें. तेव्हां हिंदुमुसलमानी अेकीचीं गीतें गाणाऱ्या पण अतरंगीं

केवळ मुस्लिम विचारांनीं भरलेल्या किश्चलूंचे नि त्यांचें समाधान झालें. ही गोष्ट ऑगस्ट १९२४ ची आहे. दिनांक १ जुलाअी १९२५ ची अेक घटनाहि देणें अवश्य वाटतें. त्या दिवशीं देशबंधु दासांचा स्मृतिदिन म्हणून सर्व देशभर मानला जातो त्याचप्रमाणें अमृतसरमध्येंहि मानला जात होता. तन्निमित्त निघालेल्या मिरकणुकींत देशबंधु दास यांचें चित्र अेका काठीला अटकावून सर्वांना दिसेल अशा प्रकारें अुंच धरून मिरविलें जात होतें. पण तें चित्र मुसलमानांच्या—तत्रस्थ कॉंग्रेसी मुसलमानांच्याहि—डोळ्यांत खुपूं लागलें. लागलींच तें चित्र काढून टाकण्याची मागणी मुसलमानांनीं केली, नि तें काढलें तेव्हां मग मिरवणूक पुढें जाअूं शकली (अर्जुन–दिल्ली). खरोखरीच मूर्तिचित्रें धर्मभावना दुखवतात म्हणावें तर तसेंहि नाहीं. केमालपाशा, झगलूल पाशा, काबुलचा अमीर अमानुल्ला, अनवर बेग, औरंगजेब आदींचीं चित्रें मुसलमानांसाठीं निघालेल्या स्वतंत्र मुसलमानी शाळांत लावलेलीं स्वतः अनेक स्थळीं पाहिलेलीं आहेत (लेखक). १९२३ या वर्षीं नाशिक जिल्ह्यांत येवलें नांवाचें गांवीं बाहेरून फिरून घरीं येत असतां वाटेंत मुसलमानांची शाळा अुघडी होती, ती पहावयास गेलों. तेथें पुष्कळ छायाचित्रें भिंतीला लावलेलीं होतीं. आंत गेल्यावर चित्रें वा समूहचित्रें (ग्रूप फोटो) लक्षपूर्वक बंघितलीं. त्यांत औरंगजेब, शहाजहान, बाबर, हुमायून, मौलाना शौकत–महमदअल्ली, डॉ. किश्चलू, हकीम अजमलखान, अलिगड कॉलेजचे संस्थापक अेक मुसलमान पुढारी, हजरत मोहानी, सांप्रतचे निझाम, अितर कित्येक मुस्लिम पुढारी, काबुलचे अमीर अमनुल्लाखान–हबीबुल्लाखान–अबदुल रहिमान, हैदर, टिपू, झगलूल पाशा, केमालपाशा अनवर बेग अित्यादींचीं चित्रें होतीं. त्यावेळीं गांधी खिलाफतीचे शीर्षस्थानीय नेते मानले जात होते. तेव्हां त्यांचें चित्र कोठें तरी स्वतंत्रपणें सांपडेल असें वाटलें. पण तो तर्क चुकीचा ठरला. खिलाफत चळवळीच्या जनकाला अल्लीबंधूंनीं आमचा नेता नि गुरु म्हणून ज्यांचा अुच्च स्वरानें पुकारा करून तें सत्य असल्याचें हिंदूंना पटविण्याचा प्रयत्न केला, हिंदुमुसलमान प्रश्नांत मुसलमानच सदासर्वदा दोषी नि अपराधी आहेत असें सिद्ध होअूनहि अेकासुद्धां शब्दानें त्यांचा निषेध न करतां वेळप्रसंगीं हिंदूंचे कान धरूं धावणाऱ्या त्या 'म.' गांधींचें तरी छायाचित्र दिसेल असें वाटलें होतें. त्या मुसलमान–अुपकारकर्त्या गांधींचें चित्र तेथें मुळींच

नव्हतें. नीचांतला नीच असलेला मुसलमानसुद्धां मुसलमानेतर गांधीपेक्षां अधिक श्रेष्ठ आहे असें समजणाऱ्या मौलानांच्या अनुयायांनीं मुसलमान थोरांच्या चित्रावरोबर काफर गांधींचें चित्र लावणें अशक्य होतें हें मग लक्षांत आलें. यावरून चित्रांमुळें धर्मभावना दुखावत नाहींत. त्यांचें निमित्त हिंदू चित्र वा मूर्तींच्या संबंधींच पुढें केलें जातें हें यावरून अुघड आहे. नि ही वृत्ति 'राष्ट्रीय' म्हणविणाऱ्या मुसलमानांची आहे हें वर आलेंच आहे.

(४) **आझाद मुस्लिम कान्फरन्स**—आझाद म्हणजे स्वतंत्र. ही परिषद १९४० मध्यें भरली होती. त्या वर्षी कॉंग्रेसचे अध्यक्षहि अझादच. अशा दोन अर्थानें या परिषदेचें अझाद कान्फरन्स म्हणून नांव दिलें गेलेलें दिसतें. या परिषदेंत कॉंग्रेसचे नि 'राष्ट्रीय' म्हणविणारे बहुतेक मुसलमान पुढारी आले होते. या परिषदेंत झालेलें प्रस्तावांचें स्वरूप स्पष्ट झालें म्हणजे त्या प्रस्तावांतील मर्माच्या वृत्तीनेंच 'राष्ट्रीय' मुसलमानांचीं मनेंसुद्धां रंगलेलीं आहेत असें समजावयाला प्रत्यवाय नाहीं. या परिषदेचे अध्यक्ष सिंध प्रांताचे मुख्य दिवाण खानबहादूर अल्लाबक्ष—कॉंग्रेसचे अभिमानी म्हणविणारे गृहस्थ—झालेले होते. त्यांतील सर्व 'राष्ट्रीय' मुसलमानांनीं मिळून जे प्रस्ताव केलें त्याचें स्वरूप कसें होतें याचें वर्णन ओस्टर्न टाअिम्स नामक लाहोरच्या लीगच्या पत्रानें अुघडें करून दाखविलें आहे. तें पत्र म्हणतें कीं ही परिषद पाकिस्थानच्या विरोधार्थ भरली होती. पण केलेल्या प्रस्तावांत ज्या पाकिस्थाना विरुद्ध म्हणून यांनीं आरोळी मारली त्याच पाकिस्थानांतील योजनेचा (नांव सोडून) पुरस्कार केलेला आहे. यानंतर त्या परिषदेतील ठराव तेथें दिले ते येणें प्रमाणें (अ) हिंदुस्थानचें सरकार पूर्ण केंद्रीभूत केलेलें अेकमुखी असें नसावें. केंद्र सरकाराच्या हातीं कमीत कमी सत्ता द्यावी. देशाच्या सुरक्षितीसाठीं अत्यंत अवश्यक नि अपरिहार्य असेल तेवढीच सत्ता केंद्र सरकारचे हातांत ठेवून बाकीचा सर्व सत्ताधीशपणा प्रांतांना देण्यांत यावा. प्रांतांनीं संयुक्त सत्तेंत समाविष्ट होणें न होणें हें त्यांचे अिच्छेवर अवलंबून असावें. (या मागणींत मोठा धोका आहे. पंजाब—सिंध—सीमाप्रांत—बलोचस्थान—बंगाल आदिक मुस्लिमाधिक्याचे प्रांतांनीं हिंदुस्थानी सभेंत समाविष्ट न होतां स्वतंत्र अेक गटानें रहाण्याचें

ठरविणें वा बाहेरच्या मुस्लिम राष्ट्रांत मिळून त्यांच्याशीं अेकरूप होणें ही सत्ता प्रातांचें हातीं असल्यामुळें पूर्वीपासून बाहेरच्या मुसलमान राष्ट्रांशीं संयुक्त होण्याची जी महत्त्वाकांक्षा अतिराष्ट्रीय (राष्ट्रविरोधी) मुसलमानांची आहे ती सफल होण्याचा मार्ग मोकळा झाल्यासारखाच होतो. नि याकरितां ही मागणी मुसलमान मागत आहेत. आणि त्याच कारणासाठीं ती पुरी होणें हें हिंदुस्थान राष्ट्राला धोक्याचें नि नाशकारी ठरणारें आहे म्हणून) हें मागणें पाकिस्थानच्याच मागणीसारखें नाहीं कां ?

(आ)—मुसलमानांचे सांस्कृतिक, वैयक्तिक, धार्मिक त्याचप्रमाणें राजकीय, आर्थिक, सामाजिक अधिकार नि हक्क, आणि नोकऱ्यांमध्यें मुसलमानांचे किती प्रमाण असावें या गोष्टी ठरविण्यासाठीं या परिषदेनें अेक मंडळ नेमलें आहे. (या सर्व गोष्टींत आतांपर्यंत हिंदूंच्या मागें अेकीचा भुंगा लावून नि सरकारपुढें ××× चालन करून मुसलमानांनीं अव्वाचे सव्वा हक्क नि अधिकार लाटले आहेत. आणि आतां पुन्हां जणूं कांहीं ती कमाअी कमीच आहे अशा भूमिकेवरून खरोखरी मुसलमानांनीं सर्व गोष्टींत किती हक्क नि अधिकार मागावेत हें ठरविण्यासाठीं मंडळ नेमलें आहे ही गोष्ट लक्षांत घेतां मुसलमानांची—राष्ट्रीय म्हणविणाऱ्या मुसलमानांची—सर्वग्रासी स्वरूपाची अराष्ट्रीय भूक कशी वाढत जात आहे हें लक्षांत घेतां हें तथाकथित कॉंग्रेसानुयायी 'राष्ट्रीय' मुसलमान जात्यंध वृत्तीनें हिंदुस्थानचे तुकडे पाडण्यास निघणाऱ्या मुस्लिम लीगवाल्या मुसलमानांचेंच प्रच्छन्न असे दुसरें स्वरूप आहे असेंच म्हटलें पाहिजे.) अितकेंच नाहीं तर घटनासमितींत जे मुसलमान प्रतिनिधी घ्यावयाचे ते केवळ मुसलमानांनींच निवडून द्यावेत असाहि ठराव केलेला आहे. आणि तरीहि स्वतःला संयुक्त मतदारसंघाचे अभिमानी म्हणवतात. ही फसवणूक नव्हे कां—मग त्यापेक्षां आम्हीं स्पष्टपणें काय वाटेल तें अुघड बोलतों हें बरें नव्हे का ?" अशा अर्थाची टीका यावर वरील पत्रकर्ता करीत आहे. आणि हें त्यांचें म्हणणें अयथार्थ आहे असें कोण म्हणूं शकेल.

(५) **अलीबहादुरखान (मुंबअीचे राष्ट्रीय मुसलमान)** हे त्या परिषदेला अुपस्थित होते ते आपल्या भाषणांत मोठ्या अुत्साहांत नि अभिमानानें

मराठे ... ग्रंथालय ...
४५६

आतां म्हणाले कीं अलबत "**अस्लामचें भविष्य खरें करून दाखवून हिंदुस्थानांत अस्लामस्थान जर होणार असेल तर ती कामगिरी मजसल-अि-अहरारच पूर्ण करून दाखवील**" म्हणजे ही कामगिरी अितरहि अिस्लामी संस्था करूं पहात आहेत पण त्यांत यश मात्र मजसल-अि-अहरारच मिळवील-अितरांना तें यश मिळणार नाहीं. यावरून प्रत्येक मुस्लिम संस्था कोणत्या कार्यार्थ स्पर्धाशील आहेत हें लक्षांत घ्यावें. नि हेंहि आपण विसरूं नये कीं हें सर्व 'राष्ट्रीय'-कॉंग्रेस ज्यांना राष्ट्रीय समजत आहे अशा राष्ट्रीय-मुसलमानांविषयींचें वर्णन आहे. (**आ**) कॉंग्रेसी मुसकीनें जीव गुदमरून गेलेले श्री. मुनशी हे कॉंग्रेस सोडून बाहेर मोकळ्या वातावरणांत आले नि पाकिस्तानच्या विरुद्ध 'अखंड भारत' आंदोलन आरंभ करते झाले. त्यांना हे कॉंग्रेस भक्त 'राष्ट्रीय' अलीबहादुरखान म्हणतात "**आम्हीं पाकिस्तान-विरोधी असलो तरी अखंड भारताच्या चळवळींत आम्हीं कोणीहि मुसलमान भाग घेणार नाहीं. तुम्ही अशी चळवळ करणें म्हणजे जातीय स्वार्थच पहाणें आहे.**" कशी राष्ट्रीयतेची वानगी यांची आहे पहा ! !

(६) **डॉ. अनसारीः**—(**अ**) गांधी आपणाला राजकारणांत नि राजकीय हालचालींत मुस्लिम विषयक निर्णय घेण्यासाठीं, मतें ठरविण्याकरितां, प्रत्यक्ष कार्यसंपादनार्थ कोणी ना कोणी तरी मुसलमान आपल्याजवळ मार्गदर्शक म्हणून स्वीकारीत असतात. कांहीं काळ डॉ. अनसारी मुसलमानविषयक प्रश्नांत त्यांचे मार्गदर्शक होते. १९२२ मध्यें दिल्लीच्या राजकीय हुतात्म्यांच्या स्मारकांसाठीं निधि जमविण्याचें कॉंग्रेसचें ठरलें होतें. तसा तो जमत असतां स्वामी श्रद्धानंदजीनेंहि २० जानेवारीला तो निधि जमविण्याचें काम चालू केलें तेव्हां त्यांना आढळून आलें कीं डॉ. अनसारी-कॉंग्रेसी राष्ट्रीय पुढारी-यांनीं अंगोरा (तुर्कस्थानची राजधानी) निधि चालू केलेला आहे. **या कृत्यांत हकीम अझमलखान नि डॉ. अनसारी दोघेहि प्रेरक होते.** स्वामीजी कॉंग्रेसी मुसलमानांमध्यें निधीसाठीं येतील ही कल्पना डॉ. अनसारीना असल्यामुळें त्यांनीं कॉंग्रेसचे म्हणविणाऱ्या मुसलमानांनी 'अंगोरा निधी गोळा करावयाचा आहे त्याला पैसे द्या—कॉंग्रेसी निधीला

देऊं नका' असा आग्रहाचा अुपदेश दिला होता. अर्थात् मुसलमानांनीं त्याप्रमाणें केलें हें सांगावयास नकोच. (आ)' " १९२१ मध्यें परदेशी कपड्यांची होळी करावी असें गांधीनीं–अर्थात् कॉंग्रेसचे वतीनें ठरविलें. स्वामी श्रद्धानंदांनीं या संबंधांत मतभेद कळविला. त्यांचें म्हणणें कीं, 'या परदेशी कापडाच्या होळीद्वारा विदेशीयांविषयीं अुत्पन्न होणारा द्वेष आपण अुत्पन्न होण्यास कारणीभूत होअूं नये, आपण तें सर्व कापड हिंदुस्थानांतील अत्यंत दारिद्र्यानें गांजलेल्या निर्धन लोकांस वाटून देअूं.' पण हें गांधींना पटलें नाहीं. आणि त्यांनीं आपला आग्रह वा हट्ट चालवावयाचें ठरविलें. परदेशी कपडे जाळणें हें अेक धार्मिक कृत्यच जणूं आहे अशा वृत्तीनें कित्येक स्थळीं हजारों रुपयांचा कपडा जाळला गेला. यांत देशबंधु दास नेहरू आदिक कॉंग्रेसचे अत्यंत प्रमुख नेत्यांकडूनहि अशा होळ्या झाल्या. पण खिलाफत मुसलमानांनीं (अर्थात् कॉंग्रेसभक्त मुसलमानांनीं–कारण त्या वेळीं सर्व खिलाफती कॉंग्रेसी झालेले होते.) 'हा सर्व आमचा गोळा झालेला कपडा त्याची होळी न करतां तुर्कस्तानच्या तुर्की बंधूंना पाठवितों' म्हणून गांधींना सांगितलें नि गांधींनीं किंचित्सुद्धां आढेवेढे न घेतां 'तो कपडा सुखेनैव तुर्की बांधवांना पाठवा.' म्हणून लागलीच संमति दिली. 'तत्त्वासाठीं कपडा जाळलाच पाहिजे. त्यांत तडजोड नाहीं.' म्हणणाऱ्या गांधींना कॉंग्रेसी मुसलमान नि त्यांचे मुसलमानी मार्गदर्शक डॉ. अनसारीदि 'राष्ट्रीय' मुस्लिम नेते वाटेल तसें वळवून घेतात. यावरून राष्ट्रीय मुसलमानहि अंतःकरणांत कसे मुस्लिमवृत्तीचेच आहेत हें कळणें कठिण नाहीं. डॉ. अनसारी पूर्वी परदेशांत पॅनअिस्लामी कार्यांत लागलेले होते. पुढें त्यांनीं कॉंग्रेसमध्यें ती कामगिरी पत्करली.

(अि) कम्युनल अवार्डमधील गोष्टीविषयीं आरंभीं अराष्ट्रीय, राष्ट्रविघातक, हानिकारक, अेकीचा भंग करणारे अवार्ड होअील असें म्हणारे अनसारी तें अवार्ड निश्चितपणें गळीं पडतांच कॉंग्रेसला गांधीच्या द्वारा चुप करण्याचा प्रयत्न करण्यास पुढें सरसावले. '**कम्युनल अवार्डला कॉंग्रेसनें विरोध केल्यास अेकहि मुसलमान कॉंग्रेसमध्यें रहाणार नाहीं**' हें बजावून कॉंग्रेसनें अवार्डचा निषेध करूं नये म्हणून गांधींच्या कानाचा चावा घेण्यास

हे राष्ट्रीय कॉंग्रेसवाले अनसारी प्रवृत्त झाले. गांधीनें या स्वयंनियुक्त मार्गदर्शकाच्या म्हणण्याला मान तुकवून 'स्वीकारहि नाहीं–धिःकारहि नाहीं' असा तृतिय-प्रकृतिपंथ कॉंग्रेसला घ्यावयाला लावला.

(७) **मौलाना हजरत मोहानी**—हे स्वतःला लो. टिळकांचे शिष्य म्हणावित असत. आणि मद्रासला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा–पूर्ण नि निर्भेळ स्वातंत्र्याचा प्रस्ताव अुत्तीर्ण करून वेण्यासाठीं यांनीं अकांडतांडव केलें होतें. पण हे पक्के (आंतून) प्यानअिस्लामी आहे. आम्हीं अमदाबादच्या तुरुंगांत असतां काबुलच्या अमीराला हिंदुस्थानवर चालून येण्यास आमंत्रण करून त्याचे करवीं हिंदुस्थान अिंग्लिशांचे हातून सोडवावयाचा नि मग त्याचे बादशाही छायेखालीं हिंदुस्थानला त्याचेजवळून स्वराज्य घ्यावयाचें असा अेक कट कॉंग्रेसीगांधी आदिक प्रमुख नेते नि खिलाफती मुसलमानांमिळून कसा केलेला आहे हें बऱ्याच सविस्तरपणें या मौलाना कॉंग्रेसीनें आम्हांस सांगितलें होतें. त्यावरून ते हिंदुस्थानांत मुस्लिम बादशाही प्रस्थापित करण्याच्या धोरणाचे पुरस्कर्ते आहेत हें आम्हांस कळलेलें होतें. पण अुघड नि कॉंग्रेसी जनांना ठाअूक असलेलाहि अेक पुरावा देअून हे अंतःकरणांतून कोणत्या वृत्तीचे आहेत हें कळणें अत्यावश्य आहे. मोपल्यांचे बंडांत मोपल्यांनीं हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले हें सर्व–विश्रुत आहे. त्यांचे निषेधाविषयींचा ठराव कॉंग्रेसच्या अधिवेशनांतील विषयानियामक मंडळांत हिंदूंची सरसहा (कत्तल) हत्याकांडें, त्यांचीं घरेंदारें जाळणें–लुटणें, बलात्कारानें बाटविणें आदिक त्यांतील क्रूरतेची परिसीमा गांठणाऱ्या गोष्टी अैकून मनें संतप्त होतील अशा अत्याचारादिकांविषयीं सर्व मोपल्यांचा तीव्र निषेध करणारा ठराव पुढें मांडला गेला. या ठरावाला हिंदूंनींच अुपसूचना मागून अुपसूचना मांडून अत्यंत सौम्य स्वरूपाचा तो ठराव करून टाकला होता. तरीहि मुसलमान पुढाऱ्यांना तो रुचेना. आणि हे सर्व कॉंग्रेसी 'राष्ट्रीय पुढारी' होते. त्यांतल्या त्यांत मौलाना हस्रत मोहानीसारख्या राष्ट्रीय वृत्तीविषयीं शंकाहि न वाट्टूं देणाऱ्या मुसलमान पुढाऱ्याकडूनहि त्या सौम्य केलेल्या ठरावाला विरोध झाला. नुसता विरोधच नाहीं तर **राष्ट्रभक्त (?) मौलाना हसरत मोहनी म्हणतात "मोपला प्रदेश हा दार–अुल–अमन (मुसलमानांचा मित्र देश) राहिला नव्हता.**

तो दार-अुल-हरब (शत्रु देश) वनला होता. आणि ज्याअर्थी ब्रिटिशांशीं शत्रुत्व करणाऱ्या मोपल्यांचें हिंदूंशीं भांडण जुंपलें त्याअर्थी मोपल्यांनीं अेक कुराण स्वीकारा वा तरवारीला मान द्या असें हिंदूंशीं वर्तन केलें हें योग्यच झालें, आणि जीव वांचविण्यासाठीं जर हिंदु मुसलमान झालेले असले, तर तें मुस्लिमीकरण हें स्वेच्छेचेंच ठरतें-वलात्काराचें नाहीं. (लिबरेटर-स्वामी श्रद्धानंद)

(८) **मौलाना अझाद सोभानी** हे १९२१ मध्यें गांधींचे परदेशीय राजकारणांतील मार्गदर्शी होते. त्यांनीं श्रीहट्टमध्यें अेक भाषण दिलें. त्यांत ते म्हणतात (अमृतवझारवरून) **" ब्रिटिश सत्तेला हळुहळू ओहोटी लागली आहे. त्यांना लवकरच हिंदुस्थानाला रामराम ठोकण्याची** (Good by) **पाळी येणार आहे. म्हणून माझें निक्षून सांगणें आहे कीं आपण जर हिंदूंशीं लढून त्यांना दुर्वल करून टाकणार नाहीं तर हिंदू हिंदुस्थानांत हिंदूराज्य स्थापतील, अितकेंच नव्हे तर सर्व मुस्लिम जगतावर आपलें वर्चस्व स्थापित करतील. परंतु हिंदुस्थानला प्रवल वनूं देणें वा दुर्वल करून टाकणें हें आपणां मुसलमानांच्या हातीं आहे. आणि म्हणून प्रत्येक मुसलमानानें मुस्लिमलीगला मिळून नि पुढील दोन गोष्टी पार पाडून आपलें कर्तव्य पुरें करावें. पहिली गोष्ट म्हटली म्हणजे हिंदूंना दुर्वल करून टाकणें, आणि अिंग्लिश हिंदुस्थानांतून जाण्याची वेळ येअील त्यावेळीं मुस्लिमराज्य हिंदुस्थानांत स्थापणें. जरी अिंग्लिश हे मुसलमानांचे शत्रू आहेत तरी अिंग्लिश मुस्लिम युद्धाची वेळ फार दूर आहे. हिंदूंना त्यावेळीं तात्पुरतें आपल्याकडे वळवून घेत ब्रिटिशांना घालवून मुस्लिमराज्य स्थापतां येअील.**

" (गांधी मुस्लिम कान्स्परसी) " (९) **डॉ. सय्यद महमूद:**—हें विहारचे अेक मोठे कॉंग्रेस फक्त राष्ट्रीय मुसलमान आहेत. ते म्हणतात **" जातीय निर्णय आधींच अस्तित्वांत आलेला आहे. तो मुसलमानांना जोंपावेतों मान्य आहे तोंपावेतों त्याला कोणीहि हात**

लावीत नाहीं नि लावणारहि नाहीं. तो कॉंग्रेसनें तत्वतः मान्य केलेला नसला तरी व्यवहारतः मान्य केला आहेच आणि आपला समाज त्यापासून मिळूं शकेल तितका सर्व लाभ करून घेण्यास पूर्णपणें स्वतंत्र आहे'' या पत्रकानंतर मुसलमान पुढाऱ्यांनीं अशी मागणी केली कीं या पत्रकांतील धोरणाला कॉंग्रेसच्या कार्यकारिणीकडून संमति मिळवून द्यावी लागलीच.

(१०) **व्या. असफअल्ली—'कॉंग्रेसभक्त' नि 'राष्ट्रीय' म्हणविणाऱ्या मुसलमान पुढाऱ्यांनीं तत्काळ कॉंग्रेसला आपलें पत्रक काढून विनंति केली कीं ''या अल्पसंख्याक प्रश्नासंबंधीं कॉंग्रेसनें आपली भूमिका स्पष्ट करावी.''** अर्थात् ज्या कम्युनल अवार्डला 'अराष्ट्रीय राष्ट्रहानिकर, अेकीच्या मुळावर अुठलेलें' असें म्हटलें जातें त्या मुस्लीम स्वार्थाला अन्यायानें वाढविणाऱ्या जातिनिर्णयाला कॉंग्रेसनें संमति द्यावी अशी अिच्छा या 'राष्ट्रीय' म्हणविणाऱ्या मुसलमान गृहस्थाची असावी याचा अर्थ मुसलमान हितसाधन हाच हेतु धरून काम करावयाचें असें मुसलमानांनीं ठरविलें आहे. मग तो मुसलमान कॉंग्रेसी असो वा कॉंग्रेसी नसो असाच होतो नाहीं ? आणि या कॉंग्रेसी 'राष्ट्रीय' मुसलमानाच्या विनंतीला तत्परतेनें मान देअून ''जातीय निर्णयांत (कम्युनल अवार्डांत) जें कांहीं परिवर्तन घडून आणावयाचें तें त्याच्याशीं हितसंबंध असलेल्या पक्षांच्या परस्पर संमतीनेंच घडवून आणावें'' असा कॉंग्रेस नेत्यांनीं प्रस्ताव केला नि याप्रमाणें राष्ट्रीय मुसलमान पुढाऱ्यांनीं जातीय स्वार्थी मुसलमानांची काळजी नि आपली पोटदुखी दूर करून घेतली. हा प्रस्ताव झाल्यानंतर आणखी अेक

(११) **राष्ट्रीय मुसलमान नवाब महम्मद तिस्मायलखान** यांनीं जवाहिरलालना अभिनंदानत्मक पत्र पाठविलें त्यांत ''जातीय निर्णयावरील तुमच्या अलीकडील ठरावानें मुसलमान समाजाची अेक मोठी तक्रार दूर झाली आहे आणि आमचा विश्वास आहे कीं **हा ठराव चिरस्थायीपणें टिकेल**'' असें म्हणून कदाचित् पुढें त्यांत पुन्हां माघार घेतली जाअूं नये याविषयीं सूचनाहि देअून ठेवली आहे.

(१२) **सरसीमा प्रांताचे काँग्रेसाध्यक्ष अब्दुल गफारखान– फ्रन्टियर गांधी** — यांनीं मला अेकदां असें सांगितलें कीं **"पठाणांच्या स्वातंत्र्याचे कल्पनेशीं विरोध येतोसा दिसतांच विशेष प्रसंगानुरोधें काँग्रेसशीं केलेली हातमिळवणी मी तत्काल सोडून देअीन. कारण हिंदुस्थानशीं माझा काय संबंध ?"** असें प्याट्रिक लॉके यांनीं कांटेपोररी रिव्हयूमध्यें लिहिलें आहे, हें अीस्टर्न टाअिम्सनें प्रसिद्ध केलें होतें. (२६।८।४०)

(१३) **अब्दुल कयूम** अेम. अेल. अे. **सीमा प्रांतः**—हे 'राष्ट्रीय' म्हणवून घेणारे सीमाप्रांतांतले काँग्रेसभक्त आहेत. हिंदुस्थानच्या सैन्यांत आतांपावेतों शेंकडा ६० साठपर्यंत हिंदुस्थानचें मुसलमानांचें प्रमाण होतें. अफगाणचा अमीर या सैनिक मुसलमानांचा भरंवसा बाळगून होता. याच सैनिक मुसलमानांच्या बळावर, अिंग्लिश हिंदुस्थानांतून गेल्यास, पंजाबहून निघून बंगालपर्यंतचा प्रदेश थोड्याच दिवसांत ताब्यांत घेण्याची हमी सांगणारे सर शिकंदर हयातखान पुढें येतात, त्यांचेचबरोबर हिंदुस्थानावर निश्चित पगडा बसवणें सोपें जावें या अिच्छेनें सैन्यांत पठाण लोक भरती होणें अत्यावश्य आहे अशा समजुतीनें हे सर सीमाप्रांताचे 'राष्ट्रीय' कयूम म्हणतात. " जर वीस हजार पठाण (सीमाप्रांतीय) आपल्या सैन्यांत घेतले तर त्यामुळें आमचें (कोणाचें ? मुसलमानाचेंच नां ?) शक्तिवर्धन होअील आणि बायका पळवणें आणि डाके घालणें याहि गोष्टी बंद पडतील. मला आशा आहे कीं सरकार या संबंधांत आपलें धोरण बदलून त्या जातींना सैन्यांत घेअील आणि त्यामुळें लौकर शांतता नांदूं लागेल.

युद्ध चालू झाल्यावर सीमाप्रांताकडील प्रबंधार्थ हिंदुस्थानसरकानें नेपाळचें साह्य घेअून त्यांचें आठ सहस्र सैन्य तेथें नेअून ठेवविलें नि त्यामुळें या पठाणांच्या नि त्यांच्या हिंदुस्थानांतील मित्रांच्या पोटांत दुखूं लागलें. आणि म्हणून वरील अुपाय 'राष्ट्रीय' भूमिकेवरून सुचविला गेला. या अुदाहरणांवरून राष्ट्रीय मुसलमान म्हणजे काय वस्तु आहे हें सहज कळेल. येथपर्यंत राष्ट्रीय मुसलमान गुणवर्णन झालें. आतां सामान्यतः प्यानअिस्लामी वृत्तीनें प्रेरित होअून प्रकटपणें मुसलमान प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांकडून नि त्याच्या प्रमुख

सहाय्यकांकडून ज्या कांहीं गोष्टी लेखी वा तोंडीं लिहिल्या, बोलल्या वा केल्या गेल्या त्यांचें स्वरूप आपण बघितलें पाहिजे.

प्यानअिस्लामी प्रमुखांच्या अुक्ती नि कृति.

प्यानअिस्लामी वृत्तीचा अुदय केव्हां झाला ही गोष्ट मागें आली आहेच. मुसलमानांमध्यें साधारणतः जन्मापासूनच कुराण नि महमद पैगंबर (कुराण प्रणेता नि अिस्लाम मतसंस्थापक) यांच्याविषयी कमी अधिक मानानें आदरभाव नि पूज्यभाव अुत्पन्न केला जाण्याची व्यवस्था झालेली असते. शिक्षित मुसलमान (अिंग्लिश शिक्षित) वस्तुतः अंतःकरणापासून भक्तिभावपूर्ण असतोच असें नाहीं. पण भक्तिभावाचा अभाव आपल्या अिस्लामविषयीचा करडा अभिनिवेश वा अभिमान त्यांच्यांत जागृत करण्याचा प्रयत्न मुल्ला मौलवी आदिक करीत असतात. या शिक्षित मुस्लिम प्रमुखांत मुसलमानांचे नेते बनून आपल्या मागें अेकनिष्ठ नि मतांध अनुयायी असण्याच्या जाणीवेनें जी अेक मानाची नि सत्तेची जाणीव त्यांचे मनांत अुत्पन्न होअून जी कांहीं सामर्थ्याची प्रचिती येते नि तद्द्वारां अेकप्रकारचें सुख नि धन्यता त्यांना वाटते त्या सुखमुक्त धन्यतेच्या लोभानेंहि बरेच मुसलमान पुढारी अिस्लामचा अभिमान असल्याचें नाटक करतात. तें कसेंहि असलें तरी खरीखुरी अिस्लामवियर्षी अभिमानवृत्ति, अथवा अभिमानाचें नाटकी प्रदर्शन वा विवेकहीन श्रध्देंतूनच निर्माण झालेली मतांधता यांचें अंतर्गत स्वरूप जरी त्रिविध असलें तरीपण या त्रिविध प्रकारच्या मनुष्यांचें बाह्य वर्तन नि त्याचे परिणाम हीं जवळजवळ सारखींच होतात. नि म्हणून परिणामदृष्टीनें यांना अेकाच वर्गांत मोडण्यास चिंता नाहीं. या वर्गांतील ज्यांच्या कृति वा अुक्ती दिल्यानें मुस्लिम समाज कोणत्या मार्गाला नेला जात आहे हें निश्चित कळणें नि समजणें सोपें जाअील अशांचें वर्णन आपण पुढें पाहूं.

(१) **मौलाना अब्दुल बारी:**—खिलाफतचे वेळीं हिंदुमुसलमान अेकीच्या देखाव्याचें काळीं यांचा फार बोलबाला होता. मुस्लिम पक्षीय लाभासाठीं मुसलमान यांना फार मानीत. नि धार्मिक वृत्तीच्या वर्तनासह हिंदुमुसलमान अेकीचे हे तोंडदेखले गोडवे गाणारे असल्यामुळें हिंदूंतहि यांचा प्रभाव फार होता. खिलाफतीच्या कालीं मुसलमानांवर 'आमचे भाअी'

म्हणून विश्वासानें भोळी वृत्ती ठेअून वागणाऱ्या हिंदुसमाजांतून सूक्तासूक्त मार्गानें नि योग्यायोग्य युक्तिप्रयुक्तीनें हिंदूंचें भ्रष्टीकरण मुल्ला, मौलवी, मौलाना आदिक सपाट्यानें करूं लागले होते. हिंदुसमाजांतील सर्वसामान्य भोळसट वृत्तीमुळें विश्वासानें बहुतेकांचे डोळे मिटलेले असत तरी सुसलमानांच्या पूर्वीपासून चालत आलेल्या कृत्रिम – कपटांमुळें भ्रष्टीकरण होअूं न देण्याविषयीं प्रयत्नशील असलेल्यापैकीं पुष्कळांचे डोळे उघडे होते. त्या मंडळीनीं – अुदाहरणार्थ स्वामी श्रद्धानंद जीसारख्यानीं–शुद्धिकरणाकडे लक्ष दिलें होतें ही गोष्ट मुसलमानांच्या भ्रष्टीकरण कार्याला पायबंद घालणारी असल्यामुळें मुसलमानांना ती फार वोचूं लागली. अेकादा बाटलेला व धर्मश्रष्ट होअून मुसलमान झालेला जर पुनः परत आपल्या धर्मांत परत गेला तर त्याला 'मुरतीद' 'मुस्लिम मत विरोधक' असें समजलें जातें. त्याविषयीं हिंदुमुसलमान अेकीचे भोक्ते मौ. अब्दुलबारीनें अेक कुराणाज्ञा (फतवा) प्रसिद्धिली. त्यांत ते म्हणतात "**जी व्यक्ति मुसलमानांना पुन्हां शुद्ध करील वा स्वतः शुद्ध होअील ती मुरतिद (अिस्लामविरोधक) आहे. अशा मनुष्याशीं कधींहि मैत्री होणें शक्य नाहीं. म्हणजे तो शत्रूच होतो. साप नि विंचू यांच्यावरोवर अेक वेळ स्नेह होईल पण 'मुरतीद' म्हणजे अिस्लामविरोधक त्याचें समर्थन करणाऱ्याशीं संधि (मित्रता) होअूं शकत नाहीं. तो प्राणदंडालाच योग्य. त्याला ठार मारलाच पाहिजे. मुरतिद स्त्री असली तरी तिलासुद्धां ठार करावयाला चिंता नाहीं.**" आणखी पुढें म्हणतात कीं कुराणाज्ञानुसार मी असा फतवा देअीन कीं "मुरतीदला तीस दिवसांचा अवधि द्यावा, तेवढ्या अवधींत जर तो तोबा करून (पश्चात्तापानें) परत अिस्लाममध्यें येणार नाहीं तर त्याला ठार करून टाकावें." या नि अितर गोष्टी हिंदुमुस्लिम अेकीविषेडे गांधीच्या दृष्टीला लाला लजपतराय नि स्वामी श्रद्धानंद यांनीं आणली नि यांच्या कपटयुक्त्या नि आंतबाहेरचे दुटप्पी वर्तनाविषयीं सांगितलें तेव्हां गांधी म्हणाले कीं, "अब्दुलबारी हे भयंकर मित्र होअूं शकतीक. पण माझे म्हणणें ते मित्र आहेत.....मौलाना अब्दुलबारी

हे ईश्वराचे सरस हृदय पुत्र आहेत. त्यांना कपट कौशल ठाऊक नाहीं" त्यांच्या हिंसक फतव्याविषयीं या अहिंसकाला खंति वाटली नाहीं.

(२) **हकीम अजमलखान:**—कर्णावती (अमदाबाद) येथें भरलेल्या खिलाफतपरिषदेचे आणि कॉंग्रेसचेहि अध्यक्ष असतां म्हणाले होते कीं "अेका टोकाला हिंदुस्थान नि दुसऱ्या टोकाला आशिया मायनर (टर्की धरून) या मधील **मुसलमानीं प्रदेशासह मोठें 'मुस्लिम संयुक्त संस्थान' रूपानें अेक प्रचंड शक्ति हळुहळू पण निश्चयानें अस्तित्वांत येत आहे.**" म्हणजे हिंदुस्थानहि या मुस्लिम राज्य संघाला मिळून देण्याची हावच नाहीं कां?

(३) **सर अकबर हैदरी:**—(हैद्राबाद) भागानगरचे मुख्य प्रधान हे सरसीमाप्रांतांतील मुसलमानांना भेट द्यावयास गेले होते. आफ्रिडी लोकांचा मुख्य पुढारी महमद जमालखान हा अकबर हैदरींना म्हणाला "**हैद्राबाद-संस्थान नि सीमाप्रांतीय मुसलमान जाती यांना जोडणारे तुम्ही बुद्धिमान दुवा आहांत. माझी अशी अिच्छा आहे कीं आमचे हैद्राबादशीं जोडणारे मार्ग अगदीं सरळ नि मोकळेपणाचे असावेत**" हैदरी तेथें गेले तेव्हां पेशावरपासून पुढें २५ मैलांवर सरदार सादुल्लाखान यांना भेटावयास गेले, त्यावेळीं मार्गांत स्थलोस्थलीं हजारो पठाण जमातीनीं जमून त्यांचें प्रेमानें स्वागत केलें अिस्लामिया कॉलेजमधील समारंभांत मुल्लामौलवींच्या अुत्साहाला भरती आलेली होती. तेथील भाषणांत हैदरी म्हणतात "ही जागा हैद्राबादपासून दोन हजार मैल दूर आहे. परंतु आपण विशेष संबंधानें अेकमेकांशीं निबद्ध होअून अेकमेकांच्या खूप जवळ होऊन बसलेलों आहोंत. तसें नसतें तर मीं अितक्या लांब येण्याचा त्रास घेतलाच नसता. मला तुम्हांला जसें कांहीं ममत्वांच्या प्रेमांतील मंडळीप्रमाणें भेटावेसें वाटतें कारण आपलेमध्यें जोडणारा अेक पवित्र संबंध आहे. अिस्लामिया कॉलेजच्या विद्यार्थ्यांवर फार मोठें दायित्व आहे, आणि आशा आहे कीं तुम्हीं ते दायित्व पूर्णपणें पार पाडाल. **हिंदुस्थानांत निरनिराळ्या जाती-अुपजातींना अिस्लामचा अुपदेश करण्याचें कार्य करावयाचें आहे.** (**भाषणाच्या शेवटीं म्हणतात**)

हिंदुस्थानांतील मुसलमानांचे हिंदुस्थानावाहेरील मुसलमान लोकांशीं संबंध टिकविणारे आणि हिंदुस्थानची सुरक्षिति राखली जाण्याच्या मुख्य प्रवेशद्वारावरील प्रहरी (पहारेकरी) हीं दोन्हींहि कार्यें तुम्हांस पार पडावयाचीं आहेत.'' या शेवटच्या अधोरेखित लिखाणाचा अर्थ वाचकांनीं नीटपणें लक्षांत घ्यावा. महमद जमालखान आफ्रिडी पुढारी यांचें उत्तर आतांच मागें उल्लेखित केलें आहे. त्यांतच तो पुढें म्हणाला. **'' आमची परिस्थिति अशी आहे कीं आम्हांला निश्चित धोरण असें कांहीं आंखणें शक्य होत नाहीं. तरीपण हिज अेक्झाल्टेड हायनेस निझामशाहांना आम्हां सीमाप्रांतीय जातींच्या वतीनें कळवा कीं आम्हीं सदासर्वदा आमच्या सर्व सामग्री नि साधनांसह त्यांच्या सेवेसाठीं सादर राहूं.** यानंतर मोहबतखान मशिदींत तेथील पठाण जातींच्या प्रमुख पुढाऱ्याशीं हैदरींचें पुष्कळ गुप्त खलबत झालें. वरील उत्तरांप्रत्युत्तरांवरून तें खलबत काय असावें हें कळणें कांहीं कठीण आहे काय ? याचवेळीं **आफ्रिडी जातीचा मुख्य अधिपति महमद जमाल म्हणाला '' निझामसाहेबांच्या प्रधानांनीं येथें यावें या गोष्टीमुळें आम्हांला फार हुरूप आला आहे आणि आमच्या जवळील सर्व प्रकारची सामुग्री नि आमची सेवा ही हैद्राबाद निझामचरणीं पूर्णपणें समर्पित केलेली आहे. आणि या आमच्या विनंतीची स्वीकृति झाल्यास अेका मोठ्या मुस्लिम संस्थानाशीं अनेक प्रदेशीं आमचे अेकीकरण झालेलें दिसून येअील.** ज्या जीनांचें निझामशीं दोन तास गुप्त खलबत, नंतर निझामचे प्रधान हैदरींची सीमाप्रांताला भेट, तेथील प्रमुखांचीं अुत्तरें, त्यांत हैद्राबादचा संबंध अफगाणिस्तान, अिराण, टर्की जुळून परस्पर साह्यकारितेचीं त्यांचीं स्वप्नें या गोष्टीकडे विशेषपणें लक्ष दिलें पाहिजे. (गां. मु. कांस्पिरसी पृ. २८–३१)

(४) **अबुल कलाम अझाद** काँग्रेसचे सांप्रतचे अध्यक्ष अेकदां म्हणाले होते कीं **'' मुस्लिमेतर राज्याविरुद्ध अिस्लामचे आज्ञानुसार केवळ तरवार, यश येअीपर्यंतचे दीर्घकालीन युद्ध नि शिरच्छेद याच गोष्टी मुसलमानांनीं करीत राहिलें पाहिजे ''** मध्यवर्ती विधिमंडळांत

२६ जून १९३८ मध्यें काजी महमद काजिमी–मौ. महंमदअल्लीचा शिष्य– स्पष्टपणें म्हणतात "**१८६४ मध्यें मुसलमानी न्याय करणाऱ्या काझींचें न्यायालय हिंदुस्थानांतून नाहींसें केल्यानंतर खरेंखुरें आंदोलन हिंदुस्थानांत चालूं झालेलें आहे. त्यावेळेपासून मुसलमानांनीं तें सारखें जिवंत ठेवून असें ठरविलें कीं हिंदुस्थान ही अिस्लामभूमि राहिली नाहीं, ती दार–अुल–अयन म्हणजे मित्रभूमिहि राहिली नाहीं. पण निश्चितपणें शत्रुभूमि ठरली आहे. आणि तदनुसार आमच्या कांहीं प्रार्थना ही भूमि शत्रुभूमि आहे या दृष्टीनेंच अद्यापपर्यंत होत असतात.**" मुसलमानांच्या या प्रकारच्या दृष्टिकोनामुळें अद्यापपर्यंत त्यांच्या सर्व हालचाली, आंदोलनें, चळवळी याच अेका भूमिकेवरून चाललेल्या असल्याचा अुल्लेख सर मिचायल ओडवायर यांनीं 'अिंडिया अॅज आय न्यू' या पुस्तकांत नि 'रावलात रिपोर्ट'मध्यें भरपूर आहे. (गांधी मुस्लिम कान्स्पेरसी पृ. ६५–६७)

(५) **खिलापत परिषद १९२६ चें अितिबृत्तः**—त्या परिषदेंत हिंदूविरुद्ध मुसलमानी मन अितकें खवळलें गेलें होतें कीं अेका वक्त्यानें त्यावेळच्या रीतीप्रमाणें 'हिंदूभाअी' असें म्हणतांच सभेंत कोलाहल माजला. **काफिराला 'भाअी' म्हणणें आम्हाला खपणार नाहीं. काफीर भाअी (भाअू) होअूं शकत नाहीं असें अुद्घोषून ठरावांतील शब्दरचना भाअी हिंदू हा शब्द टाळून केलेली आहे. या विरोधकांत अल्लीबंधू–गांधींचे परमशिष्य नि मित्र म्हणविणारेहि समाविष्ट होते.** (गांधी मुस्लीम कान्स्पेरसी पृ. १६३)

(६) दिल्ली येथें ३१ डिसेंबर १९२६ ला तघलीघ (मुस्लिमी) करण परिषद झाली. त्यांत **ब्या. अहमद अमीनचें** म्हणणें असें झालें कीं "**सर्व वस्तू मुसलमानांनी मुसलमानांकडूनच घ्याव्यात. प्रत्येक मुसलमानानें आपल्या आयुष्यांत प्रत्येक दहा वर्षांत तीन तरी हिंदू बाटविले पाहिजेत आणि याप्रमाणें..... मुसलमानांची संख्या १५ कोटी करावी म्हणजे हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल त्यावेळीं सर्व सूत्रें मुसलमानांच्या हातीं येतील.**" (हिंदु

समाजदर्शन पृ. २७) दिल्लीस डाक्याचे नबाबाच्या अध्यक्षतेखालीं मुसलमान परिषद झाली. त्यांत अेक मुसलमान म्हणाला (पंडित मालवीय आदिक हिंदुपुढाऱ्यांच्या विरोधाविषयीं म्हणाला) **कुत्रे पिसाळतात त्यावेळीं त्यांना गोळ्या घालून ठार मारतात. या नामधारी (हिंदू) पुढाऱ्यांच्या धमक्या तरी, तुम्हीं दावून टाका.** (हिंदु समाजदर्शन पृ. ८८)

(७) **मौलाना अझाद सोभानी** सिलहट येथील २७ जानेवारी १९३९ च्या परिषदेंतील भाषणांत म्हणतात **" हिंदुस्थानांतून अिंग्लिशांना हुसकून द्यावें असें वाटणारा जर कोणी पुढारी असेल तर तो मी आहे. असें असूनहि माझें असें म्हणणें आहे कीं, मुस्लिम लीगनें अिंग्लिशांशीं लढा ठाणूं नये. आपला सांप्रतचा मोठा लढा हा आपल्या २२ कोटी हिंदू शत्रूंशीं आहे. केवळ ४॥ कोटी अिंग्लिशांनीं प्रबल बनून जवळ जवळ सबंध जग गिळीत आणलें आहे. जर हे बुद्धिवान्, विद्वान, नि संपतिमान् असलेले २२॥ कोटी हिंदू प्रबळ झाले तर सर्व हिंदुस्थानांतील मुस्लिम अिंडिया खाऊन टाकतील. अितकेंच नव्हें तर अीजिप्त, टर्की, काबुल, मक्का, मदिना आणि अितर मुसलमान प्रदेश गिळंकृत करतील. अिंग्लिश हळुहळू दुर्बल होत चालले आहेत...थोड्याच कालांत ते हिंदुस्थानांतून निघून जातील. म्हणून सर्वांतून मोठे असलेले आपले शत्रू जे हिंदू त्यांच्याशीं जर आपण आतांपासून संघर्ष करून त्यांना दुर्बल बनविलें नाहीं तर ते हिंदुस्थानांतच 'रामराज्य' स्थापून राहणार नाहीं तर सर्व पृथ्वीवर त्याचा प्रसार करतील. त्यांना दुर्बल करणें वा सबळ होअूं देणें हें ९ कोटी मुसलमानांचे हातीं आहे. म्हणून प्रत्येक मुसलमानांनीं मुस्लिम लीगला मिळावें नि हिंदूंना येथें सुप्रतिष्ठित होअूं देअूं नये. त्यामुळें अिंग्लिश येथून निघून जातांच आपण येथें मुस्लिम राज्याची स्थापना करण्यास समर्थ होअूं.....सावध रहा नि २२ कोटी हिंदूंच्या पाशांत सांपडूं नका. "** (थाटस् ऑन पाकिस्थान पृ. २७०)

(८) "(अ) बंगाल, आसाम, पंजाब, सिंध आदिक भाग पाकिस्थान म्हणून वेगळे केल्यानंतर बाकी प्रांतांत अुरलेले अडीच पावणे तीन कोटी मुसलमानांना पाकिस्थान प्रदेशांत नेणें अिष्ट नाहीं. कारण तसें केलें तर हिंदूप्रांतांत मुसलमान मुळींच न अुरून त्या त्या प्रांतांत हिंदूंना मुसलमान करण्याचें काम बंद पडेल नि हिंदुस्थान मुस्लिम करण्याचें कार्य साधणार नाहीं. म्हणून त्यांना आहेत तेथें राहूं दिले पाहिजेत." (**कान्फिडरेसी ऑफ अिंडियाकर्ते** पृ. ४) **(आ) हिंदुस्थानपासून मुस्लिम अिंडिया वेगळा करण्याचें कार्यीं होणाऱ्या हिंदूंविरोधाला सर्व प्रकारच्या अुपायांची पराकाष्ठा करीत नि वाटेल त्या (वैधावैध) युक्त्या-प्रयुक्त्या योजीत चेचून टाकलाच पाहिजे. आणि असें करण्याचा त्यांचा हक्कच आहे.**

(९) (अ) कान्फिडेरसी ऑफ अिंडिया या पुस्तकाचे कर्ते **'पंजाबी'** पृ. ८८ नि ८९ मध्यें म्हणतातः—**' मुसलमान आधीं मुसलमान नि मागाहून हिंदी अथवा आधीं हिंदी नि नंतर मुसलमान असें होणें शक्यच नाहीं.'** याचा अर्थ अुघड आहे कीं **आधीं नि मागून ते मुसलमानाचे मुसलमानच राहतील. त्यांचा मुसलमानीपणा** किंचित्सुद्धां कमी वा सौम्य होणार नाहीं. पुढें म्हणतात, " अन्य जातीयांसमवेत आमचें राज्य—यंत्र असें होअूंच शकत नाहीं. आमचें म्हणजे मुस्लिम राज्य शुद्ध मुसलमानमयच असलें पाहिजे. (आ) पाकिस्तान हें मुसलमानांना मिळाल्यावरसुद्धां अुरलेल्या हिंदुस्थानशीं मिळून संयुक्त सरकार स्थापन करण्यास अेका अटीवर आम्ही सिद्ध आहोंत. नि ती अट म्हणजे हिंदू हिंदुस्थानांत जातीय चळवळ म्हणजे अर्थात् हिंदुत्वाची चळवळ होतां कामा नये. (मुसलमानी चळवळ मात्र चालली आहे तशी चालूच राहील.) असें पंजाबी आपले वरील पुस्तकांत लिहितात. (अि) " पाकिस्तानचा हेतु, केवळ हिंदु—मुसलमानांचें विभक्तिकरणच नसून अेका स्वतंत्र मुस्लिम राज्याची निर्मिति हा आहे. कॉंग्रेस-प्रमाणें राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं मुसलमान झुकेले नाहींत. त्यांना

धार्मिक स्वातंत्र्य हवें. हेंच त्यांचें स्वराज्य. मुसलमानांची सर्वांगीण अुन्नति करावयाची असेल तर ती त्यांच्या धर्मवृक्षाच्या वाढीवर अवलंबून आहे. धर्मप्रसार शक्य तितक्या लवकर केला पाहिजे. यासाठींच हिंदुस्थान वाटून हवा. पाकिस्तानची राज्यव्यवस्था कुराणाधारें केल्यानेंच या सर्व गोष्टी सिद्ध होणार आहेत..." (कान्फिडेरसी ऑफ अिं.)

(१०) जमिनींत अर्धें पुरणें, दगडांनीं ठेचणें, कड्यावरून लोटणें, फटके मारणें, आदिक शिक्षांचा अवलंब पाकिस्तान सरकार करील. मुस्लिम धर्मद्वेष्ट्याला फांशीची शिक्षा दिली जाअील. छायाचित्रकला, बोलपट आदिक व्यवसाय नि हिंदूप्रमाणें धोतर-लुगडें नेसणें, लग्नविधी करणें, दाढी करणें, गोषा न पाळणें, अित्यादि अपराध करणाऱ्यांना कडक शिक्षा ठोठावल्या जातील. (पाकिस्तान और मुसलमान पृ. १९८)

अुक्तींच्या अनुसारें होणाऱ्या
कांहीं विशेष कृतींचीं अुदाहरणें

भ्रष्टीकरणार्थ मुसलमानांचे अचाट प्रयत्न हिंदुस्थानांत पूर्वी त्यांच्या राजवटींत प्रामुख्यानें बलात्कारी अत्याचारांच्याद्वारा झाले. अितर अुपायांचाहि अवलंब झाला पण त्यांचें प्रमाण फार मोठें नव्हतें. पण मुसलमानी सत्ता नष्ट झाल्यावर नि पुढें अिंग्लिश राजवटींत कपटीयुक्त्या, फसवणुकी, भोळ्या हिंदूंच्या धर्मभक्तीचा लाभ घेत छद्मीपणें भ्रष्टीकरण चालविणें, अित्यादिमार्गें लाखों हिंदूंना आतांपर्यंत भ्रष्ट केलें गेलें आहे. या त्यांच्या युक्त्या, कपटपाटव, वाममार्ग अित्यादिविषयीं ज्याला माहिती पाहिजे असेल त्यांनीं 'दाअिये अिस्लाम' दिल्लीचे कुख्यात हसन निझामीनीं लिहिलेलें (याचें मराठी भाषांतर संक्षेपतः 'भयसूचक घंटा' या नांवानें प्रसिद्ध केलें आहे) त्यांत भ्रष्टीकरणाचें कार्य कसकसें करावें हें मुसलमान समाजाच्या प्रत्येक वर्गाच्या लोकांना सविस्तरपणें समजावून दिलेलें आहे. त्यांत १ शेखलोक, २ मुल्ला मौलवी, ३ संस्थानिक नि सत्ताधारी, ४ शेतकरी, ५ शिल्पी (सुतार, लोहार, घिसाडी, पिंजारी, फेरीवाले, खेळ बनवणारे अित्यादि) ६ अगदीं

क्षुल्लक नोकरी करणाऱ्यापासून तो वरिष्ठांत वरिष्ठ नोकरी करणाऱ्यापर्यंतचा पोलिसांसह सर्व नोकरवर्ग, ७ राजनैतिक जेष्ठवर्ग (पुढारी)–संपादक–लेखक–पुस्तक प्रकाशक आदिक, ८ डाक्टर नि हकीम (मुसलमानी वैद्यकी करणारे) ९ गायक–तमाशेवाले–बोलपटवाले–नाटककार आदिक, १० फकीर, ११ वार्ताहर (बातमीदार), १२ वेश्या नि सुअिणी, १३ दुकानदार नि व्यापार करणारे, थोडक्यांत म्हणावयाचें तर मुसलमान समाजांतील प्रत्येक प्रकारच्या लहानमोठ्या व्यवसायांतील मुसलमान मात्र व्यक्तीनें काय काय युक्त्यांनीं हिंदूंचें भ्रष्टीकरण करणें, त्यांना साह्य करणें, तें पचविणें आदिक गोष्टी करणें आणि तें सर्व कसें करावें हें सविस्तरपणें या पुस्तकांत सांगितलें आहे. पण किती हीन प्रतीचें मार्ग अवलंबावयास मुसलमानी मन प्रवृत्त होतें हें कळण्यास अेकदोन प्रकार येथें देणें अवश्य वाटते. हिंदूमधील अज्ञानी नि विशेषतः स्त्रिया यांचा माळ, गंडे, ताअीत, अभिमंत्रित पाणी, अित्यादि गोष्टींवर विश्वास फार असतो. कोणी रोगाकरितां, कोणी सांसारिक अडचणीकरितां, कोणी संततिकरितां गंडे दोरे देणाऱ्यांचे कच्छपी लागतात. त्यांना त्यांचा कपट कावा कळत नाहीं. गंडे दोरे नि अभिमंत्रित म्हणून पाणी देते वेळीं हे फाकेफुके फकीर नि भोंदू लोक हिंदू अज्ञानी पुरुष नि स्त्रिया भ्रष्ट करून मुसलमानीकडे त्यांना ओढण्यासाठीं असे हिंदुधर्मानें निषिद्ध केलेले विविध आचार नि प्रकार करावयास सांगून त्यांचें मन मुसलमानीपणाकडे ओढतात. पाणी अभिमंत्रून देते वेळीं त्यांत थुंकून, वा घाम मिसळून वा घाणेरडें ×× संमिश्र करून बायामुलांना प्यावयास सांगतात. आणि हें त्यांना सांगून सवरून. हेतु हा कीं आपणांला मुसलमानीपणा कांहीं परका नाहीं–अुलट अत्यंत निकट आहे असें वाटावें, नि त्यामुळें लवकर वा अुशिरा त्यांचें मत मुसलमानांकडे वेधवून घेअून भ्रष्टीकरणांत यश मिळावें. हा अनुभव जेथें जेथें मुसलमान फकिरापीरांचा गोंधळ आहे तेथील हिंदूंना माहीत आहे. पुढील अुदाहरण तर याहूनहि अधिक तामसी वृत्तीचें आहे. हिंदुस्थानांत आपलें मत हिंदूंमध्यें प्रसृत करून आपली संख्या वाढवावी–हिंदूंची संख्या घटवावी यासाठीं मुसलमान समाज सर्वप्रकारें प्रयत्नशील आहे ! बुद्धिवादाच्या भूमिकेवरून वादविवाद वा योग्य पद्धतीच्या अुपदेश मार्गानें मुसलमान वा अितर कोणीहि धर्ममती लोक हिंदुस्थानांत

प्रयत्न करीत राहिल्यास हिंदू त्यांचेविषयीं खंति वाळगणार नाहींत. परंतु या पद्धतीनें प्रयत्न करून यश मिळण्याअितकें बुद्धिग्राही तत्त्वज्ञान वा ज्ञानसंग्रह त्यांचेजवळ नसल्यामुळें आणि या भूमिकेवरून हिंदुतत्त्वज्ञानावर नि ज्ञानमत्तेवर मात करणें त्यांना शक्य नसल्यामुळें त्यांना आपापल्या मतप्रसाराकरितां बौद्धिक क्षेत्राव्यतिरिक्त अितर मार्गानें नि पद्धतीनें प्रयत्न करावे लागतात, धर्माचा संबंध मनबुद्धीशीं आहे. आणि अेखाद्याला बुद्धीला पटवून देअून आपले धर्मपंथ वा मतें स्वीकारावयास प्रवृत्त केलें तर त्याविषयीं वाअीट वाटणें वा अिर्षा बाळगणें अयोग्य म्हणतां येअील. पण तसें करतां येत नाहीं नि आपले धर्ममताचा तर प्रसार करावयाचाच हा हट्ट सोडतां येत नाहीं म्हणून वाममार्गाचे छल, कपट, फसवाफसवी, अत्याचारादि हीन अुपाय धर्मसंबंधांत अुपयोजणें हें केव्हांहि निंद्य नि गर्ह्य आहे. पण दुर्दैवानें तसेच मार्ग हीं धर्म मतें—अिस्लाम, ख्रिस्ती, आदिक—अवलंबीत आहेत ही जगावरील अेक महान् आपत्तीच आहे. व आतां तशाच मार्गांपैकीं अेका घृणित नि अेक प्रकारे दुष्ट अशा मार्गाचें वर्णन करावयाचें आहे. हसननिझामी, पीरमाटामिया आदिक पाताळयंत्री लोकांनीं जे अनेक अुपाय आपल्या मार्गाच्या अवलंबनद्वारा मुस्लिम मतप्रचार करावयास निघालेल्यांना सांगितलें आहेत त्यापैकीं अेक अुपाय असा आहे : हिंदू स्त्रियांमध्यें ज्या अनेक प्रकारें अिस्लामीकरण वा हिंदूंची संख्या कमी करण्याचें काम चाललें आहे त्यांत काम करणाऱ्या कांहीं मुसलमान सुअिणींची योजना केलेली आहे. **त्या सुअिणी या मुस्लीम नेत्यांच्याकडून सांगितलें नि शिकविलें गेल्याप्रमाणें ज्या ज्या स्थळीं हिंदुस्त्रियांच्या बाळंतपणामध्यें सुअिणीचें काम करावयाला जातात तेथें तेथें (वा क्वचित् स्थळीं लाचलुचपत देअून हिंदू सुअिणीकडूनहि) त्या त्या हिंदुस्त्रियांची प्रसवशक्ति—गर्भधारणशक्ति आदिक—नष्ट करण्यासाठीं त्या मुसलमानी सुअिणी त्यांच्या गुह्यस्थानीं विशिष्ट औषधी प्रविष्ट करून त्या हिंदुस्त्रियांची प्रसवशक्ति नष्ट करतात. हें कसें करावें याचें शिक्षण त्या त्या सुअिणींना दिलें जातें. अशा कांहीं गोष्टी अिंद्रगड तालुक्यांत अुघडकीस आल्या होत्या** (स्वधर्म १४ मे १९२५). या अनेकविध अुपायांनीं होणाऱ्या भ्रष्टीकरणाची गति

भयंकर प्रमाणांत हिंदूंचा ग्रास करीत चालली आहे. हा क्षय कोणाहि हिंदुत्वनिष्ठ व्यक्तीच्या मनांत हिंदू ज्ञातीची मरणशंका अुत्पन्न केल्यावांचून रहाणार नाहीं. या अनर्थाचें अेक मुख्य कारण हिंदूंचीं मनें विपर्यस्त राष्ट्रीयतेच्या रोगानें ग्रस्त होअून हिंदुत्वाचे अस्तित्वावर निखारे ठेवण्यास प्रवृत्त झालेलीं होतीं यावांचून दुसरें कोणतें असूं शकणार ? जगांतली कोणती जाती वा त्या जातीचे पुढारी आपल्या जातीचा असा भयंकर क्षय होत असलेला पाहूं शकत असतील ? ही हिंदुहितघातक नि हिंदूजातिमारक अपराधी वृत्ति केवळ कॉंग्रेसी राष्ट्रीयतेनें अुत्पन्न करून हिंदूराष्ट्राला आत्महत्येच्या महापातकाला प्रवृत्त केलें आहे. या कॉंग्रेसी 'राष्ट्रीयते'ची होळी जितक्या लवकर पेटेल नी जळून भस्मसात् होअील तितकें हिंदुराष्ट्राच्या सुरक्षितीसाठीं अत्यावश्य आहे. सिंध, बंगाल, सीमा प्रांत, पंजाब आदीप्रांतामध्यें मुस्लिमीकरण अनेक प्रकारें केलें जात आहे. शाळेमध्यें अितिहास बदलून टाकलेले, हिंदू मुलांनाहि कुराणाची शिकवण भाग पाडिलेली, (मुसलमान विद्यार्थ्यांना कुराण शिकविण्याचे बहाण्यानें हिंदू मुलें विपुल असलेल्या शाळेमधून) हिंदूविरुद्ध मुसलमानांचीं मनें भडकतील असें मासिकांतून लेख, अकबराची निंदा नि अवरंगजेबाचा 'अुदो अुदो' अित्यादि प्रकारें मतवेड्या लोकांच्या लहरीला मान्य होतील अशा सुधारणा क्रमिक पुस्तकांत होत आहेत. सिंधी भाषेंत संस्कृतपासून आलेले १२००० शब्द आहेत (कारण हिंदुस्थानच्या सर्व भाषांचा नि मूल संबंध संस्कृताशी आहे.) नि पर्शियनचे ३ हजार (मुसलमानांच्या राजसत्तेनंतर आलेले) आहेत. पण संस्कृतोत्पन्न शब्द काढून टाकून पर्शियन शब्द घालण्याचा त्यानें सपाटा चालविला आहे. शालोपयोगी पुस्तकांतून नी नवीन वाङ्मयांतून हा प्रकार सरसहा चालूं झाला आहे, हिंदुसंस्था असलेल्या स्थानाजवळच मशिदी होत आहेत. पोलिसमध्यें मुसलमान भरणा फार असल्यामुळें हिंदूंना न्याय मिळणें दुरापास्त होअून हिंदूंना आपल्या जीविताची शंका वाटत आहे. 'न्यायाची नुसती बतावणी करून देखील यापुढें राज्यकारभार चालविणें अशक्य झालें आहे असें अिंग्लिश अधिकारीसुद्धां घरगुती बोलण्यांत प्रांजलपणें सांगतात. (अिंडियन डेली मेल २२ नोव्हेंबर १९२५)

(२) मुसलमान जेव्हां जेव्हां आमच्या धर्मभावना दुखवतात म्हणून म्हणतात तेव्हां तेव्हां तें म्हणणें खरें धरलें तरी, अथवा अुकरून भांडणें काढण्याला निमित्त म्हणून पुढें करीत असले तरीहि त्या त्या कारणा वा निमित्ताला कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत होतील याला कांहींहि मर्यादा असणें वा कल्पिणें शक्य राहिलें नाहीं असेंच निगमन अपरिहार्यतेनें काढावयास लावणाऱ्या घटना घडलेल्या आहेत. त्यापैकीं कांहीं थोड्या घटना पुढीलप्रमाणें आहेत. आत्तांपर्यंत मुसलमान लोक मशिदीपुढील वाद्यानांचे बंदी करा म्हणत होते पण कलकत्त्यांत कांहीं मुसलमानांनीं यापुढें जाअून अेक नवीन अुपक्रम केला. त्यांनीं आपल्या अेका मोठ्या सभेंत अेक ठराव संमत करून घेतला—**" हदीस नि कुराण यांच्या दृष्टीनें ज्या अर्थीं मूर्तिपूजा हें पाप आहे त्या अर्थीं राजमार्गावरून मूर्ति मिरवल्या जाण्यामुळें मुसलमानी धर्ममतीयांचें मनावर आघात होतो. त्याकरितां ही सभा सरकारला अशी विनंति करते कीं मुसलमानी** मताचा विचार करून असल्या मिरवणुकी बंद केल्या पाहिजेत". पुढें त्यांचें असें ठरलें कीं याप्रमाणें केलें गेलें नाहीं तर आपणच या प्रकाराला आळा घातला पाहिजे. कारण आपल्या दृष्टीपुढें मूर्तीचा मान पूजा अित्यादि होत असतां–अमुक स्थळीं मूर्तीची मानमान्यता होत आहे हें कळत असतांहि–ती गोष्ट होअूं देणें हें अत्यंत पतित वृत्तीचें लक्षण आहे. त्यामुळें आपण पतित होअूं. यासाठीं आपण अितर साधनांनीं ही गोष्ट बंद होत नाहींसें झाल्यास–आपल्या स्वतःच्या प्रयत्नांचे बळावर तें सर्व बंद करणें हें आपणांला आवश्यकच आहे. (हिंदू संसार १७।८।२५)

(३) मतवेडाची आणखी अेक वानगी–कराची येथील नगर संस्थेंत (म्युनिसिपालिटींत) " राजमार्गावरील कराचीमधील मुन्या (लव्वी करायच्या मोऱ्या) पश्चिमेस मक्का (मुसलमानी धर्ममतस्थान) असल्यामुळें त्या दिशेकडे तोंड करून अुभारल्या जाअूं नयेत." असा ठराव झाला.

(४) देशी संस्थानमधीलहि अेक वानगी म्हणून झालेली घटना अशी. जयपुर हे राजपूत म्हणजेच हिंदू संस्थान. शितावरून भाताची परिक्षा या न्यायानें

हिंदू मनोवृत्तिप्रमाणेंच हिंदू संस्थानिकांचीहि वृत्ति आहे यांत आश्चर्य कसलें ? मुसलमानी संस्थानांत मुसलमान राजे म्हणून तेथें मुसलमानी अधिकाऱ्याची रेलचेल. हिंदू संस्थानांत आत्मविस्मृत नि परधार्जिण्या हिंदूमनोवृत्तीचे हिंदूराजे मुसलमानांच्या हातीं अधिकारपदें गेलेलीं. जयपुरमध्यें लालसोट गांवांत येक मंदिर आहे तें घेण्याची लहर मुसलमानांना आली. त्यांनीं ती मशीद आहे नि ती आमचे स्वाधीन करावी म्हणून मागणी केली. न्यायालयांतून हिंदूंना अनुकूल निर्णय लागला तरीहि मुसलमानांना त्याचें काय ? त्यांनीं तें देवालय बल-प्रयोगानें स्वाधीन करून घेण्याचें ठरविलें. ही 'जिहादी' सेना मंदिरावर चालून गेली. पण तेथें हिंदूहि देवालय संरक्षणार्थ सिद्धच होते. अर्थात् जेव्हां हिंदू सावध नि सिद्ध असतात तेथें त्यांचे हक्क नि स्वत्व हरण कोणालाच करतां येत नाहीं. अर्थात् मुसलमानांचा प्रयत्न व्यर्थ झाला. पण पुढें या विफल मनोरथ केल्याचा हिंदूंवर सूड घेण्यासाठीं मुसलमानांनीं मागाहून फार क्रूरपणानें असावधानतेंत आक्रमण केलें. त्यांत हिंदूंवर अनेक प्रकारचे अत्याचार करण्यांत आले. मुसलमानांना अनुकूल अशीं वक्तव्यें मुसलमान अधिकाऱ्याच्या बळावर घेतलीं गेलीं. नि अत्याचाराचे पुरावे नष्ट करून टाकतात. या संस्थानांत अुच्च पदाधिकारी मुसलमान आहेत. त्यांच्या वर्चस्वामुळें जयपुरमध्यें मुसलमान काय वाटेल तें करूं शकतात. (अर्जुन ११।१।२५)

(५) बंगालप्रांतिक परिषद भरली होती. तेथें पुष्कळ पुढारी होते. श्री लहिरी स्वागताध्यक्ष या नात्यानें भाषणांत म्हणाले, १ **" मुसलमानेतरांनीं–हिंदू आदिक अितर लोकांनीं–सुद्धां मुसलमान शरियतलाच (निर्बंध नि न्याय पद्धति) मान तुकविली पाहिजे. २ आतांपर्यंत मुसलमानांनीं जरी हिंदूंचें भ्रष्टीकरण मागपासून चालू ठेवलें आहे नि ठेवतीलहि; अितर धर्ममतेंहि हिंदूंमधून नि कदाचित मुसलमानांमधून आपले मतांत धर्मांतर करून नेतील तरीपण हिंदूंना मात्र शुद्धीकरणाचा हक्क मुळींच नसावा. ३ मुसलमानांच्या भाषणावरून नि वर्तना-वरून असें स्पष्ट दिसून येतें कीं देवालयादिकांच्या मुसलमानांनीं केलेल्या भ्रष्टाकाराकरितां फार तर हिंदूंनीं निषेध व्यक्त करण्यापर्यंत अुडी मारावी, परंतु हिंदूंच्या हातून प्रतिशोधाच्या**

अवसानांत जर अेखादी मशीद कोठें भ्रष्ट झाली तर मात्र त्याचें पारिपात्य झालेंच पाहिजे. नि त्यासाठीं मुसलमानांच्या तुकड्या (पलटणी) महमद अलीच्या हातांत देअून हिंदूंना शासन करण्यांत यावें असें सर्व मुसलमानांनीं-पुढाऱ्यांसह सर्व मुसलमान समाजानें-अेकमतानें घोषित केलें आहे...'' हें भाषण अेका पुढाऱ्यांनीं दायित्वाच्या स्थानापासून बंगाल प्रांतिक परिषदेसारख्या प्रातिनिधिक सभेंत निश्चितार्थी प्रतिपादन केलें आहे. याचेवर अितर कोणीहि-कॉंग्रेसची अध्यक्षिका सरोजिनी नायडू तेथें अुपस्थित असून त्या अध्यक्षिकेकडूनहि-आक्षेप घेतला गेला नाहीं. मुसलमानांकडूनहि ही गोष्ट नाकारली गेली नाहीं हें लक्षांत घेतलें असतां हें विधान सर्वोपरि सत्य नि प्रत्यक्ष वस्तुस्थितिनिदर्शक आहे हें निश्चित होतें. येवढें येथें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. (बॉंबे क्रानिकल २४।५।२६) (६) **हैद्रावाद (सिंध) १८ जूनला सिंध प्रांतीय खिलाफत कमेटीची बैठक झाली. त्यांत खिलाफत संस्थेंत नसणाऱ्या मुसलमानांनाहिं आमंत्रण होतें, त्यांत पुढील ठराव संमत झाले ते असेः—(अ) अखिल भारतीय खिलाफतला या सभेची विनंति आहे कीं अवरंगजेबाचा नि सिंधमध्यें येअून विजय संपादनद्वारा हिंदुस्थानांत मुसलमानी पाय रोवणारा महम्मद कासिमाचा असे दोन अुत्सव सर्व हिंदुस्थानभर करण्याची व्यवस्था करावी, (आ) कोणत्याहि हिंदू दुकानांतून कोणाहि मुसलमानांनीं कोणतीहि वस्तु घेतां कामा नये.** सिंधमध्यें हैद्राबाद जिल्ह्यांतील वादीन नामक स्थानाहून समाचार आला आहे कीं वाणा मोतीगीर नामक मनुष्य घोड्यावर बसून जात असतां अेका मुसलमानानें दरडावून सांगितलें कीं शेजारच्या मशिदींत कुराण ठेवलेलें आहे आणि त्यापुढून घोड्यावर बसून जाणें म्हणजे कुराणाचा अपमान करण्यासारखें आहे तेव्हां घोड्यावरून तूं जातां कामा नये. पायीं गेलें पाहिजे. बिचाऱ्याला घोडा परतवून दुसऱ्या मार्गानें जावें लागलें. (भारत मित्र २०।६।२६)

(७) प्रोफेसर तारकचंद गज्रा—अेक आर्यसमाजी नि असहकारयोगी (नॉन-को-ऑपरेटर) यांनीं अमदाबादला व्याख्यान दिलें. त्यांत ते म्हणाले

"……शेवटच्या मुसलमानी कालांत शूरत्व, धैर्य, वीरता अित्यादि गुण दिसून येत होते नि त्यांनीं तो लढा यशस्वी पार पाडला. पण आपणां हिंदूंत अेकच अुणीव दिसते नि ती म्हणजे दुही नि संघटनेचा अभाव ही होय. हा सर्व भूतकाल झाला. पण आतांच्या काळांत जर आमचे मुसलमान वंधु त्या निर्मल गंगेवर नि त्या भव्य हिमालयावर प्रेम करतील नि श्रीरामादिकांना आदरभावांनीं वघतील तर मीहि पण त्यांच्या थोरपुरुषांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत त्यांना जाअून मिळेन." अितकें बोलणें झालें नाहीं तोंच खादी टोपीनें युक्त असा गांधींरंगीदेशभक्त मुसलमान वंधु अुसळून अुठला नि म्हणाला 'हजरत अुमरनीं जेव्हां तरवारीच्या वळावर मुसलमानीचा प्रसार केला तेव्हां तुझा सनातनधर्म कोठें गेला होता ?……हिंदूंनीं गोंजारीत गोंजारीत खादी वापरावयाला लावलें (तरी बरें. खादींतील मजुरीचा वराचसा भाग मुसलमानी कोष्ठ्यांचेच खिशांत जातो.) पण आतां पहावें तो स्वामी श्रद्धानंद शुद्धि नि संघटन यांचा अुपदेश करीत आम्हांला विरोध करीत आहे. ही वघ तुझी खादी टोपी, ही मी झुगारून देत आहें" असें म्हणत त्या अेकी करणाऱ्या मुसलमान वंधूंनीं ती खादी टोपी काढून टाकून दूर भिरकावली. (टाअिम्स २७।६।२५)

(८) झाशीस हिंदू बहुसंख्याक असलेमुळें साहजिकच हिंदू प्रतिनिधी अधिक संख्येंत नगरसंस्थेंत (म्युनिसिपालिटींत) निवडून आले. पण हें सहन न होअून तेथें असलेल्या मुसलमान प्रतिनिधींनी "अल्पसंख्येंत आम्हीं असलेमुळें मुसलमान समाजाचें हित आम्हीं साधूं शकणार नाहीं." असें म्हणत आपल्या प्रतिनिधित्वाचीं त्यागपत्रें दिलीं. (३।६।२५)

(९) **आगाखानी कावे**—१ हिंदु-मुसलमानांनीं अस्पृश्यांना अर्धे अर्धे आपसांत वाटून घ्यावें अशी सूचना काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून पुढें मांडण्यास याच कावेबाजानें महमदअल्लीला कोकोनाडा काँग्रेसमध्यें प्रवृत्त केलें. नि त्याप्रमाणें ती सूचना पुढें मांडली गेली. अर्थात् काँग्रेसी हिंदूंनी ती कान फाडून अैकून घेतली. विविध प्रकारच्या भल्याबुऱ्या

अुपायांनीं मुसलमानांची संख्या वाढवावयाची हा अुद्देश पुढें ठेवून अुपयोजलेल्या मार्गांपैकीं अुदाहरणार्थ कांहीं येथें दिले आहेत. हिंदूंचे नअू अवतार मान्य केल्याचें भासवून अल्ली नि त्याचेच वंशज आगाखान हे श्रीकृष्णाचेच अवतार आहेत असें ते सांगतात. आगाखानी मतप्रचाराची माहिती मिळवून पंजाबसिंह कै. लाला लजपतराय यांनीं पीपल् पत्रांत प्रसिद्ध केली त्यांत ते म्हणतातः—अिब्राहिम युसफ यांनीं वैदिक अिस्लाम नांवाचें पुस्तक छापलें आहे. त्यांत आरंभीं आगाखानचें छायाचित्र छापून त्यावर "कलियुगांतील श्रीकृष्णावतार" नि "हिंदुमुसलमान अैक्याचे संस्थापक" असें लिहिलें आहे. त्याखालीं "यदा यदाहि धर्मस्य" अित्यादि हा श्लोक त्यांचे तोंडी घातला आहे. यानंतर पीर शहीअुद्दीन यांच्या 'बुद्ध अवतार' या पुस्तकांत अरबस्थानांतील 'मूर्तिंजा अल्ली' हा दहावा अवतार असून त्यानें अिस्लामधर्मप्रचार केला असें सांगितलें आहे. या व्यतिरिक्त बुद्धानें युधिष्ठिरास भारती युद्धांत घडलेल्या पापक्षालनार्थ गाअीचा यज्ञ करण्यास सांगितलें असें लिहिलें आहे. 'मुख्य दहा अवतार' या सय्यद अिमामशहा यांच्या पुस्तकांत 'अल्ली' हा दहावा अवतार असें सांगितलें नि नामदार आगाखान हे अल्लीपासून ४८ वे पुरुष आहेत असेंहि लिहिलें. आणखी "निष्कलंकी गीता," "कृष्णवाणी," "सत्पंथ शास्त्र" अित्यादि पुस्तकें याच मंडळींकडून निघालीं आहेत. ही सर्व माहिती देअून लालाजी म्हणतात, "या सर्व प्रचारावर आगाखानांचा विश्वास आहे काय?" असला तर ते 'न हिंदू आहेत न मुसलमान आहेत' या कोटींत जातील. आणि विश्वास नसतांहि जर हा असला प्रकार ते चालू देत असतील तर हा मोठाच लपंडाव नि कपटी डाव आहे असें म्हणावें लागेल. याला आगाखानाचें अुत्तर म्हणजे "सबसे चूप भली" हें आहे. या संबंधांत आगाखान तोंड अुघडीत नाहींत. या गोष्टीचा पाठपुरावा करून आगाखानांना अुघडपणें कांहींना कांहीं तरी अुत्तर देण्यास भाग पाडण्याचा अुपक्रम केला तर ते हिंदूसमाजावर अुपकारच होतील. हा सर्व आगाखानी प्रचार म्हणजे भोळ्याभाबड्या हिंदूंना सपशेल फसविण्याचा कपटी कावा नि पाताळयंत्री डावच आहे असें म्हटलें पाहिजे. (केसरी २।७।२६)

(१०) **कलकत्त्याचा दंगाः**—हिंदुस्थानांत मुसलमानांनीं कांहीं केलें तरी त्यावर पांघरुण घालणें, त्याचें समर्थन करणें वा तें शक्य न झालें तर

त्यासंबंधीं मूग गिळणें असें वर्तन सरकारी अधिकारी नि अँग्लो इंडियन पत्रें यांचें असतें. पण या दंग्याचे संबंधांत या दोघांहि जणांना स्पष्टपणें मुसलमांनाना दोषीच ठरवावें लागले आहेत नि म्हणून त्या दोन साक्षी देऊन हिंदुस्थानभर लहान मोठे होणाऱ्या अनेकशः मुसलमानी दंग्यापैकीं कलकत्त्याचा दंगा अुदाहरण म्हणून निवडला आहे. **"दंग्याचें अुत्तरदायित्व सर्वस्वीं मुसलमानांवर आहे. पूर्वी विचार ठरवून हेतुपूर्वक प्रयत्नानें विधि नियमांचें (कायद्याचें) अुल्लंघन करून हा दंगा करण्यांत आलेला आहे. कुराणी आज्ञांच्या ढालीखालीं छपून आपल्या कृत्यांचें समर्थन करण्यानें हें क्रूर, कटु नि स्पष्टपणें सिद्ध झालेलें सत्य झाकतां येणें अशक्य आहे."** (टाअिम्स १७।६।२६) "कलकत्त्यांतील दंग्याचें संपूर्ण अुत्तरदायित्व पूर्णपणें अुत्तेजन देणाऱ्या मुसलमानावरच आहे नि तेच पूर्ण दोषी आहेत." (सिव्हिल अं. मिलिटरी ग्याझेट) "जातीय दंग्यांतील क्रूरता अत्यंत नीचतम प्रकारानें व्यक्त झाली हें स्पष्ट दिसून येतें. युद्धांत वा सामुदायिक द्वंद्वांत धैर्य, स्वार्थत्याग आणि वीरता हीं व्यक्त होण्यास संधि मिळते, असें बहुधा विचार करणाऱ्याला वाटतें. परंतु या दंग्यांत भित्रेपणाचा कळस, नीच स्वार्थ, आणि अधमाधम क्रूरता हीच आम्हांला दिसून आलीं. निरुपद्रवी लोकांना पाठीमागून नकळत भीरूपणानें अनपेक्षित रीतीनें सुऱ्यांनीं भोंसकणें, संन्यासी नि निःसहाय्य वृद्ध लोकांचीं सरसहा हत्याकांडें करणें, कान नि नाकें कापणें, अित्यादि नीच कृत्यांनीं 'शत्रूं'ना 'देमाय' करून टाकण्यांत या 'शूरवीरांनीं' दंग्यांत हातखंडा दाखविण्यांत प्राविण्य सिद्ध केलें. या प्रकारचें पण याहून अत्यंत भयंकर अुदाहरण सरकारी पोलिस प्रतिवृत्तांत स्पष्टपणें प्रसिद्ध केलें आहे तें येणें प्रमाणेः—"जुलै २० दिनांकाला 'सेंट्रल अव्हेन्यू', 'नीलमाधव आळी', 'मुरलीधरसेन आळी' 'कृष्णविहारीसेन आळी' यांतील सर्व घरांच्या खिडक्या, दारें, भुअीपासून दोन फुटपेक्षां अधिक अुंचीपर्यंत भिंती, ज्वालाग्राही तेलांनीं तिंबवून ठेवल्या होत्या. ही सर्व वाजू मारवाडी नि बंगाली हिंदूलोकांनींच वसलेली आहे आणि मोहरमच्या मिरवणुकीच्या वेळीं अेखादीं मशाल फेकीत या सर्व स्थळीं आग लावून देण्याकरितां या

भागांतील तेलाची भिजवणी मुसलमानांनींच केली असली पाहिजे यांत तिळमात्र संशय नाहीं.'' त्या घरांच्या तिन्हीं बाजूच्या आळ्यांतील मार्गावरूनहि तेल खूप मोकळ्या हातानें भरपूर ओतून ठेवलें होतें. घरांतून पळूं पहाणाऱ्या गृहवासीयांना सुरक्षितीसाठीं निघून जाणें अशक्य व्हावें अितकेंच नव्हे तर 'फायर ब्रिगेडला' हि ती आग विझविण्यासाठीं त्या आळ्यांमधून प्रवेश करणें अशक्य होऊन जावें आणि याप्रमाणें वणवा पेटून सर्व लोक त्यांतील वृद्ध, तरुण, बाल, स्त्रिया पुरुषांसह आपल्या घरादारांसुद्धां जळून खाक व्हावींत हाच यांतील स्पष्ट हेतु दिसतो. या भयंकर क्रूर नि कपटी दुष्टपणांतून अेका दैवी घटनेनेंच या विचाऱ्या मनुष्यप्राण्यांचा–हिंदूजिवांचा–प्राणघात नि मत्ताहानि हीं वांचविलीं गेलीं. ज्या रात्रीं मुसलमानांनीं हा अश्वत्थामी अधमाधम घाला घालावयाचें ठरविलें होतें त्या रात्रीं फार जोराची पर्जन्यवृष्टि होअून हा घातुक हेतु सिद्ध करण्याकरितां प्रयत्न करण्याचें काम मुसलमानांना अशक्य होअून गेलें. आणि ही भयंकर नि हृदय-विदारक ठरणारी आपत्ति टळली (ऑगस्ट–माडर्न रिव्ह्यू) जर ही दैवी कृपा होअून पर्जन्यवृष्टि झाली नसती तर हा अधमाधम नि नीचतम क्रूरताजन्य सैतानी (?)–नव्हे तें विशेषण अपुरें पडेल–मुसलमानी अपकृत्योत्पन्न अग्निवृष्टीपासून मानवी प्राण्यांचा नि वित्ताचा नाश झाला असता याची यथार्थ कल्पना वाचकांनीं आपल्या मनोदृष्टीपुढें आणावी--निदानी तसा प्रयत्न तरी करावा म्हणजे अंशतः तरी हिंदूलोकांवरील–निश्चित म्हणावयाला कोणाचें मन हिचकत असेल तर सरतेपदी संभवनीय म्हणून तरी–भावी संकटपरंपरेची कल्पना करतां येअील. (मॉडर्न रिव्ह्यू नोव्हेंबर)

(११) **अेका हिंदूमुलाची (हत्या) कुरवानीः**—ब्रह्मपुर (बंगाल) येथें अेका मुसलमानानें ५ वर्षें वयाच्या हिंदूमुलाला पकडून त्याची कुर्बानी केली (शस्त्रानें भाजीप्रमाणें चरचर चिरला) '' आज ओद आहे

याकरतां कुर्बानी केली' असें तो म्हणाला. ह्या मुसलमानावर अभियोग (खटला) झाला आहे. (महाराष्ट्र १७।२।२६)

(१२) विचित्र म्याजिस्ट्रेटीः—युक्त प्रांतांत अेस. अेन्. जाफ्री नांवाचे मुसलमान फर्स्टक्लास म्याजिस्ट्रेट यांनीं ताबुत रस्त्यावरून जात असतां बाबू रामस्वरूप शारदा कनाल, सब ओव्हरसियर हे, तावुत जात असतां आपल्या चौपाअीवर बसून राहिले अुभे राहिले नाहींत या त्यांच्या अपराधा(?)साठीं १४४ धारेप्रमाणें (कलमाप्रमाणें) नोटीस लावली. नि 'त्यांनीं ५००० रुपयांचें स्वतः जातितारण द्यावें नि ५।५ सहस्रांचें दुसरे दोन गृहस्थांची हमी (जामिनकी) द्यावी.' असा निर्णय दिला. अर्थात् ही शिक्षा अनैबंधिक (बेकायदेशीर) आहे असें ठरवून कलेक्टरनें ती रद्द केली.

आतांपर्यंत जीं १०।१२ अुदाहरणें दिलीं त्यावरून सामान्यतः मुसलमानी मनें हिंदूविषयीं काय भावना धारण करतात, हिंदूकडे कोणत्या दृष्टीनें ते बघतात, हिंदूंशीं कशा प्रकारें वर्तन ठेवूं पहातात नि त्यांचे मनांत कोणकोणते विचार घोळत असावेत याची चांचणी पहाण्यास पुरेशीं आहेत. मुसलमानी कॉंग्रेसी पुढारी, त्यांच्या जातीय स्वार्थसाधक संस्थांचे पुढारी, मुल्ला–मौलवी–मौलाना, त्यांचे अिस्लाम मतप्रचारक, मुसलमानी अधिकारी वर्ग नि सामान्य मुसलमानी समाज (प्यान अिस्लामी अुपदेशानें भारला गेला असता) कसें वर्तन करूं शकतो, हें या अुदाहरणावरून ज्यांना कळून येणार नाहीं, त्यांना कितीहि अुदाहरणें पुढें ठेवलीं तरी 'कळलें' असें होअूं शकणार नाहीं. सर्व प्रकारचा मुसलमानी नेतृवर्ग नि मुसलमान व्यक्तींच्या अुक्तींचा, कृतींचा, अुद्गारांचा, महाभारतासारखा मोठा ग्रंथच होअील अितकी सप्रमाण नि पुराव्यानिशीं सिद्ध करतां येण्यासारखी सामग्री आमचेजवळ आहे, पण ती सर्व पुढें ठेवण्याचें कारण नाहीं, स्थलहि नाहीं नि अुगीच त्याच त्या प्रकारच्या कृतिअुक्ति आदिक वाचीत बसून वांझोट्या वाचनांत वेळाचा अपव्यय करण्याअितकी सवडहि आपणांला नाहीं. म्हणून पुराव्यानिशीं अुदाहरणें देअून साधारणतः यथार्थ कल्पनेनें मुसलमानी मन जाणतां येअील अितक्या गोष्टी समोर ठेवीत दुसऱ्या प्रत्यक्ष हानिकारक घटनांकडे वळूं.

राष्ट्राचा अेक महत्त्वाचा घटक

राष्ट्रभाषा

राष्ट्राचे देश, जाति, धर्म, संस्कृति नि भाषा हे मुख्य घटक आहेत. या घटकांपैकीं कोणत्याहि अेका घटकाचा राष्ट्राशीं असलेला स्वाभाविक संबंध सुटला तर राष्ट्र मृत्यूच्या दारीं बसण्याचें भय अुत्पन्न होतें. भाषा म्हणजे ज्या जातीची ती भाषा असेल त्या जातीचें तत्त्वज्ञान–धर्म–भावना–संस्कृति–अितिहास–परंपरा यांच्या सामंजस्यपूर्ण संयुक्ततेचा भाव ज्यांत प्रतिबिंबित झालेला असतो ती भाषा म्हणजे त्या जातीच्या राष्ट्राची राष्ट्रभाषा होय. विभिन्न धर्म–संस्कृति–परंपरेचे परकीय राष्ट्राच्या भाषेचा अपहारी संबंध जर अेखाद्या राष्ट्रभाषेशीं आला तर तो संबंध ज्या मानानें तीव्र वा मंद असेल त्या मानानें त्या परकीय अपहारी संबंधापासून त्या राष्ट्रभाषेंतील भावाची हानि होत असते. या केवळ तात्विक विवेचनांनीं ही गोष्ट गळीं अुतरणें कठिण आहे म्हणून अेक अगदीं नित्याच्या परिचयाचें अुदाहरण देअून त्या विवेचनांतील विधेयाची कल्पना करून घेतां यावी म्हणून अेक अुदाहरण घेवूं. कोणत्याहि देशावर परकीय धर्म संस्कृतिवाल्यांचें आक्रमण झालें असतां पराजित राष्ट्राच्या मार्गावर वसणारे घाव अधिक प्राणघातक होअूं पहातात. मुसलमान राजवटींतील अनेकशः अन्याय–अत्याचारादिकांमुळें ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील अेकरसी हिंदुसमाजांत नि राष्ट्रांत विधर्मीय लोकसंस्था वाढून राष्ट्रांतील अेकरसीपणा मोडला त्याचप्रमाणें नि त्याचेच बरोबर भारतीय भाषांवर अरबी–फारशी भाषचेंहि आक्रमण होअून भारतीय राष्ट्रभाषेच्या भावप्रकटन शक्तींत वैगुण्य आलें. ब्रिटिश राजवटींतहि तेंच झालें. ब्रिटिशांनीं हिंदुस्थानीयांना खिस्ती संस्कृतीचा रंग देण्याचा प्रयत्न अनेक प्रकारें केला नि अद्यापहि ते करीत आहेत. त्याचबरोबर राज्यकर्त्यांचे आंधळे अनुकरणाची प्रवृत्ति परतंत्र लोकांत कमी अधिक प्रमाणांत प्रादुर्भूत होत असतेच. तदनुसारें अनेक गोष्टींप्रमाणें भाषेच्या नि भावप्रकटनाच्या संबंधांतहि अनुकरणाची प्रवृत्ति दिसून येते. पूर्वी कोणीहि मृत्युवश झाला असता त्याला वा त्याचे जिवात्म्याला सद्गति मिळो असें म्हटलें जात असें. खिस्ती मतवाल्यांत 'Peace be unto him' 'पीस बी अनटु

हिम ' असें म्हटलें जातें. सामान्यपणें वरवर पहाणाऱ्याला यांत कांहीं विशेष आहे वा तसें आपण म्हणूं लागल्यास त्यांत आपली कांहीं हानि झाली असें वाटणार नाहीं. पण थोडासा विचार करतांच तत्त्वज्ञानदृष्ट्या या अुद्गारांतरानें आपल्या श्रद्धाविषयांत किती भयंकर परिवर्तन केलें आहे हें लक्षांत येअील. मनुष्य हा ज्ञानावाचून मोक्षाला जात नाहीं. कोणाचा कसाहि आशिर्वाद. वा शुभेच्छा मिळाल्या तरी त्यांचें बल मोक्ष प्राप्त करून देण्याला असमर्थ आहे. पण मनुष्य हा मृत्यूनंतर आपापल्या पापपुण्यमय कर्मांनीं सद्गतीला वा दुर्गतीला प्रात होतो. नि त्या त्याच्या मृत्यूनंतरच्या गतीला चांगली दिशा मिळणें हें त्या परलोक गत जिवाच्या सत्कृत्याबरोबरच थोरांचे शुभाशिर्वाद नि आतेष्ट मित्रांच्या शुभेच्छा यांचें बल मिळून सद्गति मिळण्याला त्याला साह्य होतें. ही भावना ' त्याला सद्गति मिळो ' या अुद्गारांत आहे. या अुद्गारांना आपल्या कर्मसिद्धांताच्या आधारभूत तत्त्वज्ञानाच्या आधारभूमीचें अधिष्ठान आहे. अुलट ' त्याच्या आत्म्याला शांति मिळो ' या अुद्गारांत ही तत्त्वज्ञानाची भूमिका सुटते. खिस्ती मताप्रमाणें मेलेलीं माणसें म्हणजे त्यांचे देहात्मे थडग्यांत न्याय-दिनाची वाट पहात पडून राहतात. त्यांचा आकाशांतला बाप जगाचा अंत झाल्यावर जागा होतो, खिस्ती असेल त्यांना अुचलून स्वर्गांत धाडतो, खिस्ती नसेल त्याला नरकांत ढकलतो आणि पुन्हां निजून घेतो. आतां हा खिस्ती मृतात्मा जर थडग्यांत पडून राहिलाच असला तर न्यायदिनाची वाट पहात केविलवाणेंपणें दुःखी, कष्टी, संत्रस्त नि कंटाळलेल्या स्थितींत अस्वस्थ होत्साता पडून राहिलेला असणार हें अगदीं अुघड आहे. या त्याच्या दुःसह स्थितीची जाणीव असल्यानें त्याचे आप्तेष्टांच्या तोंडून साहजिकच त्या स्वाभाविकपणें अशांत होत राहणाऱ्या प्रेतात्म्याला थडग्यांत शांति मिळो म्हणून वांझोटी अिच्छा करणेंच काय तें त्या मृतात्म्याच्या खिस्ती आप्तेष्ट–मित्रांना शक्य आहे नि तदनुसार ते तसें म्हणतात. पण सध्यां अविचारानें अशास्त्र नि तत्त्वज्ञान दृष्टीनें असमंजस भूमिकेला अनुरूप असलेल्या त्यांच्या अुद्गारांचें अनुकरण करून तत्त्वज्ञानानुगामी आपल्या सशास्त्र शुभेच्छा प्रकटनाच्या अुद्गारांना नकळत आपण मुकतो नि त्यामुळें हळूहळू आपल्या मनांतील मूलभूत भूमिकेला सोडून जातों हें आपले लक्षांत येत नाहीं. परकीय धर्मसंस्कृतिवाल्यांच्या भाषेचा आक्रमक प्रभाव आपल्या भाषेवर–राष्ट्रभाषेवर–पडूं देण्यानें आपली काय हानि होण्याचा संभव

आहे हें यावरून थोडेंसें लक्ष्यांत येअील. हानीचें हें अेक स्वरूप झालें. अशीच अनेकप्रकारें हानि होते. राष्ट्रभाषेवर परकीय संस्कृतीच्या भाषेचें वर्चस्व होअूं देणें म्हणजे आपलें स्वतःच्या राष्ट्राचें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नि महत्त्व आपण गमावून बसणें होय. नि म्हणून राष्ट्रभाषा संरक्षण, तिचें शुद्ध नि निर्भेळ स्वरूपरक्षण हें राष्ट्राचें व्यक्तिमत्त्व नि महत्त्व चिरंजीवपणें टिकविण्यासाठीं अत्यावश्य आहे. अेवढें सांगून या सामान्य विवरणावरून आपण आतां आपल्या राष्ट्रभाषेच्या प्रत्यक्ष वस्तुस्थितीकडे वळूं.

आपल्या हिंदूराष्ट्राची खरी पूर्वपरंपराप्राप्त राष्ट्रभाषा म्हटली म्हणजे संस्कृत होय. हिंदूराष्ट्राचें मानवी जीवनक्षेत्रांतील सर्वांगीण असें अद्वितीय विभूतिमत्त्व संस्कृत या देवभाषेनेंच मिळून दिलें नि तिच्याचमुळें अद्याप टिकून आहे. कालांतरानें त्या आदिभाषेचीं त्यापासूनच अुत्पन्न झालेल्या नि तीपासून परिपुष्ट बनत रहाणाऱ्या भारतीय भाषांत रूपांतरें झालीं. संस्कृत भाषेची या भाषा म्हणजे मातेचें दुग्धपात करीत राहणारीं अेक प्रकारें संस्कृत भाषेचीं अबोध अपत्येंच होत. हिंदुस्थानांत संस्कृतोत्पन्न वा संस्कृत परिपोषित अशा अनेक भारतीय भाषांत हिंदी भाषाच अनेक दृष्टीनें आज राष्ट्रभाषेच्या पदीं संस्कृतची प्रतिनिधि या नात्यानें विराजमान होण्यासाठीं ग्राह्य आहे. योग्यतेच्या दृष्टीनें अितरहि भाषा हिच्याच तोडीच्या आहेत पण व्यवहार्यतेच्या दृष्टीनें हिंदीलाच सध्यां राष्ट्रभाषापदीं बसविणें हिंदूराष्ट्राला अवश्यक आहे नि ती गोष्ट बहुतांशानें हिंदूजगतानें मान्य केली आहे. परंतु राष्ट्राच्या आजच्या संकट कालांत राष्ट्रभाषा क्षेत्रांतहि विजातीय आक्रमणाची त्राटिका थैमान घालूं पहात आहे. ती म्हणजे 'अुर्दू' भाषा (?) होय.

'अुर्दू'चें स्वरूप नि राष्ट्रभाषा-पदावर आक्रमण

हिंदुस्थानांत विदेशीय मुसलमानांची संख्या अत्यंत अल्प आहे. आज जे कांहीं सात साडेसात कोटी मुसलमान हिंदुस्थानांत आहेत त्यांत शंभरीं दहाहि विदेशीय मुसलमानांचे वंशज सांपडणार नाहींत. बाकी सर्व मुसलमान हिंदू जातीमधून बाटविले गेलेल्या हिंदूंचेच वंशज आहेत. त्या सांप्रतच्या मुसलमानांचे

जवळचे वा दूरचे पूर्वज हिंदू असतांना संस्कृतोत्पन्न अशा भारतीय भाषांचेच भक्त नि सेवक होते. तेव्हां त्या हिंदूपूर्वजांच्या सांप्रतच्या मुसलमान वंशजांची पूर्वपरंपराप्राप्त भाषा म्हटली म्हणजे ज्या ज्या प्रांतांत ते राहतात त्या त्या प्रांतांतील तेथील तेथील भाषा म्हणजे त्यांची मायभाषा होय. बंगालमधील मुसलमनांची स्वाभाविक भाषा बंगाली, महाराष्ट्रीय मुसलमानांची मराठी, मद्रासमध्यें तेलगू वा तामील, मलबारमध्यें मलबारी, राजपुतान्यांत राजपुती, पंजाबांत पंजाबी, बिहार–युक्तप्रांत आदिमध्यें हिंदी नि सिंधमध्यें सिंधी या त्या त्या प्रांतातील मुसलमानांच्या भाषा. या सगळ्या पंजाबी, बंगाली, मराठी, मद्रासी, गुजराथी, सिंधी आदिक भाषा बोलणाऱ्या हिंदूंची जर राष्ट्रभाषा हिंदी असेल तर त्याच भाषा बोलणाऱ्या मुसलमानांची राष्ट्रभाषा निराळी कां नि कशी व्हावी. त्यांचीहि भाषा हिंदीच व्हावयाला पाहिजे. त्यांनीं ती स्वीकारण्यांत कांहींहि कमीपणा नसून आपल्या प्रांतिक भाषेप्रमाणेंच या राष्ट्रीय भाषेचाहि त्यांनीं त्यांची स्वतःची भाषा या नात्यानें हिंदूंच्या अितक्याच समान हक्कानें स्वीकार करावयाला पाहिजे. हेंच स्वाभाविक नि न्यायप्राप्त कर्तव्य आहे. बरें मुसलमान त्यांच्या आरबी–फारशी भाषाव्यतिरिक्त अितर भाषा स्वभाषा म्हणून स्वीकारीत नाहींत वा तशा त्या स्वीकारल्यास त्यांचें मुसलमानीपण कमी ठरतें असेंहि नाहीं. जपानमध्यें जपानी राष्ट्रभाषा स्वीकारणारे, चीनमध्यें चीनी राष्ट्रभाषेचे भक्त असणारे, अिंग्लंडमध्यें अिंग्लिश भाषेलाच मातृभाषा मानणारे, तुर्कस्थानांत आरबी–फारशीचें अुच्चाटण हेतुतः करून शुद्ध तुर्की भाषाच राष्ट्रभाषा म्हणून ठरविणारे मुसलमान हे मुसलमानच नाहींत असें म्हणावयाला हिंदुस्थानांतले मुसलमान पुढें येतील काय ? अथवा या वर अुल्लेखलेल्या देशांतील मुसलमानांपेक्षां आम्ही श्रेष्ठ प्रतीचे नि खरेखुरे मुसलमान आहोंत असें छातीठोकपणें हे हिंदुस्थानांतले मुसलमान सांगूं शकतील का ? याला अुत्तर म्हणजे मुसलमान याप्रमाणें म्हणावयाला वा सांगावयाला पुढें येणें शक्यच नाहीं. कारण तसें म्हणणें म्हणजे निर्लज्जपणें नंगें असत्य विधान करणें ठरेल, म्हणून ते तसें म्हणूं वा सांगूं धजत नाहींत.

सर्व प्रांतांत सर्व हिंदूंप्रमाणें सर्वसामान्य मुसलमान समाजाची मराठी, तेलगू, तामील, मलबारी, गुजराथी, हिंदी, बंगाली, अुडिया, पंजाबी, सिंधी आदिक त्या त्या प्रांतांच्या स्थानिक भाषाच मातृभाषा आहेत. अुलट सर्व

दक्षिण हिंदुस्थान (मद्रास प्रांतासह) ओरिसा, बंगाल, आसाम आदीमध्यें अुर्दू हें नांव सुद्धां न जाणणारेच बहुतेक मुसलमान आहेत. मग ती भाषा समजणें तर दूरच राहिलें. असें असतांहि कांहीं थोड्या वर्षांपासून सर्व प्रांतांत मुसलमानांकडून 'आमची स्वभाषा म्हणजे अुर्दू आहे' अशी आरोळी कां मारली जात आहे ? अितकेंच नव्हे तर गांधी प्रमुख घरबुडाअू कॉंग्रेसी हिंदूंच्याद्वारां नि साह्यानें अुर्दू ही राष्ट्रभाषा या नात्यानें हिंदुस्थानच्या माथीं मारण्याचा मुसलमानांचा अेवढा अट्टाहास कां चालला आहे ? हें अनैसर्गिक दृश्य–हा अस्वाभाविक अुपद्याप मुसलमानांकडून कां केला जात आहे ? याकडे विशेष शोधपूर्वक लक्ष दिलें पाहिजे, म्हणून या प्रश्नांचीं अुत्तरें शोधावयास आपण आतां लागूं.

मुसलमान अुर्दूचा हट्ट कां धरतात ?

हिंदुस्थानांतील मुसलमान हा हाडानें, रक्तानें हिंदूच आहे. नि जोंपर्यंत त्याच्या मनावर प्यान–अिस्लामी थाटाचे कुसंस्कार केले जात नाहींत तोंपर्यंत पुष्कळच अंशानें–तो मुसलमान असूनहि–हिंदुमनाचा असतो. हिंदूविषयीं तिरस्कार, अवहेलना बुद्धि, द्वेष अित्यादि अनिष्ट मनोविकार त्याचे मनांत सहसा येत नाहींत. नि त्यामुळें हिंदूहृदयाचा चांगुलपणा, समंजसपणा, सुजनता आदिक गुणाला तो फारसा पारखा झालेला नसतो. हिंदूमतांत नि हिंदूरक्तांत धार्मिक भावना फार खोल नि गंभीरपणें अंकित झालेल्या असतात. तो पुढें मुसलमान झाल्यावरहि धर्माच्या नांवानें जें जें कांहीं त्याला सांगितलें जाअील तें तें या सर्वसाधारण धार्मिक भावनावशतेनें करावयाला तो मागचा पुढचा विचार न करतां प्रवृत्त होतो. यामुळें जेव्हां जेव्हां बाटवून केलेल्या मुसलमानांच्या मनांत मुस्लिममतांच्या अुठावानें नि अुपदेशामुळें ते हिंदूंचे झालेले मुसलमान पूर्वी कधीं कधीं दंग्याला प्रवृत्त होत असत. पण विकारवशतेचा हा अुठाव प्रासंगिक असे. पण मुसलमान समाजाचा स्वाभाविक स्थायीभाव हा माणुसकी सांभाळणारा म्हणजे हिंदूसुजनतेचा होता. पण ही स्थिति झपाट्यानें पालटावयाला खिलाफत चळवळीपासून आरंभ झाला. त्यापूर्वी प्यान अिस्लामी वृत्तीनें भारलेले कांहीं प्रमुख प्रमुख नि शिक्षित मुसलमान पूर्ण कुराणी रंगानें नि वृत्तीनें रंगलेले वा भारलेले झाले होते. त्यांना सर्व मुसलमान समाज तसा बनावा अशी

अिच्छा होती, त्यासाठीं प्रयत्न करावयास ते सिद्ध होते, तदर्थ त्यांनीं प्यान अिस्लामी अुपदेशानें मारलेले मुसलमान निर्माण करण्याचा अेक प्रकारें कारखानाच अलीगड कॉलेजरूपानें काढला होता. पण सर्व मुसलमान समाज त्या प्यान-अिस्लामी वृत्तीनें ढवळून सोडण्याला योग्य संधि त्यांना मिळाली नव्हती. पण तशी अिच्छा धरून ते होते. हें सिद्ध करावयासाठीं दोनतीन घटना आपण पाहूं.

(१) अिंग्लंडमध्यें स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अभिनव भारतांतील सदस्यांची जेव्हां जेव्हां सभारूपांत वा अन्य प्रकारें बैठक होअी तेव्हां तेव्हां अेक देव, अेक ध्येय, अेक आशा, अेक भाषा, अशा प्रकारें आपल्या स्वीकृत गोष्टींचा, स्वतःचे मनावरील संस्कार दृढतम करण्यासाठीं नि झालेला ताजा नि जिवंत ठेवण्यासाठीं, पुनरुच्चार करीत असत. त्या वेळीं अेक भाषा नि लिपी नात्यानें हिंदी राष्ट्रभाषा नि नागरी राष्ट्रलिपी म्हणून अुद्घोषणा करीत. देशांतील कोणत्याहि देशकल्याणकारी संस्थेंत मुसलमान क्वचितच समाविष्ट होत. अभिनवभारतहि या नियमाला अपवाद नव्हता. त्यांतील शेंकडों सदस्यांत मुसलमान अेकदोनच असत. पण या प्रतिज्ञापुनरुच्चाराच्चे प्रसंगीं राष्ट्रभाषा नि लिपी या संबंधांत ते सम्मिलित होत नसत नि हिंदी राष्ट्रभाषा वा नागरी राष्ट्रलिपी ही आम्हांला मान्य नसून अुर्दू लिपी-भाषाच पाहिजे असा हट्ट धरून बसत असत. यावरून राष्ट्रीय क्रांतिपक्षांत शिरणारेहि शिक्षित मुसलमान किती पूर्वीपासून या प्यान अिस्लामी वृत्तीनें भारलेले होते हें सहज लक्षांत येअील. याच पुस्तकांत मागें आगाखान नि दरभंग्याचे महाराज यांच्या संयुक्त अध्यक्षत्वाखालीं झालेल्या हिंदुमुसलमान अेकीच्या मंडळांत अुर्दूच्या हट्टाविषयींची घटना दिलेली वाचकांचे ध्यानांत असेलच. त्याचप्रमाणें मुसलमानांच्या खटपटीनें सदासर्वदा मुसलमानी हट्ट पुरविण्यास सिद्ध असलेले अिंग्लिश सरकारद्वारां युक्तप्रांतादि स्थानीं हिंदीला दडपून अुर्दूचें स्तोम—न्यायालयें, सरकारी कार्यालयें आदिक स्थळीं माजवून ठेवले गेलें, अशीं कित्येक अुदाहरणें आहेत. पण ही प्यान अिस्लामी वृत्ति सर्व मुसलमानांमध्यें पसरविण्याची संधि नि निमित्त या प्यान-अिस्लामी शिक्षकांना न मिळाल्यानें मुसलमान समाज या रोगापासून अलिप्त राहूं शकला. पण ही स्थिति फार काल टिकूं शकली नाहीं. कॉंग्रेसनें

गांधींच्या नादीं लागून खिलाफतचें विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करण्यास जेव्हां आरंभ केला तेव्हां या प्यान–अिस्लामी वृत्तीच्या भुताला मुसलमान समाजाच्या अंगांत संचार करण्यास संधि मिळाली. नि त्या वेळेपासून प्यान अिस्लामी वृत्तीच्या आहारीं 'मुसलमान समाज जाअूं' लागला. ज्या देशांत हिंदूंनीं सर्वसाधारणतः मिळून मिसळून रहाणारा हिंदूवंशीय मुसलमान समाज दिसत होता तेथेंच आज हिंदूंना पाण्यांत पहाणारा, त्यांना चेपून टाकून आपलें वर्चस्व त्यांचेवर स्थापन करण्यास प्रवृत्त झालेला स्थळोस्थळीं निरनिराळ्या निमित्तांनीं कुरापत काढून हिंदूवर या ना त्या प्रकारें आक्रमण करण्यास तरबरलेला, हिंदूसंस्था योग्यायोग्य नि सूक्तासूक्त मार्गांनीं कमी करून आपली संख्या फुगवीत सर्व हिंदुस्थानला मुस्लिम रंगानें रंगवून घालणारा असा मुसलमान समाज बनूं पहात आहे, नव्हे बनत आला आहे. आणि या हिंदुस्थानांत केवळ आपलीच भाषा म्हणून नव्हे तर हिंदूंवरहि ती लादीत सबंध राष्ट्राची अुर्दूच आहे असें ठरवून घेअून हिंदुस्थानची जी स्वाभाविक राष्ट्रभाषा हिंदी ती नष्ट करावी नि त्या क्षेत्रांतहि हिंदूंच्या स्वत्वाला स्थान राहूं देअूं नये म्हणून मुसलमान समाजाचे अनेक प्रकारचे नि सर्वग्रासी प्रयत्न चाललेले आहेत. हा प्रयत्न सहजसुलभपणें यशस्वी होण्यास काँग्रेसचा अुपयोग फार होअील, हें त्यांचें लक्षांत येअून त्या काँग्रेस-द्वारां राष्ट्राचे गळ्यांत अुर्दूची घोरपड बांधावयाचा विचार त्यांनीं थाटला. गांधी पूर्वीच्या काँग्रेसमध्यें मुसलमान राष्ट्रकार्याला सम्मिलित करून घेण्याची जरी अनिवार इच्छा होती तरी राष्ट्रहिताला बाधक वा घातक गोष्ट स्वीकारावया-अितकी राष्ट्रीयता काँग्रेस विसरली नव्हती. पण खिलाफतीच्या संचारापासून तो सर्व मनु पालटला. हिंदुस्थानामध्यें मुसलमानांनीं काय वाटेल तें केलें, करूं घातलें, कितीहि हिंदुस्थानची हानि केली, अितकेंच नव्हे तर परकीय मुसलमानांना राष्ट्र देअून टाकावयाचें जरी हिंदी मुसलमानांनीं ठरविलें तरीहि त्यांच्या सर्व मागण्या, म्हणणीं वा अिच्छा पुरविण्यास सदा सिद्ध असलेला घरघालूपणाचा अवतार जो गांधी तो अवतारी हात सिद्ध असल्यावर मग मुसलमानांनीं काय म्हणून मागें घ्यावें. अफगाणिस्थानच्या अमीर अमुनुल्लाला बादशहा म्हणून दिल्लीस आणून त्याची स्थापना करण्यासाठीं जेव्हां हिंदुस्थानावर चालून येण्याचें आमंत्रण देण्यास प्यान अिस्लामी

मुसलमान–नेते खिलाफत कार्यीं सिद्ध झाले (त्या घटनांची माहिती पुढें येणार आहेच) त्या वेळीं या त्यांच्या अिच्छेला नुसती संमतिच नव्हे तर त्यांच्या या अपकृत्यांत भाग घेण्यास गांधी सिद्ध होअून कॉंग्रेसद्वारां ती गोष्ट घडवून आणण्याचा अुपक्रम त्यांनीं केला; त्याच वेळीं अेकंदर मुसलमान सत्ता स्थापनेविषयीं झालेल्या अुहापोहांत हिंदुस्थानची राष्ट्रभाषा अुर्दू करण्याचा करार गांधीबरोबर झाला असलाच पाहिजे. या विधानाला पुढील घटना पुष्टीच देतील. त्याच वेळीं हें उद्घोषित करणें यशाच्या दृष्टीनें सोयस्कर नव्हतें म्हणून अनेक युक्त्या प्रयुक्त्या योजित हळूहळू गांधीनें ती गोष्ट जवळजवळ आज पुरी करीत आणली.

गांधी प्रमुखांचा 'अुर्दू' प्रीत्यर्थ प्रयत्न

ज्याप्रमाणें कॉंग्रेसद्वारां अुर्दूची धोंड हिंदुस्थानच्या गळ्यांत बांधतां येअील (अर्थात् 'मुसलमानप्रेमी' गांधीद्वारां) हें हेरून जसा घाट मुसलमानांनीं घातला, तसाच घाट गांधींनींही अेक मुख्य गोष्ट हेरून घातला. हिंदुस्थानांत राष्ट्रभाषेचें स्थान हिंदीनेंच घ्यावें, हिंदीच राष्ट्रभाषा होअूं शकते हें अनेक राष्ट्रभक्तांच्या लक्षांत येअून तदर्थ त्यांचें मधून मधून थोडेथोडे प्रयत्न चालू असत. या राष्ट्रभाषापदाचें स्थान घेण्यास हिंदीला सक्षम करण्यासाठीं नागरि प्रचारिणी सभेच्या कांहीं कार्यकर्त्यांनीं नि अितरहि हिंदी भक्तांनीं 'हिंदी साहित्य संम्मेलन' म्हणून अेक संस्था स्थापून तद्वारां हिंदीचा प्रसार नि प्रचारादि कार्य आरंभलें होतें. त्याच संस्थेला जर अुर्दूचा प्रसार नि प्रचार करण्याचें प्रच्छन्न साधन बनवितां आलें तर ही गोष्ट शक्य तों अविरोधानें घडवून आणतां येअील ही गोष्ट गांधीनें हेरून ती संस्था हस्तगत करून घेण्याचें ठरविलें. आपणाला या प्रयत्नपरंपरेचे धागेदोरे नि दुवे संक्षेपतःच बघावयाचे असल्यानें लहान लहान नि लपते छपते अनेक प्रयत्नांचे अुल्लेख टाळावें लागणें अपरिहार्य आहेत. अिंदूरला अेक हिंदी साहित्य सम्मेलनाचें अधिवेशन घ्यावयाचें ठरलें. त्या वेळीं कॉंग्रेसमध्यें गांधींचे हस्तक बनलेल्या हिंदीभक्त (!) पुंगवांनीं या अधिवेशनाचे अध्यक्षपदाची माळ गांधींचे गळ्यांत घालावयाचा बूट रचून त्याप्रमाणें त्यांना अध्यक्षपद देण्याचें ठरवून घेतलें. गांधीबुवा अध्यक्ष झाले. अनेक लटपटी खटपटींनें आपला साधुपणाचा प्रभाव लोकमतावर जमविलेला

असल्यामुळें त्यांच्या कृत्यांत वा वर्तनांत पाताळयंत्रीपणाचा वास साध्या भोळ्या हिंदी जनतेला येणें शक्य नव्हतें. कोणत्याहि संस्थेच्या मूल घटनेंत किंचित जरी बदल वा स्वरूपान्तर करावयाचें असलें तरी त्यासाठीं आधीं विशेष मंडळ नेमलें जाऊन नि त्या मंडळामध्यें त्यावर साधक बाधक विचार होऊन त्या गोष्टी आंखल्या जातात. पुढें अधिवेशनांतील विषय नियामकींत त्यावर खल होऊन त्या स्वरूपांतराचें रूप निश्चित करण्यांत येतें नि मग ती रूपांतरित घटना अधिवेशनापुढें येऊन संमतीली जाते. अितका विधि झाल्यावांचून मूळ घटनेंत कांहींहि अंतर—कानामात्रेचा सुद्धां—कोणीहि अेकटें कार्यमंडळ वा समिति वा अधिवेशन अथवा अध्यक्ष—करूं शकत नाहीं. ही गोष्ट गांधींना समजत नाहीं वा त्यांना ठाऊक नाहीं असें कोण म्हणूं शकेल ! गांधीला हें सर्व निश्चितपणें ठाअुक होतें. पण तसा योग्य मार्ग स्वीकारून अर्दूला अनुकूल असें घटनेंत अिच्छित रूपांतर करून घेतां येणें शक्य दिसलें नाहीं म्हणून हिंदी सम्मेलनांतील आपल्या हस्तकांकरवीं काय करायचें हें आधीं पडद्याआड निश्चित ठरवून अधिवेषनांत त्या रूपांतरित स्वरूपाचें ओझरतें आविष्करण केलें. अधिवेशनांतील सर्वसाधारण प्रतिनिधी वा श्रोते प्रत्येक गोष्ट विचाराच्या कसोटीवर घासीत बसत नाहींत, नि तें शक्यहि नसतें. कार्यकारिणींतील विशेष कर्त्या मंडळींतील विशेष कळकळीनें लक्ष देणारींच मंडळी काय तीं डोळ्यांत तेल घालून घडत असलेल्या गोष्टी बघत असतात. नि ती मंडळी तर गांधींनीं आधींच मथवून ठेवलेलीं त्यामुळें लोकांच्या डोळ्यांत न खुपेल अशा पद्धतीनें हळूच धूळ फेंकीत पण हिंदी राष्ट्रभाषेचें पद हिरावून त्या स्थानीं अुर्दूला अधिष्ठित करतां येअील अशा प्रकारें अेक कुप्रसिद्ध टीप घटनेंत घुसडून दिली. नि तींत हिंदी म्हणजे जींत "आरबी, पारशी, अिंग्लिश नि संस्कृत," आदिक भाषांचे शब्द असतील वा घेतले जातील अशी सर्वांची—म्हणजे अगदीं घेडगुजरी बोली बोलणाऱ्यासुद्धां सर्वांची—जी भाषा ती राष्ट्रभाषा होय अशा प्रकारें हिंदीचें अर्थात् राष्ट्रभाषेचें स्पष्टीकरण केलें. या टीपेंत हिंदीमध्यें कोणकोणत्या भाषांचे शब्द येतील हें सांगतांना हिंदी राष्ट्र भाषेच्या क्षेत्रांत घुसणाऱ्या परकीय भाषांचीं नांवें नि तींहि विशेष हेतुपूर्वक क्रमानें घातलीं. मुसलमान आरबी भाषेच्या अुल्लेखानें 'बेहद्द खूष' व्हावेत म्हणून आरबीला स्थान पहिलें. त्यापुढें नि त्या आरबीच्या खालोखाल

मुसलमानांना प्रिय असलेली फारशी भाषा तिला दुसरें स्थान. त्यानंतर मुसलमानांच्या खालोखाल गांधीबुवाला प्रिय असलेले अिंग्लिश लोक म्हणून अिंग्लिश भाषेला तिसरें स्थान दिलें. येथेंच थांबतें तर ती गोष्ट पुरतेपणीं निंद्य—राष्ट्रभाषा हिंदीच्या दृष्टीनें—ठरली नसती म्हणूनच कीं काय अितर हिंदुस्थानीय भाषांप्रमाणें हिंदीचाहि प्राण नि आत्मा असलेल्या, ज्या भाषेनेंच हिंदीची खरीखुरी पुष्टी होणारी आहे, नि जी हिंदीच्या मातामहीच्या स्थानीं विराजमान झालेली आहे त्या संस्कृतचें—भाषाक्षेत्रांत गृहस्वामिनीचें—नांव या घरघुस्या परकीय भाषांबरोबरच नि त्याच श्वासांत अुच्चारलेलें आहे. संस्कृत भाषेचें जें हिंदीशीं नातें आहे त्या स्वत्वाच्या नात्यावर हा घोर अत्याचार या दिखाअू अहिंसकानें (दिखाअू अेवढ्यासाठीं कीं खरा अहिंसक अमनुल्लाला लढाअी करून हिंदुस्थानावर येण्याच्या कटांत भाग घेत त्याला आमंत्रण न देतां, म्हणून दिखाअू) केला आहे. परकीय अशा डाकू भाषांच्याच पंक्तीला स्वामिनी संस्कृत भाषेला गोवलें आहे. हिंदी राष्ट्रभाषेच्या कुशींत हा छुपा खंजीर मारून तिला घायाळ केल्यावर मग 'हिंदी याने हिंदुस्थानी' ही राष्ट्रभाषा नि नागरी नि अुर्दू लिपी या राष्ट्रलिप्या या नांवांनीं ठरविल्या नि तें कृतींत आणण्याचा कुदीर्घ प्रयत्न आरंभला, मंडळें नेमलीं, राष्ट्रभाषा प्रचारसमिती काढली, अनेक सोंगें ढोंगें अुभीं केलीं नि नांवानें ' हिंदी याने हिंदुस्थानी ' म्हणत अुर्दूचा पुरस्कार आरंभला. हिंदी वा हिंदुस्थानी किंवा हिंदी अथवा हिंदुस्थानी असें नांव ठेवलें नाहीं, तर नामकरणापासूनहि आपल्या मुसलमान यजमानाला हमी वाटावी म्हणून 'वा' किंवा ' अथवा ' अर्थबोधक जो ' याने ' हा अुर्दू शब्द तो येथें पेरला नि हें नामकरण अुर्दूचेंच प्रच्छन्न स्वरूप आहे हें मुस्लिम मनाला जाणवून ठेवलें. कोणी म्हणेल गांधी अुर्दूचे पक्षपाती नाहींत. नि वर जो आरोप केला आहे तो केवळ अीर्षेनें वा द्वेषानें केला आहे. गांधीविषयीं द्वेषादि भावना वाटण्यासारखें कांहीं घडलें आहे कीं काय किंवा तसें वाटणें अन्याय्य असणें शक्य आहे काय हें पुढील प्रतिपादनांत दिसून येअील. येथें केवळ गांधी अुर्दूच्या राष्ट्रभाषा-पदाला अनुकूल नाहीं आहे कीं हें स्पष्टपणें कळणारा पुरावा पुढें मांडणें अेवढेंच कार्य करावयाचें आहे. तो पुरावा असाः—

Gandhiji not opposed to Urdu:—" Do not fear I can ever oppose Urdu. Of course I know not how and in what other

way I can help or work for its progress. But I think the very fact that I am not opposing it, is enough. I don't think I could do any thing more beyond that." The above letter is reported to have been written recently by Mahatma Gandhi himself in Arabic Script in reply to an appeal made to him by Munshi Bahilol khan of Jayapore State *not to oppose the Urdu language in its legitimate claim of being India's only Lingua Franka.* (Bombay Chronical–first Dak edition Wednesday 7–4–37.)

" मी अुर्दूला कधींकाळीं विरोध करीन अशी भीति वाळगूंच नका. अर्थात् आणखी कशाप्रकारें नि कोणत्या मार्गानें मी अुर्दूला साह्य करूं शकेन वा तिच्या प्रगतीसाठीं काम करूं शकेन हें कांहीं मला कळत नाहीं. पण मी अुर्दूला विरोध करीत नाहीं ही अेवढी गोष्ट देखील मला वाटते अगदीं पुरेशी आहे–आणि याहून अधिक कांहीं मी करूं शकेन असें मला वाटत नाहीं." हें वरील-प्रमाणें पत्र 'महात्मा' गांधीनें स्वतः आणि तेंहि आरबी लिपींत लिहून (लिहवून, कारण आरबी लिपी गांधींना येत नसावी.) अुत्तर नात्यानें जयपुर संस्थानच्या मुनशी बहिलोलखान यास पाठविल्याचें कळतें. **अखिल भारताची अेकमेव राष्ट्रभाषा होण्याच्या अुर्दूच्या न्याय्य हक्काला तुम्ही विरोध करूं नका अशी गांधीला मुनशी बहिलोलखानानें विनंति (*Appeal* अपील) केली होती."** गांधीला पत्रांत जी मुनशीनीं विनंति केली आहे ती वर दिली आहेच. त्यांत अुर्दूचा राष्ट्रभाषा होण्याचा न्याय्य हक्क आहे असें विधान आहे. या विधानाविषयीं गांधींनीं आपले विधानांत असंमति दर्शावली नाहीं. अेखादि गोष्ट गांधींच्या मनाला अनिष्ट वाटेल वा वाटते तेव्हां तेव्हां त्या गोष्टीविषयीं आपली असंमति प्रकट केल्यावांचून ते राहणार नाहींत नि रहातहि नाहींत, पण जेव्हां उघड संमति अेखादे वेळीं देणें हें त्यांच्या पथ्यावर पडत नाहीं त्या त्या वेळीं ती गोष्ट टाळून त्याविषयींची आपली संमति ते दूरान्वयानें ध्वनित करीत असतात. वरील अुत्तरांत अुर्दूच्या राष्ट्रभाषा पदाच्या हक्काला नकार न देतां केवळ मी अुर्दूला कधींहि विरोध करणार नाहीं असें आपल्या त्या मित्रवराला त्यांनीं अभयप्रदान केलें आहे. नंतर मी अुर्दूसाठीं

अनुकूलतापूर्वक काम करणें वा तिच्या प्रगतीला साह्य करणें या गोष्टीसाठीं स्वीकारणीय मार्ग माझे ध्यानांत येत नाहीं. म्हणून अेक प्रकारें अंतःकरणांतील दुःख ओकून टाकलें नि तेवढें पुरसें कदाचित् वाटणार नाहीं म्हणून 'मी विरोध करीत नाहीं.' अेवढीच अेक गोष्ट देखील तुमच्या हेतुसाध्यतेसाठीं पुरे आहे असें आश्वासन देअून शेवटीं सांगतात कीं, याहून अधिक नि या पलीकडे मला कांहीं करतां येणार नाहीं. असें सांगून सध्यांच्या परिस्थितींत निराळे कांहीं करतां येत नाहीं म्हणून निरुपाय आहे—तसें नसतें तर मीं तें अधिक वा त्या पलीकडे जें काय करणें अवश्य तें केलें असतें हें सांगत, निरुपायामुळें असें नि अितकेंच होत आहे नाहींतर माझी अिच्छा मात्र खूप 'अधिक नि पलीकडे'चे प्रयत्न करण्याची आहे हेंहि ध्यानांत आणून दिलें आहे. अुर्दू हीच राष्ट्रभाषा आहे नि तीच सर्व हिंदूंनीं स्वीकारली पाहिजे असें म्हणत पुढें येण्याची मुसलमानधार्जिणी वृत्ति निर्भयपणें सांगण्याअितकी परिस्थिती नाहीं म्हणून गांधींचा जीव तळमळत आहेसा दिसतो. पण अनुकूल परिस्थिति नसल्यामुळें आपले हेतू छपवून पाताळयंत्रीपणानें अुर्दूची घोंड हिंदुस्थानचे गळ्यांत बांधण्यास हा सत्याचा भोक्ता नि भक्त प्रयत्नशील झालेला आहे. महमद सीरिज, राजेंद्र सीरीज म्हणून दोन पाठ्यपुस्तक माला हिंदीच्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांत आरबी पारशी शब्दांची रेलचेल करून ठेवणें, पुस्तकांतील धड्यांत मुस्लिमधार्जिणेपणाचें प्रदर्शन, हिंदूवृत्तीला नि भावनेला मारक अशी धड्यांतील लिखाणाची मांडणी अित्यादी गोष्टी त्यांत केलेल्या आहेत. अितरत्रहि असेच प्रयत्न होत आहेत. राष्ट्रभाषा प्रचारसमिती वर्ध्यास गांधीनें आपल्या दृष्टीखालीं स्थापून तेथून या राष्ट्रभाषा—मारक प्रयत्नांचीं सूत्रें चालवलीं जात आहेत. आणि हें सर्व गांधींच्या देखरेखीखालीं, संमतीनें नि जाणूनबुजून गांधीप्रणीत विशिष्ट धोरणानें चालू आहे यावरून हिंदीचें राष्ट्रभाषा पदाचें स्वामित्व हिरावून गांधींच्या नेतृत्वाखालीं अुर्दूचा पुरस्कार राष्ट्रभाषा नात्यानें चालत आहे हें वरील अंगुलीनिर्देशी लिखाणानें वाचकांच्या लक्षांत येअील. ज्यांना याहून अधिक माहिती पाहिजे असेल त्यांनीं हिंदी सम्मेलनाचा गेल्या पुण्याच्या नि अबोहराच्या अधिवेशनाचा समग्र अितिहास बघावा. स्थलाभावामुळें यापेक्षां अधिक स्थल गांधी प्रमुख कॉंग्रेसवाल्यांच्या प्रयत्न-प्रदर्शनाला देतां येत नाहीं याचें वाअीट वाटतें.

अुर्दूसाठीं मुसलमानांची रस्सीखेंच

कॉंग्रेसकरवीं मार्ग अितका मोकळा झाला आहे. मुसलमानांना त्यांना हवा आहे तो प्रयत्न करतां येत आहे नि तरीहि 'हिंदी याने हिंदुस्थानी' या द्राविडी प्राणायामासारख्या नांवाचा स्वीकार त्यांना करावयाचा नाहीं. त्यांना अगदीं ढळढळीत 'अुर्दू' याच नांवांनें ती राष्ट्रभाषा हिंदुस्थानच्या माथीं मारावयाची आहे. त्यासाठीं विविध दृष्टीचे, विविध प्रकारें, विविध मुस्लिम पक्षांकडून प्रयत्न होत आहेत. अुजळ माथ्यानें अुर्दू हीच राष्ट्रभाषा म्हणत अुर्दू हिंदूंना अपरिहार्यतेनें स्वीकारावयाला लावण्याचा अट्टाहास मुस्लिम संस्थानांतून—विशेषतः भोपाळ नि त्याहूनहि अधिक प्रमाणांत हैद्राबादमध्यें—चाललेला आहे. हैद्राबादेंत अुस्मानिया युनिव्हर्सिटी स्थापून तेथें अुर्दूमधून अुर्दूमाध्यम ठरवीत—शिक्षण देण्याचा क्रम चालू केला आहे. हैद्राबादमध्यें तेलगू, मराठी नि कानडी, या भाषा त्या त्या भागांतील निझामी हिंदुप्रजेच्या आहेत. पण या त्यांच्या मातृभाषांना खच्ची करीत या सर्वांचे माथीं अुर्दू मारली जात आहे. अितकेंच नव्हे तर अुस्मानिया युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्रीय विभागाचे मुख्य **डॉ. अनवार अिक्वाल कुरेशी म्हणतात "हिंदुस्थानच्या राष्ट्रीय कॉंग्रेसनें आपल्या देशाची हिंदुस्थानी ही राष्ट्रभाषा ठरवून टाकली आहे."** आणि मला वाटतें जर प्रांतिक नि प्रादेशिक अभिनिवेश आपण सर्वजण विसरलों तर आपल्या राष्ट्रांतील सर्व युनिव्हर्सिट्यांतून हिंदुस्थानी माध्यम पत्करणें मुळींच कठीण जाणार नाहीं....या अुस्मानिया युनिव्हर्सिटीद्वारां अुर्दूचा (येथें अुर्दू नि हिंदुस्थानी हीं नांवें अेकाच अर्थीं हेतुपूर्वक विकल्पानें अुपयोजलीं आहेत, यावरून कॉंग्रेसनें—म्हणजेच गांधीनें—स्वीकारलेली नि पुरस्कारलेली हिंदुस्थानी म्हणजेच मुसलमानांची अुर्दू होय हें अुघड आहे. तेव्हां गांधी—कॉंग्रेसनें हिंदुस्थानी या नांवाखालीं प्रच्छन्नपणें अुर्दूचाच स्वीकार केला आहे हें निराळें सिद्ध करण्याचें कारण नाहीं.) पुरस्कार जो आम्हीं केला त्याला प्रचंड यश येत आहे. गेल्या वीस वर्षांत निरनिराळ्या ज्ञानशाखेंतील नि व्यवहारांतील पारिभाषिक नि अितर शब्द हजारोंनीं नवीन बनवून अुर्दूमध्यें भर घातली आहे, आणि त्या शब्दांचे साह्यानें अनेक ज्ञानशाखांतलीं शेकडों अधिकृत पुस्तकें प्रसिद्धिलीं आहेत. प्राणिविद्याशास्त्र, रसायनशास्त्र, चिकित्साशास्त्र,

स्थापत्यशास्त्र नि अितिहास या विषयांवर अुर्दू ग्रंथसंपत्ति निर्माण केल्यासाठीं मी ही युनिव्हार्सिटी नि तिचे प्रोत्साहक आमचे निझामशहा आणि त्यांचे सरकार यांचें अभिनंदन करतों. मुसलमानांनीं अितर स्वार्थसाधनांप्रमाणें या अुर्दू राष्ट्रभाषा ठरविण्याच्या नि ती व्यवहारविण्याच्या प्रयत्नांमध्यें सर्व प्रकारच्या अुपायांचा अवलंब केला आहे. कॉंग्रेसद्वारां केलेल्या अुपक्रमांचे – त्यांतील गांधींच्या प्रभावी साह्यासह – दिग्दर्शन वर आलें आहेच. २. आकाशवाणी (रेडिओच्या) च्या विभागाचे केंद्रीय अधिकारी सरकारनें मुसलमानाला नेमलें आहे (ही गोष्ट यदृच्छेनेंच झाली असेल असें नाहीं. या नेमणुकीच्या मागें मुस्लिम प्रयत्नांचा अथवा मुस्लिम पक्षपाती सरकारी अिच्छेचा हात असलाच पाहिजे.) त्यानें (रेडियो) आकाशवाणींतून गाणीं विशेषतः अुर्दूच घेतलीं आहेत, भाषणेंहि अुर्दू स्वरूपाचीं भाषा बोलणाऱ्यांचीच अधिक घेतलीं जातात, बातम्या देण्याचें कार्य अुर्दूतून हेतुपूर्वक होतें, अितकेंच नव्हे तर हिंदी वा अितर भारतीय भाषेंतील गाणीं, भाषणें आदिक हेतुपूर्वक टाळलीं जातात. ३. प्रांतिक सरकारांच्या साह्यानें शक्य तेथें तेथें अुर्दूचा प्रवेश करवून घेतात. सर्व प्रांतांतून अुर्दू शाळा काढविण्याचा प्रयत्न करीत सरकारच्या अनुकूल्यानें सर्वत्र शाळा स्थापन करून घेत आहेत. कॉंग्रेसच्या राष्ट्रभाषाप्रचारसंस्थेच्याद्वारां शक्य तर अुघड नि अशक्य तेथें प्रच्छन्नपणें अुर्दूचें घोडें पुढें दामटवीत आहेत. आणि ४ मुसलमान संस्थानांतून तर तेथील मुसलमानी सत्ताधाऱ्यांच्या पूर्ण साह्याच्या बलावर सर्वत्र हिंदू भाषांचा गळा घोटींत अुर्दूचा प्रभाव वाढवित आहेत. काश्मीरसारख्या हिंदू राज्याच्या प्रदेशांत मुसलमान बहुसंख्य असलेमुळें अुघडपणें अुर्दू राष्ट्रभाषा नात्यानें त्यांनीं प्रस्थापित केली आहे नि आश्चर्य कीं हिंदीचा नि नागरी लिपीचा पुरस्कार होणें हें तेथें अराष्ट्रीय ठरविण्यासाठीं अकांडतांडव केलें जात आहे. हें पहातां धन्याला धत्तुरा नि चोराला मलिदा ही म्हण काश्मिरांत प्रत्यक्षांत येत असल्यासाठीं मन विषादभरानें क्षुब्ध होतें. या हिंदूराष्ट्रांत मुसलमानांच्या प्यान अिस्लामी प्रयत्नाला कॉंग्रेसच्या राष्ट्रभाषाद्रोही साह्याचें बळ मिळून या अुर्दूची अरेरावी डोक्यावर बसूं पहात आहे. याला ज्या मानानें यश मिळेल त्या मानानें हिंदूराष्ट्राला गुदमरण्याचें भय अुत्पन्न होऊन बसलेलें आहे. याकडे दुर्लक्ष कारणें राष्ट्रघाताला कारणीभूत होअील हें हिंदूनीं वेळींच ओळखून

मुस्लिम–काँग्रेस कटाला अुधळून लावण्याचा दीर्घ प्रयत्न अचितम् आरंभला पाहिजे. आतां आपण मुसलमानांच्या याहून प्रबलतर प्रयत्नांचे निरीक्षणाकडे वळूं.

सत्तावल नि सैनिकवलार्थ
मुसलमानी प्रयत्न

प्रत्येक देशांतील सरकारचे वा राज्यसतेचे बलाच्या नि सामर्थ्याच्या दोन शाखा वा विभाग असतात. अेक पौर वा नागर (Civil) प्रशासनसत्ता (administrative power) आणि सैनिक सत्ता हे ते दोन विभाग होत. हिंदुस्थानवर मुस्लिम राज्य संस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा धारण करणाऱ्या मुसलमानांनीं अिंग्लिशांशीं संधान बांधून सर्वसाधारणतः मोकळीं असलेलीं दोनहि विभागांतील सत्तास्थानें शक्यतितक्या अधिक प्रमाणांत हस्तगत करण्याचें धोरण ठेवलें आहे. वेळोवेळीं स्वराज्यार्थ हिंदूंच्याकरवीं चालू असलेल्या विविध राजकीय आंदोलनाच्या प्रभावानें अिंग्लिश राज्यसत्तेकडून जे जे अधिकार हिंदुस्थानला दिले गेले त्या त्या राज्यसत्ताकेंद्रांतील राज्यचालन सत्ताहि केंद्रांत नि प्रांतांत आपल्या हातीं पुष्कळ अंशांत लुबाडून घेण्यांतहि त्यांनीं पराकष्ठा केली. केंद्र नि प्रांतीय विधिमंडळांत सरकारशीं हातमिळवणी करून प्रत्येक हप्त्याला बराच मोठा वांटा आपल्यासाठीं लाटला; नि तो हिंदूंना चेपतां यावें म्हणून अिंग्लिशांनीं दिला. केंद्र नि प्रांतांतील प्रशासनसत्तेचे निर्बंध नि धोरण हे निर्बंध करणाऱ्या समितीकडून नि मंडळाकडून (लेजिस्लेटिव्ह कौन्सिल नि असेंब्लीद्वारां) केलें नि ठरविलें जातें तेथें मुसलमानांनीं सरकारच्या कच्छपीं राहून किती वांटा मिळवला आहे हें आजकालच्या वाचकवर्गाला माहीत आहे. पण त्याव्यतिरिक्त त्या निर्बंध–समिति नि निर्बंध–मंडळामधून मुसलमान धार्जिण्या काँग्रेस पक्षाला बगलेंत मारून प्रशासन क्षेत्राच्या विविध विभागांतून (अॅडमिनिस्ट्रेटिव्ह डिपार्टमेंटसमधून) आपल्या मुसलमानी हातांत प्रत्यक्ष कारभाराचीं सूत्रें रहावींत म्हणून नोकऱ्यांचें प्रमाणहि शक्य तेथें तेथें नि तितकें तितकें वाढवून घेतलें. अर्ध सरकारी वा बिनसरकारी विभागांतहि आपल्या जातीच्या लोकांना अधिक नोकऱ्या मिळून तद्द्वारां ते ते विभाग (खातीं) आपल्या आहारीं रहावींत अशी प्रयत्नांची दिशा ठेवून त्यांतहि प्रमाणाबाहेर यश मिळविलें आहे. प्रशासनसंस्थेंत पोलिस विभाग हा विशेष सत्तेच्या योगें

पुष्कळ सामर्थ्य देऊं शकतो. नि म्हणून त्या पोलिसखात्यांतहि मुसलमानांनीं आपल्या लोकांचें-शेंकडा प्रमाण भरमसाट वाढवून घेण्याचा प्रयत्न करून बहुतेक सर्व प्रांतांत कमीअधिक मानानें पुष्कळ सत्ता हडप केली आहे. राहिली सैनिकसत्ता. नित्य व्यवहारांत सैनिकसत्तेला कोठें हात घालतां येत नाहीं. पण विशेष मोठ्या प्रमाणांतील दंग्यांत नि आंतरराष्ट्रीय कोलाहलप्रसंगीं अंतीचा हुकमीपत्ता म्हणजे सैनिकबल, तेंहि शक्य तितकें अधिक प्रमाणांत आपले हातीं रहावें यासाठीं सैन्यांत मुसळमानभरतीचें धोरण आंखणें नि सरकारच्या पक्षपाती सहकाराचे धोरणाचा लाभ घेत शेंकडा ६० प्रमाणांत वाढवून घेतलें होतें. (आरमारांतहि) समुद्रांतील युद्धनौविभागहि-जे कांहीं थोडें सैन्य नि युद्धनौसामर्थ्य हिंदुस्थानचें आहे त्यांत-मुसलमानी भरतीच अधिक आहे. म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पौरप्रशासनविभागांत (सिव्हिल अडमिनिस्ट्रेटिव्ह डिपार्टमेंटस्मध्यें) नि सैनिक विभागांत आपलें सामर्थ्य जेव्हां जेव्हां नि ज्या ज्या प्रकरणीं अवश्य पडेल तेव्हां तेव्हां नि त्या त्या प्रकरणीं प्रभावी ठरेल असा प्रयत्न पुष्कळसा यशस्वी करून घेतला आहे.

मुसलमानांचे
सत्तासंपादनाचे स्वतंत्र प्रयत्न

मुसलमानांचे हिंदुस्थानावर सत्तास्थापनार्थ होणारे प्रयत्न हे अेकांगी नि अेकांडी नाहींत; कोणताहि मार्ग असो मुसलमानांनीं तो हाताळला नाहीं असें नाहीं. सरकारी सत्तेमध्यें प्रवेश करून तेथील सत्तेचा शक्य तों भाग जरी हस्तगत करून घेण्याचा अुपक्रम केलेला असला तरी अिंग्लिश राज्य असेपर्यंत त्या सत्तेचा अंश अगदीं आपल्या अिच्छानुसार हवा तसा अुपयोजतां येअील असें नाहीं. दुसरें असें कीं ती सरकारी सत्ता पूर्णपणें नि स्वतंत्रपणें आपले हातीं नि स्वाधीन नाहीं, त्यांत हिंदूहि आहेत नि तशा सत्ता विभागल्या गेलेल्या स्थितींत केवळ स्वेच्छापूर्वक नि निर्वेधपणें संपूर्णतया कामीं येअील असें नाहीं म्हणून केवळ स्वतःच्या हातीं नि पूर्ण सत्तेखालीं असलेली सैन्यासारखीच शक्ति निर्माण करण्यासाठीं मुसलमानाच्या तीन संघटना निर्माण झालेल्या आहेत. अेक म्हणजे **अहरार,** दुसरी **खुदा-अि-खिदमदगार** नि तिसरी **खाकसार** या त्या

तीन संघटना होत. या संघटनापैकीं विशेष सामर्थ्यसंपन्न, शिस्तबद्ध नि प्रबल अशा शेवटच्या दोन संस्था आहेत नि त्यांतहि शेवटची संस्था म्हणजे खाकसार ही फार कट्टर, पूर्णपणें प्यानअिस्लामी, संख्येनें नि सामर्थ्यानें अधिक नि म्हणूनच हिंदुस्थानला अधिक भयप्रद अशी आहे. अहरारची संस्था ही सौम्य स्वरूपी (बाह्यात्कारी) असून तिचे प्रयत्न जरी हेतूंच्या दृष्टीनें खाकसारासारखीच असली नि पद्धतीनें अुग्ररूपधारी आहे असें दिसून येण्यासारखी नसली तरी पण म्हणून ती अगदीं निरुपद्रवीच आहे असें नाहीं. काश्मिरला जें तेथील हिंदुराजसत्तेविरुद्ध नि तत्रस्थ हिंदूंना मारक ठरलेलें जें मुसलमानांचें अेक प्रकारें बंडच झालें त्यांत या अहरारांनींच फार मोठा भाग घेतला होता. तेव्हां ही संस्था अगदीं निरुपद्रवी आहे असें कोणी समजूं नये. या संस्थेंतील पुढारी नि कार्यकर्ते यांनीं जमेल तोंपर्यंत बाह्यतः राष्ट्रीय स्वरूप दाखविण्याचें धोरण धरलेलें आहे. मुसलमानांची अशी समज आहे कीं हिंदूंना धमकावावें नि त्यांचेजवळून वाटेल तें मान्य करून घ्यावें. ही समजूत होण्याला कॉंग्रेसचें वर्तनच कारणीभूत झालेलें आहे. कॉंग्रेसनें वा अेकाहि कॉंग्रेसी नेत्यानें मुसलमानांच्या धमकावणीला अेकाहि वेळीं तेजस्वी नि स्वाभिमानी अुत्तर दिलेलें नाहीं. अुलट प्रत्येक वेळीं त्यांच्या धमकावणीला शरणागतीच दाखविली आहे. अहरारांनीं त्यांचा अेक प्रमुख नेता, चौधरी अफजुल हक्क यांचे द्वारां सिव्हिल नि मिलिटरी ग्याजेटमधून हिंदूंना धमकी दिली आहे. ते म्हणतात, "**हिंदूंनीं मुसलमानांना सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत केलेलें आहे. तसेंच ते अडून बसतील नि आमच्यांत मिळून मिसळून जाणार नाहींत तर आम्हीं जिन्हांना मिळून जाअूं नि पाकिस्तान घेण्याची पराकाष्ठा करूं. हिंदू स्वतःला श्रेष्ठ समजतात नि मुसलमानांना दूर ठेवतात यावरून धर्म नि संस्कृति दृष्ट्या ते आमच्याहून भिन्न आहेत असें ते दर्शवून अेक प्रकारें ते नि आम्ही दोन राष्ट्रें आहोंत असेंच ठासून सांगत आहेत. तेव्हां असेंच चालू राहील तर मग आम्हांला देश विभागून देण्याची मागणी करणें भाग पडेल**" हिंदूंनीं अहराराशीं म्हणजे मुसलमानांशीं मिळूनमिसळून जावें नि तद्वारां धर्म नि संस्कृति या दृष्टीनें कांहींहि अंतर नाहीं असें सिद्ध करावें

म्हणजे काय, हिंदूंनीं मुसलमान व्हावें ? आमचें शुद्धीचें महाद्वार अुघडें आहे. अहरारांपैकीं बहुतेक हिंदू रक्तामांसाचेच पिंड आहेत. त्यांनीं या महाद्वारांतून सुखेनैव आंत यावें, आमच्याशीं अेकरूप होअून जावें म्हणजे विभक्तता राहणार नाहीं आणि देश विभागून मागण्याचें पापहि हातून घडणार नाहीं. आम्ही आनंदानें त्यांचें स्वागत करतों. पण धर्मसंस्कृतीनें हिंदूंपासून दूर राहून त्यांना काफर म्हणत जर नुसत्या धमक्याच देणें असेल तर तोहि मार्ग त्यांनीं सुखेनैव नि सक्रियतेनें अवलंबून पहावा—त्यालाहि आमची ना गाहीं. त्याहि गोष्टीला हिंदू सिद्धच आहेत. असो. ही अहरारी मनोवृत्ती आपण पाहिली. यांची संख्या दीड ते दोन लक्षापर्यंत आहे. आतां आपण खुदा—अि—खिदमतगार यांचेकडे वळूं.

खुदा-अि-खिदमदगार म्हणजे खुदा—अीश्वर, अि—चे, खिदमदगार—सेवक अर्थात् खुदाचे सेवक, अीश्वर सेवक. खुदा हा कुराणी अीश्वर होय. नि कुराणी अीश्वराचा सेवक म्हणजे खुदानें कुराणांत दिलेल्या आज्ञा मानणारा सेवक होय. कुराणी आज्ञांशीं आपण पूर्वी परिचय करून घेतला आहेच. तेव्हां हे खुदाचे सेवक वेळ येतांच कशा प्रकारें खुदाची सेवा करतील हे प्रश्न मनापुढें येतांक्षणींच चटदिशीं मनश्चक्षूपुढें अुभे राहील. ही "खुदाअीखिदमदगारांची सैनिक संस्था सीमाप्रांतीय पठाणांची असून गांधीच्या अहिंसासत्यादींचें पांघरुण घेतलेले अबदुल गफारखान—अेक पठाणी प्रमुखनेता—या सैनिक संस्थेचा अेकाधिपति आहे. हे गफारखान अेका अिंग्रज गृहस्थाजवळ सहजपणें काय बोलले हें पूर्वी आपण पाहिलेंच आहे. त्यांत आमच्या पठाणी स्वातंत्र्याच्या कल्पनेचा अुल्लेख त्यांनीं जो केलेला आहे त्या पठाणी स्वातंत्र्याचें स्वरूप कळण्यासाठीं त्यांच्या चिरंजिवांनीं अेकदां जे अुद्गार काढले होते ते पाहिल्यास पठाणी स्वातंत्र्य म्हणजे काय हें स्पष्टपणें लक्षांत येअील. ते अबदुल गफारखानाचे चिरंजीव अेका प्रसंगीं जरा अवसानांत येअून जाणून म्हणा वा चुकून म्हणा पुढीलप्रमाणें अुद्गारले. तो प्रसंग असा : हिंदुस्थानविषयीं कांहीं तरी बोलणें निघालें नि तुम्हीं अहिंसासत्यादि गुणानुसार गुण्यागोविंदानें नि मिळून मिसळून सर्वांशीं वागणार काय ? अशा अर्थाचा कांहीं प्रश्न पृच्छकांनीं केला असतां तो अुत्तेजित होअून म्हणाला, " We have been born to rule

and we shall rule "—" आम्हीं राज्य करावयाला म्हणून जन्मलों आहोंत नि राज्यच करूं " नि लागलींच सावध होऊन त्यानंतरचीं वाक्यें त्यांनीं वरील वाक्याचा कडकपणा नि स्पष्टपणा झाकोळण्यासाठीं अुच्चारलीं. या खुदासेवकांची संख्या साधारण अडीच लक्षांचे आंतबाहेर आहे. ही संख्या म्हणजे तत्काळ अुत्तेजित होअून वाटेल तो धुडगुस घालण्यास प्रवृत्त होणाऱ्या पठाणांची आहे. नि पठाण म्हणजे काय नि कसें श्वापद आहे हें आपण सर्वत्र पहातोंच. त्यावरून त्यांची ही संख्या कशी असेल नि काय करायला अुद्युक्त होअील हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. आतां अुरली खाकसार. **खाकसार** ही संस्था मुसलमानांच्या अर्ध सैनिक संस्थांत सर्वांत बलिष्ट अशी संस्था आहे. तिचा संस्थापक नि चालक **अल्लामा मश्रिकी** हा अेक अत्यंत महत्त्वाकांक्षी नि समर्थ मनुष्य आहे. त्यांनीं हिटलरच्या पायाशीं बसून संघटण शास्त्राची संथा घेतलेली आहे. नि हिंदुस्थानच्या सांप्रतच्या परिस्थितींत ज्या सीमेपर्यंत संघटनमार्ग आक्रमून संस्था प्रबळ करतां येअील तेवढी सीमा गांठून ती संस्था समर्थ करून ठेवलेली आहे. या संस्थेच्या सदस्यांची संख्या चार लक्षांवर जाअून ती शक्य तितकी वाढविण्याचा प्रयत्न चालूं आहे. या खाकसार संस्थेच्या चालकाचें नांव **अिनायतुल्लाखान** असें असून **अल्लामा मश्रिकी** म्हणजे 'पूर्वेचा देवदूत' अशा अर्थानें त्यानें आपणाला पदवी घेतली आहे. त्यांनीं आपल्या संस्थेंत कडक शिस्त ठेवली आहे नि विशेष म्हणजे त्या कडक शिस्तीला संस्थेंत असलेला प्रत्येकजण—मग तो फकीर असो वा अमीर असो—निमूटपणें मानीत आहे. फटक्यांचे शिक्षेलाहि ते सादर रहातात—कांकूं करीत नाहींत. **"सर्व जगावर अधिपत्य मिळवून पृथ्वीचें राज्य करावयाचें, महम्मदाचे वेळेपासून तो आज तेराशें वर्षेंपावेतों खुदाच्या अिच्छानुसार सर्व जगाचें राज्य अिस्लाम अेकाधिपत्याखालीं आणण्याचा जो हेतू सफल झाला नाहीं तो हेतू साध्य करून पृथ्वीवर अिस्लामी राज्य स्थापावयाचें हा मुख्य अुद्देश या खाकसार संस्थेचा आहे. खाकसार सदस्यांनीं खुदाचा (मुसलमान त्यांच्या कल्पिलेल्या देवाला खुदा म्हणतात) शिपाअी वनून जगाचा विजेता वनण्याची महत्त्वाकांक्षा धारण करावी. हाच आमचा धर्म नि हीच आमची निष्ठा."** ही त्यांची

ध्येयवादाची शिकवण आहे. खाकसारांच्या प्रत्येक सभासदाला रणक्रीडे-साठीं तरवार, शत्रूचा घाव चुकविण्यासाठीं ढाल, शिबिरांत निजण्यासाठीं अंथरुण, अंधरांत मार्ग दाखविण्यासाठीं विजेरी, प्रकाशांत अिस्लामी निशाण आणि हरकामीं येणारा बेलचा (फावड्यासारखें लांब काठीला बसवलेलें पोलादी शस्त्र) यांसह सुसज्ज राहिलें पाहिजे. सुदैवानें या सर्व गोष्टी निर्बंधाच्या (कायद्याच्या) कक्षेंत येण्यासारख्या नाहींत.' खाकसारांना लोकसत्ताक वा प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति संमत नसून पूर्ण अेकाधिपत्याचे ते अभिमानी नि पुरस्कर्ते आहेत. हिंदुस्थानांत अिस्लामी राज्य स्थापून हिंदूंना कसें वागवावयाचें याविषयीं खाकसार प्रमुख अल्लामा मश्रिकी म्हणतो. "**हिंदुस्थांतील राज्ययंत्राखालीं मुसलमान नि हिंदू, नवरा नि बायको जशी अेका घरांत नांदतात तसे हिंदुस्थानांत नांदावेत अशी आमची अिच्छा आहे.**" मुस्लिम मताप्रमाणें बायको ही अर्धांगी वा गृहिणी नसून पुरुषाचे हातांत सर्वस्वीं गुलाम म्हणून राहणारी, स्थावर (घर, भूमि आदिक) मत्ता असते त्याप्रमाणें वाटेल तें करण्याची नि हवें तसें वागवण्याचा हक्क नि सत्ता आहे अशी, सदासर्वदा पडद्याच्या तुरुंगांत डांबून ठेवली जाणारी, गुराढोरांप्रमाणें मारपिटीला पात्र असलेली अेक जिवंत अशी पूर्ण कक्षांत असलेली वस्तु म्हणून समजली जाते. आणि अशा प्रकारच्या अवस्थेंत हिंदूंना नांदूं देण्यास अल्लामा मश्रिकी अिच्छुक आहेत. यांच्याजवळ लक्षावधि रुपयांची मत्ता सांठलेली आहे. या संस्थेचें किती स्तोम माजलेलें आहे याची कल्पना यावी म्हणून २।३ घटना येथें दिल्या आहेत. **पंजाब सरकारला (नोटीस) चेतवणी देअून पुढील मागण्या केल्या आहेत.** जकात (प्रत्येक मुसलमानांनीं द्यावयाचें अिस्लाम निधीचें दान) हें 'अिंदरा अल्लीया हिदीया'कडे सर्व अेकत्रित होअून पक्षाच्या कोषाची पूर्तता करतां येअील अशी स्थायी सोय लावून टाकावी. (२) पक्षाच्या प्रचारकार्यार्थ 'नभोवाणी' (रेडियोचें) चें केंद्र स्थापन करण्याचा अधिकार खाकसारला मिळावा (३) प्रत्येक सरकारी मुसलमान नोकराला खाकसार पक्षाचा सभासद होण्याची पूर्ण मोकळीक असावी. **सीमाप्रांतीय सरकारकडील मागण्या :** वरील मागण्या पुढें ठेवून त्यांनीं नवी अेक मागणी आणखी मागितली ती अशी (४) धार्मिक कार्यार्थ दिलेल्या स्थावर मत्तांचें सर्व दान सरकारनें नियंत्रणार्थ नि व्ययासाठीं खाकसारकडे द्यावें. या मागण्यांना सीमा-

प्रांतीय कॉंग्रेसी सरकारचे मुख्य प्रधान खानसाहेब यांचें पूर्ण सहानुभूतिदर्शवणारें पत्र आलें होतें. **सिंधकडेहि अशाच मागण्या** मागितल्या. अर्थात् या तीनहि प्रांतांत मुस्लिम सरकारें आहेत. नि त्यांची या खाकसार संस्थेला पूर्ण सहानुभूति आहे. खाकसार संस्था कोणत्याहि कार्यांत प्रत्यक्ष भाग घेत नाहीं नि अहरार आणि खुदाअी खिदमदगार याहि संस्थांचा हाच नियम आहे. पण त्यांच्या पुढाऱ्यांपैकीं कोणी कांहीं अेखाद्या गोष्टीविषयीं "यामुळें आमच्या धर्मभावना दुखवतात, म्हणून त्या होतां कामा नये" या वा अशाच अर्थाचें वाक्य अुच्चारावयाचाच अवकाश कीं लागलीच मुसलमानांचा दंगा तेथें होतो. हे दंगे बहुतेक सर्व स्थळीं पूर्व नियोजित, विशेष धोरणानें चालविलेले नि संघटित स्वरूपाचे असतात. आणि या दंग्यांत शिस्तींत चालणारे, संयुक्ततेनें काम करण्याचें शिक्षण घेतलेले लोक पुष्कळसे असतात. तेव्हां हे लोक या वर अुल्लेखलेल्या संस्थांचेच असले पाहिजेत हें निगमन चुकीचें ठरण्याचा संभव आहे असें कोण म्हणूं शकेल ? खाकसारांनीं तर दोन वेळीं दोन प्रांतांत सरकारविरुद्ध प्रत्यक्ष अत्याचारीपद्धत अवलंबून संघटित विरोधाची–दंग्यांची–अुठावणीहि केली होती ही गोष्ट वृत्तपत्रवाचकांना माहीत आहेच. तीं सरकारें म्हणजे अेक पंजाबी नि दुसरें युक्तप्रांतीय होय. या अुठावणींत मनुष्यहानिहि बरीच झालेली आहे. युद्ध चालूं झाल्यावर आपल्या संस्थेंतील बऱ्याच मोठ्या संख्येंत खाकसारांना युद्धाचें प्रत्यक्ष शिक्षण मिळावें म्हणून नि सैन्यांत मोठ्या प्रमाणावर खाकसारांची संख्या घालतां आली तर पुढें मागें त्याचा अुपयोगहि आपणांला आपल्या हेतूसाठीं करून घेतां येअील अशा हेतूनेंहि असेल, अल्लामा मश्रिकीनें सरकारला ५०००० स्वयंसेवकांचें साह्य देण्यास सिद्धता असल्याचें कळविलें होतें. पण सरकारनें त्या साह्याची अपेक्षा धरली नाहीं नि तें साह्यदान वांझोटें ठरलें. अुलट या खाकसारांच्या विविध हालचाली नि बेत यामुळें साधारभय वाटून ती संस्था सरकारनें अनैर्बंधित नि घातकी ठरवून बंद केली आणि अल्लामा मश्रिकीला कारागारांत बंद करून ठेवलें आहे. अंग्लो अिंडियन पत्रें सहसा मुस्लिम संस्थाविषयीं–मग त्या नागर (सिव्हिल) संस्था असोत सैनिक–अर्धसैनिक संस्था असोत–विरोधीपणानें लिहीत नाहींत. पण तींही पत्रें या खाकसकरांवर क्रुद्ध होऊन तीविरुद्ध कडक अुपाय योजण्यासाठीं

सरकारला आग्रहानें सुचवित होतीं. मुसलमानी मूजोरपणा नि माजोरीपणा सरकारच्या फुशीनें अुत्तेजित होऊन मर्यादेबाहेर जाअूं लागला नि आतां तर ती त्यांची अुन्मत्तता सरकारी सत्तेलाहि आव्हान द्यावयाला अुघडाअुघडी सिद्ध झाली आहे. मद्रासमध्यें मुस्लिम लीगचे अध्यक्ष जीनानी "तुम्ही, आम्हांला पाकस्तान देतां कीं आम्हीं तें दुसऱ्यांजवळून (दुसऱ्या कोणा प्रबळ परकीय सत्तेच्या साह्यानें) घेण्याचा प्रयत्न करावा" अशी आव्हान देणारी भाषा वापरली आहे. त्याचप्रमाणें परवां कलकत्त्यास मुस्लिम लीगच्या कार्यकारिणीच्या वेळीं नि मुंबअीस गेल्या कांहीं दिवसांत येथील लीग प्रमुखांनीं **"जर लीगच्या मागण्या योग्य प्रकारें न मानतां हिंदुस्थानला नव्या सुधारणा वा स्वराज्याचे हक्क दिले तर मुसलमान बंड (रिव्होल्ट) करतील" अशी सरकारला धमकी दिली आहे. सरकार त्या धमकीविषयीं अनुकूल प्रतिकूल विचार करावयास समर्थ नि स्वतंत्र आहे. पण त्या धमकीप्रमाणें वागण्याचे मुसलमान जेव्हां मनांत आणतील तेव्हां त्या बंडाची लाट पहिल्यानें नि प्रामुख्यानें हिंदूंना धडका देअूं लागेल हें निश्चित. आणि हें लक्षांत घेअून हिंदूंहि आधींपासून सिद्ध होअून त्या लाटेचा प्रतिकार समर्थपणें करतील तरच त्यांचें यथायोग्यपणें संरक्षण होणारें आहे हें हिंदूंनीं दृष्टीआड करतां कामा नये.**

काँग्रेसी हिंदूकडून राष्ट्रहित आहे !!

मागें काँग्रेसची नि प्रमुखतः काँग्रेसचे १९२० पासूनचे नेते बनलेले गांधीची मनोवृत्ति मुसलमानधार्जिणी बनून राष्ट्रहानिकर झाल्याचें केवळ दिग्दर्शन प्रसंगाप्रसंगानें संक्षेपतः झालें आहे. पण येथें आतां त्या मनोवृत्तीचें यथार्थ दर्शन सप्रमाण रीतीनें हिंदूवाचकांना करवावयाचें आहे. काँग्रेस ही संस्था हिंदुस्थान राष्ट्राच्या हितार्थ निघालेली आहे. शक्य त्या त्या मार्गानें नि पद्धतीनें सर्व क्षेत्रव्यापि दृष्टि ठेवून राष्ट्रकल्याण साधावयाचें हें तिचें खरें नि मुख्य कार्य आहे. जर ती हें कार्य करीत नसेल तर ती राष्ट्राला निरुपयोगी संस्था ठरेल आणि जर ती राष्ट्रोपयुक्त कार्य न करतां अुलट राष्ट्रहानिकर कार्य करीत असेल तर ती जितकी लवकर नष्ट

होअील तितकें राष्ट्रोपकारक समजून ती तत्काल नष्ट करणें हेंच हिंदुराष्ट्रिकांचें व्यक्तिगत नि सामुदायिक प्रमुख कर्तव्य ठरेल. कारण कॉंग्रेस ही राष्ट्राकरतां आहे—राष्ट्र कॉंग्रेसकरितां नाहीं. हिंदुस्थानांतील अेका प्रख्यात पुढाऱ्यानें ' कॉंग्रेस ही मला मातेसारखी आहे ' असें म्हटलें होतें. होय, तें सर्वांबरोबर आम्हांलाहि मान्य आहे. पण मातेसारखी आहे या अर्धसत्याबरोबरच हें वाक्य अुराशीं बाळगणाऱ्यानें हेंहि दुसरें अर्ध लक्षांत घेतलें पाहिजेः **कॉंग्रेस ही मातेसारखी असली तरी माता नव्हे.** आपणां सर्वांची माता म्हणजे ही भारतभूमि होय. आम्हां सर्वांची पुण्यभू नि पितृभू म्हणजे हिंदुस्थानभूमि आहे. तिच्यावांचून आम्ही येथें क्षणहि जगूं शकत नाहीं. ती आमचें सर्वस्व आहे. तिच्या नि आम्हां सर्वांच्या सेवेसाठीं, अुपयोगासाठीं, कल्याणसाधनासाठीं कॉंग्रेस आदिक संस्थाची निर्मिति आम्हीं केलेली आहे. त्या संस्था आम्हांला मातेसमान सेव्य आहेत. पण जर त्यांत कर्तव्यशून्यच नव्हे तर पैशून्य, निरुपयोगीच नव्हे तर अुपद्रवी लोक शिरून आमच्या हितांवर निखारा ठेवावयास सिद्ध झाले असले नि राष्ट्राला परकीयांच्या हातीं सोंपवावयास अुद्युक्त झालेले दिसत असले तर त्यांचेसह त्या कॉंग्रेसला मूठमातीच देणें हें पवित्र कर्तव्य ठरेल. तसें करण्यांतच राष्ट्रकार्याचें पुण्य नि श्रेय लाधेल. दाअी आअीसारखी मान्य म्हणून म्हणतां येअील, पण कोठपर्यंत ? ती आअी मुलांची सेवा करीत राहील तोंपर्यंत. जर ती मुलांचे नळीला नख लावावयास नि आअीला विष पाजावयाला सिद्ध झाली तर त्या दाअीचा आअीपणा गुंडाळून ठेवून त्या दाअीला लत्ताप्रहाराचा प्रसाद देत बाहेर घालवून देणें ही सौम्यच शिक्षा ठरेल. नि म्हणून या कॉंग्रेसच्या नि कॉंग्रेसी तथाकथित राष्ट्रसेवक हिंदूंच्या घरबुडाअू कृत्यांचें परीक्षण आपणांला आतां करावयाचें आहे. त्याला आरंभ करूं.

१९१९ या वर्षी काबुल अमीर नि अिंग्लिश यांच्यांत झालेल्या चकमकीच्या वेळेपासून मुसलमान काबूलच्या अमीराला हिंदुस्थानवर स्वारी करावयाला प्रवृत्त करून त्याला दिल्लीचा बादशहा बनविण्याची स्वप्नें पहात होते नि ही गोष्ट गांधीला माहीत होती हें पूर्वी अुल्लेखलें आहेच. ही घटना स्वतंत्रपणें **सिंहाला शह** या पुस्तकांत (१९३०) मध्यें अुल्लेखित केली आहे. त्यांत गांधीसंबंधीं या घटनेशीं संबंध असल्याचें स्पष्ट नसलें तरी ही घटना घडवून आणूं पहाणाऱ्या

मुस्लिम पुढाऱ्यांचें गांधीशीं मेतकूट जमलें होतें हें स्पष्ट सांगितलेलें आहे. आणखीहि अेक स्वतंत्र पुरावा आहे. गांधी आयर्विनची तडजोड होण्यापूर्वी गांधीची व्हाअिसरायांशीं भेट व्हावयाची होती. त्या वेळीं दिल्लीस जावयाचे पूर्वी आम्ही (स्वतः लेखक) गांधीशीं अेका विशेष गोष्टीविषयीं सूचना करण्यासाठीं वर्ध्यास गेलों होतों. प्रजापक्षाकडून राजपक्षाशीं तडजोडीचीं बोलणीं आरंभावयाचे पूर्वी आधीं झालेल्या प्रजापक्षीय आंदोलनांतील राजकीय बंदी सोडण्याची मागणी प्रजापक्षीय नेते करीत असतात. त्या वेळीं अनेक राजकीय बंदी कारावासांत क्रांतीच्या प्रयत्नांसाठीं पिचत पडलेले होते. सुप्रसिद्ध भगतसिंह आपल्या फांशीच्या दिनाची मार्गप्रतीक्षा करीत कारावासांत राहिलेले होते नि गांधीच्या 'सत्याग्रहा'चेहि बंदी कारावासांत होते. "या सर्व बंदींच्या सुटकेविषयींची मागणी तुम्ही व्हाअिसरॉयपुढें ठेवा; त्यांत अनत्याचारी नि अत्याचारी असा जगांत कोठेंहि न केला जाणारा पण हिंदुस्थानांतच तुमच्याकडून केला जाण्याची भीति असलेला कृत्रिम नि अन्याय्य फरक करूं नका" अशी विनंति गांधींना केली. पहिल्यानें ही गोष्ट अेका वरवर युक्तियुक्त दिसणाऱ्या पण वास्तविक अुडवाअुडवी करण्याकरितां म्हणूनच त्या आपल्या सत्यभक्तीचें प्रदर्शन करणाऱ्या महात्म्यानें अुत्तर दिलें कीं 'जी गोष्ट मागण्यानें मिळेल तीच मागावी. ते अत्याचारी लोकांना सोडणार नाहींत तेव्हां ती मागणी मागण्यांत काय अर्थ?' अर्थात् याला प्रत्युत्तर म्हणून 'जर ते देतील तेंच मागावयाचें—देणार नाहींत ती मागणी मागावयाची नाहीं असें धोरणच योग्य असेल तर मग स्वराज्याची मागणी आम्ही करतों असें कां म्हणतां? ते स्वराज्य देणार नाहींत. कांहीं अिकडकचे तिकडचे साधे हक्क मागावेत कीं जे ते देतील!!' असें आम्हीं म्हणतांच क्षणभर ते चूपच झाले नि मग म्हणतात 'हें पहा! अत्याचारी लोकांना सोडा म्हणणें हें हीनपणाचें आहे. तें मी करणार नाहीं!' लागलीच "मग स्वामी श्रद्धानंदाची हत्त्या करणाऱ्या हत्यारी अबदुल रशीदसाठीं हिंदुसमाजाला नि स्वामीजींच्या चिरंजिवांना 'भाअी अबदुल रशीदला क्षमा करा म्हणून म्हणालात तो हीनपणा नव्हता कां? त्याचेसाठीं केलेला 'हीनपणा' यांचेसाठीं वा शस्त्राचारी राजकीय बंदीसाठीं करण्याला कां सिद्ध नाहीं?" असा रोखठोक प्रश्न करतांच त्यांची मुद्रा बघण्यासारखी झाली होती.

त्यांतच बोलण्याचे ओघांत खिलाफत आंदोलनांचे वेळीं मुसलमान पुढारी काबुलच्या अमीराला हिंदुस्थानवर चढाअी करून येण्यास प्रोत्साहवित होते अित्यादि गोष्टींत कितपत खऱ्या आहेत असें विचारतां 'कांहीं मुसलमान पुढारी या प्रयत्नांत होते हें मला माहीत होतें' असें त्यांनीं मला स्वतःला सांगितलेलें होतें. वरील आमच्याकडून त्यांना झणझणींत भासणारें अुत्तर दिलें गेलें नाहीं तोंच त्यांना कोणी तरी हाक मारीत आहेसें दाखवून 'मला आतां वेळ नाहीं. पुढें केव्हां तरी बोलूं' असें सांगून कांहींहि वाट न पहातांच ते तेथून अुठून गेले नि आम्हीहि अर्थात् परतलों. या आमच्या भेटींत झालेल्या संवादावरून मुस्लिम प्रयत्नांची माहिती त्यांना पूर्ण होती याविषयीं आम्हांला तरी शंका नाहीं. १९१९ नंतर अमीरानें आपली बाजू अधिक बळकट केली. २।३ वर्षांत हिंदुस्थानांतहि खिलाफत आंदोलनानें चढत्या वाढत्या प्रमाणांत अुग्र स्वरूप धारण करीत आणलें होतें नि 'अेक वर्षांत स्वराज्या'ची आरोळी याच अमानुल्लाचे ठरावाच्या बळावर कॉंग्रेसमधून गांधीच्या साह्यानें ठोकली गेली. यांत गांधीचा निश्चित हात होता याला भरभक्कम वाटणारे म्हणून जे सर्वोपुढें मांडण्यासारखे पुरावे ते पुढीलप्रमाणें आहेत. अेक गोष्ट येथें सांगितली पाहिजे. नि ती ही कीं, गुप्त कटाचे पुरावे अुघड होणाऱ्या घटनासारखे भरपूर नि सर्वांना माहीत झालेले असे मिळणें शक्य नसतें. नि म्हणून विविध वेळीं विविधप्रकारें निरनिराळ्या फटींतून थोडथोड्या मिळणाऱ्या सुगाव्यावरून अेकंदर डाव काय होता हें दाखविण्यासाठीं त्या सुगाव्यांची तर्कशुद्ध मांडणी करून घटनांचा क्रम दाखवावा लागतो. हें लक्षांत घेअून दिलेल्या गोष्टींच्या धाग्यांची जुळणी दाखवलेल्या मांडणीकडे लक्ष देअून पाहिल्यास निश्चित पटल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां पुढील गोष्टींकडे अनुसंधानपूर्वक लक्ष देअून तो भाग बघावा अशी विनंति आहे.

१. मार्च १९२१ मध्यें विधिसमितींत गृहमंत्री सर विल्यम व्हिन्सेटचे भाषणांत ते म्हणतात "...अल्लीबंधु हिंदुस्थानांत मुस्लिमसाम्राज्य स्थापण्यासाठीं प्रयत्नांत आहेत ही गोष्ट सर्वत्र बोलली जात नाहीं का? हा हेतु साध्य करून घेण्यासाठीं परकीय शत्रूंचें साह्य घेण्याचा त्यांचा हेतू आहे असें बोललें जात नाहीं काय? अेक दोन महिन्यांत बाहेरून परदेशीय सत्तेचें हिंदुस्थावर आक्रमण होअील नि त्यांना हिंदुस्थानांतील मुसलमान साह्य करतील असेंहि

बरेचजण म्हणत नाहींत काय ? आणि जर हें सर्व खरें नसेल तर मग कावूलशीं जो अिंग्लिश सरकारचा संधि होणार आहे तो होअूं नये म्हणून विशेष अुत्सुकता कां दिसून येतें बरें ? अशी अिच्छा (त्यामागें कांहीं विशिष्ट हेतू असल्यावांचून) धरणें हें चमत्कारिकच नाहीं कां ?"

२. या गृहमंत्र्याच्या भाषणावर अेक 'फोडा-झोडा नि राज्य चालवा' (डिव्हाअिड अँड रूल) या नांवाचा गांधींनीं लेख लिहिला पण त्यांच्या आरोपाला नकाराचें सरळ अुत्तर मात्र देतां आलें नाहीं. उलट डेली अेक्सप्रेसमध्यें गांधींची भेट प्रसिद्ध झाली आहे त्यांत **" काबुलमध्यें जी सिद्धता होत आहे (अर्थात् युद्धाची) ती खिलाफतीच्या साह्यार्थ होत आहे " असें गांधीनेंच स्वतः सांगितल्याचें प्रसिद्ध झालें आहे.** यांत खिलाफतीच्या साह्याचे निमित्तानें काबुलमध्यें १९२१ च्या अेप्रिलमध्यें युद्धार्थ नि हिंदुस्थानवरील आक्रमणार्थ सिद्धता चालली असल्याचें गांधीस माहीत होतें हें स्पष्ट आहे.

३. " मुसलमान जोंपर्यंत अहिंसात्मक चळवळी करीत राहतील तोंपर्यंत मी त्यांच्यारोबर राहीन. पण अत्याचाराला ते स्वीकारीत आहेत वा नुसते मान्य करीत आहेत अेवढें जरी मला थोडेसें कळलें तरी मी तत्काल त्यांचा संबंध सोडीन..." असें खिलाफत चळवळीच्या आरंभीं गांधींनीं सांगितलें. पण अेप्रिल १३।१९२१ च्या यंग अिंडियामध्यें हा सत्य–अहिंसाभक्त म्हणतो " माझ्या सहकाऱ्यांपासून मला वेगळा समजण्यांत अर्थ नाहीं." ' युद्ध वाअीट आहे ही गोष्ट खरी पण युद्धाहूनहि कांहीं गोष्टी अधिक वाअीट आहेत ' हें मौलाना महमदअल्लीचें म्हणणें खरें आहे. शांततेनेंच आपसांतील भानगडी मिटाव्यात अशीच अल्लीबंधूंची अिच्छा आहे नि त्याप्रमाणें ते प्रामाणिकपणें नि झटून प्रयत्न करीत आहेत. पण जर तो त्यांचा प्रयत्न सरकारच्या वर्तणुकीमुळें वा अन्य कारणानें व्यर्थ ठरला तर **त्यांना शक्य झाल्यास युद्धहि घडवून आणल्यावांचून ते रहाणार नाहींत. माझ्या अहिंसेच्या व्रतामुळें मला जरी त्यांत भाग घेतां येत नसला तरी सध्यांच्या पौरुषहीन शांततेपेक्षां युद्धमय स्थितीकडे मी संमतीपूर्वक झुकेन आणि म्हणूनच अंतीं देशांमध्यें**

अराजकतेचा गोंधळ माजण्याचा संभव आहे हें माहीत असूनहि या अहिंसात्मक (?) असहकाराच्या चळवळींत मी भाग घेत आहें'' या विधानांत युद्धाच्या सिद्धतेसाठीं अलीबंधूची धडपड नि त्यामुळें देशांत बंडाळी होण्याचा संभव, या गोष्टी माहीत असून त्या युद्धमय परिस्थितीची मान्यता स्वीकारूनच गांधीनीं अहिंसात्मक असहकाराचा ढोंगधत्तुरा चालूं ठेवला होता हें स्पष्ट असल्याचें कोण नाकारूं शकेल?

४. अहमद हुसेन नांवाच्या अेका व्यकीचें पत्र गांधीनें ४ मे १९२१ च्या यंग अिंडियांत प्रसिद्धिलें आहे. तें पत्र म्हणतें 'ज्यांनीं अिस्लामला खच्ची केलें नि मुसलमानांचीं पवित्र स्थलें अन्यायांनीं घेतलीं त्यांच्या विरुद्ध अफगाणचा अमीर चालून आल्यास मी त्याला अवश्य साह्य करीन, हें मद्रासला महमद अलीनें केलेलें भाषण तुम्हास (गांधीस) माहीत आहे. नेमस्त लोक अशी गोष्ट घडूं घातल्यास त्या आंदोलनाचा नाश करण्यास अुत्सुक आहेत. मालवीय, दास, लाला लजपतराय हे याविषयीं मूग गिळून आहेत. तुम्ही सुद्धां या महत्त्वाच्या भाषणाकडे लक्ष पुरविलें नाहीं...हा काळ स्पष्टपणें अुघड बोलण्याचा आला आहे. तेव्हां तुमचें म्हणणें स्पष्टपणें लोकांना (मुसलमानांना) कळेल तर बरें होअील' अशा प्रकारचें पत्र गांधीला जावें यावरून मुसलमानांना गांधीची अनुकुलता असल्याचें माहीत होतें तरीहि पण ती अनुकूलता प्रकटपणें मिळावी अेवढेंच ते अिच्छित होते. नि त्यांची अिच्छा या मुसलमानभक्तवत्सल गांधीनीं पुरविली आहे.

५. प्रयागच्या जिल्हा परिषदेंत गांधींनीं अुघडपणें नि स्पष्टतेनें सांगितलें कीं **''वदंता खरी असेल तर अलीं बंधूच अेकटे काय म्हणून पकडले जावेत नि मला मात्र मोकळें ठेवावें, मीं जें करणार नाहीं तसें त्यांनीं कांहींच केलेलें नाहीं. जर त्यांनीं अफगाण अमीराला निरोप पाठविला असला तर 'तुम्ही हिंदुस्थानवर चढाअी करून आलांत तर मला प्रयत्न करतां येअील तेवढा करून तुम्हांला हिंदुस्थानांतून हुसकून लावण्यासाठीं अेकहि हिंदुस्थानवासीयाला मीं पुढें येअूं देणार नाहीं.' असा निरोप मीहि पाठवीन.** (अुघड असें बोलणें म्हणजे प्रत्यक्ष निरोपच पाठविणें नव्हे काय? कारण अुघड

भाषणें परदेशीय वार्ताहर आपापल्या देशी लागलीच पाठवतात. गुप्त निरोप पाठविला असेल त्याला हा अुघड निरोपाचा प्रकट पाठिंबाच गांधींनीं दिलेला आहे.)....."

६. अमीराला तार पाठविण्यासंबंधी हिंदुस्थानांतील राजकारणी नेते मला दोष देतात असें महमदअल्ली हुतात्मा स्वामी श्रद्धानंदाजवळ कुरकुरले. तेव्हां श्रद्धानंदजींनींहि त्याचप्रमाणें मतप्रदर्शन करून त्या पाठविलेल्या तारेविषयीं महमद-अल्लींना दोष दिला. महमदअल्ली चूप बसले. त्यानंतर आनंदभवनांत गेल्यावर महमदअल्लींनीं स्वामीजींना अेका बाजूला नेअून त्याच तारेचें लिखाण स्वामीजींना दाखविलें. स्वामीजी आपल्या लिबरेटरच्या १९२६ जुलै २९ च्या अंकीं हा वृत्तांत देअून म्हणतात " **अहिंसामय अनत्याचारी आंदोलनाच्या प्रत्यक्ष जनकाचे स्वतःच्या हस्ताक्षरांतच जेव्हां तें त्या तारेचें लिखाण लिहिलेलें मीं पाहिलें तेव्हां मी आश्चर्यानें दिङ्मूढच बनलों.**" ही गोष्ट अुजेडांत आणल्यानंतर नि त्याचा पुष्कळ बोभाटा झाल्यावर फेब्रुवारी १०।१९४० च्या हरिजनमधील गांधीलेख म्हणतो, " अमीराला पाठविण्याकरितां मौलाना महमदअल्लीच्या वतीनें तारेचें पूर्वलिखित (ड्राफ्ट) मीं लिहिल्याचें मला आठवत नाहीं. ज्या पूर्वलिखिताविषयीं अेवढें काहूर अुठलें आहे तें अगदीं निरुपद्रवी आहे. नि त्यापासून काढलेलें निगमन निघावेंच असा तो नाहीं. दिवंगत स्वामीजींनीं त्याविषयीं मजजवळ कांहींही अुल्लेख केला नाहीं." असें अुडवाअुडवीचें अुत्तर दिलें आहे त्याचें थोडेंसें आविष्करण केलें पाहिजे.

(अ) अशी तार लिहिल्याचें मला आठवत नाहीं !! अमीरासारख्याला केलेली तार आठवत नाहीं याचा अर्थ असा होतो कीं अमीर, नबाबासारख्यांना यांच्या तारा शेंकडो जात होत्या त्यामुळें ही तार जणूं आठवत नाहीं असें असलें तरीहि " **अमीरानें अिंग्लिशांशीं संधि करूं नये, हिंदुस्थानांत परिस्थिति आशादायक आहे**" ही तारच अशा प्रकारच्या महत्त्वाची आहे कीं जी जन्मभर तार करणारांकडून विसरली जाअं नये. ही तार केली नाहीं असें गांधी म्हणूं धजत नाहींत. कदाचित् केल्याचें सिद्धच झालें तर खोटेपणाचा नंगा दोष पदरीं पडतो. आठवत नाहीं म्हटलें

म्हणजे दोन्ही दृष्टीनें सुरक्षित. ही सत्यभक्ताची सत्यभक्ति. (आ) पुढें म्हणतात कीं तार निरुपद्रवी आहे. हिंदुस्थानांतील आंदोलनांची तीव्रता धगधगत असतांहि तुम्हीं अिंग्लिशांशीं संधि करून शांततेला कां बांधून घेतां असा तारेचा आशय आहे. अमीराला हिंदुस्थानावर येण्याची बुद्धि होअूं नये म्हणून बऱ्याच अटी मानून अमीराला स्वस्थ करण्यासाठीं अिंग्लिश सरकार खटपटीत होतें. ही गोष्ट सर्व प्रसिद्ध आहे आणि तें होअूं न देतां अमीरानें हिंदुस्थानच्या अनुकूल परिस्थितीचा लाभ घेत हिंदुस्थानवर चालून यावें असा तारेचा आशय होता. आणि असें असून गांधीबोवा म्हणतात तार निरुपद्रवी, मग गांधीच्या मतें अुपद्रवीपणा याहून दुसरा कोणता असावा बरें ? (अि) शेवटीं स्वामीजीनें मजजवळ अुल्लेख केला नाहीं अेवढें म्हणून ठेवलें. यांत तसें खरें असतें तर स्वामीजी मला म्हणते असा ध्वनि काढून हें खरें नाहीं असा भास अुत्पन्न केला आहे. पण गांधींच्या हातून मुसलमान धार्जिणेपणा होत आहे हें बरेंच पूर्वीपासून जाणल्यापासूनच स्वामीजी दूरावत चालले नि पुढें गांधीशीं त्यांनीं संबंधच सोडला. तेव्हां अुल्लेखाचा प्रश्नच अुरत नाहीं. तेव्हां या हरिजनांतील लिखाणांत धूळफेक आहे. त्या आरोपाचा स्पष्ट नि सरळ नकार ते देअूं शकले नाहींत ही गोष्ट वाचकांनीं लक्षांत घ्यावी. दुसरें असें कीं, प्रयागच्या जिल्हा परिषदेमध्यें गांधीनीं जें भाषण दिलें होतें तें या तारेंतील म्हणण्याशीं तंतोतंत जुळतें होतें नि तें भाषण स्वामीजींनीं स्वतः अैकलें असल्यामुळें त्यांना गांधींना त्या तारेविषयीं वांझोटें विचारणें अवश्यक वाटलें असलें पाहिजे.

७. ' अफगाणी राज्यांत (जर राज्य आलें तर) हिंदूंच्या धर्माला कांहींच भय नाहीं ' असी हमी हिंदूंना गांधींनीं भरली होती. ज्याला हिंदुस्थानावरील परकीय मुसलमानांच्या बादशाह्यांच्या बादशाहीवटीच्या कालांत हिंदूंवर झालेल्या अत्याचार, छळ, बलात्कारादींची माहिती आहे अशा कोणालाहि ही हमी म्हणजे निव्वळ अट्टल भोंदूपणा वाटल्यावांचून राहणार नाहीं.

८. यंग अिंडियामध्यें 'अफगाण बागी' म्हणून गांधीनें अेक लेख लिहिला. त्या लेखाविषयीं गांधीमित्र, हिंदुस्थानचे कल्याणचिंतक म्हणवणारें सी. अेफ्. अँड्रयूज–हे राजकारण क्षेत्रांत सर्वपरिचित आहेत–यांनीं ' हा लेख म्हणजे

अफगाण अमीराला हिंदुस्थानवर चालून येण्यासाठीं आमंत्रणच दिल्यासारखें आहे. आणि अशा स्थितींत हिंसा कृत्यांत तुम्हीं भागीदारच ठरला नाहीं काय ? ' असा या अहिंसास्तोमी गांधीबोवांना खोंचक प्रश्न विचारला. हा प्रश्न कांहीं अेखाद्या हिंदुपुढाऱ्यांनीं वा देशभक्तांनीं विचारलेला नव्हता—तो सरकारी पक्षांत सरकारमान्य अशा अिंग्लिश मनुष्याचा होता. अर्थात् गांधींना तत्परतेनें उत्तर देणें भाग पडलें. अुत्तरांत " माझ्या लेखाचा तसा अर्थ होअूं शकेल हें माझें ध्यानांत आलें आहे. म्हणून " मीं अगदीं तातडीनें नि तत्परतेनें ज्यांना ज्यांना याचें अुत्तर हवें आहे त्या सर्वांना अुद्देशून (सरकारमध्येंहि या लेखाचें स्पष्टीकरण [अेक्स्प्लनेशन] गांधीकडून सार्वजनिक रीतीनें मागण्याची आवश्यकता भासली नि म्हणूनच अँड्र्यूजद्वारां तें स्पष्टीकरण मागितलें गेलें. तेव्हां हें कांहीं ठीक चिन्ह नाहीं हें ओळखून हे अमीराला आमंत्रण करणारे महात्मे गडबडले नि अुठपळ करीत स्पष्टीकरणार्थ पुढें आले) मी प्रसिद्धितों कीं माझा तसा अुद्देश नव्हता. हिंदुस्थानला बाहेरच्या कोणाच्याहि साह्याची आवश्यकता नाहीं.....अगदीं अहिंसा मार्गानेंच आमचें साध्य आम्हीं मिळवूं " हें अुत्तर देअून कसेंबसें स्वतःविरुद्ध अुठूं पहाणारें राजकीय काहूर शांत केलें. दुसरा कोणी असा प्रश्न केला असता तर त्याला अुत्तरच मिळालें नसतें. कदाचित् मिळालें असतें तर अुडवाअुडवीचें अथवा पृच्छाकाच्या मनाच्या हीनपणाचा त्याचेवर आरोप करीत माझ्या लेखाचा असा विपर्यास करणें हा सरळपणा नाहीं असें म्हणण्यास गांधी पुढें सरसावले असते. पण हा लेखाविषयींचा प्रश्न असें अुडवा-अुडवीचें वा लपंडावाचें अुत्तर देअून पिंड सोडण्यासारख्या ठिकाणाहून झालेला नसल्यामुळें अुडवाअुडवी वा लपंडाव करण्याचे साहस गांधीस करणें अशक्य झालें. नि अगदीं सरळपणें माझ्या लेखाचा अमीराला आमंत्रण दिल्याचा अर्थ होतो हें मान्य करणें भागच पडलें. गांधी कांहीं कच्चे लेखक वा नवशिके सार्वजनिक कार्यांत भाग घेणारे नाहींत. मनांत नसणारा अर्थ अितका अुत्तानपणें लेखांत येऊं शकतों हें विधान भोळसरांनाहि खरें वाटणार नाहीं. तो लेख जें मनांत होतें तेंच व्यक्त करण्यासाठीं लिहिलेला होता. पण अँड्र्यूजचा प्रश्न होतांच तसें धैर्यानें मान्य करण्याचें साहस मात्र या कॉंग्रेस—प्रमुखाला करवलें नाहीं. बाकी तो लेख म्हणजे हिंदुस्थानावर

चालून येण्याचें अमीराला आमंत्रण देणाराच होता हें निश्चित. प्रयागच्या परिषदेंत मात्र अल्लीबंधूप्रमाणेंच मीहि अमीराला बोलावण्याच्या कृत्यांत भागी होईन (म्हणजेच आहे) असें जोरजोरानें सांगणारे गांधी सरकारी पृच्छा अँड्रयूजद्वारां होतांच अितके गर्भगळीत झाले नि आपलें अवसान सोडून पुन्हां अहिंसेच्या बुरख्याचा आश्रय करते झाले हेंहि ध्यानांत ठेवण्या-सारखें आहे.

९. नागपुरच्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत "अमीरानें अिंग्लिशांशीं संधि करूं नये" म्हणून प्रस्ताव गांधीनें स्वतः मांडला, पण त्याच वेळीं कॉंग्रेस अधिवेशनांत तोच ठराव पंडित मालवीयादिकांचे विरोधाच्या भयानें गांधीनें पुढें मांडण्याचें साहस केलें नाहीं.

१०.,१९२० च्या अेप्रिल २६ ला मुंबअीस मुसलमानांची मुंबअी खिलाफतच्या वतीनें सभा भरून 'हिंदुस्थान नि त्या शेजारील आशियांतील राष्ट्रें नि सरकारें (अफगाणिस्थानकडे हा अंगुलीनिर्देश आहे हें वाचक ताड-तीलच) यांचें भवितव्य अपरिहार्यपणें अेकच असल्यामुळें मुंबअीचे मुसलमान कॉंग्रेसला विनंति करीत आहेत कीं, परस्पर स्नेह नि सहानुभूति निर्माण करण्या-साठीं शेजारीं राष्ट्रें नि सरकारें यांच्याशीं मित्रत्वाचे घनिष्ट संबंध जोडावे नि तदनुसारें परदेशीय राजकारणाचें धोरण स्पष्ट नि निश्चितपणें आखावें म्हणून विनंति करीत आहे' असा प्रस्ताव केला. अर्थात् मुसलमानांची दाढी हालल्याबरोबर त्या तालावर पावलें टाकण्यास सदा सिद्ध असलेले गांधीनें कॉंग्रेस कार्यकारिणीला तदर्थक प्रस्ताव करण्यास आज्ञापिलें नि त्यासाठीं कसा ठराव असावा याचें पूर्वलिखाण स्वतः लिहून कार्यकारिणीपुढें मांडावयासाठीं पाठविलें ! त्या वेळीं काय कॉंग्रेस, काय अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटी, काय कार्यकारिणी मंडळ हीं सर्व गांधीच्या अर्ध्या वचनांत असलेली सेवक मंडळी बनून राहिली होतीं. नि तरीहि तें गांधीचें प्रस्ताव लिखाण गांधीची अनुगामी असलेल्या कार्यकारिणीला सुद्धां फार कडक वाटलें. नि म्हणून "गांधीनीं जो प्रस्ताव लिहून पाठविला तो पुन्हां नीटनेटका करून नि अवश्यक तो फेरफार करून कार्यकारिणीच्या सभासदांमध्यें पहिल्यानें व्यक्तिगत संमतीसाठीं पाठवावा नि मग पुढचें कार्य-कारिणीपुढें मांडावा" अशी गांधीला विनंति करून तो प्रस्ताव मान्य करण्याचें कार्य पुढें ढकललें.

११. कर्णावती (अमदाबाद) ला खिलाफत परिषद झाली. त्यांत हकीम अजमलखान अध्यक्ष नात्यानें अेका बाजूला हिंदुस्थान नि दुसऱ्या बाजूला आशिया मायनर (तुर्की प्रदेश) या दोन्हीसह अेक जे मोठ्या सांखळीचे दुवे आहेत, ते भावी कालांतील ' मुस्लिम संयुक्त संस्थानां 'ची (अमेरिकेप्रमाणें) फळी उभी होणार आहे त्यासाठीं हळुहळू पण निश्चयानें जवळजवळ निसंबद्ध होणारे घटक आहेत ' असें म्हणून हिंदुस्थानांतील नॉनकोऑपरेशनचें आंदोलन नि अफगाण अमीराचा अिंग्लिशांशीं होणारा संधि या दोन गोष्टींचें परस्पराशीं संबंध आहेत असें स्पष्ट गांधींच्या अुपस्थितींत म्हणाले आहेत.

अफगाण अमीराच्या हिंदुस्थानवरील चढाअीच्या आधारावर असहकारितेच्या आंदोलनाची वावटळ अुठणार होती, पण अफगाण अमीराचा अिंग्लिशांशीं संधि दिनांक ६ ला पक्का झाला. ही बातमी कळतांच हिंदुस्थानभर वावटळ अुठविण्यासाठीं म्हणून ठरलेला बारडोलीचा ' सिग्नल–' संकेत ठरल्याप्रमाणें देण्याचें स्थगित करून तें आंदोलन करावयाचें नाहीं असें गांधीनें ठरविलें. अर्थात् अमीर येत नाहीं तेव्हां हिंदुस्थानांत सार्वत्रिक अुठाव अुपयोगी ठरणार नाहीं म्हणून बारडोलीचा ' सत्याग्रह ' हा गांधीबावांनीं मागें घेतला.

१२ गांधीनें ' नॉनव्हायोलंट नॉनकोऑपरेशन ' ची म्हणजेच ' अहिंसात्मक असहकारा'ची चळवळ अुभारली होती. ती हिंदू, मुसलमान, खिस्ती, पारशी आदिकांसह करावयाची होती असें असतांहि १९२१ मध्यें " कौन्सिल ऑफ् ॲक्शन " म्हणजे अेक कार्यमंडळ (केंद्रीय) नेमावयाचें होतें. त्यांत वास्तविकत: हिंदुमुसलमानादिक सर्व लोकांचे प्रतिनिधी घेणेंच युक्त नि न्याय्य होतें. पण यंग अिंडियांतील या लेखांत केंद्रीय कार्यमंडळांत केवळ मुसलमानच असावेत, नि हें कार्यमंडळ नॉनकोऑपरेशन विषयक असणार आहे. नॉनव्हायोलंट हा शब्द हेतुत: गाळलेला आहे. गांधीनें सतत दोन्ही शब्द जोडीनेंच म्हणावयाची प्रथा ठेवली होती. पण या गोष्टींत मात्र अहिंसेचा वास ठेवला नव्हता नि त्या मंडळांत केवळ मुसलमानच असणार म्हणून बजावलें. हा विधि झाला. निषेधहि पाहिजेच. अर्थात् या मंडळांत अेकहि हिंदू असूं नये हा निषेधहि स्पष्ट केला. अर्थात् गांधी त्या मंडळांतून वगळलें जाणें शक्य नव्हतें म्हणून आपल्याविषयीं त्यांनीं त्याच लेखांत

सांगून टाकलें कीं " **माझा समावेश त्यांत मी नॉनकोऑपरेशनचा तज्ञ म्हणून व्हावयाचा आहे, हिंदू म्हणून नव्हे; तें मंडळ केवळ मुसलमानांचेंच असणार.**" कां बरें. सर्व हिंदुस्थानांतील राजकीय आंदोलन हें हिंदूंचेंच प्रामुख्यानें असतां (मुसलमान खिलाफतीसाठीं आले, हिंदुस्थान-साठीं नव्हेत) त्यांत हिंदू खड्यासारखा कां वगळला. नि केवळ मुसलमानच त्यांत घेण्याचें कां बरें ठरविलें. त्यांत येवढें गौप्य काय होतें कीं जें मुसलमानाजवळ सुरक्षित रहावें नि हिंदूंजवळ तें सुरक्षित राहाण्याची शंका वाटावी. मी साधु पुरुष म्हणून गांधीचा दावा. मग हें गौप्य, हा कपटाचा खेळ कां ? यंग ऑडिया १ जून १९२१ मध्यें गांधीचा लेख म्हणतो "...**खिलाफतीसाठीं हिंदुस्थानसरकारला पेचांत आणण्यासाठीं चालून येणारे अफगाण लोक जर पराजय करण्यांत यशस्वी झाले तर हिंदुस्थानवर राज्य प्रस्थापित करण्याचा मोह त्यांना आवरणार नाहीं हें नाकारतां येत नाहीं. आणि असें असूनहि जें सरकार तुटावें म्हणून अिच्छा आहे त्या सरकारला अफगाणविरुद्ध साह्य करणें असहकारवाद्याच्या क्रमाला अिष्ट नाहीं. अित्यादि...**" या त्यांच्या लिखाणांतील हे पुरावे पाहून हा कट गांधीला माहीत नव्हता वा ते त्यांत नव्हते असें म्हणावयाला कोणता सुजन पुढें येअील बरें ? निर्विवाद असे सर्व पुरावे स्थलाभावामुळें देणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांत असहकाराची लाट अुठवून स्थलोस्थलीं सरकारी यंत्र निकामी, सरतेपर्दी खिळखिळें तरी करावें नि बाहेरून अमानुल्लाची स्वारी होतांच मुसलमानांनीं हिंदुस्थानभर अुठाव करून ठरल्या वेताप्रमाणें अमानुल्लाचे हात बळकट करीत त्याच्या यशाचा मार्ग सुलभ करून ठेवावा; या व्यूहाचीं सूत्रें नीटपणें चालावींत म्हणून कार्यमंडळ पाहिजे होतें. पण त्या मंडळांत हिंदू कसें काम करणार ? मुस्लिम बादशाही हिंदुस्थानवर आणून बसविण्याअितका अधमाधम हिंदू, हिंदुपुढाऱ्यांत दुसरा कोणी मिळणें शक्यच (गांधीचे प्रभावळींतील कांहीं हाताबोटावर मोजले जाणारे वगळून) नव्हते. नेहरू पितापुत्र या मंडळांत घेतां आले असते पण तसें केल्यास त्यांचेंहूनहि कार्यसेवेंत अधिक योग्य असे लाला लजपतराय, पं. मालवीयजी हे घेणें भाग पडले असतें. पण ते या देशद्रोहाला मोडून काढून त्यांत भाग कधींहि घेते ना, नि

म्हणून त्या मंडळांत हिंदू नसावा असा दंडक गांधीनीं ठरवला होता. असाच नाहीं का अर्थ होत.

हा १९२१ सालचा अमानुल्ला–मुसलमान–गांधीकटाचा कोळसा अधिक न अुगाळतां गांधीच्या अन्य महात्माबाजीकडे वळूं. मुसलमानाविषयींच्या प्रेमानें गांधीमन सदानकदा भरून वाहत राहतें त्या वृत्तीनें तें 'यंग इंडिया'मध्यें 'शरणागतीचें शास्त्र' (सायन्स ऑफ सरेंडर) या नांवाचा अेक लेख ९ मे १९२५ मध्यें लिहिते झाले. त्यांतील वेंचक मुक्ताफळें पुढें दिलीं आहेतः **"प्रेमी मनुष्य प्रेमविषय झालेल्याला जें कांहीं द्यावयाला सिद्ध होतो त्याला न्यायान्यायाची मर्यादा नसते. आणि जें कांहीं तो देअूं अिच्छितो त्याहून प्रेमविषयांला जें दिलें जातें तें सतत त्याला कमीच वाटतें. आणि अशा स्थितींत अधिक कांहीं द्यावयाला अुरलें नाहीं म्हणून तो प्रेमी जीव कष्टी नि खिन्न होतो."** याच त्यांच्या शरणागतीच्या 'शास्त्रा'न्वयें (वेडाप्रमाणें) मुसलमानाविषयीं लिहितांना २३ मार्च १९४० मध्यें हरिजनमध्यें लिहिते झाले कीं, **"बलाचा अुपयोग करीत स्वतः अेकटे वा अिंग्लिशांच्या साह्यानें ते आपली अिच्छा अप्रतिकारी हिंदुस्थानावर लादल्या-वांचून रहाणार नाहींत. मला जर काँग्रेसला माझ्या मताप्रमाणें वागायला लावतां आली तर मीं मुसलमानांना बलप्रयोग करावा लागण्याची वेळच येअूं देणार नाहीं. मी माझ्यावर (काँग्रेसद्वारां स्वीकृति दिली म्हणजे तो 'मी' हिंदुस्था-नचाच 'मी' ठरणार हा भाव) त्यांचें राज्य सुखेनैव होअूं देअीन कारण तें हिंदुस्थानी राज्यच होअील."** "अनत्याचार प्रकाशन व्हावयासाठीं अेकच पक्ष अनत्याचारी असला पाहिजे. म्हणजे बलप्रयोग करणारा दुसरा पक्ष अत्याचार करीत असतां अनत्याचाराची वागणूक करून दाखवतां येअील. दोन्ही पक्ष अनत्याचारी झाले तर मग अनत्याचाराचें माहात्म्य दाखवावयाला प्रसंगच अुरत नाहीं. तेव्हां कोणीतरी अत्याचारी झालेंच पाहिजे. म्हणजेच अनत्याचाऱ्याला आपल्या अनत्याचारी व्रताचें अनुष्ठान करतां येअील." या गांधी मताप्रमाणें (हरिजन ७।१०।३९) मुसलमा-नांनीं अत्याचारीच राहिलें पाहिजे म्हणजे हिंदूंना अनत्याचारीपणा दाखवून

आपला नाश करून घेण्याची गांधी–सांधि मिळेल असाच या लिखाणांतील गांधी हेतु नाहीं का ? या बोवाजींना नि त्यांच्या गांधीवेड्या शिष्यगणांना पुण्यवान होतां यावें म्हणून अत्याचारी रूपानें या जगांत पापी अुत्पन्न झाले पाहिजेत. असें म्हणणें म्हणजे वेडेपणाची किंवा भोंदूगिरीची पराकाष्ठाच म्हटली पाहिजे. ४।११।३९ च्या हरिजनमध्यें गांधीसेवासंघाचे अध्यक्ष गांधीशिष्य मश्रुवाला सांगतात **" आपल्या स्वतःच्या सैन्यापासून जो त्रास जनसमाजाला होअील त्याहूनहि आक्रमक अशा परकीय सैन्यापासून पुष्कळच कमी त्रास होअील."** या घरघातक मताचे प्रतिपादकांना–गांधींना–कर्णावतीला (अमदाबादला) कॉंग्रेसचे सर्वाधिकारी नेमलें आहे. हे सर्वाधिकारी गांधीबुवा मुसलमानांच्या अिच्छेपुढें हिंदूराष्ट्राला वळी देणारे राष्ट्रद्रोहीच ठरणार नाहींत काय ? याचा विचार हिंदूंनीं स्वतः हिंदूराष्ट्र म्हणून वांचावयाचें असेल तर–तत्काल केलाच पाहिजे.

१३. गांधी मुसलमान कटाचा आधारस्तंभ जो अमनुल्लाखान त्याचीं अुचलबांगडी झाल्यावर या गांधी मुस्लिम युतीला दुसरा कोणीतरी आधार पाहिजेच होता. तो आधार सांप्रतच्या निझामशहांचा ' आलाहजरतचा ' मिळाला. या निझामशहाच्या महत्त्वाकांक्षेविषयीं आधीं थोडी माहिती दिली म्हणजे मग त्याविषयीं गांधीच्या कृतीचें यथार्थ स्वरूप ध्यानांत येअील. निझामी राज्यांत—मोगलाअीत—हिंदूंची राजकीय, धार्मिक, आर्थिक, औद्योगिक, भाषाविषयक गोष्टींत कशी गळचेपी चालली आहे हें निझामशाहींत त्याच्या जुलमाविरुद्ध जो हिंदुत्वनिष्ठांनीं हिंदुमहासभेच्या नेतृत्वाखालीं नि आर्य समाजी आदिक अितर हिंदुत्वनिष्ठ संस्थांच्या साह्यानें निःशस्त्र प्रतिकाराचा जो लढा चालविला त्या वेळीं नि त्या पूर्वी अनेकदां प्रसिद्ध झालेल्या वृत्तांतावरून नि अितिवृत्तांतून (रिपोर्टांतून) लोकांपुढें मांडलें गेलें आहेच. निझामशहांना पूर्ण सर्वाधिकारी राजसत्ताधीश होण्याची अिच्छा नि महत्त्वाकांक्षा अुत्पन्न झाली आहे. त्यांचे संस्थाना-बाहेरच्याच नव्हे तर देशाबाहेरीलहि मुसलमानांशीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले आहेत. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या तांझीम नि तबलीक (हिंदूंचें भ्रष्टीकरण नि मुसलमानांचें सबलीकरण) या चळवळीला विपुल द्रव्यसाह्य ह्यांचेकडून होत असतें. नि सर्व हिंदुस्थानांतील मुसलमानांचे

डोळे अमनुल्लाखानानंतर यांचेकडे वळलेले आहेत. हिंदुस्थानांतील सर्व मुसलमानपुढाऱ्यांचे प्रयत्न निझामला 'हिज म्याजेस्टी'—स्वतंत्र राज्य-पदाधीश झालेला पहाण्यासाठीं शक्य त्या त्या मार्गानें चालूं आहेत. निझामी राज्यांतले पुढारी मुसलमान तर आमचा निझाम स्वतंत्र सत्ताधीश 'हिज म्याजेस्टी' आहेच, त्याला कोणी दुसऱ्यानें तें पद वा ती पदवी देण्यावर तें अवलंबून नाहींच असेंहि म्हणूं लागले आहेत. या युद्धाच्या अडचणींत सांपडून द्रव्यबुभुक्षु बनलेल्या ब्रिटिश सत्तेला द्रव्यभार अर्पण करून आंध्र प्रांताचा नि कर्णाटकाचा प्रदेश नि मच्छलीपट्टण बंदर घेण्याचा प्रयत्न निझाम कसून करीत आहे. नि या गोष्टीला बाहेरच्या मुसलमान पुढाऱ्यांचें संगनमती साह्य होत आहे. याच संबंधांत बहादुर यार जंगबहादुर अखिल भारतीय संस्थानी मुस्लिम लीगचे अध्यक्ष यांची नि गांधीची भेट होऊन बोलणें झालें नि तदनुसार आक्टोबर १३।१९४० च्या हरिजनमध्यें गांधीनीं "हैद्राबाद" या मथळ्याखालीं अेक लेख लिहिला आहे. त्यांत आरंभीं नि लेखाच्या दोन तृतीयांश भागांत घोळून घोळून जर हिंदुस्थानांत चालूं युद्धकालामुळें अराजकताच निर्माण झाली तर सर्वांत प्रबळ ठरेल तो हिंदुस्थानवर राज्य स्थापित करील. नि मला जें माहीत आहे त्यावरून (याअर्थीं 'फॉर व्हॉट आय नो' असें त्यांचें स्वतःचेंच वाक्य आहे. यावरून तत्संबंधींच्या गुह्य प्रयत्नशीलतेच्या गोष्टी गांधीला माहित आहेत हें स्पष्ट दिसतें) तसा प्रबल ठरून हिंदुस्थानवर राज्य प्रस्थापित करणारा हैद्राबाद निजामच ठरेल, असें प्रतिपादलें आहे. नि नंतर लेखाच्या शेवटच्या अेकतृतीयांश भागांत आमच्या अनत्याचारी आंदोलनांत या गोष्टीला काय स्थान आहे असा प्रश्न आपणच उद्भवून गांधीबुवा म्हणतात "**शस्त्रविरहित नैतिक बलाचा आधार घेण्यास राजेहि सिद्ध होतील नि खरेखुरे** लोकसेवक म्हणून त्यांचें मानाचें पद त्यांना मिळेल. त्यांत हक्काला स्थान न राहतां कर्तव्याचें अधिष्ठान राहील. नि अशा वेळीं हिज अेक्झाल्टेड हायनेस (अिंग्लिशांनीं दिलेली हरभऱ्याच्या झाडावर चढविणारी पदवी) निझाम हा अुपरोक्त दृष्टीनें लोकसेवक म्हणून निवडला जाअील. अर्थात् सध्यां तो राज्य करीत असलेल्या लहानशा भागाचा लोकसेक न राहतां

अखिल हिंदुस्थानचा लोकसेवक म्हणून निवडला जाअील. कोणाला हें शेखमहंमदी मनोराज्य वाटेल. पण मीं व्यवहारी मनुष्य असल्याचा दावा करतो आहे नि त्या व्यवहार्यतेच्या दृष्टीनें हें मी सांगतों आहे-मनोराज्य म्हणून नव्हे.” याप्रमाणें या लेखांत मी **निझामला-अत्याचारानें असो वा अनत्याचाराच्या दृष्टीनें असो पण निझामला-हिंदुस्थानचा धनी-राजा-बादशहा झालेला पाहूं अिच्छितों असें स्पष्ट सांगून मुसलमानांच्या निझामला हिंदुस्थानचा बादशहा करण्याच्या अिच्छेला पूर्ण अनुकूलता प्रदर्शाविली आहे. अशांना काय विशेषण द्यावें?**

राजा जयचंदाला अितिहास नि अितिहास-वाचक असणारे आपणहि देशद्रोही ठरवतो आहोंत. पण खरी घटना पहातां काय दिसतें. जयचंदाची महाराजा पृथ्वीराज चव्हाणाशीं स्पर्धा होती. अखिल हिंदुस्थानचे सम्राट्पदीं बसण्याची त्याची योग्यता जयचंदाला पहावत नव्हती. पण अेकटेपणें त्याचा पराभव करण्याची शक्ति त्याला नव्हती. यासाठीं पृथ्वीराजाचा पाडाव करून स्वतःच हिंदुस्थानचा अेकमेव महाराजा बनावें म्हणून महंमद घोरीला—परक्याला-मूर्खपणानें स्वतःच्या साह्याला बोलावला तें त्याचे हातीं राज्य जावें हिंदुस्थानवर मुस्लिम राज्य व्हावें म्हणून नव्हे. पण परक्याचा हात घरांत शिरतांच पृथ्वीराजाला जयचंदाचे साह्यानें मारणाऱ्या अहमदानें करार मोडून जयचंदाच्याहि तोंडाला पानें पुसलीं नि स्वतःच हिंदुस्थानचा बादशहा बनला. हिंदुस्थानवर मुसलमानांचें राज्य स्थापन होअून हिंदुस्थानला पारतंत्र्य आलें. अर्थात् या परिणामावरून म्हणजे हिंदूंचा हिंदुस्थान परकीयांच्या—मुसलमानांच्या पारतंत्र्यपाशांत अडकला यावरून, त्याचा तसा हेतु नसतांहि, मुर्खपणाच्या वर्तनासाठीं अितिहास नि त्याचे वाचक आपण त्याला **देशद्रोही** म्हणतो. मग जी व्यक्ति वा व्यक्तिसमूह हा हिंदूंचा हिंदुस्थान-ज्यांत चार पंचमांश म्हणजे शेंकडा आयशीं हिंदू आहेत असा देश-परकीय धर्म, संस्कृति, भाषादिकांमुळें हिंदुस्थानला जे दार-अुल-हरब म्हणजे शत्रुदेश मानतात, हिंदूंच्या हिताचा बळी घेत सर्व सत्ता नि लाभ स्वतःला घेअूं पहातात, हिंदुस्थानचें हिंदुत्व नष्ट करून त्याला मुस्लिमस्थान करण्यासाठीं बद्धपरिकर झाले आहेत अशा स्वतःलाच स्वतः परकीय समजणाऱ्या समलमानांचे हातीं हिंदुस्थानचा गळा

सर्वस्वीं द्यावयाला सिद्ध झालेल्यांना ती जयपालाला लावलेली साधीसुधी देशद्रोह्याची पदवी पुरेशी पडेल का ? असें वाटून कोणती नवी शब्दसृष्टी त्यांचें वर्णन करण्याला शोधून काढावी असा प्रश्न पुढें अुभा राहिल्यावांचून कसा राहील ?

कदाचित् हे सर्व-प्रयत्न कल्पनेच्याच क्षेत्रांत आहेत. प्रत्यक्ष व्यवहार-क्षेत्रांत तर गांधी कांहीं गोंधळ घालीत नाहींत ना असा प्रश्न कांहींजण करतील. त्यांचेहि प्रश्नांना खाद्य पुरविलें पाहिजे. (१) काश्मिरला मुसलमानांनीं हिंदूंविरुद्ध चालविलेल्या अनेक अत्याचारी गोष्टीविषयीं तेथील एका नागरिकानें गांधीना हस्तक्षेप करून हिंदूंची सोडवणूक करावयासाठीं विनंति केली तेव्हां त्यांनीं अुतर दिलें "**तेथील लोकसंख्या अतिशयानें मुसलमानांची आहे. हिंदु अत्यल्प अशा स्थितींत तेथील हिंदुराजानें मुसलमानांना वाटेल तें करावयाला पूर्ण मोकळीक द्यावी. नि तसें करतां येत नसेल तर राज्यत्याग करून दूर सरावें.**" **निझामशाहीमध्यें अगदीं अुलट परिस्थिति. हिंदूंची संख्या शंभरी नव्वद जवळजवळ, नि मुसलमान मूठभर. पण तेथें अधिकसंख्याक हिंदूंच्या दुःस्थिती-संबंधी निझामशहाला काश्मिरच्या राजाप्रमाणें निरोप देणें तर दूरच, पण हिंदू आपल्यावरील अन्यायाचें परिमार्जन करून घेण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतां या गांधीनें हिंदूंचेच पाय ओढण्याचा प्रयत्न करून निझामशहाला त्रास देण्याची माझी यत्किंचितहि अिच्छा नाहीं म्हणून प्रसिद्ध केलें.** (२) मोपल्यांनीं मलबारमध्यें भयंकर हत्याकांडें, बलात्कारी भ्रष्टीकरण, मंदिरांचा विध्वंस, गरोदर स्त्रियांची चीरफाड, सरसहा लूट, जाळपोळ अित्यादि गोष्टींची पराकाष्ठा केली तरी गांधी यंग अिंडियामध्यें "**शूर मोपला लोक ! त्यांनीं जें कांहीं केलें तें धर्मावेशांत (मतांधतेनें नव्हें अं ! !) केलें. ते पापभीरू नि देवभीरू आहेत**" **असे प्रशंसापर अुद्गार वृत्तपत्रांतून प्रसिद्धिले. असें निर्लज्ज समर्थन प्रत्यक्ष मुसलमानदेखील अुघडपणें करूं शकले नाहींत.** आणखी असें कीं आजचे कल्पनासृष्टींतील भविष्यकालाविषयींचे बेत हे तदनुसारी प्रयत्नद्वारां दुसऱ्या दिवशीं प्रत्यक्षांत येणारे असतात. तसेंच गांधीचे हे

आजचे मनचे बेत आधीं सिद्ध व्हावेत म्हणून अतिरासह ते प्रयत्नशील होत आहेत. अशावेळीं प्रत्यक्ष गोष्ट करणाऱ्याप्रमाणेंच ते दोषी समजले पाहिजेत.

आणखी अेकच देशघाति अपकृत्य पुढें मांडून हा गांधीगोंधळ पुरे करूं. सध्यां हिंदुस्थानचे तुकडे अुडवित हिंदुस्थानचे घास करूं धांवणाऱ्या मुस्लिम लीगी मागणीसंबंधीं गांधीची प्रच्छन्न संमति पुढें मांडावयाची आहे. त्या मागणीसंबंधीं ते म्हणतात : " **घटना समिती (कान्स्टिटयूअंट असेंब्ली) वसल्यावर आठनऊ कोटी मुसलमान जर निग्रहानें पाकिस्तानची मागणी पुढें मांडण्यास प्रवृत्त झालेच तर मग त्यांना जगांतील कोणती शक्ति अडवूं शकेल?** " अर्थात् अडवणें अशक्य म्हणून नि त्या ढोंगाखालीं गांधी त्या पाकिस्तानला संमति देण्यास अेका पायावर सिद्ध होणार, हें त्यांचे मागें नुकतेच वाराव्या अुदाहरणांतील शेवटच्या छेदकांत अुद्धृत केलेल्या मतप्रदर्शनावरून स्पष्ट कळण्यासारखें आहेच. सात कोटींची इच्छा जर अितकी समर्थ तर अठ्ठावीस कोटींची पाकिस्तानविरोधी हिंदूअिच्छा, अेकच जग नव्हे तर चार जगांचा विरोध हिंदू अुलथून पाडूं शकतील हें गांधी नाकारूं शकतील काय ? झालें, गांधी पर्व संपलें. आतां गांधींच्या प्रभावळींतील घरबुडव्या हिंदूंच्या कृतींची कांहीं अुदाहरणें पाहून या ' आतां ' च्या काळांतील शेवटच्या पडद्याला हात घालूं.

कांहीं घरबुडव्या हिंदूंच्या अुक्ति नि कृति

१ श्रीमती सरोजिनी नायडू—या काँग्रेसमधील नेतृवर्गांत प्रमुख म्हणून गणल्या जातात. मुसलमानांच्या प्रातिनिधिक सभा जेव्हां कोठें विशेषत्वानें होतात तेथें यांना आमंत्रण मिळतें नि याहि तेथें जातात. अशाच अेका मुसलमानांच्या मोठ्या प्रातिनिधिक सभेंत त्या अेकदां गेल्या होत्या. तेथें जगांतील सर्व मुसलमानांना अुद्देशून त्या म्हणाल्या " Moslems of the world ! Unite !! " " हे जगांतील मुसलमानांनों ! अेकत्र (अर्थात् संघटित) व्हा ! " या हिंदू बाअीला मुसलमान—अखिल जागतिक मुसलमानांच्या संघटनाची मात्र भूक लागलेली दिसते. पण स्वतःची हिंदू जाति पदोपदीं अपमानली जाते, तिच्यावर अनेक प्रकारानें अनेकांकडून अनेक वेळीं आक्रमणें होतात, त्यांचे हितसंबंधाकडे दुर्लक्ष केलें जातें; अितकेंच नव्हे तर त्यांचेवर

अंगार ठेवला जातो. अितिहासालाहि माहीत नाहीं, अितक्या पुरातन कालापासून त्यांचा स्वामित्वाचा देश जो हिंदुस्थान त्याचीं शकलें अुडविलीं जाण्याची वेळ आली तरीहि या बयेच्या तोंडून Hindus of the world or, Hindus of Hindusthan! Unite!! "जगांतील हिंदूनो अथवा अखिल हिंदुस्थानांतील हिंदूंनो ! अेकत्र—संघटित व्हा !!" म्हणून अुद्गार निघूं शकत नाहींत. अुलट हिंदू संघटनाचा पुरस्कार करणाऱ्या हिंदुस्थान राष्ट्राच्या खऱ्या कल्याणकर्त्यांला या बाअी 'कम्युनलिस्ट'—'जात्यंध'—म्हणून म्हणावयाला सिद्ध असणार. नि ही कॉंग्रेसी हिंदुमनाची अेक वानगी आहे.

२ नेहरू पितापुत्रांपैकीं दिवंगत मोतीलाल नेहरू तर म्हणत असत कीं "I am Hindu by birth but moslem by culture"—"मी जन्मानें हिंदु पण संस्कृतीनें मुसलमान आहे" अर्थात् रक्तामांसानें हिंदु असेन पण मनानें मुसलमानच आहे. असें मुसलमानी रंगांत रंगून गेलेलें मन ज्याचें असेल असा हिंदू हिंदूंचें हित काय पहाणार. हे कृतीनें नि वास्तवतः मुसलमानच. तेव्हां अमनुल्ला कटांत यांनीं भाग घेतला होता यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्यांचेच चिरंजीव जवाहिरलाल. ज्या घरांत पूर्ण मुसलमानी संस्कृतीचा प्रभाव पडलेला असेल त्या घरींच पालन पोषण झालेल्या नि त्याच वातावरणाचा परिणाम झालेल्यांच्या मनांत मुस्लिम-प्रेमाचाच प्रभाव पडला असला तर त्यांत आश्चर्य कसलें ? यांनाहि अमनुल्लाकटांत भाग घेण्याच्या माहितीवरून मसुरीहून निघून जाण्याची आज्ञा सरकारनें दिली होती. नि मग पुन्हां कांहीं दिवसांनीं यांना तेथें जाण्याची मोकळीक मिळाली, ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. हिंदूंवर होणाऱ्या अन्यायाविषयीं, अत्याचार—बलात्कार—जाळपोळ—लुटमार—हत्याकांडें अित्यादि-विषयीं अेकदांहि हिंदूसाठीं सहानुभूतिपर अुद्गार काढले नाहींत, त्यांचेवरील संकटें नि दुःखें दूर करण्याचा प्रयत्न केला नाहीं; अुलट मुसलमानांच्या शीरजोरीचाच—कॉंग्रेसच्या हाताला हात लावून पाठपुरावा केलेला आहे. कधींहि मुसलमानांच्या अन्यायी नि सर्व प्रकारें असमर्थनीय अशा मुस्लिम अत्याचारादिकांसंबंधीं अेकदांहि निषेध तर राहोच—नुसती अप्रसन्नताहि यांनीं प्रकट केलेली नाहीं.

३. श्री वल्लभभाअी पटेल यांना मनांत कांहींहि वाटत असलें तरी त्यांनीं आपलें वर्तन–स्वातंत्र्य गांधींना विकलेलें आहे. हे सर्वस्वी कॉंग्रेसी कित्ता वळवीत चाललेले नि ज्यांचे हातून हिंदूहितसंरक्षणाचा किंचितहि संभव अुरला नसलेले हिंदू गृहस्थ आहेत.

४ मद्रासचे प्रख्यात कॉंग्रेस पुढारी राजगोपालाचार्यः—यांनींहि आजपर्यंत गांधीचीच री ओढून सर्वस्वीं मुसलमान धार्जिणेपणाची परीक्षा अुत्तीर्ण झालेले आहेत. कर्णावती (द. हैद्राबाद) च्या निझामशाहींत हिंदुत्वनिष्ठांचा निःशस्त्र प्रतिकार चालूं होता त्या वेळीं यांनीं मद्रास अिलाख्यांतील प्रतिकारकांविरुद्ध नैर्बोधिक कार्यवाही करून आपल्या मुसलमान धार्जिणेपणाचा अुघडा झेंडाच अुभारला होता. आतां हे प्राणी या मुसलमानी धार्जिणेपणांत विक्रम गाजवूं अिच्छित आहेत. मुस्लिम लीगच्या पाकिस्तान, अथवा मध्यवर्ती विधिमण्डळांत कॉंग्रेस समाविष्ट झाल्यास शेंकडा ५० नि न आल्यास त्याहून अधिक प्रमाणांत प्रतिनिधित्व पाहिजे अित्यादि ज्या हिंदुस्थानराष्ट्रच्या गळ्यावर सुरी ठेवली जाणाऱ्या राष्ट्राघाति मागण्या जीनांच्या द्वारां पुढें ठेवल्या जातात त्याला अगदीं अुघडपणें समर्थावयास गांधीहि पुढें येअूं धजत नाहीं. पण हे सु (!)–प्रसिद्ध कॉंग्रेसी राष्ट्रभक्त परवांच अुद्‌बोधिते झाले कीं "कॉंग्रेसनें केव्हांहि बहुमतावर हक्क सांगितला नाहीं. **लीगच्या ज्या मागण्या आहेत त्या योग्य व सरळ नि न्याय्य** (fair and just) **आहेत ही गोष्ट कोणीहि समंजस देशभक्त नाकारणार नाहीं.**" युद्ध आहे तोंपावेतों हिंदुस्थानच्या सभेंत शेंकडा ५० म्हणजे अर्धावांटा मिळावा नि पुढें पाकिस्तान तोडून मिळावें ही जी मुस्लिम लीगच्या वतीनें मागणी मुसलमानासाठीं म्हणून मागितली जात आहे ती 'सरळ नि न्याय्य' आहे असें म्हणणारी जीभ देशभक्ताची आहे असा कोणता प्राणी म्हणेल तें म्हणो. आम्हां या लोकींच्या जगांत तर याला कोणी देशभक्ति म्हणावयाला सिद्ध होणार नाहीं. अितकेंच काय पण अन्य कोण्या देशीं असे प्रलाप काढणाऱ्या प्राण्याची काय दशा होअील याची कल्पना केली असतां अशांचें स्थान नि योग्यता कोणती हें यथार्थपणें कळून येअील.

कॉंग्रेसच्या प्रमुखांपैकीं प्रमुखांचे देशभक्तीची वानगी आपण पाहिली. आतां कॉंग्रेसी सरकारें जीं स्थापन झालीं त्यांपैकीं अेका प्रांताच्या कॉंग्रेसी मंत्रिमंडळानीं

जे गुण अुधळले नि स्वतःच्या कृत्यांचा पाढाहि स्वतःच जो वाचला आहे तो वाचकापुढें ठेवीत आहोंत. कॉंग्रेसी सरकारें सात प्रांतांत होतीं. पण त्या सातहि प्रांतांत मुसलमानांनीं "आम्हांवर अन्याय होत आहेत. आमची गळपेची केली जात आहे." असा कांगावा चालविला होता. हेतु असा कीं मुसलमानांना प्रसन्न राखण्यासाठीं धडपडणाऱ्या कॉंग्रेसी मंडळींना 'अन्याय, गळचेपी' आदिक कांगाव्यांनीं घाबरवून देअून अधिकाधिक मुसलमान-धार्जिणेपणा करण्याला भाग पाडावें. आणि हा हेतु त्यांचा यशस्वी होत असे. युक्त प्रांतीय कॉंग्रेसी मंत्रिमंडळानें मुसलमानांचे धन्यवाद घेण्यासाठीं काय काय केलें अिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून जेव्हां अन्यायाची हांकाटी करण्यास मुसलमानांनीं आरंभ केला त्या वेळीं 'आम्हीं तुम्हाकरतां काय काय केलें' याचा पाढा वाचून त्यांचें समाधान करण्याकरितां अेक पत्रक युक्त प्रांतीय मंत्रिमंडळानें काढलें. पण तें सांगतांना **मुसलमानांना प्रसन्न करण्यासाठीं ज्या न्यायाच्या मर्यादा अुल्लंघाव्या लागल्या त्यांत हिंदुहिताची अन्यायानें अमर्याद हानि करण्याचें पाप अुघडकीस येण्याची भीति होती. म्हणून तें पत्रक गुप्तपणें काढून केवळ मुसलमानांमध्येंच वांटावयाचें ठरविणें त्यांना भाग पडलें.** तें पत्रक असें

त्या पत्रकाचें नांव

"हुकमत सुबजात मुतहद्दाका मुसलमान अफलियतके साथ बर्ताव"

हें होतें.

१. या गुप्तपत्रकाच्या २ पृष्ठांत "या प्रांतामध्यें मुसलमान हे शेंकडा १४ नि हिंदू शेंकडा ८५ टक्के आहेत तरी मुसलमानांना त्यांच्या प्रमाणापेक्षां कितीतरी अधिक प्रमाणांत प्रत्येक गोष्टींत भाग दिला आहे. हें दुसऱ्या कोणत्याहि राजवटींत शक्य झालें नाहीं. पण कॉंग्रेसराज्य चालूं झाल्यावर मुसलमानांना शेंकडा ५० पेक्षांहि जास्त जागांवर नोकर नेमलें आहे.

२. "कायद्याप्रमाणें जोंपर्यंत अेकादा डेप्युटी कलेक्टर, सरकारनें 'लिस्टेड पोस्ट'च्या टिपणींत नोंदला नाहीं तोंपर्यंत त्याला डेप्युटी कमिशनर अथवा

कलेक्टर नेमतां येत नाहीं. परंतु कॉंग्रेस सरकारनें ४ डेप्युटी कलेक्टरांना कलेक्टरांच्या रांगेंत चढविलें **नि चार पैकीं ३ मुसलमान नि केवळ १ हिंदु होता–म्हणजे मुसलमानांना शेंकडा ७५ टक्के प्रमाण दिलें.**"

३. गुप्त कागद पृष्ठ ३—"**या वर्षीं १८ डेप्युटी कलेक्टर नेमले त्यांपैकीं ८ मुसलमान नेमले–म्हणजे १५ टक्के मुसलमानांना शेंकडा ४४·४ टक्के जागा दिल्या.**"

४. सेटलमेंट आफिसमध्यें तर मुसलमानांना शेंकडा ५० जागा दिल्या. चार सेटलमेंट आफिसर नेमले गेले त्यांत २ मुसलमान, १ हिंदू नि १ युरोपियन होता. (आ) १० तहसिल नेमले त्यांत ४ मुसलमान–म्हणजे शेंकडा ४० प्रमाण दिलें. (अि) २७ नायब तहसिलदार यांना तहसिलदार केलें. त्यांत मुसलमान १३ नेमले म्हणजे जवळ जवळ शेंकडा ५० टक्के झाले.

५. गुप्त कागद पृ. ४–"**चार ४ मोठे खास अधिकारी नि २ डेप्युटी डायरेक्टर नेमले त्यांत शेंकडा ५० टक्के मुसलमान होते. (निम्मे झाले). (आ) फायनान्स डिपार्टमेंटमध्यें ४ मोठे अधिकारी नेमले होते त्यांमध्यें २ मुसलमान नेमले. (अि) ११ लोकांना व्हेटरनरी क्लार्क नेमले. त्यामध्यें ९ मुसलमान होते म्हणजे शेंकडा ८१ पेक्षांहि जास्त जागा दिल्या. (अी) गव्हर्मेंट प्रेसमध्यें अेकंदर १९३ लोक भरले त्यांत मुसलमान ११३ म्हणजे शेंकडा ५३ चेवर प्रमाण त्यांना दिलें.**"

६. गुप्त कागद पृ. ६—"**कॉंग्रेस सरकारनें अेकंदर सर्व खात्यांतील नोकऱ्यामध्यें मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येपेक्षां अितक्या जास्त नोकऱ्या दिल्या आहेत नि त्यांची अितकी काळजी घेतली आहे कीं असें अुदाहरण अन्य कोठेंहि मिळणार नाहीं. बंगालमध्यें मुसलमान शेंकडा ५४ आहेत, परंतु मुसलमान तेथें शेंकडा ६० नोकऱ्या मागत आहेत. त्याच्याशीं आम्हाला कांहीं करावयाचें नाहीं. परंतु या प्रांतांतसुद्धा मुसलमानांना अितका मोठेपणा मिळत आहे तो तरी लपवून कां ठेवावा !**" मुसलमानापासून लपवावयाचा

नाहीं हें कॉंग्रेसी वृत्तीला शोभेसेंच आहे, पण हिंदूंपासून कां लपविला याचें अुत्तर हे सत्यअहिंसावादी गांधीभक्त युक्त प्रांतीय सरकार सांगूं शकतील काय ?

७. गुप्त कागद पृ. ७—**" पंजावच्या पंतप्रधानानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं मुसलमानांना शेंकडा ५० टक्के जागा दिल्या जातील. पंजावमध्यें मुसलमान शेंकडा ४४ च आहेत. परंतु त्यांना केवळ ६ टक्केच जागा जास्त दिल्या जातात.तर असा प्रश्न विचारला जाणें साहजिक आहे कीं संयुक्त प्रांतांत तर केवळ १४ टक्केच मुसलमान असतांना त्यांना पन्नास-पन्नास टक्के जागा काय म्हणून दिल्या जातात ? तर त्याला अुत्तर असें कीं सांप्रतचें कॉंग्रेस सरकार मुसलमानांना अधिकांत अधिक संतुष्ट राखण्यास झटत आहे. म्हणूनच सरकारी नोकऱ्यांमध्यें त्यांना अशा प्रकारच्या अधिकांत अधिक टक्के नोकऱ्या मिळत आहेत ! ! "** सगळ्याच नोकऱ्या मुसलमानांना दिल्या नाहींत ही कॉंग्रेसी सरकारची हिंदूवरील कृपाच समजावयाची ! !

८. गुप्त कागद पृ. ८—लोकलबोर्डांतून मुसलमानांच्या शिक्षणाला कसें अधिकांत अधिक साह्य दिलें जातें नि त्यांची काळजी घेतली जाते याचें कथन केलें आहे.

९. गुप्त कागद पृ. १०—मुसलमानांच्या धर्मभावना दुखवणारे लेख कॉंग्रेसनें बंद केलें " अेकदां वर्तमानपत्रांत बातमी आली कीं मुंबअीच्या प्रा. सरकारनें (कॉंग्रेसी सरकार) रंगीला रसूल या पुस्तकावरील बंदी अुठविली. यामुळें मुसलमानांना फार वाअीट वाटूं लागलें. बंदी अुठवण्याचें कारण विचारतां हें पुस्तक निराळें असून तें कै. अच्युतराव कोल्हटकरांनीं लिहिलें होतें. तरीहि युक्तप्रांतीय कॉंग्रेसी सरकारनें त्या पुस्तकांचें नांव बदलविण्यास मुंबअी प्रां. कॉंग्रेसी सरकारला भाग पाडलें."

१०. गुप्त कागद पृ. १४-१५—" जिनांनीं आपल्या अेका वक्तव्यांत कॉंग्रेस सरकारला विचारलें कीं कॉंग्रेसी सरकारनें मुसलमानाविषयीं कधीं प्रेमभाव दाखविला ?.....याला अुत्तर असें कीं, **युक्तप्रांतीय कॉंग्रेस सरकारनें मुसलमानावर कधींहि मनाअी हुकूम लावले नाहींत.**

अितकेंच नव्हे तर पहिले लाविलेले मनाअी हुकूमहि काँग्रेस सरकारनें काढून टाकले आहेत. याच्या अुलट असें दाखवतां येअील कीं हिंदूंवर मात्र असे अनेक मनाअी हुकूम बजावून हिंदूंच्या मंदिरामध्यें पूजा किंवा आरती करण्यास नि त्याचप्रमाणें शंख वाजविण्याला मनाअी केली आहे. बारावंकीमध्यें मोहरमच्या अुत्सवांत **हिंदूंना शंख वाजविण्यास नि कथाहि करण्यास मनाअी केली आहे.** त्याचप्रमाणें हिंदूंच्या होळी अुत्सवांत **हिंदूंना आपसांत अेकमेकांवर देखील रंग अुडविण्याची बंदी केली आहे.** जहांगिराबादमध्यें हिंदूंचें अेक मंदिर काँग्रेस सरकारनें कित्येक दिवस बंद केलें होतें. वांद्यामध्यें मोहरमच्या अुत्सवांत हिंदूंना विवाहाच्या वेळींसुद्धां आधीं पोलिसांची संमति घेतल्यावांचून लग्नाच्या मिरवणुकी काढावयाला बंदी केली; अितकेंच नव्हे तर शंख, घंटा, किंवा बाजासुद्धां वाजवूं दिला नाहीं. अंबाला जिल्ह्यांत बरेलीमध्यें हिंदूंवर कित्येक मनाअी हुकूम बजावले. त्यामध्यें अेक हुकूम असा होता कीं **लग्नामध्यें हिंदू स्त्रियांना त्यांच्या चालीप्रमाणें ढोलकेंसुद्धां वाजवूं दिलें नाहीं.** या हुकुमाचा ४५ हिंदूंनीं भंग केला. त्यासाठीं त्यांना पकडून शिक्षा दिली गेली. **त्याचप्रमाणें सारणमध्यें शिखांना आपली मिरवणूक काढूं दिली नाहीं.**" अित्यादि.

११. गुप्त कागद. पृ. १६—गोरखपुरमध्यें अेका हिंदू मोहल्यांत मुसलमानांची नवी वस्ती झाली. याच मोहोल्यांत हिंदूंचें अेक गोरखनाथाचें सुप्रसिद्ध मंदिर होतें. येथें गुरखे लोकहि पूजा करीत होते. येथें **या नवीन आलेल्या मुसलमानांनीं गोहत्त्या करण्याचा हक्क मागितला आणि तो काँग्रेस सरकारनीं मुसलमानांना वहाल केला;** त्याचप्रमाणें मुसलमानांच्या मशिदीवरून जिथें पूर्वी हिंदूंना वाद्यें वाजविण्याची अनुज्ञा होती तेथेंहि काँग्रेसी सरकारनें ती काढून घेतली.

१२. गुप्त कागद—**मुसलमानांनीं अत्याचार, आक्रमणें केलीं, अुत्तेजक नि हिंदुविरुद्ध द्वेष फैलावणारीं भाषणें-लेख लिहिले पण त्यासाठीं काँग्रेस सरकारनें त्यांना कांहीं शिक्षा न करतां सोडून दिलें, नि त्यांचेकडे दुर्लक्ष केलें.**

१३. गुप्त कागद–मथुरा येथें पंतप्रधान गेले असतां मारंहरा नि कासगंज या आसपासच्या गांवीं दंग्यानंतर अधिक पोलिस त्या गांवावर लादले, त्याविषयीं विचारलें असतां पंत म्हणाले कीं तेथील आंव्याचें पीक (हिंदू) गांवकऱ्यांनीं लुटलें म्हणून पोलिस ठेवले. लोकांनीं 'त्या वेळीं आव्यांचें पीकच नव्हतें तेव्हां लुटलें कोणी नि कसें ?' असा रोखठोक प्रश्न विचारतां पंत गोंधळून म्हणतात, आंव्याचें पीक नसलें तर दुसरें कशाचें तरी असेल ! मीं केलें आहे तें बरोबर विचार करूनच केलें आहे नि त्यांत बदल होणार नाहीं.

१४. गुप्त कागद–हिंदीनीं अुर्दूवर कुरघोडी केली असा आरोप आहे. पण हें स्वच्छ खोटें आहे. **"अुलट अनेक वेळां अुर्दूलाच हिंदीपेक्षां अधिक मोठेपणा दिला गेला आहे."**

श्री काशीला दंगा झाला त्या वेळीं तेथें १४४ धारा (कलम) पुकारलें. बाहेरच्या दुधवाल्यांनीं गांवांत येअून १ तासांत गांवांतून दूध घालून जाणें शक्य नव्हतें. त्यामुळें कितीक तान्हीं मुलें दुधाविना तडफडत राहिलीं नि कांहीं भुकेनें मेलीं. नागरिकांना अनेकश: हाल नि कष्ट सोसावे लागले. हें झालें युक्तप्रांतीय कॉंग्रेसी सरकारचें गुणवर्णन. आतां मुंबअी सरकारचीं कांहीं कृत्यें–स्वातंत्र्यप्रणेते काळकर्ते परांजपे यांच्या 'काळां'तील निवडक निबंधावरची अिंग्लिश सरकारनीं घातलेली बंदी या 'स्वदेशी' नि 'राष्ट्रीय' म्हणविणाऱ्या कॉंग्रेस सरकारनें त्या पुस्तकांना हिंसेचा वास येतो म्हणून मोकळीं केलीं नाहींत. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा 'म्याझिनी', १८५७ चे क्रांतियुद्धाचा अितिहास, अंदमानच्या हाला–कष्टाची कथा सांगणारी 'जन्मठेप' या पुस्तकावरील बंदी नि नाशिकच्या सुप्रसिद्ध स्वातंत्र्यकवि गोविंद यांच्या प्रोत्साहक नि राष्ट्रप्रेमवर्धक कवितांच्या पुस्तकांवरील बंदी अुठविली नाहीं. अितरहि प्रांतांतून कॉंग्रेसी मनोवृत्तीचा मुसलमानधार्जिणेपणा नि राष्ट्रहित-विन्मुखतेचीं कित्येक अुदाहरणें देतां येतील.

या सर्व गोष्टींवरून ही राष्ट्रकारणांतील कॉंग्रेसी मनोवृत्तीची नि धोरणांतील राष्ट्रघातक अशी अस्तनींतील आग कशी राष्ट्रहितमारक ठरत आली, ठरत आहे नि ती तशीच टिकूं दिली तर पुढेंहि ठरेल, याची यथार्थ कल्पना

हिंदूंनीं करून घ्यावी म्हणजे पुढील मार्गक्रमणाचा आराखडा योग्यपणें आखतां येअील.

मुसलमानी आक्रमक धांव कोठपर्यंत पोंचली आहे ?

हिंदुपदपादशाहींत नांवापुरती धुगधुगत राहिलेली मुसलमान पादशाही १८५७ नंतर अिंग्लिश सत्तेनीं नष्ट केल्यावर मुसलमानांनीं हिंदुस्थानकडे शत्रुभूमि म्हणून पहाण्याचें ठरविलें. हिंदुस्थान मुसलमानमय करावयाचा हें मुसलमानांचें बादशाही कालीं ठरलेलें घोरण बादशाही गेल्यावर शक्य तेथें बलात्कारादि प्रकारें नि सर्वसाधारणतः कपट, छळ, छपते अुपाय, आदिक मार्गोनीं चालूच ठेवलें. अेवढ्यानें समाधान न होतां हिंदुस्थानांत हळूहळू राजकीय सत्ता हस्तगत करीत करीत शक्य नि साधेल त्या मार्गें पुन्हां अेकदां मुस्लिम राज्याची प्रस्थापना केली पाहिजे अशा निश्चयानें अेकीकडे मुसलमानांनीं अिंग्लिशांशीं हातमिळवणी करीत, दुसरीकडे कॉंग्रेसमध्यें शिरून हिंदूंच्या भोळेपणाचा लाभ घेत स्वतःसाठीं राजकीय सत्ता हस्तगत करण्याकरतां कॉंग्रेसी संमति घेण्याचा डाव खेळत, नि अुघडपणें कॉंग्रेसला नि हिंदूंना विरोध करीत हटवादानें दंगे–अत्याचारादिकांचें अवलंबन करून राजकीय सत्ता मिळवण्याची भाषा चालू ठेवली आणि तद्वारां ब्रिटिशांना मुसलमानांचा बाअू दाखवित स्वातंत्र्याला खो घालण्याची सुलभता निर्माण करून ठेवली. जेव्हां जेव्हां कांहीं राजकीय हक्क मिळाले त्या त्या वेळीं त्यांतील सत्तेचा मोठा अंश आपल्या हीन स्वार्थबुद्धीच्या घशांत त्यांनीं ओतून घेतला. खिलाफतीची संधि साधून सर्व हिंदुस्थानभर प्यान अिस्लामीची मतांध वृत्ति माजवून सर्व मुसलमान समाजाला त्यांनीं हिंदूविरोधक बनवीत आणलें. नि आतां आमचें म्हणणें न स्वीकारल्यास आम्ही गृहकलह निर्माण करूं अशी धमकी द्यावयाला ते प्रवृत्त झाले आहेत.

आरंभीं आम्हांला स्वतंत्र मतदार संघ द्यावा नि आम्ही अल्पसंख्य आहोंत म्हणून आम्हांला पुरेसें संरक्षण द्यावें या मागणीच्या चंचुप्रवेशापासून आरंभ करून हळूहळू राजकीय सत्ता अन्यायानें अिंग्लिश पाठिंब्याच्या बळावर नि कॉंग्रेसच्या राष्ट्रघाति साह्याच्या आधारानें मुसलमानांनीं बळकावली. कम्युनल अवार्डपासून त्यांचें बल नि संघटना वाढली. आणि आतां हिंदुस्थान राष्ट्राचे

तुकडे करण्यापर्यंत त्यांची ठेप येऊन पोंचली. मुसलमानांनीं आपण अल्पसंख्याक जाति नव्हेच—तर स्वतंत्र राष्ट्र आहोंत म्हणून सूर काढण्याला आरंभ केला आहे नि आमची स्वतंत्र मुसलमान भूमि पाहिजे अशी मागणी करीत त्या कल्पनेंतील भावी मुसलमानी भूमीचें वा प्रदेशाचें 'पाकिस्तान' हें नामकरणहि करून टाकलें. या पाकिस्तानच्या वामनस्वरूपाचें वर्धन कसें होत आहे हें या पुस्तकांत जोडलेल्या मानचित्रावरून ध्यानांत येअील. ज्याप्रमाणें अेखादें श्वापद आपलें भक्ष हळुहळू खात फस्त करतें त्याप्रमाणें हिंदुस्थानचे लचके तोडीत तोडीत सर्व हिंदुस्थानच आपल्या पोटांत रिचवण्याचा त्यांचा हेतु आहे. "आज आम्हीं मागत आहोंत तो $\frac{1}{3}$ भाग आम्हांला गोडीगुलाबीनें द्या, $\frac{2}{3}$ भाग आम्ही तुम्हांला सोडतो. पण जर विरोधाल तर पुढें मग तुम्हांला देण्यास काढलेला भागहि मिळणार नाहीं—सर्वच आम्ही घेऊं" म्हणून जिना डुरकावीत आहे. या मुस्लिमलीगप्रमुखाच्या पोळसदृश्य डुरकावणीकडे हा हिंदुस्थानचा हिंदुराष्ट्रसिंह आपल्या मोहनिद्रेंत लक्ष्य पुरविणार नाहीं तर कदाचित् या मत्त डुरकावणाऱ्यांचीं शिंगें सिंहाचें पोटांत शिरकलेलीं पहाण्याचा अनैसर्गिक देखावा पुढें येण्याची भीति आहे. तेव्हां हिंदुराष्ट्रसिंहाला हांक भरीत जागृत केला पाहिजे. त्या जागृतीचीं पूर्वचिन्हेंहि सर्वत्र दिसूं लागलीं आहेत. नि निराशामय अमावास्यारात्रीच्या प्रभावाची प्रभा आशेच्या पूर्वदिशेला क्षितिजावर फाकूं लागली आहे. त्या भावी कालांतील सिद्धतेच्या कर्तव्यपूर्तीचें यापुढें दर्शन घेऊं.

— पुढें —

येथपर्यंत या पुरातन नि अेक दृष्टीनें सनातन हिंदूराष्ट्राचा भूतकाल नि वर्तमान काल 'पूर्वी' नि 'आतां' या दोन प्रकरणांतून पाहिला. पूर्वकाळीं हा हिंदुस्थान किती वैभवसंपन्न, अैश्वर्यसंपन्न, राजत्वसंपन्न, समर्थ नि सर्व जगताच्या गुरुस्थानीं मानला जाणारा होता हें या राष्ट्राची निरनिराळ्या दृष्टीनें नि विविध क्षेत्रांतील महत्ता, प्रवीणता नि निपुणता पाहून आपले ध्यानीं आलेलें आहे. त्यापुढें काळाच्या कुटिल गतींत सांपडून अनेक कारणपरंपरांमुळें त्या अेके काळीं अैश्वर्याच्या अुच्चतम शिखरावर आरूढ झालेला आपला हिंदुस्थान पतनोन्मुख होअून आज कोणत्या हीन नि संकटापन्न स्थितीला येअून पोंचला आहे हें पाहिलें आहे. आणि आतां यापुढें भविष्यकालीं याचें काय होणार? याविषयींची रक्त जाळणारी घोर चिंता हिंदूमनाला जाळीत आहे. अशा स्थितींत भविष्यकालाविषयीं आपणांपुढें शंकाकुल करणारें जें मोठें प्रश्नचिन्ह अुभें ठाकलेलें दिसतें, त्याचें अुत्तर आपणांला शोधावयाचें आहे. कारण त्याच अुत्तराच्या अनुकूल प्रतिकूलतेवर आपलें अस्तित्व—आपली जीवनमरण—समस्या अवलंबून राहिलेली दिसत आहे.

या हिंदूराष्ट्राचें पुढें काय होणार?

या प्रश्नाचें अगदीं थोडक्यांत नि पूर्ण सत्य असें अुत्तर द्यावयाचें झालें तर तें अुत्तर हें कीं, आपण हिंदू—सर्व मिळून या हिंदुत्वाचे विराटपुरुषरूपी समष्टिदेहानें—या हिंदूराष्ट्राचें भवितव्य जसें घडवून आणावयाचें ठरवूं नि तदनुसार प्रयत्नशील होअूं तसें याचें भविष्य घडून येअील यांत तिळमात्र संशय नाहीं. जगांतील संघटनाबलीं झालेलीं लहानलहान लोकसंख्येचीं राष्ट्रें

हिन्दुस्थान व युरोप
तुलनात्मक क्षेत्रफळ

मैलांचे प्रमाण.
0 १०० २०० ३००

जगावर अधिपत्य गाजवूं शकलीं, गाजविण्याची महत्त्वाकांक्षा धरून तदर्थ यशाच्या आशेनें प्रयत्नशील होत आहेत. आणि ज्याप्रमाणें कांहीं राष्ट्रें पूर्वी पृथ्वीचें स्वामित्व संपादनांत कमी अधिक प्रमाणांत यशस्वी होऊं शकलीं त्याचप्रमाणें आज प्रयत्नशील असलेलीं राष्ट्रें यशाचा वांटा घेऊंहि शकतील. या यशाचें अुदक त्यांचे हातावर सोडणाऱ्या संघटनाशक्तिरूप देवतेला त्यांनीं कौल लावला होता नि म्हणून कांहींना यश मिळालें होतें—प्रयत्नशीलांना यश मिळण्याचा संभव अुत्पन्न झाला आहे. या महत्त्वाकांक्षी राष्ट्रांतील भूतकालांपैकीं यशस्वी राष्ट्र म्हणजे अिंग्लंड हें केवळ साडेचार कोटी संख्येचें होतें. मागील युद्धांत आव्हान देअून सर्व जगाला जवळ जवळ चार वर्षें घुसळून काढणारें नि आतां सर्व जगाचा स्वाहा करीत आपल्या अखिल युरोपला पादाक्रांत करून जगावर आपल्या पराक्रमाची मुद्रा ठोकावयाला सिद्ध झालेलें जर्मन राष्ट्र सहा साडे सहा कोटींचें आहे. नि त्याचेच जोडीला पुढें आलेला नि जवळ जवळ तितकाच प्रबल आहेसा दिसणारा जपान पांच साडेपांच कोटींचें राष्ट्र आहे. आणि अितक्या थोड्याशा संख्येच्या म्हणजे पांचपांच सहासहा कोटींच्या संख्येचीं राष्ट्रें केवळ स्वतःच्या संघटन बळाच्या सामर्थ्यानें दोन अडीचशें कोटी लोकसंख्येच्या अवाढव्य जगाला आव्हान देण्यास पुढें येअूं शकतात, तर मग तीस कोटी लोकसंख्येच्या हिंदूराष्ट्राला तशाच संघटनाबलाच्या सामर्थ्यावर स्वतःवरील संकटें दूर करीत पुन्हां अैश्वर्यमंडित होअून वैभवगिरीवर आरूढ व्हावयाचे मार्गांत पांच जगें जरी विरोधार्थ पुढें अुभीं राहिलीं तरी डगमगण्याचें काय कारण ? केवळ प्रचंड अिच्छाशक्ति नि भगीरथ प्रयत्नांची शीग या कार्यार्थ विनियोगाला लागली पाहिजे. म्हणजे पुढचे भविष्यकालांत पूर्वीच्या महान भाग्यशाली भूतकालाला शोभेल असा अुज्ज्वलतर भविष्यकाल हिंदुराष्ट्राला निश्चित लाभूं शकेल, हें आपणांपुढें अुभ्या असलेल्या प्रश्नचिन्हाला अुत्तर आहे.

हिंदूराष्ट्राचें अलौकिक स्वरूप

जगांतील अहिंदूराष्ट्रांचें त्या त्या राष्ट्राच्या राष्ट्रिकांच्या मनापुढील स्वरूप मनोमय वा कल्पनामय आहे. पण हिंदूराष्ट्राच्या राष्ट्रिकांच्या मनापुढील त्यांच्या राष्ट्राचें स्वरूप नुसतें मनोमय वा कल्पनामय नसून चैतन्यमय— चैतन्यरूपी

आहे. तें कसें हें आपण बघूं. हिंद्वेतर जगांतील लोकांना प्रत्येक गोष्ट केवळ भौतिक वा अभौतिक संस्कारयुक्त मनोमय स्वरूपांत भासत असते, पण हिंदूमनावर हिंदूतत्त्वज्ञानामुळें सर्व जगतांत चैतन्य भरलेलें आहे हें मौलिक सत्य बिंबलेलें असलेमुळें प्रत्येक भौतिक अभौतिक वस्तूच्या मागें चैतन्यमयतेचें अस्तित्व त्याला दिसत असल्यामुळें हिंदूंना केवळ भौतिकमयता मग ती प्रत्यक्ष असो वा मनोमय असो स्वीकृत करवतच नाहीं. तशीच गोष्ट त्यांच्या राष्ट्रकल्पनेची. ज्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीला त्याचा जीव वा आत्मा, मन, वाचा, देह नि त्याला रहावयाला अधिष्ठान म्हणजेच घर पाहिजे असतें त्याचप्रमाणें राष्ट्रालाहि राष्ट्रात्मा, राष्ट्रमन, राष्ट्रभाषा, राष्ट्रदेह नि राष्ट्रगृह यांची आवश्यकता आहे हें हिंदू मन जाणतें—तें अितक्या वर्णनात्मक पद्धतीनें प्रत्येक हिंदूमन व्यक्त करूं शको वा न शको. पण त्यांच्या कल्पनेंत या गोष्टीचा अस्पष्ट वा स्पष्टपणें ठसा अुमटलेला असतो. हिंदूराष्ट्राचीहि तीच गोष्ट. या हिंदूराष्ट्राचा हिंदूधर्म (वास्तविक धर्माला नांव नाहीं. धर्म म्हणजे धर्म. नांव द्यावयाचेंच तर ज्ञानमय म्हणून वैदिक, सतत असणारा—सनातन सत्यें अबाधित असतात म्हणून सतत असणारा—म्हणून सनातन आदिक गुणांवरून नांवें देतां येतील. पण हिंदूधर्म हें नांव अेका निराळ्या दृष्टीनें दिलेलें आहे. या हिंदुस्थानांत हिंदूजाति आहे नि ती त्या सनातन धर्माचें पालन करीत आहे म्हणून त्या धर्माला अुपलक्षणेनें हिंदुधर्म असें म्हटलेलें आहे.) हा आत्मा, हिंदूसंस्कृति हें त्या हिंदूराष्ट्राच्या मनाचें स्वरूप, संस्कृत नि व्यवहार्य दृष्टीनें तिचीच सध्यां प्रतिनिधि असलेली संस्कृतनिष्ठ हिंदी हें या राष्ट्रपुरुषाच्या राष्ट्रभाषेचें स्वरूप, हिंदूजाति हें त्या राष्ट्रपुरुषाच्या सूक्ष्मदेहाचें चिरंतन स्वरूप नि हा यावच्चंद्रदिवाकरौ रहाणारा हिंदुस्थान देश हा त्या राष्ट्रपुरुषाचा प्रत्यक्षांत दिसणारा भौतिक पण जिवंत असलेला चिरंजीव देह म्हणजे त्या राष्ट्रपुरुषाच्या निवासाचें चैतन्यमय जिवंत गृह होय. अितर जातींना त्यांचे देश हे जडरूपानें प्रतीत होतात. हिंदूलोकांची देशाची म्हणजे राहत्या पृथ्वीभागाची कल्पना जडरूप नसून देवतारूप—चैतन्यरूप—आहे, जगांतील सर्व व्यवहार—विहार या देशमातेच्या अंकावर राहून करावें लागतात नि त्या वेळीं आमचा पादस्पर्श या मातेच्या अंगाला होतो. या प्रमादासाठीं हिंदू प्रत्येक प्रातःकाळीं त्या देशमातेची—पृथ्वीमातेची—प्रार्थना करीत असे (आज विस्मरण झालें असलें तरी ती कल्पना हिंदूमनाच्या

अंतःस्थळीं पूर्णत्वानें वास करीत असलीच पाहिजे). त्या प्रार्थनेंत प्रत्येक हिंदू "॥ समुद्रवसनेदेवी पर्वतस्तनमंडळे । विष्णुपत्नीनमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्वमे ॥" (समुद्ररूप वसनाचें परिधान करणारी नि निर्मल अमृततुल्य जीवन देणारी —पाणी सोडणाऱ्या—मातृस्तनानें युक्त असणारी हे विष्णुपत्नि म्हणजे भगवंताची पत्नि म्हणजेच आमची माता असलेले देशरूप पृथ्वीमाते, माझ्या पादस्पर्शाच्या दोषासाठीं मीं तुला नमन करीत आहे. तूं त्या पदस्पर्शाच्या दोषांची मला क्षमा कर) या मंत्रानें नमन करून क्षमायाचना करीत असे. क्षमायाचना जडाजवळ शक्य नाहीं. अर्थात् देशाला देवतामयता आहे हें जाणल्यावांचून क्षमायाचनेची प्रवृत्ति होणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक हिंदूंचा स्नानमंत्र पाहिला तर वा देशाच्या समग्र स्वरूपाची चिंतनपद्धति बघतां देशाचें देवतास्वरूप हिंदुमनांत कसें प्रतिबिंबित झालें आहे हें स्पष्ट होअील. प्रातःकाळीं हिंदुस्थानाच्या सर्व दिशाविदिशांतील प्रमुख प्रमुख अशा मोक्षदायिनी सप्तपुरी—सात नगरें; शरीर—मन—बुद्धीला पावन करणाऱ्या हिमालयपासून रामेश्वरपर्यंत शुद्धोदक देअून जीवन वितरण करणाऱ्या तीर्थमय नदनद्या; सर्व देशभर पसरलेली वारा ज्योतिर्लिंगें; श्रीसती पार्वती मातेच्या देहाची देशभर विविधस्थळीं वितरण झालेलीं पवित्र अंशस्थळें; ऋषीमुनींना तत्त्वचिंतनक्षम करणारे तपोवनमय विविध पर्वत; अित्यादि रूपानें या देशाच्या विराट देहाचें स्मरण करून प्रत्येक हिंदूंनीं स्नानकर्म करावयाचा विधि पूर्वद्रष्ट्यांनीं सांगून ठेवलेला आहे. हेतु हा कीं प्रत्येक हिंदुमनांत आपल्या या परमपावन नि देवतामय राष्ट्र देहाच्या – हिंदुस्थान देशाच्या — पूर्णस्वरूपाचें विहंगमदृष्टीनें दर्शन व्हावें, नि तद्द्वारां ही मातृभूभक्ति हिंदुमनांत तेजाळतेनें विलसत असावी. राजसत्तेच्या प्रभावानें विविध प्रदेशाची अेकरूपता प्रत्यक्षांत आणावयाला सोपें जातें. त्याहि दृष्टीनें अश्वमेधयज्ञादि रूपानें हिंदुस्थान अेकछत्री करण्याची नि ठेवण्याची कल्पना चिरस्थायी रूपानें या हिंदूराष्ट्रांत व्यवहार्यतेंत अुतरलेली होती. केंद्रसत्तास्थानें बदलत असत. पण केंद्रसत्तेच्या हातीं अेकछत्रित्वानें नांदणारा हिंदुस्थान हा राज्यसत्तादृष्टीनेंहि अेकरूप नि म्हणून अेकछत्रीपणाच्या स्वरूपांत चिरस्थायीपणें बहुतेक काल रहात आला आहे. या हिंदूराष्ट्राची राष्ट्रभाषा अनेक सहस्रक वर्षें संस्कृतच होती. नि पुढें कालवशांत येथें अनेक

भाषा अस्तित्वांत आल्या तरी अेकाच वृक्षाच्या अनेक शाखांप्रमाणें त्या अनेक भाषांना शब्दरूप जीवनशक्ति देणारी संस्कृत भाषाच राहून भाषाक्षेत्रांतील मौलिक अेकता फारशी बिघडूं शकली नाहीं. राष्ट्रीय ग्रंथ रूपानें रामायण महाभारत हेच अेकमेव राष्ट्रीय ग्रंथ म्हणून सर्व हिंदुस्थानभर सत्ता गाजवित आले आहेत. कला, विद्या, अनेक शाखाप्रशाखायुक्त तत्त्वज्ञान अित्यादि गोष्टी मौलिक अेकता राखून राहिलेल्या होत्या नि आहेत. संकटकाल नि अैश्वर्यभोगकाल हे समान, परंपरा, सामाजिक धर्मनिर्बंध (मनु आदिकद्वारां) अेकच. या नि अशाच अितर अनेक प्रकारांनीं नि मार्गांनीं धर्म, तत्त्वज्ञान, परंपरा, समाजरचना, अितिहास, समान वैभवसंकटकाल, अेकभाषामयता, समान तीर्थ यात्रादि स्थानें, राजसत्तेची अेकछत्रीपणाची देशव्यापी कल्पना नि व्यवहार्यता अित्यादि दृष्टीनें हिंदुस्थान अेक राष्ट्र होता. अेकराष्ट्र रूपानें या देशांतील हिंदूलोक या देशाची वा राष्ट्राची सेवा करण्यांत मग्न होते. तेव्हां हें हिंदुस्थान हें अेकराष्ट्र कधींच नव्हतें नि आतां अिंग्लिश आल्यावर स्पष्टपणें वा अकबरादि मुसलमानकालीं नि तत्पूर्वी केवळ अेकदांच अशोक या हिंदू राजाच्या राज्यकालीं अस्पष्टपणें अेकराष्ट्रीयत्वाची कल्पना येअूं शकली असें जें कधीं कधीं स्वार्थी लोकांच्या तोंडून अैकलें जातें वा आपल्यांतील परप्रत्ययनेय बुद्धीच्या बावळटांकडून त्याच विधानाची री ओढली जाते तें किती अयथार्थ आहे हें वरील विवेचनावरून लक्षांत येण्यास प्रत्यवाय नाहीं. कोणी कांहींहि म्हटलें, चिंतिलें वा केलें तरी आम्हीं अेकराष्ट्र होतों तें तसेंच आहोंत नि पुढेंहि राहूंच राहूं.

तुम्हीं अेक राष्ट्र कधींच नव्हतात; आतांच ही नवी कल्पना आमच्यापासून शिकत आहांत असें स्वार्थी परकीय लोक आमच्या कानीं कपाळीं ओरडून सांगत आहेत. तेंहि क्षणभर आपण गृहित धरून त्याना विचारूं कीं, अेक चीन नि जपान सोडून गेल्या ५।६ शें वर्षांमागें तुम्हां सर्वांचें राष्ट्रीयत्व कोठें होतें. तुम्हीं पूर्वी राष्ट्र म्हणून कधींच अस्तित्वांत नव्हतात. नि तरीहि आम्हीं चिरंतन रहाणारें राष्ट्र आहो असें म्हणतच आहांत ना ? मग आम्ही राष्ट्र नव्हतो असें म्हटलेंत तरी आम्ही राष्ट्र होत आहोत–नव्हे–झालों आहोंत ही आमची जाणीव–मागील सहस्रावधी वर्षांच्या अनेक विध धाराप्रवाहानें

अस्तित्वांत असलेले आम्ही ही आमची जाणीव घेऊन जर राष्ट्र म्हणून उठूं लागलों तर तुम्हांपेक्षां अधिक हक्कानें नि अधिकारानें आम्हीं उठूं शकतों. कारण तुमचें मानवी समाज म्हणून अस्तित्वच नव्हतें त्यापूर्वीपासून आम्ही वैभवसंपन्न ऐश्वर्यपदावर जातीय जीवनासह नांदत होतो. आम्हांला हिणवण्याचें सामर्थ्य असणारें राष्ट्र वा लोक या जगांत कोणीच असूं शकत नाहींत. सर्व जगांत राष्ट्रकल्पना ही काल्पनिक जगांतील जडरूपी भावना आहे. परंतु आम्हां हिंदूराष्ट्रीयांची राष्ट्रकल्पना ही बुद्धीला अनुभूत असलेली चैतन्यमय मूर्तिरूप आहे, नि म्हणून जगाच्या लौकिक राष्ट्रकल्पनेहून आमची हिंदूंची हिंदूराष्ट्रकल्पना ही अुच्चतर नि म्हणूनच अलौकिक अशी आहे.

मध्यकालीन आत्मविस्मृति नि तिचे परिणाम

या पुस्तकांतील ' पूर्वी 'च्या प्रकरणानंतर हिंदुस्थानांत भाग्य कालाला कशी नि कां ओहोटी लागली याचें दिग्दर्शन केलें होतें. त्या त्या ओहोटीच्याच भागांत जरी प्रत्यहीच्या राष्ट्रदेवतास्मरणाचें तंत्र संभाळलें जात आलें तरी त्यांतील अर्थाला हिंदूजाति विस्मरली नि त्याच महान् अपराधाचीं फळें आजच्या संकटरूपानें भोगण्याची पाळी आम्हांला आली आहे. आम्ही राष्ट्राचें स्वातंत्र्य गमावून बसलो येवढेंच नाहीं तर राष्ट्रजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत परकीयांच्या आक्रमणाला थोपवून धरण्याचें कार्य आमचे हातून घडलें नाहीं. श्रीशिवकालीं कांहीं काळापुरती आलेली जागृति पुन्हां आत्मविस्मृतीच्या निशेचा जोर वाढून आम्ही गमावून बसलो नि पहिल्या पारतंत्र्यापेक्षां अधिक सर्वग्रासी पारतंत्र्याचे दाढेंत सांपडून भरडले जाअूं लागलो आहोंत. पूर्वी मुस्लिम पारतंत्र्यांत हिंदुत्वाच्या अभिनिवेशाचें कवच अंगावर अभेद्य रूपानें बसलेलें असल्यामुळें सामुदायिक नसलें तरी स्थळोस्थळीं नि प्रसंगाप्रसंगाला आम्हीं हिंदुत्वाच्या अभिनिवेशानें टक्कर देत आलों. पण कशानें तरी (त्या कारणाचे अुहापोहाला स्थलावकाश नाहीं म्हणून तें काम सोडून देणें भाग आहे) तें कवच आमच्या अंगावरून आज गळून पडलें आहे. नि आतां आम्ही अितके हीन स्थितीला पोंचलो आहोंत कीं ' आम्ही हिंदू ' असें अभिमानानें सांगणें तर दूरच पण आमचे हिंदुत्वाचा नुसता अुल्लेख करणेंहि आम्हाला अुलट हीनपणाचें, संकोची वृत्तीचें नि हानिकारक वाटूं लागलें आहे. अधोगतीची ही पराकाष्ठा

आहे. यापुढें दोनच गति अुरतात. अेक तर पुन्हां आत्मस्मृति जागृत होअून हिंदू म्हणून अुत्कर्षपथाचा अवलंब करीत पूर्वीहूनहि अधिक श्रेष्ठपदाचें 'अधिपत्य' मिळविणें अथवा 'हिंदू' हें नांवहि अुरणार नाहीं अशा भयाण अंधःकारांत हिंदुत्वांसह विनष्ट होणें–यावांचून तिसरें गत्यंतरच अुरलें नव्हतें. पण भगवद्प्रसादसंपन्न हिंदूंजाति जगाचे कल्याणार्थ केवळ जिवंतच नव्हे तर जगद्गुरुपदीं विराजत नांदावी असा भगवद् संकल्पच असल्याचें दिसतें. पूर्वकाळीं अनेकवार नष्ट होअूं घातलेल्या हिंदूजातीच्या चिरंजीवितेनें भगवंताचें कृपादान आपल्या सामर्थ्याद्वारां पुनः पुनः प्राप्त करून घेतलेलें आहे. तद्वतच ती सनातन हिंदूजाति याहि आजच्या प्रसंगीं अभूतपूर्व वाटणाऱ्या संकट क्षणीं आपल्या जवड्यांतून भरडीत खाअूं पाहाणाऱ्या त्या नाशाच्या जवड्यालाच फोडून पुन्हां दिव्य तेजाळतेनें जगाचे डोळे दिपवीत जगाच्या मूर्धास्थानीं अभिषिक्त होअील.

भावी दिव्यकालाचीं पूर्वचिन्हें

जगांत सर्व बलांच्या अनुकूलतेवरच व्यक्ति वा समष्टि, जाति वा राष्ट्र आपलें जीवनकार्य सफल करूं शकतें. पण या सर्व बलांमध्यें तुलनेनें प्रत्येक बलाहून बलवत्तर आणि सर्व बलांना आधारभूत असें जें अिच्छाबल आहे त्या अिच्छाबलाचा वा सामर्थ्याचा अवतार हिंदूमनांत झालेला आहे. अिच्छा-सामर्थ्याचा हिंदूमनांतील आविर्भाव ही जीर्ण शीर्ण हिंदुत्वाच्या कायाकल्पाची बांदीच आहे. या अिच्छासामर्थ्याच्या मागोमाग अितर सामर्थ्यें–वस्तूमागें तिची सावली येते याप्रमाणें–अनुसरावयाला लागतील यांत कांहींच शंका नाहीं. नुसती अिच्छा म्हणजे सामर्थ्य नव्हे. पण त्या अिच्छानुसारें प्रयत्न-शीलतेचा अुदय होअूं लागला म्हणजे अिच्छेला अिच्छासामर्थ्याचें स्वरूप येअूं लागलें असें निश्चितपणें मानावें. हिंदूमनांत अुत्कर्षाची, अुन्नतीची अिच्छा अुत्पन्न झाली. नि ती कार्यवाहींत आणण्यासाठीं हिंदुमहासभा नि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला. या अेकाच गोष्टीवरून अिच्छासामर्थ्य हिंदूमनांत प्रकट होअूं लागण्यास आरंभ झाला असें समजण्यास चिंता नाहीं. हिंदूजाति, हिंदूधर्म, हिंदूसंस्कृति यांचें रक्षण करीत या हिंदूराष्ट्राला अैश्वर्यपदावर स्थापित करण्यासाठीं हिंदूराष्ट्रस्वातंत्र्यार्थ प्रयत्नांचें यज्ञकंकण या संस्थांनीं

आपलें हातांत बांधलेलें आहे. या हिंदूराष्ट्राच्या पुनरुद्धाराची महदाकांक्षा या संस्थांच्या द्वारां हिंदूमनांनीं धारण केलेली आहे. आरंभ म्हणजे कार्यपूर्ति नव्हे. केवळ आम्ही आरंभ केला अेवढ्यानें भागणार नाहीं. नि ही गोष्ट हिंदुमन ओळखीतहि आहे असें मानावयाला मुळींच प्रत्यवाय नाहीं. या प्रयत्नाला यशःसंपन्नतेसाठीं कशाप्रकारच्या सामर्थ्यानें युक्त व्हावयाला पाहिजे हें आपण मागाहून पाहूं. तत्पूर्वी संकटस्वरूपाची व्याप्ति नि सामर्थ्य काय, किती नि कसें आहे याचें थोडेसें निरीक्षण केलें पाहिजे. कारण आपल्या सामर्थ्यसंपादनाचे कार्याला पूर्णत्व आणावयाला या निरीक्षणामुळेंच साह्य मिळणारें आहे.

संकटस्वरूपाचें चित्रण

जगाचें खरें स्वरूप म्हणजे कोणातरी प्राण्यांना क्रूरपणानें मारून त्याला खात खात रक्ताळलेल्या तोंडांतील सळसळणाऱ्या जिभेनें आपल्या पिलांना प्रेमानें चाटणाऱ्या वाघिणीचें चित्र म्हणजे जगाचें वा निसर्गाचें यथार्थ स्वरूप—चित्रण होय. क्रूरतेची पराकाष्ठा नि प्रेमलतेची अद्वितीयता या बाह्यतः परस्पर विरुद्ध दिसणाऱ्या गुणांच्या अेकत्र वास्तव्याचें जीवन—चित्र म्हणजे जगाचें वा निसर्गाचें जीवन—चित्र असें ज्या. सावरकरांनीं अेके स्थळीं वर्णन केलें होतें. नि तें पूर्णपणें यथार्थ आहे. जगाला जो कोणी यापैकीं कोणत्या तरी अेकाच रूपानें पहाणारा त्याप्रमाणें पहात वर्तनाचें स्वरूप ठरवील तर तो सपशेल फसेल. तो जगांत टिकण्याला योग्य रहाणार नाहीं. जगांत केवळ क्रूरतेचा आश्रय करणारा वा क्रूरताच आहे असें समजणारा, जगांतील जीवनांत मिळणारीं सुखें नि आनंद याला मुकेल. नि जग हें केवळ प्रेमानें, अुदात्ततेनें, दैवीमयतेनेंच भरलेलें आहे असें मानून चालेल तो जगांतील क्रूरतेच्या भक्ष्यस्थानीं पडेल. जगाच्या दोन्हींहि रूपांना ओळखून जशास तसें न्यायानें विचारपूर्वक वागेल तोच—तो व्यक्ति असो वा समाज अथवा राष्ट्र असो—जगापासून स्वतःला संरक्षित जगांतील सुखा—आनंदाच्या स्वादाचा लाभ करून घेअूं शकेल. ही गोष्ट लक्षांत घेअूनच हिंदूराष्ट्राच्या पूर्वद्रष्ट्यांनीं जगाच्या क्रूरादिकांपासून समाजाला सुरक्षित राखण्यासाठीं संरक्षण सामर्थ्यसंपन्न क्षात्रतेजानें युक्त असा क्षात्रियवर्ण नि जगांतील सुखा—आनंदाचा स्वाद मिळवून देणाऱ्या—अुच्च गुणांचा अुत्कर्ष

साधन करीत समाजाला सुखानंदाचा लाभ घडवून देत रहाणारा ब्राह्मणवर्ग प्रतिष्ठापून तदनुरोधें समाजरचना वैज्ञानिक दृष्टीनें गुणकर्म जन्मयुक्ततेवर आधारलेली होती. ज्या समाजांत या दोनहि गुणांचें वा स्वरूपाचें सामंजस्य असतें तोच समाज वा राष्ट्र या जगांत प्रगतीचें अधिकारी राहूं शकतें. ज्या कालापासून हिंदूंमनांत केवळ प्रेमगुणांशीं समान धर्मी असणाऱ्या माया, ममता, दया, क्षमा, विश्वबंधुता, अहिंसा आदिक गुणांचा अतिरेक झाला नि क्रूरता वा रक्तपात-क्रिया नि तदनुसारें पराक्रम, शूरत्व, आक्रमकबुद्धि, शत्रुभेदनसामर्थ्य, युक्तिप्राविण्तादि गुणांकडे समाज वा राष्ट्रदृष्ट्या दुर्लक्ष होत गेलें त्या वेळेपासून हिंदुस्थानचा अेकेक पाय जागतिक स्पर्धा जीवनांत मागें मागें पडूं लागला. म्याक्समुल्लर अेकदां म्हणाले कीं 'हिंदूंना—**मरावें कसें हें माहीत आहे. पण मारावें कसें, हें ते विसरल्यामुळें त्यांना दुर्दिन आले ' ठकासी ठक वा विश्वासघात्यावर अविश्वास अथवा कपट्याशीं कपट प्रयोगादि वृत्ति न ठेवतां प्रामाणिकपणा, अनाठायी विश्वास, अस्थानीं क्षमादान, कपट्याशीं धर्मयुद्ध अित्यादि अपात्रीं वा कुपात्रीं गुणदर्शनाच्या चुकीमुळें रजपूत जातीचा विजय होअूं शकत नाहीं. नाहीं तर मोगली सत्तेचा कधींच नाश झाला असता, ' किंवहुना मुस्लिम आक्रमण हिंदुस्थानांत घुसूंहि शकलें नसतें असा अितिहासवेत्यांचा अभिप्राय आहे. राजपुत अितिहास लेखक कर्नल टॉडहि असेंच अुद्गारल्याचें अितिहासांत अुल्लेखित आहे.** हिंदूमनांतील या अविवेकीं सात्विकगुणप्रियतेचा लाभ परक्यांनीं भरपूर घेतला अितकेंच नव्हे तर आमच्यांतील घरबुडवेहि समाजमनांतील याच सत्वगुणप्रियतेचा लाभ घेत हिंदूसमाजाला आत्मघाताला अजून प्रवृत्त करण्याचें महापातक जाणूनबुजून करीत आहेत. हें मागें कॉंग्रेसी राष्ट्रघाति मनोवृत्ति नि कृतिविषयक वर्णनप्रसंगीं स्पष्ट केलेलें आहे. या खिलाफतीचें भूत अंगांत संचरलेल्या कॉंग्रेसकालापासून संहारक, नाशकारी, हानि करणाऱ्या सर्व कृतींचा-अुक्तींचा-गुणांचा विनियोग आपसांतील व्यवहारांत अुपयोजला जात आहे. हिंदूंचें वित्त, जीवित, मत्ता, मान, सत्व (अब्रू), धर्म, संस्कृति, हिंदूराष्ट्रभाषादिकांवर होणाऱ्या आक्रमणांना आळा घालण्याचें तर दूरच; अुलट या गोष्टीला निष्क्रियतेच्या द्वारां साह्य वा

सक्रियतेच्या द्वारां प्रोत्साहन या कॉंगेसीगणांकडून मिळत आहे. संहारक शक्तीचा प्रयोग स्वकीयांवर ते करीत आहेत; आणि प्रेमादि गुणांच्या प्रकटनाला बाह्य जग (ॲबिसिनिया, स्पेन, तुर्कस्थान, चीन आदिक) पात्र ठरवित आहेत. अितकेंच नव्हे तर हिंदुत्वाच्या नळीं नख घालायला प्रवृत्त झालेल्या प्यान अिस्लामी वृत्तीला गांधी प्रमुख कॉंग्रेसीजन सक्रिय साह्य करीत आहे. प्रेम, दया, क्षमा, आदिक सात्विक गुणांचें स्थान म्हणजे जेथें मौलिक अेकता असेल, स्वकीयतेचें अधिष्ठान असेल तेथेंच होणें न्याययुक्त आहे. आपणांशीं समानहितसंबंधियांशीं–समानधर्मीयांशीं–ममत्वानें निबद्ध असलेल्याशीं वागतांना या सात्विक गुणांचा विनियोग हा ममत्ववर्धक नि म्हणून अेकत्वकारी ठरूं शकतो. पण जेथें आपल्या हानींत लाभ असणारे नि आपल्या लाभांत स्वतःची हानि मानणारे समाज वा लोकांशीं वागतांना या गुणांचा अुपयोग करणें म्हणजे जाणून वा अजाणता आत्मघाताला प्रवृत्त होणें आहे. ही गोष्ट आत्मघात टाळूं अिच्छिणाऱ्या समाजानें नि राष्ट्रानें ओळखावयाला पाहिजे. या हिंदूराष्ट्राला ही गोष्ट जितकी लवकर कळेल तितका त्याचा भाग्यकाल जवळ येअील. सात्विक गुणसमुच्चय म्हणजे ब्राह्मगुण हे समाजाला नि राष्ट्राला संघटित, अेकरूप नि प्रेमनिबद्ध ठेवतात. आणि आपणाशीं विरोधक असलेल्या समाज–राष्ट्राच्या सबंधांत ब्राह्मगुणांना मागें सारीत क्षात्रगुणांचा विनियोग करण्यानें ते मारक, घातक, नि हानिकर आक्रमणादिकांपासून रक्षण करून समाज–राष्ट्राचें जीवन अक्षुण्ण राखतात ही गोष्ट हिंदूसमाजानें त्वरित ओळखली पाहिजे. ब्राह्म–क्षात्रगुणांच्या विनियोगांची यथातथ्यता बिघडून त्यांचा व्यभिचार, या घरघालू कॉंग्रेसनें आरंभल्यापासून हिंदूराष्ट्रावरील संकटाचें स्वरूप अधिकाधिक भीषण स्वरूप धारण करीत आहे.

१९१६ या वर्षीं या जात्यंधतेची दुही नाहींशी करण्यासाठीं हिंदूंची हानि न होअूं देतां मुसलमानांचें समाधान करणारी तडजोड केली होती. नि तेथेंच या दुहीला अिच्छिल्याप्रमाणें पूर्णविराम मिळता तर पुढील आपत्तिपरंपरा कोसळली नसती. पण कॉंग्रेस नेत्यांच्या बुडाअू वृत्तीनें हें दुहीचें गाडलेलें भूत पुन्हां अुकरलें जाअून त्याचा थयथयाट पुनश्च चालू झाला. आरंभीं आम्ही अल्पसंख्याक असल्यामुळें आमचे हितसंबंध या हिंदुस्थानराष्ट्रांत सुरक्षित राहतील

कीं नाहीं याची भीतियुक्त शंका वाटते, या निमित्ताचा वाऊ करून पहिल्या मिळालेल्या सवलतींतील सत्तेपेक्षां अधिक सत्तेचा अंश मागावयाचा आरंभ झाला. स्वराज्याच्या संपादनार्थ मुस्लिम सहकार्य अपरिहार्य आहे ही हेतुतः वा अहेतुतः पण खोटी समजूत हिंदुस्थानांतील लोकांची करून देऊन त्या पडद्याआड मुसलमानांना अधिकाधिक सत्तांश देण्याला काँग्रेसची सिद्धता झालेली नि कदाचित् काँग्रेसच्या दानाला स्वीकारून मुसलमानहि स्वराज्य मागणीला दुजोरा देतील कीं काय या भयानें हिंदूं हो म्हणतील त्यापेक्षां आम्ही अधिक सत्ता प्रत्यक्ष देतों, असें अिंग्लिश राजसत्तेनें म्हणावयास आरंभ केलेला. या लिलांवाच्या स्पर्धेंत मुसलमानांच्या प्रसन्नतेला राजकारणाच्या बाजारांत भराभर मोल चढत चाललें. अशा वेळीं आपल्या पोळीवर तूप ओतून घेण्याची बुद्धि त्यांना झाली नसती तरच आश्चर्य. हा हिंदूंच्या हातून हिंदुस्थानांतील राजकारण क्षेत्रांत सत्तांश हिसकण्याच्या संधीचा लाभ घेत, हिंदुस्थानांतील चारपांच प्रांतांत जातीय निवाड्यामुळें व्यवहारतः मुस्लिमसत्ता प्राप्त झाल्यासारखी स्थिति निर्माण होतांच, यापुढील पायरी म्हणून जी सत्ता आधींच हातीं आली आहे तिच्यावर आपल्या पूर्ण स्वामित्वाची मुद्रा ठोकून तितका तरी हिंदुस्थानचा भाग मुस्लिम प्रदेश म्हणून फोडून वेगळा करावा या अिच्छेनें बरेंच दिवस पडद्यामागें शिजवीत आणलेल्या पाकस्थान योजनेचें शिंग अगदीं अुघडपणें मुस्लिम लीगनें फुंकलें. ही गोष्ट बऱ्याच वर्षांपासून शिजूं घातलेली पाकिस्तानी योजना हिंदूंना माहीत झालेली असूनसुद्धां हिंदूंनीं तिच्याकडे कानाडोळा केला. "अंः असें कधीं होअील काय? मुसलमान काय अितक्या निर्लज्जपणें जात्यंधतेचा रंग घेतील?" अित्यादि अुद्गार काढीत सुरक्षिततेच्या गुंगींत हिंदू गुंग होते. संकट मागें लागलें असतां डोळे मिटून वाळूंत तोंड खुपसावें नि मागें लागलेल्या कुत्र्याचें संकटमय अस्तित्व दिसत नाहीं तेव्हां आपण सुरक्षित आहोंत असें समजणाऱ्या सश्याप्रमाणें हिंदूलोक संकटाची संभावना दिसत असूनसुद्धां त्याकडे अपराधी दुर्लक्ष करतात नि संकट प्रत्यक्ष कोसळलें—आक्रमकानें प्रत्यक्ष गळा धरला—म्हणजे मग सुटकेच्या अुपायाची नि तीहि केवळ, चर्चा करूं लागतात. तसेंच याहि गोष्टींत झालें. मुस्लिम लीगनें मुसलमानांच्या वतीनें पाकिस्ताची मागणी स्पष्टपणें आव्हानपूर्वक पुढें मांडली. नि त्याला भेदनीतिपटु अिंग्लिश

सत्ताधाऱ्यांनीं वारीक झिरझिरीत पडदा नांवापुरता आड करून त्या मागणीला अुचलून धरलें. तेव्हां मात्र हिंदूंची धुंदी थोडीशी अुडाल्यासारखें वाटूं लागली आहे. पाकिस्तान म्हणजे हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या महत्त्वाकांक्षेच्या नाटकांतील शेवटचा प्रवेश आहे असें जर कोणाला वाटत असेल तर तो भ्रम आहे. या पुस्तकांतील '**आतां**' या प्रकरणांत मुसलमानांचें हिंदुस्थानांतील महत्त्वाकांक्षेचें खरें नि पूर्ण स्वरूप काय आहे याचें दिग्दर्शन केलेलें वाचकांनीं पुन्हां अेकदां बघावें. आम्हीं अल्पसंख्य तेव्हां आम्हांला संरक्षण द्या या चंचुप्रवेशी मागणीपासून वाढत वाढत हिंदुस्थानचे तुकडे अुडवून पांच मोठेसे प्रांत—ज्या प्रदेशीं हिंदूसंस्कृति—धर्म—नि तत्त्वज्ञान यांच्या जन्मकालींचा पाळणा हालत होता तो पंचनद प्रदेश, ती वेदघोषाची प्राचीनतम कालांतील आद्यपुण्यभूमीचाहि समावेश त्यांत आहे अशा पंजाबप्रांतासह पांच मोठाले प्रांत—पाकस्थान या नामकरणांत आणावयाचे नि तद्द्वारां त्यांचे पूर्ण मुसलंमानीकरण करावयाचें येथपर्यंत ठेप येअून पोंचली आहे. जी महत्त्वाकांक्षा संधि साधीत नि टप्पे गाठीत येथपर्यंत अुडी मारीत आली आहे ती मुस्लिम महत्त्वाकांक्षा हिंदुस्थानला खग्रास करण्याला पुढें सरसावणार नाहीं असें म्हणण्याचें धाडस केवळ अेक महामूढात्मा किंवा हिंदूराष्ट्रद्रोहात्माच म्हणूं शकेल. ज्याला ज्याला म्हणून थोडी तरी प्रामाणिक विचारशक्ति आहे त्याला हिंदुस्थान खग्रास करण्यासाठींच मुस्लिम महत्त्वाकांक्षा अुड्या घेत पुढें सरसावत आहेत असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

हिंदुस्थानराष्ट्र अिंग्लिशराष्ट्राच्या पारतंत्र्यांतून मुक्त होअून स्वतंत्र होण्यासाठीं अविरत प्रयत्न करीत आहे. तो प्रयत्न होत असतांच जणूं कांहीं तेवढी आपत्ति पुरीशी नाहीं म्हणूनच कॉंग्रेसच्या घरघाळू वृत्तीमुळें आतांपर्यंत वर वर्णन केल्याप्रमाणें मुस्लिम आक्रमणाचे संकटाची भर त्यांत पडत आहे. आज कालच्या महायुद्धांत गुंतलेल्या युद्धमान राष्ट्रचालकांचीं वक्तव्यें नि अुद्घोषणा पहातां हीं परस्परांचा गळा घोटूं निघालेलीं अुभयपक्षीय राष्ट्रें जणू कांहीं जगत्कल्याणार्थच अवतीर्ण झालीं आहेत असें वरवर पहाणाऱ्याला वाटेल. जगांत लोकशाही सुरक्षित व्हावी म्हणून अिंग्लंड धडपडत आहे. (अिंग्लंड हिंदुस्थानचे संबंधांत मात्र तद्विरुद्ध वर्तन करीत आहे. मग अिंग्लंड कोणाच्या

नि कोठच्या लोकशाहीकरितां मरणमारणाला प्रवृत्त झालें आहे ? कोणास ठाऊक !) अमेरिका हिंदुस्थान युद्धांत आला नाहीं तर जपान विरुद्ध आपले दहा लक्ष अमेरिकन तरुण बळी द्यावे लागतील या संभवनीय भयानें व्याकुल होऊन तिच्या मनांत हिंदुस्थानविषयीं अत्यंत कळकळीची सहानुभूति उत्पन्न झाली आहे. ३।४ वर्षें जपानशीं झुंजत असलेला चीन अिंग्लंड, अमेरिकादि-कडून येणारी युद्धसामुग्री मिळत राहिली तरच जपानचे युद्धांत आपण तगूं शकूं हें जाणून ती युद्धसामुग्री मिळण्याचा हिंदुस्थानचा मार्ग जपानची हिंदुस्थानकडे चाल झाल्यास बंद झाल्यास ती मिळणें अशक्य होअील नि युद्ध चालविणें व्यवहार्य रहाणार नाहीं यासाठीं हिंदुस्थाननें युद्धांत अुडी घ्यावी असें अिच्छितों आणि म्हणून त्यांना हिंदुस्थानविषयीं अवर्णनीय कळकळ वाटूं लागली आहे नि ममत्व अुत्पन्न झालें आहे. हिंदुस्थान अिंग्लंडच्या हातून निघून गेल्यास अिंग्लंडचें सामर्थ्य नष्ट होअून युद्धांत आपल्या विजयाचा मार्ग सुकर होअील हें निश्चित जाणून जर्मनी हिंदुस्थानच्या पारतंत्र्यासाठीं दुःखीकष्टी झाला आहे आणि त्याच्या स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करण्याचा आव आणीत आहे. जपानला पूर्वेकडील क्षेत्र मोकळेपणें वावरावयास सांपडावें असें वाटत असल्यामुळें त्या अिच्छेआड येणारें ब्रिटिशांचें हिंदुस्थान-वरील साम्राज्य पहावेनासें होअून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यार्थ जपानहि तळमळत आहे, अितकेंच नव्हे तर हिंदुस्थानला स्वातंत्र्यदान करावें म्हणून हिंदुस्थानवर चढून येअूं पहात आहे. आपल्या हिंदुस्थानच्या कल्याणार्थ जगांतील अितकीं राष्ट्रें तळमळून धडपडत आहेत हें पाहून अिंग्लंडलाहि भडभडून आलें नि हिंदुस्थानला अुधारचिें—आज रोखठोकीच्या स्वरूपांत नव्हें पण अुद्यांच्या अुधारीचें स्वराज्यदानाचें बोलणें बोलत त्याच्या विनिमयांत हिंदुस्थाननें युद्धांत अुडी घ्यावी आणि तद्द्वारां अिंग्लंडवरील संकटाचें स्वरूप सौम्य करावें म्हणून खटपटत आहे. पण आवळा देण्याच्या कोरड्या आश्वासनावर युद्ध लढण्याच्या संमतीचा हिंदुस्थानच्या हातचा कोहळा अिंग्लंडच्या हातांत अद्याप पडला नाहीं. अुद्यांच्या स्वराज्यदानाचें आश्वासन देते वेळीं तरी अिंग्लंडनें शुद्ध सदिच्छा दाखवावयाला पाहिजे होती. पण त्या स्वराज्यदानप्रसंगीं हिंदुस्थानचे तुकडे पाडणारी कुऱ्हाड हिंदुस्थानवर कोसळणार असल्याची आपत्ति अिंग्लंडनें देअूं केलेल्या योजनेंत समाविष्ट झालेली असल्याची संकटसूचनाहि क्रिप्स-

साहेबाकडून अिंग्लंडचे वतीनें हिंदुस्थानला मिळालेली आहे. अशा प्रकारें चोहोंकडून कसकशी नि कोणकोणतीं संकटें भावी कालांत आपणांवर येअून आदळूं पहात आहेत हें यथायोग्यपणें निरीक्षण करून या महान् संकटाचें स्वरूप, हिंदूंनीं लक्षांत घेअून तदनुसार आपला पुढील कार्यक्रम आखला पाहिजे.

संकटनिवारणार्थ शक्तीची अुपासना

येवढाच खरा नि अेकमेव मार्ग हिंदूराष्ट्रांपुढें अुभा आहे. ही शक्ति अुपासना म्हणजे काय ? खरा अुपासक तोच कीं जो आराध्यदेवतेशीं तादात्म्य पावतो, देवतारूपच तो बनतो आणि तीच खरी अुपासना. हिंदूराष्ट्रानें शक्ति देवीची अुपासना करणें म्हणजे स्वतः अेक महान् शक्तिरूपांत परिवर्तित होणें होय. तसें झालें तर संकटांच्या कोलाहलाची आरोळी ठिकच्या ठिकाणींच विराम पावेल. जगांमध्यें सर्वच प्राण्यांना आत्मसंरक्षणाचा दैवी हक्क आहे. आणि आत्मसंरक्षणकार्यीं नि संरक्षणकार्यार्थ म्हणून कांहींहि केलें तरी तें मानवी निर्बंधान्वयें-अिंग्लिशांच्या राज्यांतील अिंडियन पिनलकोडानुरूपहि-अपराधांत गणलें जात नाहीं. अेरव्हीं ओरखाडा ओढणें हेंहि अपराधी कृत्य ठरतें. पण आत्मसंरक्षणार्थ प्राण घेतला तरी तो अपराध नसून दैवी हक्काच्या कक्षेंतील पवित्र कर्तव्यच आहे असें सर्व जग मानतें. जर अेका व्यक्तीला आत्मसंरक्षणाचा अशा प्रकारचा हक्क अिंडियन पीनल कोडहि मानतें तर मग अशा व्यक्तींच्या समूहाला-सध्यां अस्तित्वांत असणाऱ्या समूहापुरतेंच नव्हे तर या सांप्रतच्या व्यक्तीसमूहाबरोबर त्यांच्याच पुढील अनंत पिढ्यांतील अनंत वंशीयांच्या आत्मसंरक्षणार्थहि-त्यांचा देश-धर्म-जाति-संस्कृति आदि पवित्रतम ठेव्यांच्याहि संरक्षणार्थ-परनाशार्थ नव्हे तर आपला होअूं घातलेल्या नाशाचे निर्दालनार्थ नि आत्मरक्षण कार्यासाठीं म्हणून स्वीकारलेले मार्ग नि अुपाय हे मानवी पीनलकोड्याच्या नि दैवी संमतीच्या विरुद्ध जातात असें कोणता शहाणा मनुष्य म्हणूं शकेल ? दुसरी गोष्ट अशी कीं दुर्बलाला कोणीहि सहज धक्का देण्याला प्रवृत्त होअूं शकतो. समर्थाकडे डोळा अुघडून बघण्याचेंहि धाडस करण्यापूर्वी दुष्टमन दोनदां विचार करूनच मग काय तें करूं पाहील. हा मनुष्य स्वभाव लक्षांत घेतांहि संकटांना दूरच्या दूर ठेवून जवळ येण्याचें साहसहि तीं संकटें करूं

शकणार नाहींत अशांहिसाठीं नि संकटें प्रत्यक्ष कोसळल्यास त्यांच्या परिपत्यासाठीं सामर्थ्य संपादन वा शक्तिस्वरूप धारणा करणें अपरिहार्य आहे. नि ती शक्ति अेक ध्येय प्रेरित होत, ध्येय प्राप्त्यर्थ अनेक मार्गांचें अवलंबन करीत, मार्गांतील अडथळे दूर करणें—शत्रूचें बल तोडणें—आपलीं बलकेंद्रें वाढवणें —अस्तित्वांत असलेल्या स्वकीय बलकेंद्रांचा सहकार मिळविणें—अित्यादि गोष्टी साधीत राष्ट्राला सामर्थ्य दान करणारे संघटनद्वारांच प्राप्त होअूं शकते. तसें प्रचंड, प्रबळ, शक्य त्या त्या शक्तिकेंद्रांना हस्तगत करून ठेवणारें आपल्या ध्येयाशीं अेकरूप असणाऱ्या संस्थांचा सहकार प्राप्त करून घेणारें आणि अवश्य अशा साधतील त्या त्या साधनानें युक्त असणारें संघटन निर्माण करणें हाच अेकमेव मार्ग या हिंदूराष्ट्रापुढें आहे. (अशा प्रकारचें) हिंदूसंघटन हाच अेकमेव हिंदूराष्ट्राचा तारक मंत्र आहे हें तीन थोर पुढाऱ्यांच्या साक्षीनें सांगून मग पुढील मार्ग आक्रमूं.

संघटनाविषयीं निवडक राष्ट्रभक्तांचे विचार

The Musalmans are taking good care not to yield their communal bias to the claims of Nationalism. The Hindus ought to be above such party considerations but they should not forget that *The chance of Indians getting Swarajya rests on the solidarity of the Hindus who should not endanger their existance by seeking to conciatiate those who refuse to be conciliated.*

" मुसलमान केवळ आपल्या जात्यंधतेच्या कक्षेंतच राहूं अिच्छितात नि राष्ट्रीयतेची किंचित्हि चिंता ते बाळगीत नाहींत. हिंदूंनीं अशा जात्यंध विचारांच्या हीन कक्षेला शिवूंदेखील नये. **परंतु त्यानीं हेंहि विसरतां कामा नये कीं, हिंदूंच्या संयुक्त संघटनशक्तीच्या आधारावरच स्वराज्यसंपादनाचें कार्य सिद्ध होण्याचा संभव आहे. जे मिळूं अिच्छित नाहींत त्यांना मिळवून घेण्याच्या नादांत सांपडून हिंदूंनीं आपल्या अस्तित्वाला किंचित्हि धोका निर्माण होअूं देतां कामा नये.** " (स्वामी श्रद्धानंद). लाला लजपतरायनीं हिंदुमुसलमान अेकीच्या प्रश्नावर निःपक्षपाती दृष्टीनें अभ्यासपूर्वक विचार केला नि नंतर त्याविषयीं आपलें मत देशबंधु दास यांना कळवण्यासाठीं लिहिलेल्या पत्रीं ते म्हणतातः

"हिंदुमुसलमान अेकीच्या प्रश्नानें माझे मनाला ग्रासून टाकलें होतें. आणि तुम्हींहि याविषयीं विशेष गंभीरपणें विचार करा. **गेले सहा महिने मी बहुतेक सर्व वेळ याच प्रश्नाचा अभ्यास करण्यांत घालविला. मुसलमानी अितिहास नि मुसलमानी कायदा** (कुराणप्रणीत कायदा तो मुसलमानी कायदा) याचा खूप अभ्यास करून माझें मत असें झालें आहे कीं हिंदु मुसलमान अेकी शक्यहि नाहीं **नि व्यवहार्यहि नाहीं.**" हें त्यांचें मत १९२४ चे आसपास प्रसिद्ध झालेलें आहे. आणि तें मत आज १९४२ या वर्षीं तर–म्हणजे १८ वर्षांनंतरहि कालालासुद्धां खोटें ठरवितां आलें नाहीं; अितकेंच नव्हे तर त्या वेळेनंतरपासून घडत आलेल्या चढत्या वाढत्या गंभीर पुराव्यांनीं अधिकच ठामपणें तें सिद्ध झालेलें आहे. आणि तरीहि कांहीं हिंदू घरघालूंचीं लोचट मनें तेंच तें हिंदुंमुसलमान अेकीचें कोडगें गाणें गात बसलीं आहेत. पण आपणांला त्यांचेकडे ढुंकून बघण्यासहि वेळ अुरला नाहीं. क्रांतिपक्षांत असलेले महाबुद्धिवान नि प्रतिभाशाली सुप्रसिद्ध देशभक्त **लाला हरदयाळ** यांनीं कॉंग्रेसी राष्ट्रीयतावाद, विश्वबंधुत्ववाद, समाजवाद, अित्यादींशीं कांहीं कांहीं काल समरस होत कार्य करून पाहिलें नि शेवटीं पूर्ण विचारांतीं तेहि हिंदुत्ववादाशीं येअून स्थिर झाले. त्यांनीं हिंदूसंघटनाविषयीं असें म्हटलें आहे कीं "माझी राजकारणसंहिता (टेस्टमेंट) येणेंप्रमाणें आहेः मी घोषित करतो कीं पंजाबसहित (ही पंचनदभूमि वेदभूमि म्हणून प्रसिद्ध असल्यामुळें विशेषपणें अुल्लेखलेली आहे) हिंदुस्थान नि हिंदूजाति यांचें भविष्य पुढील चार खांबावर सुस्थित होणारें आहे—(१) हिंदू संघटन (२) हिंदूराज्य (३) मुसलमानांचें शुद्धिकरण (४) सीमाप्रांत नि अफगाणिस्थान जिंकून त्याहि प्रांतांतील मुसलमानांचें शुद्धिकरण (हे प्रांत दहा अकरा शतकांमागें पूर्ण हिंदूमय होते नि पुढें अरब–अिराणी मुसलमानांच्या बलात्कारी आक्रमणकालीं मुसलमान बनवले गेलेले आहेत). या चार गोष्टी जोंपर्यंत घडवून आणल्या जात नाहींत तोंपर्यंत आपल्या पुत्र–पौत्रादिकांची सुरक्षिति धोक्यांत राहील नि हिंदूजाति सुरक्षित राहणें अशक्य होअून बसेल. हिंदूजातीला अेकमय अितिहास आहे नि तीमधील विविध संस्थांचें अेकरसी मौलिक स्वरूप आहे. पण मुसलमान नि खिश्चन लोक हे हिंदुत्वापासून फार भिन्न होअून

पडलेले आहेत. ते परकीय होऊन बसलेले असून त्यांचें प्रेम अरवस्थान, पर्शिया (अिराण) नि युरोपीय संस्थास्वरूपांवर जडलेलें आहे. म्हणून आपल्या डोळ्यांत जर कांहीं खुपत असलें तर तें काढून ज्याप्रमाणें आपला डोळा आपण त्या त्रासापासून मुक्त करतो, त्याचप्रमाणें या परकीय बनलेल्या स्वकीयांचें शुद्धिकरण करून हिंदुस्थानांतून परकीपणाचें अुच्चाटण केलें पाहिजे. सीमाप्रांत नि अफगाणिस्थान हे पूर्वी हिंदुस्थानचेच भाग होते. पण सध्यां ते अिस्लामच्या छायेखालीं सांपडलेले आहेत. म्हणून ज्याप्रमाणें आपल्या नेपाळमध्यें हिंदुत्वच नांदत आहे त्याचप्रमाणें काबूल नि सीमाप्रांत हे प्रदेश पुन्हां हिंदुत्वाच्या रंगानें रंगविले पाहिजेत. नाहींतर स्वराज्य मिळविणें निरुपयोगी ठरेल. त्या पार्वतीय जाति (काबूल नि सीमाप्रांतीय जाति) या नित्य भांडखोरी नि कलागति करणाऱ्याच रहावयाच्या नि त्यामुळें वारंवार नादिरशहा नि झमानशहाची पुनरावृत्ति होण्याचें भय सतत टिकून राहण्यांचा संभव असावयाचा. यासाठीं हिंदूंना जर आत्मरक्षण करणें असेल तर त्यांनीं काबूल नि सीमाप्रांत जिंकून तेथील लोकांना हिंदुत्वदीक्षाच दिली पाहिजे."

'क्रांतिपक्षाचा प्रणेता, अध्वर्यू नि कर्णधार' म्हणून ज्यांचें वर्णन अनेकांनीं केलें ते **हिंदूराष्ट्रपति स्वातंत्र्यवीर सावरकरहि** रत्नागिरीच्या बंदींतून सुटल्यापासून हिंदुसंघटनाचाच संदेश या गेल्या ४।५ वर्षें या हिंदूराष्ट्राला देत आले आहेत. "आलांत तर तुमच्यासह, न आलांत तर तुमच्यावांचून नि विरोध कराल तर तुम्हांला विरोधूनहि या हिंदूराष्ट्राला पुन्हां अैश्वर्यगिरीवर सुप्रतिष्ठित करण्यासाठीं स्वातंत्र्यसंपादनार्थ संघटित व्हा" अशा अर्थाचा संदेश अनेकशः स्थळीं, अनेक वेळीं लक्षावधींना त्यांनीं अैकविला आहे नि लक्षावधींकडून वृत्तपत्रादि वाचनाद्वारां वाचला गेला आहे. तेव्हां त्यांनीं काय काय म्हटलें आहे हें पुन्हां येथें पुनर्वार अुद्धृत करण्याचें कारण नाहीं. केवळ दिग्दर्शनार्थ वर अेक वाक्य सूत्ररूपांत त्यांच्या संदेशाचा संक्षेपार्थ अुल्लेखला आहे, नि तेवढा पुरे आहे. दिवसें दिवस तो संदेश हिंदूमनें अंतःकरणांत सांठवून घेत आहेत. आणि हींच चिन्हें पुढील भाग्यरवीच्या अुदयकालापूर्वीची आश्वासनदायी सुप्रभात आहे.याच संघटन संदेशरूप तारक मंत्राचा अुपदेश धारण करून हिंदूमात्र अनुष्ठानमग्न झाला पाहिजे. म्हणजे अिच्छित भाग्यदिवस अुजाडल्यावांचून रहाणार

नाहीं. पण हें संघटन, संघटन म्हणून जें म्हणतात तें संघटन म्हणजे काय ? संघटन म्हणतांच प्रत्येकाच्या मनांन कांहीं तरी जाणिवेचा भाव अुत्पन्न होतो. पण संघटन करावयाचें म्हणजे काय करावयाचें असा प्रश्न जर दुसऱ्या कोणी केला अथवा स्वतःच स्वतःच्या मनापुढें अुद्भविला तर त्याचें समर्पक नि सर्वग्राही स्वरूप मनोदृष्टीपुढें यथार्थतेनें येणें अशक्यवत् वाटतें. नि हाच बहुतेकांचा अनुभव असतो. म्हणून संघटनाची साधारणतः रूपरेखेंतच पण यथार्थ कल्पना आपणांला यावी यासाठीं संघटन काय हें पाहूं.

संघटन म्हणजे काय ?

अनेक जणांकडून अनेक वेळीं अेका विशिष्ट गोष्टीचा अुल्लेख होत असतो, नि सर्वसामान्यतः त्याच शब्दानें त्या गोष्टीचा उल्लेख आपण सर्वजण करीत असतां. सर्वजण सदासर्वदा अेखादा शब्द अुपयोजतात येवढ्यावरूनच त्या शब्दाचा यथावत् अर्थ सर्वांना कळत असतोच असें विधान करतां येणार नाहीं. असे जे कांहीं शब्द आहेत त्यांपैकीं संघटन हा अेक शब्द आहे. संघटन म्हणजे अिच्छित ध्येयप्राप्तीसाठीं सामुदायिकरीत्या मनुष्यबलाची अेकसूत्री, अेकध्येयी नि अेकाधिपत्याखालीं वा निवडक प्रातिनिधिक नियंत्रणाखालीं निर्माण केलेली यंत्रणा होय. पण अेवढ्यानेंच भागत नाहीं. कोणत्याहि कार्यसिद्धीला केवळ मनुष्यबल पुरें पडत नाहीं. मनुष्यबल हें मुख्यांतील मुख्य बल आहे. पण तें बल, अितर साधनबल, धनबल, नि विविध कार्यतज्ञताबल यांच्याबांचून लंगडें नि म्हणून यशःसिद्धीसाठीं अपुरें आहे. आपणांला हिंदूसंघटन कोणत्या कार्यासाठीं हवें आहे हें पाहून त्या कार्याला अुभ्या केलेल्या मनुष्यबलाबरोबरच अितर कोणत्या प्रकारची सिद्धता नि साधनानुकूलता पाहिजे हें बघून ती सिद्धता नि ती साधनानुकुलता संपादन करणें हेंहि तितकेंच अत्यावश्य आहे. नाहीं तर नुसता लोकसंग्रह भरपूर संख्येंत आज्ञापालनार्थ सूत्रबद्धतेनें सिद्ध केलेला असला म्हणजे संघटन झालें, नि असें संघटन केलें म्हणजे कार्य साधलें ही समजूत चुकीची आहे. अेका शिस्तींत असलेल्या, अेकाधिपत्याचे वा निर्वाचित प्रतिनिधींचे नियंत्रणाखालीं प्रेरित होणाऱ्या, साधारण सैनिक संचलनानें शिक्षित असलेल्या नि लाखांनीं मोजल्या जाणाऱ्या ध्येयनिष्ठ मनुष्यांचा संस्थाबद्धतेंत संग्रह केलेला असला म्हणजे संघटन झालें, नि असें संघटन बाकी कांहींहि न

करतां वा त्या संघटित सामर्थ्याला आपली कार्यपटुता नि सामर्थ्य अजमावून पहाण्याचे प्रसंग न साधूं देतांच तें तथाकथित संघटन–झालें म्हणजे "सर्व कांहीं आपोआप होतंय!" असें मानणें म्हणजे आपली स्वतःची नि जनतेची फसवणूक करून घेणें नि देणें होय. प्रत्येक देशाला असलेलें स्वातंत्र्य टिकवून राष्ट्र प्रगतिशील नि समर्थ ठेवण्यासाठीं म्हणून जें संघटन अवश्य असतें त्या संघटनाचें खरें स्वरूप पहावयाचें तर त्या देशाचें राज्ययंत्र बघावें. राज्ययंत्रांत जितक्या सिद्धतेचा, विभागांचा, जितक्या प्रकारच्या सामर्थ्यांचा, विद्याज्ञानादिकांचा आदिक समावेश होतो त्या सर्वां मिळून झालेलें असेल तें त्या देशाचें राष्ट्रीय संघटन होय. नि ज्या राष्ट्राला आपलें गेलेलें स्वातंत्र्य कमवावयाचें असेल त्या राष्ट्राला त्याला पारतंत्र करणाऱ्या राष्ट्राच्या विविध सामर्थ्य साधन विभागांनीं संपन्न असलेल्या राज्ययंत्राला–म्हणचे परकीय सरकारला–परिणामकारी शह देतां येऊील अशा प्रकारें अेकाद्दष्टीनें त्याहूनहि अधिक सामर्थ्यादि साधनानें युक्त असें संघटन निर्माण केलें पाहिजे. तरच स्वातंत्र्याची मागणी करण्याचें सामर्थ्य नि योग्यता निर्माण होऊील. आपण याच्या स्पष्टीकरणार्थ आपलें स्वतःच्या राष्ट्राचेंच अुदाहरण घेअूं. राष्ट्रस्वातंत्र्य हें मागून वा प्रेमाच्या कानगोष्टी करीत नि सात्विकतेचे ढोंगाच्या चाळ्यानें मिळत नसतें; शस्त्राच्या धारेंत तें अवतीर्ण होत असतें. मग ती शस्त्राची धार स्वातंत्र्य कमावूं पहाणाऱ्या राष्ट्राची असो वा पारतंत्र्यांत टाकणाऱ्या राष्ट्रावर तिसऱ्या राष्ट्रानें अुगारलेले तरवारीची असो. स्वातंत्र्य हें शस्त्रप्रसंगांतूनच अुद्भुत होत असतें.अिंग्लंडवरील रोमन साम्राज्याची सत्ता प्रत्यक्ष रोमवर अुत्तरेकडून प्रचंड गॉल लोकांच्या प्रखर तरवारीच्या घावाचें आक्रमण झालें तेव्हां डळमळली–कोलमंडून पडली; आणि अिंग्लंड स्वतंत्र झालें. गेल्या जर्मन युद्धाच्या संकटप्रसंगीं हिंदुस्थानला चालू असलेल्या पारतंत्र्याचे स्थितींत ठेवणें शक्य दिसत नाहीसें झाल्यावर शब्दांतच कां होअीना पण वसाहतीचें स्वराज्य दानाचें अुदक अिंग्लंडला सोडावें लागलें. कारण त्या वेळीं जर्मनांच्या साह्यानें हिंदुस्थानचा क्रांतिपक्ष सशस्त्र क्रांतीची भीति निर्माण करूं पहात होता. त्या युद्धांतून सुटका झाल्यावर नि हिंदुस्थानच्या अंतर्गत निर्माण झालेल्या शस्त्रभयाचा अुपशम झाल्यानंतर पुन्हा अिंग्लंडची मूठ आवळली गेली.मुस्लिमांच्या स्वार्थाग्नीला फुंकर घालून तो अधिक भडकविला नि कलहाची तीव्रता वाढवीत

'अेकमुखानें मागा म्हणजे देतों' असें अॅमेरीच्याद्वारां अिंग्लिश राष्ट्र हिंदुस्थानला वेडावीत खिजवूं लागलें. हिंदुस्थानच्या हांतीं स्वराज्याचा वांटा पडणें दुरावत चाललें, पण सध्यां ज्या महान प्रलयकारी भट्टीमध्यें सर्व जगाचें भवितव्य वितळूं लागलें आहे त्या भट्टीची आग आमच्यासुद्धां सर्व साम्राज्याचा बळी घेअूं धांवते आहे–हिंदुस्थानच्या दाराशीं युद्ध येअून ठेपलें आहे, असें पहातांच अिंग्लिश राष्ट्राची पाचावर धारण बसली नि 'हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिलेंच पाहिजे.' 'आपण अितकें दिवस केलेल्या अन्यायाचें परिमार्जन केलेंच पाहिजे.' अित्यादि वाक्यांचा अिंग्लिश राजकारणी लोक पाअूस पाडूं लागले. पुढील कांहीं महिने जगाचें भवितव्य–नि त्याचबरोबर हिंदुस्थानचेंहि भवितव्य–काय ठरणार आहे हें दाखवूं शकतील. त्या जागतिक घटनाप्रवाहावर आपणां हिंदुस्थानवासियांचा सहेतुकपणें कांहींहि प्रभाव पाडण्याचें सक्रियतेचें सामर्थ्य आपणांजवळ आज निर्माण झालेलें नाहीं. हिंदुमहासभादि संस्था आज १०।१५ वर्षें हिंदूराष्ट्राच्या कानीं कपाळीं ओरडत असतांहि नि श्रद्धानंद पत्रादींच्या मधून भावी युद्ध, आणि हिंदुस्थानची संधि या विषयीं 'युद्धाचे वारे नि हिंदुस्थान' आदि लेखांचे द्वारां सुचविलें जाअूनहि आपल्या हिंदूराष्ट्राकडून कांहींच सिद्धता केली गेली नाहीं. नि म्हणून या संधीचा लाभ घेण्यास आपलें हिंदूराष्ट्र आज समर्थ नाहीं. तरीहि या युद्धांतून निर्माण होणाऱ्या जगांत हिंदुस्थान ज्या प्रकारानें नि स्वरूपांत या संकटकालांतून बाहेर पडेल, तो प्रकार वा स्वरूप पूर्ण स्वातंत्र्याचें नसून थोड्या फार प्रमाणांत पण पारतंत्र्याचेंच असण्याचा संभव फार. आणि कदाचित् स्वातंत्र्याचेंहि स्वरूप असलें तरीहि जी गोष्ट परतंत्र स्थितींत जशी अत्यावश्य नि अपरिहार्य ठरते नि असते तीच गोष्ट स्वतंत्र स्थितींतहि स्वातंत्र्यरक्षणार्थ नि राष्ट्रोत्कर्षार्थहि तितकीच नि तशीच अत्यावश्य नि अपरिहार्य असते. ती गोष्ट म्हणजे संघटन हीच होय. वर संघटनाची त्रोटक रूपरेखा दिली आहे. पण तेवढ्यानें संघटनाची यथार्थ कल्पना येणें शक्य नाहीं. म्हणून त्याविषयींची पूर्ण नि सविस्तर नसली तरी (सविस्तरपणें माहिती नि वर्णन द्यावयाचें म्हटलें तर तें अेक स्वतंत्र पुस्तकच होअील. तेव्हां या पुस्तकाच्या कक्षेंत मावेल नि ज्यामुळें साधारणतः यथार्थतेची व्याप्ति स्थूलरूपानें कळून येअूं शकेल तितकी तरी कल्पना) कांहीं प्रमाणांत यथार्थशी नि सुसंगत अशी कल्पना यावी म्हणून साधारण स्वरूपाचें आविष्करण पुढें दिलें आहे.

संघटन स्वरूपाविष्करण
सैन्यविभाग

राष्ट्रोद्धारार्थ संघटन कसें असावें असा प्रश्न उद्भवून नुकतेच मागच्या च्छेदकांत राष्ट्राचें रक्षण–वर्धन नि उत्कर्षार्थ स्थापन झालेलें जें राज्ययंत्र तें राष्ट्राचें नि राष्ट्रार्थ म्हणून असलेलें पूर्ण स्वरूपी संघटन स्वरूप होय ही गोष्ट सूचित केली आहे. त्या संघटनाचें वा राज्ययंत्राचें मुख्य सामर्थ्य नि बल म्हणजे सैन्य होय. सैन्यावांचून राज्य म्हणजे कल्पनासृष्टींतील राज्यस्वरूप होय. तें सैन्यविरहित राज्य 'राज्य' या नांवाला किंचितहि योग्य नाहीं. ती केवळ विटंबना मात्र समजावी. हिंदूंनीं आपलें स्वराज्यसंस्थापनार्थ संघटन करावें याचा अर्थ जर स्वराज्य हवें असेल नि आल्यावर तें टिकवून धरावयाचें असेल तर मुख्यतः सैन्यबल संपादन केलें पाहिजे. सैन्यपद्धतीवर संघटना निर्माण करतां येअील, पण ती खरीखुरी 'सैन्य' या पदवीला प्राप्त होणार नाहीं. तेव्हां सध्यांच्या परिस्थितींत सैन्यांत प्रवेश करून घेअून तें सैन्य आपल्या लोकांनीं भरून काढलें पाहिजे. तरीहि तसें करणें दोनतीन वर्षांपूर्वी सर्वस्वीं अशक्य होतें; आतां मात्र जर्मन–जपान युद्धाच्या आचीनें अिंग्लिश राष्ट्रमन वितळावयाला लागून बोटचेपें होअूं लागलें आहे. नि त्याचाच परिणाम असा झाला कीं सैन्यांत लाखांनीं भरती होण्यास–सैनिक नि अधिकारी नात्यानेंहि–अिंग्लिश हिंदुस्थानच्या राष्ट्रिकांना आवाहनीत आहेत. हिंदूंकडून राजकीय आंदोलन जसजसें अधिकाधिक तीव्र स्वरूपांत होत जाअून स्वराज्याची मागणी नेटानें होअूं लागली तसतशी या मागणीला सैनिक असंतोषाचा पाठिंबा मिळूं नये नि वेळ आल्यास हिंदू आंदोलकांना (चळवळ्यांना) दडपतां यावें (जालियनबागेप्रमाणें) म्हणून सैन्यांत आपल्या प्रेमांतल्या लोकांची–पूर्वबंगाल गव्हर्नर भाषेंत आवडत्या बायकोचे जातीच्या लोकांची–मुसलमानांची–भरती सैन्यांत शेंकडा ६० वर अिंग्लिशांनीं पोचवली होती. पण ती वेळ आतां पालटली आहे. ही संधि साधून सैन्यविभाग–स्थलसेना, जलसेना नि विपदसेना (विमानसेना) हे तीनहि सैन्यविभाग–हिंदूंनीं आत्मसात् केले पाहिजेत. यायोगें प्रत्यक्ष सैन्य शिक्षित होअील, अनेकशः हिंदू अधिकारकार्य करण्यास समर्थ बनतील. या आतांच्या सैन्यांत भरती झालेल्या

नि होणाऱ्या हिंदू सैनिकांस—अधिकाऱ्यांसह—प्रत्यक्ष युद्धाची युद्धदीक्षा मिळेल. नवीनांत नवीन शस्त्रसंभाराशीं निकट परिचय होअील. हे सर्व लाभ या प्रसंगाविना मिळणें नुसतें दुरापास्तच नव्हेत तर अशक्य होतें. याप्रकारें हिंदूराष्ट्रानें आपल्या हिंदूराष्ट्राच्या भावी सत्ताप्रस्थापनकालीं आपली खरीखुरी सैन्यशक्ति वाढवून ठेवल्यासारखें होअील. नि याच गोष्टीची अितर गोष्टींच्या सिद्धतेच्या मानानें अधिकांत अधिक आवश्यकता आहे.

२. हें चालू असतांच सैन्यपद्धतीवर जीं सैनिक दलें नि संघ हिंदुचे चालू आहेत, ते लाखांनीं भरून काढलीं पाहिजेत. हीं दलें नि संघ म्हणजे जाणत्या, शिक्षित नि ध्येयनिष्ठ राष्ट्रभक्तांचीं अर्ध सैन्यरूपी पथकें होत. या महायुद्धकाळीं अिंग्लिशांच्या राज्ययंत्रांत शिथिलता अुत्पन्न झालेल्या क्षणीं नि दुसरें राज्ययंत्र हिंदुस्थानच्या निवासियांचें संरक्षण करण्यास सर्व देशव्यापी स्वरूपांत समर्थ नसल्यामुळें निर्माण होणाऱ्या अराजककालीं, दंगे, हत्त्या, मारामाऱ्या, लुटालूट, चोऱ्या, अत्याचार, बलात्कार, आदिकांना अूत येण्याचा संभव दिसत आहे. अशा वेळीं या हिंदूसंघ—दलांचें पहिलें पवित्र, अवश्यकीय नि अपरिहार्य कर्तव्य हें आहे कीं, या अनवस्था प्रसंगीं आपल्या राष्ट्रांत या थैमान घालूं पहाणाऱ्या आततायांच्या—आजच्या वृत्तपत्रीय भाषेंत गुंडांच्या—अुन्मत्ततेला किंचित्सुद्धां वाव मिळूं शकणार नाहीं अथवा जेथें ही अुन्मत्तता प्रकट होअील तेथें त्या अुन्मत्ततेचें चांगलेंच कांडात काढून—त्याचें निर्दालन करून—पुन्हां असें करण्याचें आततायांचे मनांतहि आणणें अशक्यवत् होअून बसेल. अशा प्रकारें परिणामकारी रीतीनें देशांतील लोकांचें संरक्षण केलें पाहिजे. तरच या संघांचें वा दलांचें अस्तित्व सार्थकीं लागल्यासारखें होईल. जर हीं कर्तव्यें हीं संघवाहीं दलें पार पाडीत नसतील नि पाडणार नाहींत—अलिप्तपणें नुसत्या दिखाअू संघटितपणाचे कल्पनेच्या मिटक्या मारीत राहतील—तर ते अपराधी ठरतील नि ज्या राष्ट्राच्या '**जाति, धर्म नि संस्कृतीचें रक्षण करीत**' स्वातंत्र्यार्थ अेकत्र झाल्याचे वा होत असल्याचें जे समजतात त्या प्रतिज्ञेप्रमाणें त्याच राष्ट्रांतील जाति—धर्म—संस्कृतीचें संरक्षण न केल्याच्या विश्वासघाताच्या पातकाचे धनी ते बनतील. नि राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंपादनालाहि आपणाला असमर्थ ठरवून घेतील. पण ही नुसती चेतावणी आहे. कारण या प्रतिज्ञाबद्ध

संशप्तकांना (अर्थ वा साधयेत्–देहं वा पातयेत्; अर्थतरी साधीन वा देह तरी ठेवीन या भीमप्रतिज्ञेनें बद्ध होऊन जे कर्तव्याच्या रणांत अहमहामिकेनें शिरतात त्यांना संशप्तक म्हणतात. असेंच निर्वाणींचें सैन्य जें दुर्योधनाकडे होतें त्याला हेंच नांव त्यांच्या त्या प्रतिज्ञाबद्धतेच्या व्रतामुळें दिलेलें होतें) या सघां–दलांत येण्यासाठीं त्यांचेवर कोणी बलात्कार केला आहे अशी वस्तुस्थिति नाहीं. तें स्वेच्छेनें नि राष्ट्रभक्तीनें प्रेरित होऊनच संशप्तक बनलेले असावयाचे. तेव्हां अशा राष्ट्रापत्तीच्या काळीं त्यांचीं राष्ट्रभक्त अंतःकरणें आपोआपच उसळून उठतील. आणि राष्ट्ररक्षणकार्यीं रणावतील यांत किंचित्सुद्धां शंका नाहीं. कदाचित् कांहीं अपसमजामुळें वा अितर कांहीं अन्य कारणानें कर्तव्यच्युति होऊं नये, कर्तव्यकल्पनेचा विपर्यास घडूं नये म्हणून चेतावणी अर्थीं वरील दोन शब्द सूचनार्थ लिहिले आहेत. तशी कर्तव्यच्युति होण्याचा संभव आहे म्हणून नव्हे.

संघटनाचा नागर (Civil) विभाग

राष्ट्राच्या संरक्षणप्रसंगीं नि आपत्तिनिवारणाच्या वेळीं (परकीयांचें आक्रमण वा अंतःस्थ बंडाळी आदिक वेळीं) सैन्यविभाग हाच अेकमेवतेनें संकट वा आपत्तिनिवारणाला समर्थ असूं शकतो. पण तो सैन्याविभाग प्रशासनकार्यक्षम होणें शक्य नाहीं. त्याहि वेळीं देशांतील प्रजेचे लोकव्यवहार हे देशाचे हितसंबंधाला परिपोषक राहून सैन्यविभागाला कार्यक्षमतासंपन्न ठेवण्यास अत्यंत अवश्यकीय असा प्रशासनकार्य करणारा नागरविभाग राहिलाच पाहिजे. अितर वेळीं राष्ट्रीय जीवनक्रम अुन्नतिशील नि अुत्कर्षगामी करण्यासाठीं अनेकविध सुप्रयत्नांची अवश्यकता असते. सुप्रयत्न म्हणण्यांत अेक विशेष हेतु आहे. अवश्यकता निर्माण होतांच प्रयत्नांचा आरंभ होणें हें स्वाभाविक आहे. पण प्रसंगानुरोधें नि अवश्यकतानुसार योग्य मार्गावलंबन घडणें हें सर्वस्वीं तज्ञतेनें होणाऱ्या मार्गदर्शनावर अवलंबून असतें. सध्यां हिंदुस्थानांत कोणत्याही गोष्टीच्या योग्यमार्गदर्शनाला तज्ञता अपरिहार्यतेनें अत्यावश्यक आहे ही गोष्ट जणूं सर्व राष्ट्रच विसरून गेल्यासारखें झालें आहे. राष्ट्राच्या जीवनक्रमाचे अनेक पैलू आहेत. राज्यशासन विभाग, व्यापार-व्यवसाय विभाग, कलाशास्त्रादिक विभाग, श्रमजीवि निपुणता विभाग,

विविधज्ञान शास्त्रादि विभाग—या ठोकळ विभागांपैकीं प्रत्येक विभागाचे अनेकशः पोटाविभाग झालेले असतात. अुदाहरणार्थ, पहिला राज्यशासन विभाग घेअूं. यांत विविध राज्यघटनांच्या स्वरूपाची युक्तायुक्तता नि योग्यायोग्यता यथार्थतेनें जाणून आपल्या राष्ट्रांतील समाजाच्या सांप्रतच्या विविध प्रकारच्या मानसिक नि बौद्धिक स्थितींत कोणती पद्धति अधिकांत अधिक अुपयुक्त, अुपकारक, समर्थ नि कार्यक्षम बनेल याचें निःपक्षपात दृष्टीनें निरीक्षण करून तदनुरूप राज्य-यंत्रशासन निर्माण करणें नि तशा प्रकारच्या राज्ययंत्राशीं समरस होअील अशा प्रकारें समाजमनाची स्थिति अुत्पन्न करणें; (२) यापुढें त्या राज्ययंत्राचे हाती राष्ट्राच्या अर्थ विभागाची रचना. तीहि त्या विशिष्ट प्रकारच्या राज्ययंत्राची गाडी सुरळीत चालेल नि तद्द्वारां राष्ट्राचें अुन्नतिसाधन होअील अशा प्रकारें त्या विभागाची मांडणी—आंखणी अित्यादींची योजना तज्ञ लोकांकडूनच होअूं शकेल. (३) राष्ट्राचा शिक्षण विभाग. राष्ट्रांतील अुगवत्या पिढीचें शिक्षण राष्ट्रकल्याणाला पोषक नि वर्धक होअून तिला तेजस्वी, सुसंस्कृत मनस्कता आणून देणारेंच असलें पाहिजे. त्यांतून निर्माण केली जाणारी प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या हितसाधनाबरोबरच कुटुंबपोषणवर्धनार्थ समर्थ नि राष्ट्रसेवाबुद्धीनें परिपूरित असलेली अशीच निर्माण झाली पाहिजे. त्या व्यक्तीचे मनांत स्वतःच्या या हिंदूराष्ट्राची प्राचीनता, महता, श्रेष्ठता ही पूर्णपणें अंकित होअून ती हिंदू-राष्ट्राच्या अितिहासाविषयीं, परंपरेविषयीं, आपल्या राष्ट्रभाषेविषयीं पूर्ण अभिमानी असलेली अशी होत तिला जगाच्या कर्तव्यक्षेत्रांत समर्थतेनें प्रवेश करतां आला पाहिजे. (४) आपले राष्ट्रांवरील निसर्गदेवतेच्या सर्वांगीण कृपेची जाणीव ठेअून त्या सर्व निसर्गसिद्ध संपन्नतेचा लाभ आपल्या राष्ट्राला वैज्ञानिक ज्ञानवर्धनानें कसा करून देतां येअील, आपल्या राष्ट्राला स्वयंपूर्ण बनवीत जगाच्याहि अवश्यकता पुरविण्यास आपलें राष्ट्र कसें समर्थ करतां येअील या चिंतेनें आपल्या विविध भौतिक ज्ञानवर्धनानें त्या हेतूची सिद्धि करण्यांत आयुष्यें वेंचणारे वैज्ञानिक त्या शिक्षणक्रमांतून पुढें आले पाहिजेत अि. अि. प्रकारें राष्ट्राला सर्व शाखांत, शास्त्रांत, कलेंत, विद्यांत, ज्ञानांत पूर्ण निष्णात करून राष्ट्राचा सर्वांगीण अुत्कर्ष साधणारी पिढी निर्माण करणें हा शिक्षणक्रमाचा हेतु आहे. हा हेतु शक्यांत शक्य तितक्या रीतीनें अुत्तम प्रकारें पार पाडून राष्ट्राचा नरनारीवर्ग हा योग्यतम कसा होईल याची व्यवस्था करणारा शिक्षणक्रम बनविणें हें काम

तज्ञतेवांचून कसें होऊं शकेल ? आणि हाच प्रकार अितर अनेकशः युक्त विभागांचा आहे. हे सगळे विभाग यथातथ्यतेनें आंखणें, रचणें, चालविणें नि संयुक्ततेनें परस्परसहाय्यक नि पूरक बनविणें हें काम राज्ययंत्राचें आहे. मग त्या राज्ययंत्राची पद्धति कोणतीहि (राजसत्ताक, अर्धराज्यसत्ताक, प्रतिनिधिसत्ताक, समाजसत्ताक वा तज्ञसत्ताक) असो. अशीच राष्ट्राच्या अितर अंगांचा विचार नि व्यवस्था करावी लागेल. हें कार्य त्या त्या विभागांतील तज्ञावांचून कसें होणार ? आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ प्रयत्न करावयास निघालेल्या राष्ट्रभक्तांवर राष्ट्रस्वातंत्र्य कमाअीबरोबरच तें मिळेल तेव्हां वा आतांच जगाच्या सांप्रत होणाऱ्या अभूतपूर्व मंथनांतून नवनीताप्रमाणें स्वातंत्र्याचा तो गोळा—तें लोणी —हातांत पडतांच म्हणजे आतांच स्वातंत्र्य मिळत्या स्थितींत हीं कामें करणारे तज्ञ जर आपणांत नसतील तर आपणांला स्वातंत्र्य मिळूनहि त्या स्वातंत्र्य-रक्षणार्थ नि त्या स्वातंत्र्याच्या ध्वजाखालीं राष्ट्रोद्धार प्रयत्नकार्यीं ते ते तज्ञ आपण कोठून आणणार ? त्या त्या विभागांची व्यवस्था आपण कशी करणार ? तज्ञतेच्या अभावी परकीयांच्याच तोंडाकडे पहात पुन्हां याला—त्यालाच पाचारण करीत राहणार काय ? हा प्रश्न आमच्या संघटण करूं अिच्छिणाऱ्या संस्थांच्या—मग त्या काँग्रेसादिसारख्या नागर संस्था असोत वा संघदलादि सैनिकरूपाच्या संस्था असोत त्या संस्थांच्या—ध्यानांतून अगदींच निसटलेला दिसत आहे. सध्यां या बेगडी शिक्षणक्रमांतून शिकलेला—मॅट्रिकी वा अर्धमॅट्रिकी असो वा महाविद्यालयीन पदव्यांची लांब वा आखुड अशी अक्षरी माळ नांवामागें लटकविणारा असो—स्वतःला सर्व विषयज्ञ समजतो. कोणताहि प्रश्न त्याच्यापुढें येवो तो तडकाफडकी त्या विषयाच्या चिंध्या अुडवीत आपलें मत ठोकून मोकळा होतो. त्याची बुद्धि अितकी अकुंठित असलेली त्याला वाटते कीं अमुक अेका गोष्टींत आपणांला मत देण्याचा अधिकार वा योग्यता आहे वा नाहीं हा प्रश्नच त्याचे मनापुढें येत नाहीं. प्रत्येक शिक्षित आपणांला सु—शिक्षित म्हणवितो नि लोकहि ढिलेपणानें तसें म्हणतात. आणि तदनुसारे सुशिक्षित म्हणजे सर्वज्ञ अशी भ्रामक समजूत करून घेअून वाटेल त्या विषयावर वाटेल तेव्हां नि वाटेल तेथें चटकन अुत्तर द्यावयाला सिद्ध—तज्ञतेचा आव आणीत तत्त्वातत्त्वानें सिद्ध. आश्चर्य हें कीं अितर कोणत्याहि देशांत तज्ञतेचें अितकें भरमसाट पीक न येतांहि ते देश अुन्नतीच्या शिखराचे पथिक झालेले आहेत नि कांहीं तर जवळ जवळ शिखरस्थ होअूं पहात

आहेत. अितकें लाखांच्या संख्येनें नुसतें कांहीं विषयज्ञच नव्हे तर सर्व विषयज्ञ लोक हिंदुस्थानांत निर्माण होतात नि आमचे देश मात्र देवांनीं या गोष्टींत दरिद्री ठेवावेत यासाठीं कदाचित् अितर देश हिंदुस्थानचा हेवाहि करीत असतील ! अशी शंका येते. पण त्यांच्या मनांत लागलींच दुसराहि विचार डोकावत असेल कीं 'असा हा असंख्य सर्वज्ञ निर्माण करणारा हिंदुस्थान सर्व जगाच्या लाथा खात आहे, हें कसें ? तज्ञ असंख्य निर्माण होअूनहि जर जगाच्या लाथाच खावयाच्या असतील तर ती हिंदुस्थानी तज्ञता देशा-राष्ट्रापासून हजारों कोस-हे देवा !-दूरच ठेव. त्या तज्ञतेचा वासहि आमच्या देशाला लागूं देअूं नकोस' म्हणून अितर सर्व देश देवाची प्रार्थनाच करीत असतील हें मात्र निश्चित ! !

म्हणून आपल्या देशांतील या अज्ञानी अवस्थेला नष्ट करीत नि यथार्थ ज्ञानाचें दारिद्र्य दूर सारीत राष्ट्ररक्षणार्थ, शासनार्थ, वर्धनार्थ, अुन्नत्यर्थ नि अुत्कर्षार्थ लागणाऱ्या अनेकशः ज्ञान-विद्या-कला-शास्त्रादींच्या शाखाप्रशाखांच्या ज्ञानानें संपन्न असे निरनिराळ्या विषयांत नि त्या त्या गोष्टींच्या शाखांत प्रवीणता संपादन केलेले तज्ञ निर्माण करण्याचें कार्य आपल्या या राष्ट्रांत ज्या मानानें अधिक प्रमाणांत होअील त्या मानानें त्या प्रमाणांत आपलें राष्ट्र अुन्नति-अुत्कर्षाच्या मार्गक्रमणाला योग्य ठरेल. कौटुंबिक प्रयत्नाला कौटुंबिक संकल्पानें सिद्ध होणारी योजना अवश्य असते. त्याचप्रमाणें राष्ट्रकार्यार्थ राष्ट्र दृष्टीनें कार्य करण्यास प्रवृत्त झालेल्या संस्था नि संघ आदीनेंच सिद्ध झालें पाहिजे. अशाप्रकारें विविध विविध अधिकारानें नि तज्ञतेनें बोलणा-सांगणारे निर्माण करण्याची कल्पना दिवंगत देशभक्त श्री. गोखले यांना येअून तदर्थ सर्व्हेंटस् ऑफ् अिंडिया सोसायटी ही संस्था काढली होती. नि सर्वच विषयांत नसले तरी कांहीं विषयांत बरीचशी तज्ञता मिळवलेले अभ्यासू विद्वान त्या अेका संस्थेनें पुढें आणलेले आहेत. पण देशाच्या अवश्यकता अनेकविध आहेत. त्या सर्वांची पूर्ति व्हावी यासाठीं फार मोठ्या प्रमाणांत प्रयत्न झाले पाहिजेत. आज देशांत अेकहि संस्था वा संघ असा नाहीं कीं ज्यांनीं कांहीं कांहीं प्रत्यक्ष कार्यक्षेत्रें निवडून त्या त्या क्षेत्रांत आपल्या सभासदांना वा घटकांना कार्यार्थ पदार्पण करावयाला प्रवृत्त वा ओदिष्ट केलें आहे. केवळ संघटित संख्याबलाची संख्या नि व्याप्ति वाढविण्याचे कार्याव्यतिरिक्त संघटित

घटकांना प्रत्यक्ष कार्य असें कांहींहि पुढें ठेवलेलें नाहीं. त्यांनीं आपल्या संघबलाच्या साह्यानें हिंदूराष्ट्राच्या भावी कालीं नि शक्य तर प्रसंग येतांच सध्यांसुद्धां अुपयोगी पडतील अशा प्रकारें विविध क्षेत्रीय तज्ञनिर्मितीचें कार्य हातीं घेण्यासारखें आहे. तसें झाल्यास राष्ट्राची महान् अवश्यकता—ज्यावांचून राष्ट्राचा गाडा अडून पडेल अशा अवश्यकता—दूर केल्याचें महान कार्यपुण्य त्यांचें पदरीं पडेल.

द्विविधकार्यांतील दुसरा अेक महत्त्वाचा भाग

जगांत व्यक्तीच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या जीवनक्रमांत सर्वत्र संघर्ष आहे, मग त्या व्यक्ति—समाज—राष्ट्राची कोणतीहि स्थिति असो. संघर्षांत दोन पक्ष असावयाचेच. अेक स्वपक्ष—दुसरा प्रतिपक्ष. ज्याप्रमाणें आपला स्वपक्ष बलवान्, संघटित नि समर्थ करणें हा अेक भाग अत्यावश्य आहे त्याचप्रमाणें विपक्षाचे विविध प्रकारें आक्रमण कसें अुघड वा गुप्त कशा प्रकारें होत आहे ? हें ओळखून त्या त्या मार्गानें तें त्याचें आक्रमण विफल करणें अत्यावश्यक आहे. अुघड आक्रमणाआधीं त्या भावी आक्रमणाची पूर्वसिद्धता पडद्यामागें होत असते हें अेक नि कांहीं प्रयत्न केव्हांहि अुघड करणें सोयस्कर नसल्यानें गुप्तपणें कपटादि मार्गें विपक्ष आपल्या पक्षाची हानि करीत असतो नि त्याच्या पक्षाचें बल नि सामर्थ्य वाढवित असतो हें दुसरें. हीं दोन्ही प्रकारचीं सामर्थ्यें वाढूं देणें नि त्यांची गुप्त अुपाययोजना यशस्वी होअूं देणें हें आपल्याला घातक होणारें असल्यामुळें जो जो विपक्ष असेल त्याच्या त्याच्या गुप्त कारवाया निरनिराळ्या युक्त्याप्रयुक्त्यानें हुडकून काढून त्यांची माहिती मिळविणें नि त्या कारवाया तशाच प्रकारच्या प्रत्युपायांची योजना करून विफल करीत आपल्या पक्षाला—राष्ट्राला मारक होणाऱ्या विपक्षीय योजना नि हेतु व्यर्थ करणें हेंहि कार्य करणें स्वपक्षाच्या सिद्धतेअितकेंच अत्यावश्य असतें. हें केवळ दिग्दर्शन आहे. या नि अशाच विपक्षांचें बल तोडण्याकडे आपल्या संस्था—संघापैकीं कोणाचेंच लक्ष नाहीं.

स्वतःला मार्ग—अुपाय—कर्तव्यें सुचत नसतील तर आपल्या हिंदूराष्ट्राचे कल्याणावर घाव घालणारे विपक्षीय निरनिराळ्या प्रकारें, अुपायांनीं, मार्गांनीं—गुप्त वा अुघड—कशा कारवाया करीत आहेत यांचें निरीक्षण करून तो कित्ता

आपणहि वळविला पाहिजे. जशास तसें बनावयासाठीं विपक्षीय परका जशा प्रकारचा असेल तशा प्रकारचें ज्ञान करून घेऊन त्या प्रकारचें बनावयास शिकलें पाहिजे, नव्हे बनलेंच पाहिजे तरच आपला निभाव लागेल.

आपल्या अस्तनींतील आग

तर आधीं विझविली पाहिजे. शत्रूहि करूं शकत नाहीं अितकी हानि आपल्यामधील घरभेद्या बुडाअू लोकांकडून होत असते. अुदाहरणार्थ अुर्दूची धोंड हिंदूराष्ट्राच्या गळ्यांत बांधण्यांत अिंग्लिश–मुसलमान गट्टी समर्थ होअूं शकली नाहीं, अितक्या परिणामकारक रीतीनें गांधीद्वारां ती धोंड गळ्यांत बांधली जाण्याचा संभव अुत्पन्न झाला आहे. मागें '**आतां**'च्या प्रकरणीं या गोष्टीचें अुद्घाटन झालेलें आहेच. गांधीनें अुघडपणें 'अुर्दूच राष्ट्रभाषा' असें म्हटल्याचें कोठें आहे? म्हणून विचारणाऱ्या जिभल्या लवलवतील म्हणून अेक ताजें अुदाहरण द्यावयाचा मोह आवरत नाहीं. गांधीला निसरड्या वाक्यरचनेची खोड आहे. पण प्रामाणिक मनुष्याला वकिलीची अपेक्षा नसते म्हणून प्रामाणिक वाचकांना निश्चिति पटावी असें तें वाक्य आहे नि तें हरिजन दिनांक ८।३।४२ च्या पहिल्या पृष्ठावर 'नोट्स्' या मथळ्याखालीं स्वतःच्या स्वाक्षरीनें हीं स्फुटें लिहिलीं आहेत त्यांतील दुसऱ्या स्तंभांत 'अुर्दू मेड अिझी' या मथळ्याखालीं खालील वाक्यें आहेत. तें म्हणतें "Charity begins at home. As I was speaking to Jamanlaljee's friend on the necessity of their learning Urdu if they believed in Rastra Bhasha as recomended by Congress." "**धर्मबुद्धीची सक्रीयता घरापासून आरंभली जाते. जमनालालजीच्या स्नेह्यांशीं बोलत असतां काँग्रेसनें पुरस्कारलेल्या राष्ट्रभाषेवर जर त्यांची निष्ठा असली तर त्यांना अुर्दू शिकण्याची आवश्यकता (आहे)**, यांत अुर्दूचा राष्ट्रभाषा म्हणून स्वतःचा अुल्लेख करतांना काँग्रेसनें पुरस्कारलेली म्हणून विशेषणहि काळजीपूर्वक लावून दिलेलें आहे. म्हणजे शुद्ध हिंदीला 'हिंदी याने हिंदुस्थानी' बनविणें नि आतां अगदीं नंगेपणेंच–'याने हिंदुस्थानी'चा पंचा फेडून टाकून नग्नरूपांत–अुर्दूची राष्ट्रभाषा म्हणून प्रशस्ती करण्याला हे राजकीय बुवा पुढें सरसावले आहेत.

प्रतिपक्ष्यावर घाव घालण्यास अुगारलेल्या 'हाताचे अस्तनींत जर निखारा —जळता अग्नि—असेल तर तो संकटांचा चक्काचूर करण्यासाठीं अुगारलेला हात घाव घालण्यापूर्वीच भाजून निघून लोळा गोळा होअून पडेल. नि म्हणून आधीं या जळत्या नि म्हणून स्वतःचा हात जाळत्या आगीचें तेज हरण करून त्याचा काळाकुट्ट कोळसा बनविणें वा राख झाल्यास फुंकून अुधळून टाकणें हेंच पहिलें अवश्यकीय कर्तव्य आहे. हें विशेषतः हिंदूराष्ट्रकल्याणसाधक संस्थांनीं नि त्यांच्या घटकांनीं आणि सर्व हिंदूमात्रांनीं साधारणतः विशेषपणें लक्षांत घेअून पुढील संभवनीय राष्ट्रहानि नि जीवघेता घात टाळण्यासाठीं तत्काळ प्रयत्नाला लागलें पाहिजे. नि या घातकी प्रयत्नांची नांगी ठेंचून काढली पाहिजे.

आणखी अेक तात्कालिक सावधानता.

सध्यां अिंग्लिश साम्राज्याच्या भोवतीं जो जागतिक युद्धाचा वणवा पेटला आहे त्यानें तें होरपळून निघत असल्यामुळें अिंग्लिशराष्ट्र हिंदुस्थानशीं 'त्वयार्धं मयार्धं' ची भाषा बोलावयास–तडजोड घडवून हिंदुस्थानचें साह्य मिळवावयास —पुढें सरूं लागलें आहे. अशा वेळीं अितके दिवस जिनांचे चाळे चालू देणारे अझादपरिषदवाले मुसलमान, मोमिन मुसलमान, शिया मुसलमान, आतां आणीबाणीच्या वेळीं कदाचित् जिनांचे चाळे चालणार नाहींत नि आपल्या मुस्लीम तोंडाला अगदींच पानें पुसलीं जाण्याचा संभव निर्माण होअील म्हणून जिनाशाही पाकिस्तानच्या विरुद्ध आरोळी मारीत हिंदूंना तुष्ट करूं धांवत आहेत. हेतु हा कीं पाकिस्तान नाहीं तर नाहीं पण पाकिस्तान नांवाच्या अभावीं समंजसपणा दाखविण्याच्या महाकृत्यासाठीं आमच्या मागण्या पुरवून द्या म्हणून हिंदूंना म्हणावें नि त्या पांघरुणाखालीं आपला हेतु सिद्धीस न्यावा असा डाव खेळूं पहात आहेत. नि ही मुस्लिमधार्जिणी अेकीवेडीं भुकेलीं भुतें–कॉंग्रेसी मंडळी–घरबुडव्या गांधीपट्टींत येअून याहि संधीला हिंदूराष्ट्रहिताचा खेळखोळंबा करून टाकतील. म्हणून हिंदूराष्ट्रहितसाधकांनीं अत्यंत जागरूक राहून हा घातघेता कॉंग्रेसी डाव अुधळून लावला पाहिजे. पाकिस्तानी धुळीच्या लोटामागें मुसलमानांचा हा फड नि कॉंग्रेसी गट संगनमतानें हिंदूराष्ट्राचें हितशत्रुत्व केल्यावांचून राहाणार नाहींत. तेव्हां सावधान !

हिंदूराष्ट्रहितसाधकांचीं मनें कॉंग्रेसी राष्ट्रघातक्याविषयीं किती नि कशीं क्षुब्ध झालीं आहेत याचें अेक अुदाहरण देणें अवश्य वाटतें. कालिकतला **हारावेंजर** म्हणून अेक पत्र निघत असतें. त्यांत नुकताच अेक 'आबस्क्युअर हिंदू' या टोपण नांवाखालीं अेक लेख आलेला आहे. त्या लेखांत पाकिस्तान नि तत्सम हिंदूराष्ट्रघाताविषयीं लिहितांना " *If any of our Hindu leaders were to yield an iota to you (Jinnah) in this matter of Pakistan, I assure you that there are silent young men, who will strike down such leaders as if they were mad dogs.* " (जिनाला अनावृत्त पत्र लिहिलें आहे त्यांत) **म्हटलें आहे कीं, 'हिंदू नेत्यांपैकीं कोणी जर पाकिस्तानच्या संबंधांत किंचित्सुद्धां तुमच्या मागणीचा पाठपुरावा केला तर त्यांची पिसाळल्या कुत्र्यासारखी गत करण्यास–त्यांना चेचून टाकावयास–तरुण लोक सिद्ध आहेत'** आणि तो लेखक आणखी शेवटीं म्हणतो कीं **'जिनाजी! लोचटपणानें नि भीरुतेनें तुमच्याकडे पुन्हां पुन्हां बोलणीं करण्यास येण्याची खोड कांहीं हिंदू नेत्यांना लागलेली आहे. पण अशी बोलणीं करणाऱ्यांना घोड्याच्या चाबकानें फडसीत तुम्हांकडे त्यांना येणें अशक्य करून टाकण्याची वेळ आतां निश्चयानें आली आहे.'** अितकीं हिंदूमनें या कॉंग्रेसी घरबुडाअू धोरणावर नि तें धोरण चालविणाऱ्यांवर चिडून गेलीं आहेत. हें त्यांनींहि अजून तरी अुमजावें, आणि राष्ट्रद्रोहाच्या पापापासून परावृत्त व्हावें. आतांपर्यंत आतांच्या धुंदल्या परिस्थितींत निकटच्या भावी काळीं जागतिक घटनांचा ओघ जगांतील महायुद्धाच्या धबक्यांनीं कशा प्रकारें नि कोणत्या दिशेला वळेल, युद्धांनीं काय परिस्थिति निर्माण होअील, युद्ध चालू असतांच हिंदुस्थानला कोणत्या स्थितीला तोंड द्यावें लागेल–जंपान्यांचे पाय रोवले जातील वा अिंग्लिश–जपानी युद्ध हिंदुस्थानच्याच भूमीवर माजविलें जाअील, वा हे दोघे सुंदोपसुंद हिंदुस्थानाबाहेर झगडत असतां हिंदुस्थानांत हिंदूराष्ट्राच्या अकल्याणांत आपला स्वार्थ साधणाऱ्या आततायांचा धिंगाणा चालू होअील, किंवा यांतच आणखी कांहीं गोंधळ होत पश्चिमेकडील जर्मनीची मुसंडी आशियांत पोंचून तुर्की, अिराणादि मुस्लिम राष्ट्रांशीं संगनमत करीत हिंदुस्थानवर आक्रमण करावयाला जर्मनी त्यांना प्रवृत्त करील—हें कांहींच कोणाला सांगतां

येणें अशक्य आहे. पण अेक मात्र निश्चित सांगतां येतें कीं सध्यां मिळत असलेल्या नि हातीं घेतां येण्यासारख्या सत्ताकेंद्रांना हिंदूंनीं हस्तगत करून घ्यावें, सैन्यांत लांखावारी शिरून सैन्यबल हातीं घ्यावें, पोलिसी शक्तीहि हस्तगत करून घ्यावी, सर्व देशांत संघ दलांचें जाळें विणून तद्वारां हिंदूराष्ट्र अेकजीवि, अेकसूत्री, नि **परस्पर ईर्षाशून्य राष्ट्रभक्तीनें** परिपूरित करून सोडावें नि येअील त्या परिस्थितीचा लाभ घेत नि त्यांतील हिंदूराष्ट्राला प्रतिकूल होणाऱ्या शक्तींना विरोध करीत आपला पुढचा सुरक्षित जीवनाचा मार्ग काढावा यावांचून या धूम्रमय स्थितींत कोण नि काय सांगूं शकणार !

बुद्धिभेद करणाऱ्या कांहीं युक्तिवादांचें निरसन.

१:—डॉ. अंबेडकरांनीं आपले पुस्तकांत मुसलमान हें स्वतंत्र राष्ट्र आहेत असें व्या. सावरकरांनीं म्हटल्याचें सांगून म्हणतात कीं, दोन राष्ट्रें मान्य करून मग त्यांना अेकत्र राहण्यास सांगतात–मुसलमानांनीं वेगळे होण्याला विरोध करतात हें कसें ?

अुत्तरः—डाक्टर महाशय हे पुष्कळ बहुश्रुत असून त्यांचें वाचन दांडगें आहे. पण प्रत्येक मनुष्य जेवढें कांहीं वाचतो तें सर्व वाचन पूर्णपणें पचवून प्रत्येक विषयासंबंधीं बिनचूक मतें बनवतोच असें नाहीं. तीच गोष्ट राष्ट्रविषयक प्रश्नांत त्यांची झालेली आहे. कोणत्याही देशांत त्या देशांतील मूळचे धनी जातीय बहुसंख्यांक लोक अमतात नि तें राष्ट्र त्या बहुसंख्यांक जातीचें राष्ट्र असतें हा जगव्यापी नियम, रूढी, अितिहास असून या गोष्टीला जगाची मूकच नव्हे तर जगांतील राष्ट्रव्यवहारतज्ञांची 'राष्ट्रसंघ' लीग ऑफ नेशन्स्द्वारां संमति आहे. या धनी जातीशीं धर्म–संस्कृति–भाषा या दृष्टीनें जे भिन्न नि म्हणून परराष्ट्रीय असलेले पण त्या देशांत स्थायी निवासी झालेले आहेत अशांना अल्पसंख्यांक अशी संज्ञा देअून त्यांच्या त्या विभिन्न वा परकीय राष्ट्रीयतेला त्या राष्ट्राचे बहुसंख्यांक लोक चिरडून टाकण्याचा संभव राहूं नये म्हणून त्या अल्पसंख्यांकांना–त्यांच्या अंतर्गत व्यवहारापुरतेंच भाषा–धर्म–नि संस्कृतिविषयक गोष्टींत संरक्षण दिलेलें असतें. पण राष्ट्रीय

कार्यक्षेत्रांत त्यांनीं आपल्या भाषाधर्मादिकांचा 'बीचमें मेरा चांदभाअी' न घुसडतां त्या त्या राष्ट्राच्या भाषा, अितिहास, परंपरा, नियम, अभिमान केंद्रें, राष्ट्रपुरुष आदिक स्वराष्टीय नात्यानें स्वीकारलेच पाहिजेत. नि तरच त्या अल्पसंख्यांकांना त्या त्या राष्ट्रांत धनी म्हणून नव्हे पण धन्यासारखें राहतां येअील. ज्याप्रमाणें भाडेकरी भाडें देत आहे, घराची हानि करीत नाहीं, घरधन्याला अुपसर्ग वा हानि पोंचवित नाहीं तोंपावेतों धन्यासारखा राहूं शकतो—पण धनी म्हणून मात्र नव्हे. तद्वतच कोणत्याहि राष्ट्रांतील अल्पसंख्यांक हे परराष्ट्रीय निश्चित पण म्हणून त्यांना रष्ट्राचा तुकडा पाडूं न देतां अथवा आपणच त्यांना निराळा विभाग तोडून देअून वेगळें होण्यास साह्य न करतां त्यांच्या अंतर्गत कारभारापुरतें धर्म भाषादिकांना संरक्षण देत राष्ट्रीय क्षेत्रांत राष्ट्रीय गोष्टी सर्व प्रकारें स्वीकारावयास लावून त्यांना राष्ट्रीयाप्रमाणें वागविणें हेंच राष्ट्रहिताचें कर्तव्य नि (लीग ऑफ नेशन्स्) राष्ट्रसंघानें ठरविलेल्या 'जागतिक न्याया'नुसारें न्याय्य ठरतें. तेव्हां हिंदुस्थानांतहि मुसलमान हिंदूराष्ट्रीय नसून विभिन्न राष्ट्रीय—भिन्न राष्ट्राचे—आहेत ही गोष्ट स्पष्ट आहे. नि म्हणूनच त्या भिन्न राष्ट्रीय अल्पसंख्यांकांना आपलें वैशिष्ट्य संभाळण्यासाठीं अंतर्गत व्यवहारापुरतेंच संरक्षण देत त्यांना सर्व हिंदुस्थानभर, हिंदूराष्ट्रभाषा, हिंदूराष्ट्रेतिहास, हिंदूराष्ट्रपुरुष, हिंदूराष्ट्रपरंपरा, हिंदूराष्ट्रनिर्बंध पाळीत नि हिंदूराष्ट्राशीं अेकनिष्ठ राहातच हिंदूस्थानांत निवासिलें पाहिजे. तसें त्यांना करावयाला भाग पाडण्यांतच 'जागतिक न्याय' नि हिंदूराष्ट्रविषयक आपलें कर्तव्य केल्यासारखें होअील नि त्यांतच हिंदूराष्ट्राचें नि त्यांचेंहि कल्याणच आहे.

अशाच प्रकारें ते चीन, जपान, सार्व्हिया, बल्गेरिया, अिंग्लंड आदिक देशांत गुण्यागोविंदानें नांदत आहेत. त्यांची अेरेरावी वा प्यानअिस्लामी लहर तेथें चालतहि नाहीं अथवा चालविण्याची अिच्छाहि त्यांना होत नाहीं. ते त्या त्या राष्ट्राची भाषा, अितिहास, परंपरा, निर्बंध, वैशिष्ट्यपालन करीत त्या राष्ट्राचे प्रामाणिक घटक रूपानें तेथें राहत आहेत. नि त्यामुळें त्यांच्या मुसलमानीपणाला बाध आला आहे असें ते अथवा प्यानाअिस्लामी रंगांत रंगलेले कट्टर मुसलमानहि मानीत नाहीं. मग त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि त्यांना वागावयाची अिच्छा कां न व्हावी ? पण अशी अिच्छा न होण्याची नि प्यानअिस्लामी वृत्तीनें धुमाकूळ माजविण्याची लहर त्यांना पुढील गोष्टीमुळें होत आहे. ती कारणें येणें प्रेमाणें:—

(अ) चीन, जपान, प्रमाणें हिंदूराष्ट्रहि त्यांच्या प्यानअिस्लामी लहरी चालू न देण्याअितकें संघटित नि प्रबळ नाहीं.

(आ) अुलट या हिंदूराष्ट्रांतील हिंदूराष्ट्रीकच त्यांच्या राष्ट्रघाति प्रवृत्तीला पोषक अशी वर्तणूक करून त्यांना प्रोत्साहवित आहेत. त्यांच्या राष्ट्रविघाति असणाऱ्या ज्या ज्या मागण्या पुढें येतील त्या त्या मागण्यांना निरपवादरीत्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष संमति देण्यास या हिंदुस्थानराष्ट्राचें कल्याण करण्याचा आव आणणारी कॉंग्रेसच तरतरलेली आहे. तेव्हां मुसलमानी राष्ट्रघातिवृत्तीला अूत न आला तरच आश्चर्य !

(अि) आणि याच गोष्टींत अिंग्लिशांचीहि आंतून मिळणारी फूस नि सुधारणा देते वेळीं मुसलमानांच्या या राष्ट्रविरोधी वृत्तीचा लाभ घेत राष्ट्र निर्बल नि निःसत्व करण्याचा अिंग्लंडचा अट्टाहास चालू आहे.

हीं तीन कारणें हिंदूराष्ट्राला घातक ठरत आहेत. पहिलीं दोन कारणें नाहींशीं करणें हें आपणां हिंदूराष्ट्रीयांच्या हातीं आहे नि हीं दोन कारणें नाहींशीं झालीं म्हणजे या युद्धामुळें शक्तिपात झालेले दीन अिंग्लिशराष्ट्राचेहि ते घरफोडीचे चाळे आपोआपच बंद पडतील. तेव्हां हिंदूराष्ट्रानें आपले हातीं असलेले हिंदूराष्ट्रासाठीं प्रचंड सामर्थ्यसंपादनाचें कर्तव्य पार पाडावें म्हणजे बहुतेक आपत्तींचें मूळ अुपट्टून फेंकून दिल्यासारखें होअील नि पुढचा मार्ग सुकर झालेला दिसेल.

२:—"हिंदुस्थानांत म्हणजेच हिंदूराष्ट्रांत मुसलमान हे अल्पसंख्य आहेत. नि त्यांना जगाच्या नियमाप्रमाणें (राष्ट्रसंघानें मान्य केलेल्या) नि अितिहासपरंपरेनें रूढ असल्याप्रमाणें (जसें हिंदुस्थानांत पूर्वी पारशी–यहुदी विषयीं हिंदूराष्ट्रानें वर्तन केलें तद्वत्) मुसलमानांच्या धर्म–संस्कृतीला अंतर्गत व्यवहारासाठीं नि तितक्याच पुरतें संरक्षण हिंदूराष्ट्रानें द्यावें. पण पंजाब, काश्मीर, सिंध, सीमाप्रांत, बंगाल या भागांत हिंदू अल्पसंख्य आहेत. त्यांनाहि आपण त्या त्या प्रांतांत संरक्षण मागावें असा युक्तिवाद कांहीं कावेबाज मुस्लिम नेते नि भोळेभाळे हिंदू करतात. पण या गोष्टींत फार मोठें भय लपलेलें आहे. ते हिंदूंच्या ध्यानीं येत नाहीं. तें भय कोणतें हें आपण पाहूं.

(अ) संरक्षण म्हणजे ज्या अल्पसंख्य जातीला संरक्षण द्यावयाचें, ती जाती खरी राष्ट्रीय नसून परराष्ट्रीय आहे नि त्याच्या परकीय धर्म–संस्कृति-- भाषादिकांवर बहुमताच्या दडपणानें अन्याय होऊं नये, आणि त्या अल्पसंख्याकांना आपापसांत त्या त्या गोष्टीच्या अनुसारें अंतर्गत व्यवहार सुखानें करतां यावे म्हणून जें संरक्षण द्यावयाचें तें होय. हें वर अुल्लेखलेलें प्रांत हे हिंदूराष्ट्राचेच विभाग असल्यामुळें तेथें हिंदू जरी अल्पसंख्य असले तरी ते अल्पसंख्याक जातीचे नसून बहुसंख्याक जातीय आहेत; नि म्हणून त्यांना संरक्षणाची अवश्यकताच नाहीं. कारण सर्व राष्ट्रभर संस्कृति, भाषा, अितिहास, परंपरा, राष्ट्रपुरुषांचे अुत्सव अित्यादि सर्व हिंदूराष्ट्रीय दृष्टीनेंच असावयाचे. तेव्हां याहि प्रांतांत सर्व राष्ट्रीय व्यवहार हिंदूराष्टीय दृष्टीनेंच व्हावयाचे असल्यानें हिंदू जातीला या संबंधांत संरक्षण घेण्याचें कारणच नाहीं. त्यावर निर्देशिलेल्या प्रांतांत मुसलमान जरी बहुसंख्य असले तरी ते अल्पसंख्याक जातीय असल्यामुळें त्यांना राष्ट्रीय क्षेत्रांत सर्व हिंदूराष्ट्रीय दृष्टीच्याच स्वीकाराव्या लागतील–**अथवा स्वीकारणें भाग पाडावें लागेल.** आणि त्यांच्या अंतर्गत व्यवहारापुरतें त्यांनीं आपली धर्म–संस्कृति आदिकांविषयीं सर्व राष्ट्रसंमत संरक्षण कक्षेंत राहून अिच्छानुरूप सुखेनैव व्यवहार करावा. हाच नियम अनुसरावा लागेल. अुलट—

(आ) जर हिंदूंनीं संरक्षण मागावयाचें असें म्हटलें तर जी आपत्ति हिंदुस्थानवर आज कोसळूं पहात आहे तें पाकस्तान या आपल्या 'संरक्षण मागण्याच्या' मूर्खपणानें आपण होअून ओढवून घेअूं. कसें तें पहा. संरक्षण घेणारी जाति तत्वतः १. त्या त्या प्रदेशाला परकीय आहे असें मान्य केल्यासारखें होतें. २. याचा अर्थ तो तो प्रदेश ज्या बहुसंख्य जातीपासून संरक्षण मागावयाचें तो प्रदेश त्या जातीचें राष्ट्र आहे असें मान्य करण्याचें कार्य आपोआप घडून येतें. ३. त्यामुळें त्या त्या प्रदेशांत–प्रांतांत–हिंदूराष्ट्रीयता नाहींशी होअून राष्ट्रीय क्षेत्रांत मुसलमान बहुसंख्य जातीची भाषा, अितिहास, परंपरा, राष्ट्रपुरुष, संस्कृति आदिक राष्ट्रीय ठरून नि सर्वत्र प्रमुखपणें व्यवहारावी लागण्याचा प्रसंग येतो. आणि हिंदूराष्ट्रीयता सार्वजनिक नि राष्ट्रीय क्षेत्रांतून तिरोहित होअून तेथें तत्त्वतः नि व्यवहारतः मुस्लिमराष्ट्रीयता म्हणजे त्याचे नामकरणाप्रमाणें पाकिस्तान राष्ट्रीयता न कळत पण आपले हातानें स्थापन केल्याचें पाप आपले

हातून घडून हिंदुस्थानचे आपोआपच तुकडे पाडल्यासारखे होतात. मुसलमानांना नि आपल्या अितर हितशत्रूंना हेंच हवें आहे.

(अि) नि म्हणून आपणांला हिंदुस्थानांत कोठेंहि अल्पसंख्य म्हणून संरक्षण मागण्याचा प्रसंग निर्माण होणार नाहीं अशीच आधींपासून अतीव सावधानता घेतली पाहिजे. म्हणजे हिंदुस्थानच्या सर्व भागांमधून निरपवादरीत्या हिंदूराष्ट्रभाषा, हिंदूराष्ट्रेतिहास, हिंदूपरंपरा, हिंदूराष्ट्रपुरुष मान्यता, हिंदूसंस्कृति, हिंदूराष्ट्रीयशिक्षण, आदिक हिंदूराष्ट्रीय गोष्टींचें स्वामित्व, राष्ट्रीयक्षेत्रांत पूर्णपणें स्थापित केलें पाहिजे. तरच आपलें हिंदूराष्ट्राचें खरें राष्ट्रीयजीवन, वर्धन नि परिपोषण अक्षुण्ण राखण्याचें श्रेय मिळेल.

३. **'संख्याबलाच्या प्रमाणांत सत्ता'**:— हें हिंदूराष्ट्रीयक्षेत्रांत सूचि-प्रवेशानें शिरकाविलें जाणारें विषबीज आहे. संख्याबलाच्या प्रमाणांत सत्ता म्हटलें कीं अेकाहून अनेक संख्याबलें आहेत नि ती सत्तासंपादनार्थ परस्पर विरोधात्मकस्पर्धा करीत आहेत हें स्पष्ट आहे. अशा स्थितींत संख्याबलाचे प्रमाणांत मिळालेल्या सत्तेचा अुपयोग ती ती जाती आपल्या जातीच्या सत्तावर्धनाकडे, वर्चस्व वाढविण्याकडे, दुसऱ्या जातीचें महत्त्व कमी करण्याकडे म्हणजेच राष्ट्रांतील अेकराष्ट्रीयता मोडून भिन्नराष्ट्रीयतावर्धनाला वाव देण्याकडे करणार हें अुघड आहे.

सध्यां हिंदुस्थानांत मुसलमान हे हिंदूराष्ट्रीयत्वाची अक्षुण्णता मोडून त्या हिंदूराष्ट्रीयतेच्या शरीरांत प्यान अिस्लामी वृत्तीनें विषाचा संचार करूं पहात आहेत. आणि त्यांचे हातीं येणारी सत्ता 'संख्याबलाच्या प्रमाणांत' मुसलमान म्हणून देण्याची मान्यता देतांच वर २ क्रमांकांत जी आपत्ति वर्णिली तीच आपत्ति याहि धोरणानें अुत्पन्न होअील. हिंदुस्थान राष्ट्रांत हिंदूराष्ट्रीय सरकारांत हिंदुस्थानांतील सर्व लोक समान भूमिकेनें वागाविले जाअून केवळ शासनकार्यांतील योग्यता नि गुण यावरच नोकऱ्या नि अधिकार मिळतील. तेथें ही वा ती जाति अशा प्रकाराला किंचितसुद्धां वाव रहाणार नाहीं. प्रत्येक राष्ट्रीय अधिकारस्थानावर गुण नि योग्यतेच्या पायावरच केवळ येअूं शकेल. तो हिंदूराष्ट्राच्या सरकाराचा नोकर असेल. तो कोण्या अेका जातीच्या पक्षपात-दृष्टीनें त्या अधिकाराचा दुरुपयोग करूं शकणार नाहीं. तसें झाल्यास तो त्या

अधिकारास अपात्र ठरेल. अशी व्यवस्था झाल्यासच हिंदूराष्ट्रीयता अतुट नि अभंग राहील. जात्यंधतेच्या विषबीजाचा वारा हिंदूराष्ट्रीय क्षेत्रांत कोणत्याही निमित्तानें किंचित्हि घुसूं देतां कामा नये. आणि जेथें जेथें तो अपरिहार्यतेनें नि अवश्यतेनें परकीयांकडून वा स्वकीय घरबुडव्याकडून घुसविला गेला असेल तेथून तेथून तो संधि साधीत निखडून टाकला पाहिजे. यांतच तरणोपाय आहे.

शुद्ध, निर्भेळ नि अखंड राखीत जात्यंधतेच्या विषाचा फासहि स्पूर्शूं न शकलेले हिंदुस्थानराष्ट्राचें राष्ट्रीयक्षेत्र हिंदू राष्ट्रीयतेच्या रंगानें पूर्णपणें रंगवून टाकण्यांतच या राष्ट्राचा खरा भाग्योत्कर्ष सांठविलेला आहे. अन्यथा सांप्रतच्या जात्यंधतेच्या स्वरूपाचा विचार करतां नाशाच्या जबड्यांत हें हिंदूराष्ट्र सांपडल्या-वांचून राहणार नाहीं. ही आपत्ति टाळण्याचा सवाअी भगीरथ प्रयत्न प्रत्येक हिंदूराष्ट्रीयानें व्यक्तिशः नि सर्वांमिळून संघटितपणें कसून केला पाहिजे तरच हिंदूराष्ट्र तारण होअील.

४. 'आधीं हिंदी मग हिंदू'पणाचें वेडः—हाहि अेक रोग हिंदू मनाला जडलेला आहे. या देशांतील अितिहासपूर्वकालापासून अेकरसीपणानें निवसलेली नि आतां परकीय विषाक्ततेनें तो अेकरसीपणा मोडल्यामुळें बहुसंख्यपणाला पोंचलेली धनि—जाति म्हणजे हिंदू—जाति हीच आहे. बाकी सर्व अल्पसंख्य होत. राष्ट्र बहुसंख्यांकांचें असतें हा जागतिक अितिहास, समज नि नियम आहे. त्याअन्वयें नि पूर्वीपासूनच धनीपणा असलेली हिंदूजाति ही या राष्ट्राची धनि--जाति असल्यामुळें हें राष्ट्र हिंदूराष्ट्रच आंहे. नि तदनुसार या देशाचें नांवहि हिंदुस्थान--हिंदूंचें स्थान-असेंच न्याय्यतः असल्यानें जगानें स्वेच्छेनें म्हणा वा भाग पडून म्हणा स्वीकारलेलें आहे. अशा स्थितींत 'मी हिंदू आहे' म्हणणेंच आपलें राष्ट्रीय नांव सांगणें आहे. ती भूमिका टाकून हिंदु-मुसलमान आदिक स्वकीय परकीयांचें मिळून धर्मशाळेसारखें हें राष्ट्र आहे असें बुद्धिभ्रंशामुळें कल्पून त्या धर्मशाळा राष्ट्राचा घटक नात्यानें आधीं हिंदी नि मग हिंदू असें म्हणण्याचें वेड पसरलेलें आहे. पण यांत काय घोटाळा होतो हें त्या भोळ्या भाबड्यांच्या लक्षांत येत नाहीं. जर हें हिंदी राष्ट्र असेल तर मग हिंदू होणें हें अराष्ट्रीय ठरेल. नि जर हें वस्तुतः हिंदूराष्ट्र आहे त्या दृष्टीनें ही म्हण घेतली तर आधीं मी अराष्ट्रीय नि मग राष्ट्रीय असें म्हटल्यासारखें होणार आहे. अेवंच वर जी 'आधीं

हिंदी नि मग हिंदू' ही म्हण जी अगदीं बुद्धिवानांच्याहि तोंडीं चुकत्या नि भ्रामक कल्पनेमुळें बसली आहे ती किती अर्थहीन बडबडीसारखी आहे. तेंव्हां जाणत्या लोकांनीं यांतील मूर्खपणा नि निरर्थकपणा ध्यानीं घेऊन ती सोडून द्यावी म्हणजे या म्हणीबरोबरच त्यांचे डोक्यांतून चुकीच्या कल्पनेचें अुच्चाटण होअील नि लोकांनाहि खऱ्या कल्पनेचें आकलन करण्यास साह्य दिल्यासारखें होअील.

वर ज्या चार गोष्टी नि त्याविषयींचें स्पष्टीकरण दिलें आहे त्या सर्व गोष्टी नि त्यांचीं स्पष्टीकरणांसह अुत्तरें ज्यांत सांपडतील असें अेक जगप्रसिद्ध राष्ट्राचें अुदाहरण येथें खालीं दिलें आहे. त्यावरून राष्ट्र म्हणजे काय, राष्ट्रांत विभिन्न राष्ट्रीयता असली तरी त्यांची व्यवस्था कशी लागली जाते, राष्ट्राची राष्ट्रीयता त्या परराष्ट्रीयांनाहि कशी मानावी लागते अित्यादि सर्व गोष्टी यथावत् समजतील आणि त्यावरून आपल्या राष्ट्राच्या अनेक भानगडींचे नि घोटाळ्यांचे वाटणारे प्रश्न कसें कृत्रिम आहेत नि त्यांचा बाअू न करतां वर दिलेल्या अुदाहरणांत नि जगांतील अितर देशांत ज्याप्रमाणें बहुसंख्य अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडविला तसा तो येथेंहि सोडवावयाचा ठरविला तर हिंदुस्थानचा जो आज अेक मोठा कूटप्रश्न होअून बसला आहे तो तसा किंचित् सुद्धां वाटणार नाहीं. तें अुदाहरण म्हणजे

अमेरिकन राष्ट्र

होय. अमेरिका हें खंड फार मोठें नि त्याचे भागहि अनेक. पण अमेरिका म्हणतांच अुत्तर अमेरिकेंतील कानडा देश सोडून जो अर्धा दक्षिणेकडील भाग अुरतो नि जो अमेरिकेची संयुक्त संस्थानें–'**यू. अेस्. अे.**–' या नांवानें प्रसिद्ध आहे तोच स्थूल मानानें घेतला जातो. या संयुक्त अमेरिकेंत वा संक्षेपार्थी म्हणावयाचें तर 'अमेरिकें'त अनेक संस्थानें आहेत. या **यू. अेस्. अे.** मध्यें युरोपांतील बहुतेक प्रमुख देशांतील लोक तेथें जाअून निरनिराळ्या स्वतंत्र गटानें तेथें भिन्न भिन्न भागांत जाअून राहिले नि तीं तीं त्यांचीं स्वतंत्र संस्थानें झालीं. त्या राष्ट्राच्या जन्मापासून तों आतांपर्यंतचा अितिहास देण्याचें हें स्थळ नाहीं. आजची व्यवस्था कशी आहे हें आपल्या आवश्यकते-पुरतें सांगितलें म्हणजे पुरें. हे निरनिराळे गट म्हणजे युरोपांतील निरनिराळे

राष्ट्रांचे गट होय; आणि म्हणून स्थूल मानानें निरानिराळीं राष्ट्रेंच आहेत. पण त्या अमेरिकेंत अितरांच्या तुलनेनें अँग्लो सॅक्सन म्हणजे ग्रेटब्रिटन निवासियांची संख्या अधिक आहे. म्हणून त्या सर्व संस्थानांत त्या त्या लोकांची आपापली अिटलियन, फ्रेंच, जर्मन, आदिक भाषा चालत असल्या तरी राष्ट्रीय भाषा या नात्यानें सर्व अमेरिकेंत, अिंग्लिश लोक बहुसंख्यांक आहेत याच केवळ अेका गोष्टीचे बलावर अिंग्लिश भाषाच राष्ट्रभाषा नात्यानें स्वीकृत झाली आहे. अिंग्लिश परंपरा, अिंग्लिश धर्ममत (प्राटेस्टंट), अिंग्लिश भाषा, अिंग्लिश अितिहास आदिक सर्व कांहीं अिंग्लिश राष्ट्रीयत्व म्हणून स्वीकृत झालेलें आहे. प्रत्येक गट आपापली भाषा, परंपरा आदिक आपापसांत ठेवूनहि राष्ट्रीय क्षेत्रांत सर्व कांहीं जें जें अिंग्लिश राष्ट्रीय आहे त्याचा त्याचा ते स्वीकार करते झाले. आणि अमेरिकेंत अिटालियन, फ्रेंच, जर्मन आदिक लोक असूनहि बहुसंख्य अिंग्लिश आहेत म्हणून तें राष्ट्र अिंग्लिश राष्ट्र म्हणून ओळखलें जात आहे. तेथील अिंग्लिश लोक अमेरिका अिंग्रजांची, अमेरिका हें अिंग्लिश राष्ट्र आहे, येथली राष्ट्रभाषा अिंग्लिश आदिक विधानें करतात नि तीं तशीं त्यांनीं विधानें केलीं तर त्या गोष्टीला कोणीहि कम्युनल, अनन्याशनल, फूलिश (जात्यंधतेचीं, अराष्ट्रीय, मूर्खतेचीं) विधानें म्हणत नाहींत; कारण त्यांचें तें म्हणणें यथार्थ आहे असें मानलें जातें. वास्तविक युरोपांतील सर्वच राष्ट्रें जवळ जवळ अेकाच काळीं तेथें वसाहती करतीं झालीं. ते सर्व तेथें स्वतंत्रपणें निवसले नि पुढें अेकत्र झाले. नि आपल्यांतील आपल्याबरोबरच आलेले पण अधिक संख्येंत असलेले अिंग्लिश लोक आहेत म्हणून आपापल्या कक्षेंत आपलें आपलें वैशिष्ट्य राखूनहि संयुक्त राष्ट्रीयक्षेत्रांत अिंग्लिश राष्ट्रीयता सर्वांनीं स्वीकृत केली आहे. अशा स्थितींत त्या अल्पसंख्याकांवर अन्याय झाला आहे वा बहुसंख्य अिंग्लिशलोक त्यांच्यावर आपलें वर्चस्व लादीत आहेत असें कोणीहि मानीत वा म्हणत नाहींत.

त्याचप्रमाणें हिंदुस्थानचें कां नसावें? हिंदुस्थानांत हिंदू केवळ संख्येनें अधिक आहेत अितकेंच नसून अितिहासालाहि ठाअूक नाहीं अशा अतिप्राचीन कालापासून अेकमेवतेनें हिंदू येथें नांदत आहेत. नि मुसलमानीपणा, खिस्तीपणा आदिक विभिन्नतारूप परकीयता मागाहून आगांतुकपणें प्रवेश करती झाली; अर्थात् ती परकीयता अुपरी आहे. हिंदुस्थान हा अनादिकालापासून हिंदूधर्म,

हिंदूसंस्कृति, हिंदूभाषा, हिंदूपरंपरा, हिंदूअितिहास, नि हिंदूजाती यांसह हिंदूराष्ट्र रूपानें अेकरसीपणें निवसत आहे. नि आज जरी त्याचे राष्ट्रकारण क्षेत्रांतील अेकरसीपणा बिघडला असला तरी अनेक पटीनें बहुसंख्याक अवस्थेंत आपलें स्वत्व राखीत टिकून राहिला आहे. तो तसाच हिंदूराष्ट्र नात्यानेंच सदासर्वकाळ टिकून राहील–टिकून राहिला पाहिजे. हा हिंदुस्थान हिंदूराष्ट्र नात्यानें हिंदूंचाच होता—हिंदूंचाच आहे नि हिंदूंचाच राहील. मग अशा या विधानाला आणि निश्चयाला स्वार्थलंपट परकीय वा घरघालू नि परधार्जिणें स्वकीय कितीहि निंदोत वा नांवें ठेवोत.

बेडकें कितीहि ' डराव ' ' डराव ' करूं लागलीं तरी गजराज ज्याप्रमाणें ' डराव'ची डर किंचित्हि न बाळगतां तळ्यांत यथेच्छ विहार करीतच राहतो, त्याचप्रमाणें या हिंदूराष्ट्राचे स्वामि या नात्यानें सर्व हिंदुत्वाच्या लक्षणांसह हिंदूजाति नांदत राहून जगाच्या जगद्गुरुत्वाच्या श्रेष्ठपदावर या हिंदुराष्ट्राला पुन्हां सुप्रतिष्ठित केल्यावांचून कधींच राहणार नाहीं.

या अीश्वरमान्य महदाकांक्षेच्या परिपूर्तीसाठीं सांप्रतच्या संकटांच्या चक्रव्यूहांतून हटातटानें सोडविणाऱ्या पार्थाची भूमिका घेत नि योगेश्वर श्रीकृष्णाच्या ' ये यथा मां प्रपद्यते तान्स्तथैव भजाम्यहम् ॥ ' च्या श्रीकृष्णोपदेशाला मार्गदर्शक करीत हे हिंदूमना अुत्तिष्ठत ! (अूठ !) जाग्रत ! (खडबडून जागा हो !) नि संकटाच्या छाताडावर पाय देत अिष्टसाधनार्थ सवाअी भगिरथप्रयत्नांची कास धर आणि प्राप्य वरान्निबोधत (आणि अभिष्ट ध्येयसिद्धी करून घे !) ! !

अशा प्रयत्नशीलवंतांचेंच सारथ्य करण्यास श्रीकृष्णभगवान् सदासर्वदा सिद्ध असतात ! !–नव्हे सिद्ध होअून सारथ्यार्थ अुभे आहेत ! !



REFBK-0006268

— मालेचें प्रथम पुष्प —

— हिन्दूंनों ! सावधान ! !

लेखिका — **सौ. सावित्रीदेवी मुकर्जी**

अनुवादक — **श्री. बाबुराव केळकर**

....." हिन्दूसंस्कृतीचें संरक्षण नि हिन्दूसमाजाचें संघटण यांचे परस्पर संबंध नि महत्त्व कोणत्या शास्त्रीय दृष्टीनें रगहे यांचें विवेचन, लेखिकेनें सूत्ररूपानें नि भावनेच्या आहारीं न जातां केवळ शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलें असल्यामुळें अभ्यासकांना त्याचें महत्त्व विशेष आहे असें **केसरी**कार म्हणतात.

.....हिन्दूसमाजावर आक्रमण करावयास निघालेल्या प्रतिस्पर्धी समाजापासून रक्षण करण्यासाठीं आज हिन्दूसमाजानें काय केलें पाहिजे हें लेखिकेनें स्पष्टवक्तेपणानें नि अंतःकरणाच्या तळमळीनें सांगितलें असल्यामुळें हा ग्रंथ सार्यंत सर्वांगसुंदर, अुद्‌बोधक नि विचारप्रवर्तक झाला आहे.....असें **विविधवृत्तकार** म्हणतात.

....." मानवहिताच्या दृष्टीनें हिन्दूधर्माचें मूल्यमापन " नि " हिन्दूराष्ट्राचें समर्थन " हीं प्रकरणें तर विशेष साधलीं आहेत ..... असें **धर्मवीर भोपटकर** म्हणतात.

.....याची भाषा प्रतिपादित विषयास साजेशी, अुत्तेजक, व घटीत आहे. ग्रन्थकर्तीचे कळकळीचे विचार मनास लावून घेण्यासारखे आहेत.....असें **श्रीमन्त सरदार माधवराव किबे लिहितात.**

.....हें पुस्तक म्हणजे हिन्दूंना केलेली भावनामय विनंति नसून तर्कशुद्ध नि अुत्तम आधारावर आधरलेलें विवेचन करून हिन्दूसंस्कृतींतिल जें जें अुच्च, चांगलें नि टिकाअू आहे तें तें नि हिन्दूराष्ट्राची कल्पना यांचे तैलबुद्धीनें विवरण केलें आहे. अितकेंच नव्हे तर हिन्दूंची सामाजिक अधोगति, त्यांचा पूर्वीचा हिन्दुत्वाचा तेजस्वीपणा घालविणारा पुराणमतवाद अित्यादीवर प्रकाशही पाडला आहे. नि अितकें असूनही हिन्दूंनीं आपल्या अुत्कर्षाचें शिखर गाठलेंच पाहिजे असें हिन्दूसमाजाला आग्रहानें आणि अत्यंत आशावादीपणानें विनविलें आहे. असलें हें हिन्दूंच्या बुद्धीला नि भावनांना प्रबल चालना देणारें पुस्तक..... सध्यांच्या आणीबाणीच्या स्थितीची जाणीव हिन्दूंना करून देअून त्यांना भगीरथ प्रयत्नार्थ अुत्तेजित करण्याचे कार्यीं अुद्यत झालेल्या कार्यकर्त्यांसाठीं तर विशेष अुपयुक्त आहे.....असें **संपादक "मराठा"** कळवितात.